# अग्निमानविद

## (Part 1)

**Agnimanvida is a physician who knows Agni of Body and Agni of Medicines**




**Free Version**

**With help of this book you will become master of Medicines and master of Diseases**

**- By Dr. Bhalchandra Mahamuni (M.D. Ayurveda Mumbai)**

# अग्निमानविद

आयुर्वेद धर्म। आयुर्वेद कर्म।।
आयुर्वेद वर्म। जीवनाचे।।

आधुनिक आयुर्वेदक्रांती कारकांना
समर्पित

''मोठाल्या क्रांन्त्या या तलवारीपोक्षा तत्वांनीच घडविल्या जातात,
पण तलवारी शिवाय त्या तत्वांचा जय होत नाही''

-वि.दा. सावरकर

# अनुक्रमणिका

औषधाचे नाव


औषधी करण प्रयोजन

शोधन प्रक्रियेचे महत्व

शोधन व मारण विधी

पारद शोधन

हिंगुळ शोधन

ताम्रशोधन

लोह शोधन व मारण

मण्डुर शोधन

नाग, वंश, जसद शोधन व मारण

त्रिवंग

सुवर्ण माक्षिक शोधन व मारण

अभ्रक शोधन व मारण

गैरीक शोधन

कासीस

शंख शोधन

प्रवाक

हरताळ

मन:शिल

सोमल

कलखापरी

शिलाजित

मृगशृंग मारण

# अनुक्रमणिका

औषधाचे नाव


ऊेळ्ळउ  शोधन
बचनाग शोधन
गुग्गुळ शोधन
हिंग शोधन
लसुण शोधन
धोता बी शोधन
टंकण शोधन
कुचला शोधन
भल्लातक शोधन
औषधी करण प्रयोजन
शोधन प्रक्रियेचे महत्व
शोधन व मारण विधी
पारद शोधन
हिंगुळ शोधन
ताम्रशोधन
लोह शोधन व मारण
मण्डुर शोधन
नाग, वंश, जसद शोधन व मारण
त्रिवंग
सुवर्ण माक्षिक शोधन व मारण
अभ्रक शोधन व मारण
गैरीक शोधन
कासीस

# अनुक्रमणिका

औषधाचे नाव

शंख शोधन
प्रवाक
हरताळ
मन:शिल
सोमल
कलखापरी
शिलाजित
मृगशृंग मारण
जेवाळ शोधन
बचनाग शोधन
गुग्गुळ शोधन
हिंग शोधन
लसुण शोधन
धोता बी शोधन

कज्जली निर्माण विधी
हिंगुलोत्थ पारद निर्माण विधी

कृपीपक्व रसायन निर्माण विधी
रससिंदुर
ताम्रसिंदुर
सुवर्णराज वंगेश्वर
समीरपन्नग

# अनुक्रमणिका

औषधाचे नाव

गुग्गुळ युक्त औषधे :-

गुग्गुळ परीचय

फलत्रिकादी गुग्गळ

फलत्रिकादी गुग्गुळ + शुल्ब

फलत्रिकादी गुग्गुळ + जिंगी

गोक्षुरादी गुग्गुळ

गोक्षुरादि गुग्गुळ + चातुर्थक

गोक्षुरादि गुग्गुळ + महामृत्यूंजय रस

सिंहनाद गुग्गुळ

पंचकषाय गुग्गुळ

त्रयोदशांग गुग्गुळ

महामंजिष्ठादि काढा गुग्गुळ

# औषधीकरण प्रयोजन

चतुर्णा भिषगादीनां शस्तानां धातुवैकृते।
प्रवृत्तिर्धातुसाम्यार्था चिकित्सेह्यत्यभिधीयते।।
च.सू. ९।५

चरकाचार्यांनी चिकित्सेची व्याख्या वरील प्रमाणे केली आहे. भिषक (वैद्य), द्रव्य (औषध), उपस्थाता (परिचारक), आतुर (रोगी) यांच्या सहाय्याने आतुरामध्ये निर्माण झालेले धातुवैषम्य (विकारो धातुवैषम्यं) दूर करून त्यांच्यामध्ये साम्य (साम्यं प्रकृतिरूच्यते निर्माण करणे या प्रक्रियेस चिकित्सा संबोधले जाते.

आजच्या युगामध्ये चिकित्सेचे चतुष्पाद हे परिपुर्ण मिळणे अवघड आहे. वैद्य हा बहुश्रुत, दुष्टकर्मा, दाक्ष्य व शौच निर्माण होत असावा या बाबत शंका वाटते ? आज आयुर्वेद शास्त्रावर विश्वास असणारा व आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमास येऊन मी आयुर्वेद चिकित्साच वापरण असे छाती ठोक म्हणणारा विद्यार्थी मिळणे अवघड वाटते. याला रूग्ण कमी पाहणे व प्रथम पासून आधुनिक शास्त्राचा पगडा असणे हे महत्वाचे कारण.

जर शुद्ध आयुर्वेदीय वैद्याकडे आयुर्वेद शिकण्यास जावे तर तेथे वैद्य ओषधे घोटून घेतो व पुड्या बांधवयास लागतात म्हणुन अनेक विद्यार्थी जात नाहीत. परंतू माझ्यामते गुरूकडे खल मारल्याशिवाय आयुर्वेद कळत नाही, यामुळे आयुर्वेद चिकित्सा करणाऱ्या वैद्याच्या खल हा अविभाज्य घटक आहे. पुड्या बांधण्याचे म्हणालं तर वैद्याच्या चिकित्सामंदिरामध्ये त्याच्या प्रत्येक पुडीमागील विचार आपणास घ्यायचा असतो व दोषांच्या अवस्था पहायला शिकायचे असते म्हणून औषधीकरणाच्या प्रयोजनामध्ये सुरवातीलाच मी माझ्या विद्यार्थी मित्रांना तसे आवाहन करतो.

द्रव्य (भोषज) हे चतुष्पादामधील दुसरे व अतिशय महत्वाचे पात्र आहे.

''बहुता तत्र योगत्वं अनेक विध कल्पना।
संपच्चेति चतुष्को ऽयं द्रव्यांणा गुण उच्चते।।
च.सू. ९।७

किंवा

बहुकल्प बहुगुण संपन्न योग्यम औषधम्।

वा.सू. १

चरक व वाग्भट वरील शब्दात द्रव्य (भेषज) या चतुष्पादातील घटकाची महती वर्णन करतात.

आयुर्वेद चिकित्सा करिताना तीन गोष्टींना अधिक महत्व आहे.

१) वैद्याचे निदान

२) औषधे

३) ओषधे देण्याची विधी

आपल्या औषधाची कार्यकरण्याची शक्ती (वीर्य) ते देताना त्या सोबत अनुपान योजण्यास त्याचे सर्व गुणधर्म, त्याची मात्रा या सर्व गोष्टी चिकित्सकास माहितच हव्यात यासाठी एक उदाहरण दृष्टान्त म्हणून घेऊ. सीमेवर लदणाऱ्या योध्यास त्याच्याकडे असणाऱ्या शस्त्राची सर्वतोपरी माहिती असते, नसेल तर तो करून घेत असतो यासाठीच त्याला विशिष्ट प्रशिक्षण कालावधी दिलेला असतो आपल्या बंदुकीमधून गेलेली गोळी किती अंतरापोर्यंत जाऊ शकेल, ती शत्रुच्या वेध घेतल्यानंतर तो मरेल का जखमी होईल (वीर्य) शत्रुस संपुर्ण मारण्यास किमान किती गोळ्या माराव्या लागतील, वेगवेगळ्या स्थानानुसार त्याचा काय काय परिणाम होईल, कोणत्यावेळी बॉम्बचा वापर करावा कोणत्यावेळी संगीन वापरावी याचेच प्रशिक्षण तो घेत असतो अगदी त्याच स्वरूपात वैद्य आयुर्वेदाचे प्रशिक्षण घेत असतो अगदी त्याच स्वरूपात वैद्य आयुर्वेदाचे प्रशिक्षण तो घेत असताना औषधाची कार्मुकता, वेगवेगळ्या स्त्रोतांवर त्याचा परिणाम कसा होतो. एकच औषध वेगवेगळ्या व्याधींवर कसे उपयोगी पडेल, रूग्णाच्या प्रकृतीनुसार औषधामध्ये कोणते बदल आवश्यक आहेत यासारख्या अनेक गोष्टी औषधामध्ये कोणते बदल आवश्यक आहेत यासारख्या अनेक गोष्टी औषधाबाबत ठरवीत असतो व या सर्व गोष्टीमध्ये त्याच्या पाठीमागे दोनच गोष्टी असतात. एक म्हणजे त्याच्या गुरूंची त्याच्यावर विश्वास दाखवणारी, मार्गदर्शक पाठीवरील थाप व दुसरी म्हणजे वृहवयी व लघूत्तयी (संहिता ग्रंथ)

संहिता ग्रंथ म्हणजे कधीही न संपणारा अमृत कलश यामध्ये डोकावून पहिल्यानंतर कोणाच्या हाती कोणते अमृत लागेल याचा नक्की नेम नाही म्हणुन माझ्या प्रत्येक विद्यार्थी मित्राने या अमृतरूपी सागरात अनेक वेळा डुं डुं मनसोक्त डुंबावे.

चिकित्सेमध्ये असणारे या स्वरूपाचे ओषधी महत्व पाहुन प्रत्येकास औषधी करणाची आस निर्माण झाली असेलच.

औषधीकरण करताना अनेक छोट्या मोठ्या गोष्टी आपणास शिकण्यास मिळतात, औषधीकरण हे एक शास्त्र व कला आहे.

'संस्कारी हि गुणान्तराधानमुव्यते' या सूत्रानुसार ७ निसर्गामध्ये आढळणाऱ्या पांच भौतिक औषधांवर वेगवेगळे संस्कार करून ते शरीर साम्य बनवणे अशा स्वरूपाचे प्रयोजन औषधीकरणाचे असते.

चरक, वाग्भटांनी चिकित्सा वर्णन करत असताना प्रमुख्याने वनस्पती द्रव्यांचा अधिकार उपयोग केलेला दिसतो, वनस्पती या शरीरसाम्य होण्याकरीता जवळच्या, विषौषधींना फक्त संस्काराची गरज, विविध द्रव्यामाध्ये विरघळुन जाण्याचे त्यामध्ये असलेले सामर्थ्य यामुळे एकाच द्रवाच्या अनेकविध कल्पना करून ते वापरता येते म्हणून यांचे वर्णन केले आहे.

सिध्द संप्रदायानी पारदाच्या वापरास सुरवात केल्यानंतर
'एकडसौ रसराजशरिरमअजरामरंकुरूते।'
अनेक खनिज युक्त पदार्थ त्यांच्यावर संस्कार करून वापण्यास सुरवात झाली यामध्ये ९ महारस, उपरस, साधारणरस, धातू, उपधातू, रत्ने, उपरत्ने, सुधावर्ग, प्राणीज कल्प अशा अनेक गोष्टींचा (द्रव्यांचा) आयुर्वेद चिकित्सेत वापर होू लागला

लोहानां मारणं श्रेष्ठं सर्वेषां रसभस्मना।
मूलिभिर्मध्यमं प्राहु: कनिष्ठः गन्धकादिभि:।।
अरिलोहेन लोहस्थ मारण दुर्गुणप्रदम।।
र.र. समूच्यय ५।१४

अशा प्रकारे खनिज द्रव्यांमध्ये असणारे दोष पूर करण्यासाठी वनस्पती द्रव्यांच्या सहाय्याने त्याचे शोधन व मारण केले जाते त्यावेळी त्याचे शोधन किंवा मारण अयोग्य झाल्यास त्याचे वाईट परिणाम शरीरावर दिसल्या शिवाय रहात नाहीत यामुळे स्वतः औषधीकरण करण्याचे महत्व पटते यावेळी ग्रंथोक्त परिक्षणे करून घेणे आवश्यक असते.

औषधे बनवत असताना शोधन, मारण, द्रवाचे कल्प बनवताना ज्या ज्या ठिकाणी विशिष्ट संयोग आवश्यक असेल तेथे तो करणे (आप्पा यासाठी त्रिभुवन किर्तीचे उदाहरण कायम देता) यानंतर पूट संस्कार, अग्निचे मान कसे असावे, (औषधीकरणात अग्निचे विशिष्ट महत्व) भैषज्य कल्पना करताना त्या त्या कल्पनेच्या सिद्धी परिक्षा पाहणे. औषधे उन्हामध्ये पाळवावे की सावलीत, निर्माण करताना रुग्णास देण्याची मात्रा, औषधे करताना पाळावयाची दक्षता व सुचिर्भूतपणा या सर्वांचा समावेश होतो.

औषधाची पाठ निश्चिती करत असताना ग्रथकर्त्यांनी अनेक गोष्टींचा विचार केल्याचे आढळुने येते यात प्रधान द्रव्य, प्रयोजक द्रव्य, प्रधान द्रव्याच्या गुणास सहाय्यक करणारे सहाय्यक द्रव्य स्त्रोतोगामित्व प्राप्त करून देणारे द्रव्य, विषद्रव्यास प्रतिकारक द्रव्य, योगवाही द्रव्य, संरक्षकद्रव्य, संयोजक द्रव्य अशा अनेक गोष्टींचा विचार कत्वाचा पाठ बनवताना प्रमाणसह निश्चित केलेला असतो. असे असले तरी या सर्व प्रक्रिया व्यवस्थित होण्यासाठी महत्वाच्या असतात म्हणून औषधीकरण या प्रकियेस महत्व असते.

शेवटी आप्पा औषधीकरण करताना वापरत असलेले नियम सांगून या लेखाचा समारोप करतो.

१) औषधी कल्प करताना संयोगास अत्याधिक महत्व असून योग्यरीतीने संयोग करून तो तयार करावा.

२) औषधी करणात स्टीलचे साहित्य वापरू नये त्याऐवजी लाकडाचे वापरावे.

३) उन्ह, सावली, दिवस व रात्र यांचा औषधी द्रव्यावर होणारा परिणाम अभ्यासूनच ते वाळवावे व संरक्षण करावे.

४) यांत्रिक पद्धतीने तयार केलेली चूर्णे हीनवीर्य झाल्यामुळे त्याच्या भरडीची भावना त्या पूर्णास जरून द्यावी.

५) प्रत्येक ओषध शोधन करण्यापूर्वी त्यामधील भौतिक अशुद्धी दूरकरून ते शोधिन करावे.

# शोधन प्रक्रियेचे महत्व

शोधन व्याख्या :

द्रव्यामधील अनावश्यक आगदुर करणे, त्यामधील दोषांचे नियमन करणे, गुणांचा विकास व वर्धन करणे, द्रव्याची कार्मुकता अपेक्षित स्वरूपाची घडवणे यास शोधन म्हणतात.

शोधनाचे बाह्यशोधन व आभ्यंतर शोधन अशा दोन प्रमुख विधी आहेत. द्रव्यामध्ये सहजअशुद्धी, रासायनिक अशुद्धी व भौतिक अशुद्धी अशा तीन प्रमुख प्रकारच्या अशुद्धी असतात, भौतिक अशुद्धीमध्ये द्रव्य संग्रह व्यवस्थित न केल्याने योग्य काळजी न घेतल्यामुळे माती, वाळु, मेलेले कीडे, लाकडाचे भुस्से या सारखे मल दोष असतात. शोधन करताना सर्वप्रथम द्रव्यामधील ही अशुद्धी दूर करावी.

पार्थिव खनिज धातुंमध्ये असणारी विकृती रासायनिक संबोधली जाते यास वन्हीदोष म्हणतात व ती दूर करण्यास या द्रव्यांचे वनस्पतीमध्ये शोधन सांगितले जाते.

वत्यनाथ, जेपाळ आदीद्रव्यांमध्ये स्वभावत:च विष असते त्यामुळे या सहज अशुद्धी असून याकरिता (बहुतेक) प्राणीज द्रव्यात त्यांची शोधने सांगितली आहेत.

शोधन प्रक्रियेमध्ये १४ प्रकार वर्णन केलेले आढळतात, १) प्रक्षालन २) निष्कासन ३) निमज्जन ४) निर्वापण ५) पाचन ६) पातन ७) भर्जन ८) भावन ९) शोषण १०) स्वेदन ११) मर्दन १२)मूर्च्छन १४) पृथ्यकरण

वरील प्रक्रियांच्या आधारे द्रव्यांची शुद्धीकरून ती शरीरसात्म्य बनविली जातात.

खनिज पदार्थ हे कठिणतम तमोबहुल असुन त्यांचा संघात अधिक दृढ असतो या द्रव्यांचा दृढ संघात कमी करून खजिन द्रव्याचे परमाणू विलग करून त्याचे शरीरसात्म्य भस्म बनवण्यास शोधन प्रक्रियेची नितांत आवश्यकता वाटते. औषधींचे शोधन करताना प्रत्येकास याचा अनुभव येतो.

रसशास्त्रामध्ये वर्णन केलेल्या विशिष्ट प्रकारानुसार शोधन प्रक्रियेबाबत अनेक विचार मनात येतात.

काही ठिकाणी शोधन करताना दोळायंत्रात अशुद्ध द्रव्याची पोट्टली बांधून त्याच्या सहाय्याने शोधन करण्यास सांगितले आहे.

काही द्रव्यांना खलामध्ये घेऊन त्याचे मर्दन करावयास सांगितले आहे. काहीचे इतर द्रव्य मिसळून अग्निवर पचन करावयास सांगितले आहे.

गंधकांसारखे द्रव्य कोणत्या स्वरूपाच्या व्याधीमध्ये वापरायचे हे पाहून त्याची दोन प्रकारे शुद्धी वर्णन केली आहे.

शंखासारखी द्रव्ये रात्रीच्या वेळीस ताकामध्ये ठेवण्यास सांगितले आहे. थर बचनागासारखी सहज विषारी स्वरूपाच्या द्रव्यांची शुद्धी करून सुद्धा त्याचे विषारी गुणधर्म घालवण्यास शास्त्रकार टंकण व मिटे यांचा उपयोग सांगतात.

अशा प्रकारे औषधीकरणास शोधन प्रक्रियेस मानाचे स्थान आहे व या अशुद्धी दूर झाल्या नाहीत तर त्याचा परिणाम मानवी शरीरावर व्हायचा रहात नाही.

सप्टेंबर २००४ मध्ये चिकित्येतील धातुकल्प (परभणी) राज्यस्तरीय चर्चासत्रात सर्व वैद्यांनी काढलेल्या निष्कर्षानुसार Yes, Metals are toxic but when they are not processes according to shashtra & not given according to their matra

अशा स्वरूपाचा असून तो येथे नमुद करावा वाटतो.

# पारद शोधन विधी

रसशास्त्रामध्ये पारदास अनंत महत्व आहे. ग्रंथामध्ये पारदावर एकूण १८ संस्कार करावयास सांगितले आहेत. यापैकी देहसिद्धी करता पहिले आठ संस्कार तर लोहसिद्धीकरता सर्वच्या सर्व १८ संस्कार करण्यास सांगितले आहे.

परंतु हे अष्टसंस्कार करण्यास कष्ट, वेळ व पैसा या तीनही गोष्टी अधिक खर्च होतात याकरिता हि आजकाल हिंगुलोत्य वारद वापण्यात येतो त्याची पुढीलप्रमाणे फलश्रुती वर्णन केली आहे.

'उर्ध्वपातन यंत्रेण ग्राह्यः स्यात निर्मलोरसः।
कंचुकैःनागवंगादयैः निर्मुक्तो रसकर्माणि।।
विनाकर्माष्टकेनैव सूतोऽयं सर्वकर्मकृत।
रसेंद्रसार संग्रह

उर्ध्वपातन विधीनुसार नाग, वंग व कंचुक दोषांनी वर्जित असा पारद हिंगुळापासुन मिळतो व याकरीता अष्टसंस्कार करावे लागत नाहीत म्हणून या पद्धतीने मिळवलेला पारदावर आप्पा स्वेदन व मर्दन हे दोन संस्कार करावण्यास सांगताना हिंगुलोत्य वारद निर्माण विधी पुढे सविस्तर आला असून या ठिकाणी फक्त दोन संस्कारांचे वर्णन करीत आहोत.

स्वेदन संस्कारः-

आवश्यक घटकः

१) पादर - १ भाग
२) सैंधव - १/१६ भाग (१६० ग्राम - १० ग्राम)
३) रूईची पाने
४) पोट्टली
५) माठ (दोलायंत्र)

कृती : सर्व प्रथम धोतराची एक पार पदरी पोट्टली तयार करून घ्यावी. त्यामध्ये रूईची पाने अशा पद्धतीने घालावीत जेणेकरून पारद पोट्टलीमध्ये ओतल्यानंतर त्यामधून खाली सांडणार नाही.

एक माठ घेऊन त्यामध्ये पारदाच्या १/१६ भाग सैंधव मिसळलेले पाणी घ्यावे व तो चुलीवर ठेवावा.

यानंतर पोट्टलीमध्ये हिंगुळोल्थ पारद घालवा, घालत असताना सावकाश कोणतीही घाई न करता घालावा जर तो सांडला तर त्याचे बारीक गोळे होऊन ते टपटप उड्या मारतात व आपले डोळे, पाठ भरून येतात, संपूर्ण पारद पोट्टलीमध्ये घातल्यानंतर त्यास गाठ मारावी व दोलायंत्रास अडकवतो त्याप्रमाणे आडव्या दांड्याला अडकवावी. यावेळी पोट्टलीचा पारद असलेला सर्व भाग माठातील पाण्यात बुडालेला असावा परंतू तो तळास टेकलेला नसावा यानंतर माठास मंदाग्नि द्यावा, मंदाग्नि देत असताना माठातील पाणी उकळू नये तर त्यामधून फक्त वाफा येतील याच प्रकारे अग्नि द्यावा. काहीवेळानंतर माठामधील पाणी कमी होईल त्यावेळी त्यामध्ये बाहेरून गरमच पाणी ओतावे, कारण थंड पाणी ओतल्यास द्रावणाचे तापमान कमी हातो व योग्य प्रकारे स्वेदन होत नाही. पाणी ओतताना माठास धक्का न लावता ओतावे. अशा प्रकारे ३ तास मंदाग्नि दिल्यानंतर पारदाचे स्वेदन होते व त्याचा वर्ण बदलतो.

३ तासानंतर माठातील पाणी थंड होऊ द्यावे व त्यानंतर पोट्टलीमधील पारा सावकाश दगडीखलात काढून घ्यावा, कोमट पाण्याने स्वच्छ धुवून सावलीत थोडावेळ उघडा ठेवावा. कोरडा झाल्यानंतर बाटलीत भरावा व दुसऱ्या दिवशी त्याच्यावर मर्दन संस्कार करावा. स्वेदनामुळे बाह्य मलांचे शिथीलीकरण होते.

मर्दन संस्कार :-

स्वेदन केलेल्या पारदावर मर्दन हा संस्कार आवश्यक असतो.

घटक :

१) स्वेदित पारद

२) कोरफडीचा गर

सर्व प्रथम एका पातेल्यामध्ये कोरफडीचा गर काढून घ्यावा त्यानंतर संगमरवरी खलामध्ये स्वेदन केलेला पादर हळूवार काढुन तो बुडेल इतकाच कोरफडीचा गर त्याममध्ये घालून लाकडी मुसळ (बत्ता) वापरून तो घोटण्यास सुरवात करावी घोटल असताना काही वेळानंतर पारद एकदम पूर्ण स्वरूपी होऊन जातो. याप्रमाणे किमान तीनवेळा तरी पारद कोरफडीच्या रसात घोटावा.

घोटल्यानंतर पारद एकदम चकाकू लागतो त्यानंतर तो धुवून सावकाश प्लॉस्टिकच्या टबमध्ये काढून बाटलीमध्ये भरून ठेवावा कोरफडाच्या रसाचा मलनाशिनी 'गृहकन्या मलहान्ते' या गुणाचा उपयोग या ठिकाणी होताना दिसून येतो. मर्दन संस्काराची फलसुती वर्णन करताना 'बहिर्मलविनाशनम्' अशा स्वरूपाची आहे.

याकरिता हिंगुलोत्य पारद निर्माण विधीनंतर स्वेदन व मर्दन हे संस्कार करणे आवश्यक आहे.

साहित्य :

दोलायंत्र, धोतराचे कापड, चूल, दगडीखल, बाटली (पारद भरून ठेवण्यास)

शोधन द्रव्य विचार :

सैंधंव हे द्रव्य हरितवया दि वर्गामधील असून, ते अग्नि दिपक, पाचक, सुक्ष्म, मधूरवलवण रसात्मक आहे. यामुळे मलाचे शोधन करणे हा गुणधर्म सैंधवाजवळ प्रथम पासूनच आहे. या बरोबरच लवण रस हा तीक्ष्ण छेदन भेदन करणारा आहे. पारदाचे या सैंधवासोबत स्वैदन केल्यामुळे पारदाच्या पृष्ठभागावर जमा झालेला मल शिथील होण्यास मदत हाते व यानंतर कुमारीच्या सहाय्याने तो मल बाहेर काढून टाकला जातो.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | शु. पारद | वडसात्मक | - | स्निग्ध, वृष्य | योगवाही, रसायन | - |
| २) | सैंधव | लवण मधुर | जल + अग्नि जल + पृथ्वी | लघू, रूच्य स्निग्ध | सुक्ष्म, शीत वृष्य, हदय | दीपन पाचन |
| ३) | कुमारी रस | तिक्त मधुर | वायू आकाश पृथ्वी जल | शीत | बृंहण बल्य, वृण्य | भेदन |

## गंधक शोधन

पारदाचे औषधामध्ये उपयोग करण्यासाठी त्याच्या शोधनाानंतर बंधन संस्काराची आवशक्यता पडते कारण पारदाच्या ठिकाणी सहज स्वरूपात चंचलत्व हा दोष यातो तो दूर करण्यास व दुर्गहत्व नाशनास सर्वाधिक उपयोगात येणारे द्रव्य म्हणजे गंधक होय. त्यामुळे पारदानंतर गंधकास महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

चरक संहिता वाचत असताना आयुर्वेदामध्ये वर्णित अनेक सिद्धांताबरोबर एक सिद्धांत कायम दृष्टी समोर येतो तो म्हणजे सामान्य विशेष सिद्धांत होय.

सर्वदा सर्वभावाना सामान्यं वृद्धीकारणम्।
ऱ्हासहेतुर्विशेषश्च प्रवृत्तिरूभयस्य तु।।
सामान्य एकत्वकर विशेषस्तु प्रथकत्वकृत।
तुल्यार्थता हि सामान्य, विशेषस्तु विपर्ययः।।
च.सू.अ १/४४,४५

गंधकाची शुद्धी करत असताना ती दोन मुख्य प्रकारे केली जाते. आयुर्वेद प्रकाशकारांनुसार दूधामध्ये व रसरत्नसमुच्चय कारानुसार माक्याच्या स्वरसात शुद्धी कारावयास सांगितली आहे. या दोन शुद्धीकडे पहात असताना चरकाचार्यांच्या सूत्रस्थामधील संतपर्णीय मध्यायाची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. शामान्य विशेष सिद्धांताचा वापर करून संतपर्णोत्य आणि अपतपर्गोत्य व्याधींची विकित्सा करताना पुढील चिकित्सा सूत्र सांगितली आहे.

संतपर्णकृतैर्दोषे:स्थौल्य मुक्त्वा विमुच्यते।
उक्त संतपर्णात्थाना अपतपर्ण औषधम्।।५
व
तेषा संतपर्ण तज्ज्ञैः पुनरारव्यतम औषधम।
यत्तदात्वे समर्थ स्थादभ्यासे वा तादिव्यते।।
च.सू.२३।२६,३०

साहित्य : कढई, चूल, पातेले, वाळू, धोतराचे कापड, गरम पाणी, बाटली

शोधन:

प्रकारपहिला:

लोहपात्रे विनिक्षिव्य धृतंअग्नौ प्रतापयेत।
तप्ते धृते तत्समानं क्षिपेत गंधकजं रज:।।
विद्रुतं गंधक ज्ञात्वा दुग्धमध्ये विनिक्षिपेत।
यथा वस्त्रात विनि:सृत्य दुग्धमध्ये डखिलपतेत।
शीतो निष्कासितो धौतो जलं वस्त्रेण शोषयेत।
एवं नैर्मल्य आपन्नो गंधक: शुद्ध उच्यते।।
एवं वारत्रयं शोध्यो भिन्ने दुग्धे प्रयत्नत:।
भक्षणार्य हि भिवजां योगार्थ सकृत एवच।।

आयुर्वेद प्रकाश २-२१ ते २

घटक:

१) अशुद्धगंधक - १ भाग
२) दुग्ध - २ भाग
३) धृत - यथावश्यक (१ भाग)

प्रथम एका भांड्यामध्ये गंधकाच्या दुप्पट प्रमाणात दूध घालून त्यावर एक धोतर वस्त्रगाळ करण्यास बांधावे.

जवळच एक चूल तयार करून त्या चूलीवर एक लोखंडी पसरट पात्र ठेऊन त्यामध्ये वाळू घालावी व त्यावर गंधक पातळ करण्यासाठी कढई ठेवावी. गंधकाची मात्रा अधिक असताना उष्णतेने पेट घेण्याचा संभव असल्यामुळे वरील योजना करावी लागते. ही पूर्ण झाल्यावर लोखंडी कढईमध्ये गंधकांच्या समभाग धृत टाकावे ते पातळ झाल्यानंतर त्यामध्ये हळूवार गंधक सोडून उलथण्याचे सहाय्याने मिश्रण हालवावे गंधक पूर्णपणे पातळ झाल्यानंतर तो दूध असलेल्या भांड्याच्या वस्त्रावर ओतावा यावेळी गंधकामध्ये असणाऱ्या भोतिक अशुद्धी दूर होतात.

आत दुधामध्ये गंधकाचि वडी मिळालेली असते ती काढून धेऊन परत लोखंडी कढईमध्ये टाकावी. दुसरी शुद्धी करताना आयुर्वेद प्रकाशकार वेगळे दूध वापरावयास सांगतात, गंधक कढईमध्ये फोडण्याचा प्रयत्न करू नये कारण तो फोडल्यानंतर पातळ होण्यास अधिक अग्नि लागतो यामुळे वडी स्वरूपातच पातळ करावयास घालावा.

गंधक पूर्णपणे पातळ झाल्यानंतर दूधाच्या पात्रावर वस्त्र न लावता तसाच दुधामध्ये ओतावा, हीच प्रक्रिया अजून एकदा केल्यानंतर गंधकाची शुद्धी होते. या प्रक्रियेने गंधकाचे विष व पित्तकर हे दोन अधर्म नाहीसे होतात.

या शोधन प्रक्रियेनंतर गंधकास स्नेहाधिक्य झालेले असते त्यामुळे त्याचा तुपकटपणा जाण्यासाठी उष्ण जलाने तो स्वच्छ करणे आवश्यक असते.

गंधक स्वच्छ करण्यासाठी त्याचा भुगाकरून एका पातेल्यामध्ये वाणी खळखळ उकळावे, पाणी उकळल्यानंतर तो भुगा त्या पाण्यामध्ये टाकावा गंधक पाण्यात विरघळून जातो व अधिक झालेल स्नेह विलग होतो हा रात्रभर पाण्यात ठेवावा व सकाळी बाहेर काढून चांगला वाळवावा व त्यानंतर उपयोगात आणावा.

प्रकार दुसरा :

'गन्धको द्रावितो भृंगरसे क्षिव्यो विशुध्यति।'

रसरत्न समुच्चय ३ ।२३

'विधायचूर्ण गन्धस्य द्रावयेल्लोह भाजने।
भृंगराजरसे क्षिप्वा क्षालयेच्चाय वारिभि:।। '

रसरत्न तंरगिणी तंरंग ८ ।२१

घटक :-

१) अशुद्ध गंधक - १ भाग

२) माका स्वरस

३) धृत - १ भाग (यथावश्यक)

सर्वप्रथम ओला माका आणून स्वरस पद्धतीने त्याचा स्वरस काढून एका भांड्यामध्ये घ्यावी चुलीची योजना दुधाच्या शोधनावेळी ज्या प्रमाणे केली होती त्याच प्रमाणे करून स्वरसाच्या भांड्यावर भौतिक अशुद्धी दूर करण्यास वस्त्र बांधावे. यानंतर कढईमध्ये तूप टाकावे व गंधक पातळ करून घ्यावा, पातळ झाल्यावर धोतरावर पसरून ओतावा, त्यानंतर धोतर हरवून गंधकाची वडी काढून घ्यावी व दोन वेळा वस्त्र न लावता गंधक पातळ करून माक्याच्या स्वरसात टाकावा.

या विधीनंतर गरम पाण्याने स्वच्छ धुवुन तो उन्हात वाळवून त्यानंतर उपयोगात आणावा.

रसतंरगिणीकार माक्याच्या रसात शुद्ध केलेला गंधक पर्पटी प्रक्रियेस वापरण्यास सांगतात.

गंधक पातळ होत असताना त्याची वाफ घशात जाऊन त्रास, खोकला येतो, काहीवेळा मूत्रास गंधकाचा वास येतो अशावेळी नाकातोंडास फडके लाऊनच गंधक शोधन विधी करतात. यामुळे गंधक शुद्धी करणाऱ्यानी दुध, तूप यासारख्या प्राणीज कल्पांचा आभ्यंत वापर करावा.

गंधकाचे गुणधर्म व आमयिक प्रयोग :-

‘गन्धाश्मातिरसायनः सुमधुरः पाके कटुष्णोमतः
कुण्डुकुष्ठविसर्पदद्रुदलनो दीप्तानलः पाचनः।
आमोन्मोचन विनाशनः कृमिहरः सत्वात्मकः सूतिजित।।’

रसरत्नसमुच्चय ३ ।२६

‘गन्धको कटुको तिक्तो वीर्योष्णस्तुवरः सरः।
फ्विला कटुकः पाके जन्तुकण्डु विसर्पजित।
हन्तिकुष्ठक्षयप्लीहकफवातान् रसायनः।।’

भावप्रकाश निघव्टु ८ (धात्वादिवर्ण)

शुद्ध गंधक हे रसायन मधूर, कटूपाळी व उष्णवीर्याचे आहे. कंडू, कुष्ठ, विसर्व नाशक आहे यावरून त्याचे त्वचेच्या ठिकाणी असणारे गामित्व स्पष्ट होते. गंधक अग्निदीपन करणारा, अर्मास त्याच्या स्थानापासून सोडविणार गरविषनाश करणारा, कृमींचा नाश करणारा अशा स्वरूपाचा आहे.

भावप्रकाश निधष्टुकार गंधक हा कटू तिक्त कषाय रसात्मक मानतात व त्याच सोबत तो प्लीहा क्षय यांचा नाश करणारा आहे असे सांगतात.

रसतंरगिणीकार गंधक श्वासहर, कासहर, सर गुणाचा आमहर, नेत्र्य सांगुन अशुद्ध पारद व गंधक सेवनाने होणारे दुष्परिणाम घालवणारा आहे असे गंधकाचे वर्णन करतात.

या बरोबर विविध अनुवाना सोबत याचा उपयोग वर्णन करतात

| | | |
|---|---|---|
| गंधकलेप | - | आमवात, गृध्रसी |
| त्रिफळा | - | नाक, कान, मुख रोग व अग्निमांद्य |
| वासा | - | नवीनक्षयरोगात |
| कष्टकारी | - | श्वास व कास |
| वित्रकमूळ | - | दुर्बलताहर |
| तिळचूर्ण | - | अर्शविकार |
| मध | - | कुष्ठहर |

शोधन द्रव्य विचार :

गंधकाच्या वृतामधील शुद्धीबाबत आयुर्वेद प्रकाशकार असे म्हणतात.

'एवं संशोधित :सोऽयं पाषाणानम्बरे त्यजेत।
घृते विषं तुषाकारं स्वयं पिंडत्वमेतिच।।'

आयुर्वेदप्रकाश

शुद्ध गंधकामधील केरकचरा, खडे वस्त्रावर राहतात व विष तुपात मिसळते. आधुनिक शास्त्रानुसार गंधकामध्ये सोमलाचे अंश असतात व वृतामध्ये हेच अंश गंधकामधून मिसळतात असे वर्णन आले आहे.

याबरोबर घृत हे दीपन, मधूर रसामत्मक असून पृथ्वि व जल या महाभूताचे आधिक्य असणारे असते गोदुग्ध सुद्धा मधूर, स्निग्ध, वृष्य रसायन असून दुधामध्ये शुद्ध केलेल्या गंधकामध्ये पृथ्वी व जल या महाभूतांचे आधिक्याने अंश असतात तर यामध्ये शुद्ध केलेला गंधक अपतर्वणोत्स किंवा आकाश व वायु या महाभुतांची विकृती असणाऱ्या व्याशीमध्ये चांगल्या स्वरूपाचे कार्य करणारा असतो.

या विरूद्ध माका हा तिक्त कटू रसात्मक, पाचन, रसायन लघू, रुक्ष असून तो त्वचागामी आहे यामुळे तो संतर्पणोत्य किंवा पृथ्वी व जल महाभुत प्रधान विकृतीमध्ये उकृष्ट कार्यकारी सिद्ध होतो.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | गंधक | कटु | अग्निवायु | पाचन | शर, रसायन | त्व...... |
| २) | गोघृत | मधुर | पृथ्वी जल | गुरू, सुगंधी | ओजवर्धक<br>चक्षुष्य, दीपन | - |
| ३) | गोदुग्ध | मधुर | पृथ्वी जल | स्निग्ध, शीत | जरानाशक | - |
| ४) | माका | तिक्त<br>कटु | वायू आकाश<br>आयू अग्नि | लघू, रूक्ष | पाचक/रसायन | त्वचार |

## हिंगुळ शोधन

औषधीकरणामध्ये पारद हा हिंगुळापसून निर्माण केला जातो. सर्वप्रथम हिंगुळ खलामध्ये घेऊन बारीक करावा, हि शोधनासाठी वापरायचा खल हा खोलगट असावा जेणेकरून हिंगुळ बाहेर सांगणार नाही.

खलाच्या खाली प्रथमत एक पेपर अंथरावा व त्यानंतर त्यावर खल देऊन बारीक केलल्या हिंगुळामध्ये लिंबाचा रस ओतावा सामान्यपणे २ ग्राम हिंगुळाकरिता १ मोठया लिंबूचा रस एकावेळी काढून घ्यावा, सर्व प्रथम हिंगुळ लिंबाच्या रसात बुडेल अगदी पातळ होणार नाही अशा पद्धतीने घोटावा, घोटत असताना आकृतीत दाखवल्याप्रमाणे त्याची दिशा असावी. सर्व बाजूंनी त्याचा संपर्क हिंगुळाशी यायला हवा.

प्रथम सरळ व त्यानंतर फिरवून एका बाजूने परत सरळ व परत दूसऱ्या बाजूने फिरवावा, दिवसामधून जितका वेळ जमेल तेवढ्या वेळे पर्यंत खल करीत रहावे यानंतर रात्रीच्या वेळी खल झाकून ठेवावा त्यावर खलाचे झाकण ठेवावे व तो धोतरामध्ये गुंडाळून ठेवावा. दुसऱ्या दिवशी उघडतना धोतरावरील माती खलात पडु नये याची काळजी घेणे आवश्यक असते ती बाजूला झटकून त्यानंतरच खल बाहेर काढावा, अशा प्रकारे एक भावना खडखडीत कोरडी झाल्यानंतर दुसरी भावना देण्यास घ्यावी यावेळी हिंगुळाचा वर्ण लाल वाढलेला असेल, खलताना बत्ता जडजड जाऊ लागतो.

दुसरी भावना ५ लिंबांची द्यावी यावेळी भाजूताप म्हणजेच हिंगुळास उन्हामध्ये ठेवावयास सांगितले आहे. खडखडीत वाळल्यानंतर तिसरी भावना द्यावी.

सर्व भावना पूर्ण झाल्यावर ओषधात अथवा वारद निर्मितीस वापरावा तो खतवर्णी लाल दिसतो.

निम्बुकस्वरसेनेह हिंगुल शलक्ष्णचूर्णितम्।
विभावयेत्सप्तवारं क्षालयेतबहुशोऽमभ्सा।।

रसतंरगिणी तरंग ९।१६

## शोधित हिंगुळाचे गुण

‘‘लोचनामयहरः कफापहः क्तिजामयनिवूदनः परम्।
प्लीहकुष्ठगरकामलाहरो जाठराग्नि जननोऽथ पाचनः।।
मेहवर्गपरितापनाशनो देहकान्तिबलबुद्धि वर्ध्दनैः।
आमवातगजदर्पखण्डनी हिंगुली विजयते ज्वरापहः।।’’
रसतरंगिणी तरंग ९।७९

शोधन केलेला हिंगुळ नेत्ररोगहर, कफप्रकोपहर, प्लीहा, कुष्ठ, गरविष, कमला आदि रोगांना नष्ट करतो, वाचक अग्निवर्धक, प्रमेहनाशक शरीरातील कान्ति, बल व बुद्धी यांचे वर्धन करणारा आहे. ज्वरघ्न व आमवात हर आहे.

या बरोबर अतिसारामध्ये हिंगुळाचा चांगला वापर होतो.

साहित्यः खल, झाकण

शोधन द्रव्य विचारः

हिंगुळाच्या ओषधामध्ये वापरावयाच्या आवश्यक गुणधर्मानुसार व व्याधी प्रकारानुसार त्याचे वेगवेगळ्या रसामध्ये शोधन वर्णन केले आहे. लिंबू अम्ल रसात्मक, तीक्ष्ण असून लिंबाच्या रसात शुद्ध केलेला हिंगुळ अतिसार, अजीर्ण, संग्रहणी यासारख्या जाठराग्नि मांद्य असणाऱ्या व्याधीमध्ये वापरावयास सांगितला आहे यामुळे अग्निवर्धन करणाऱ्या गुणधर्मात वाढ होते.

आधुनिक विज्ञानानुसार हिंगुळामध्ये पारा व गंधक यांचे मिश्रण असते व ते विषारी परिणाम इतर पारद संयुगांच्या अगदी नगन्य दाखविते असे संशोधनाने सिद्ध झाले आहे.

## पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | हिंगुळ | तिक्त<br>कषाय<br>कटू | वायू आकाश<br>वायू पृथ्वी<br>वायू अग्नि | दीपण | उष्ण | क्षारधर्मी |
| २) | लिंबू | अम्ल | जल अग्नि | तीक्ष्ण | कृमीहर | अम्लधर्मी |

## ताम्र शोधन

सोमनाथी ताम्र गरम करीत असताना ग्रंथामध्ये वर्णन केलेली सामान्य शुद्धी करणे आवश्यक असते.

तैले तक्रे गवांमत्रे हयारनाले कुलत्थजे।
क्रमान्निषेचयेत तप्तं द्रावे द्रावे तु सप्तधा।।
स्वर्णादि लोहफ्तानां शुद्धीरेषा प्रर्वतते।

रसरत्न समुच्चय ५ ।३१

घटक :-

१) ताम्राच्या तारा - १ भाग
२) तिळतेल - यथावश्यक
३) ताक - यथावश्यक
४) गोमूत्र - यथावश्यक
५) कुलत्यक्वाय - यथावश्यक

ताम्र शुद्धीच्या पहिल्या दिवशी कुळीथ ठेचून रात्रभर पाण्यात भिजवून ठेवावेत व दुसऱ्या दिवशी त्याचा काढा करून शुद्धीकरिता वापरावा. ताम्रशोधनास ज्या तांब्याच्या तारांमधून विद्युत प्रवाह वाहतो त्याच तारा वापरण्यात आशुनिक शास्त्रानुसार या ९९३ शुद्ध असतात.

ताम्रशुद्धि करते वेळी शेगडी असल्यास उत्तम पण ती नसल्यास विटांची पुढील प्रमाणे बांधणी कारावी व त्यामध्ये कोळसा टाकून ताम्र तापवावे.

शुद्धी करताना ताम्राच्या तारा वापरणे अधिक सोपे पडते. विटांचा एक तिठाकरून त्यामध्ये आकृतीत दाखवल्याप्रमाणे सळई टाकावी व त्यामध्ये मोठेमोठे कोळश्याचे तुकडे भरून ते पेटवावे. या नंतर चार भांडी घेऊन त्यामध्ये अनुक्रमे तिळतेल, ताक, गोमूत्र व कुळथीचा काढा घ्यावा. तांब्याच्या तारा बाईडिंग तारेने बांधण्यात म्हणजे त्या निसटणार नाहीत प्रथम तारा निम्म्या करून एक भाग कोळश्यामध्ये टाकून गरम करावा यावेळी वारा घालून कोळसा फुलवावा तारा तप्त व लालबुंद झाल्यानंतर काढून (पकडीने) तिळाच्या तेलामध्ये टाकव्यात यानंतर दुसऱ्या निम्म्या तारा

कोळश्यामध्ये तप्त करण्यास या तारा तप्त होईपर्यंत तिळाच्या तेलामध्ये टाकलेल्या तारा थंड होतात नंतर त्या काढून तप्त झालेल्या तारा तिळतेलात टाकण्यात अशा प्रकारे ७ वेळा सर्व ताम्र तारा कोळश्यामध्ये तप्त करून तिळतेलात टाकण्यात तेलाचे प्रमाण कमी झाल्यावर थोडे परत टाकावे, ताम्रच्या संपूर्णपणे बुडाव्यात वर राहू नयेत याची दक्षता घ्यावी.

याच प्रकारे ताक होऊन त्यामध्ये ७ वेळा बुडवावी, ताम्र गरम ताकात बुडवल्याने आवाज येतात काही वेळा उकळी फुटते, तसेच त्याच्या वर्णामध्ये बदल होतात. यानंतर हळूहळू तारांना मृदूता येऊ लागते ताम्राचे परमाणू विलम होऊ लागतात व शोधन प्रक्रिया म्हणजे काय ते समजून येते.

वरील प्रक्रारे ७ वेळा गोमूत्रात व ७ वेळा कुळीथ क्वथामध्ये ताम्र शुद्धी करावी.

प्रत्येक शुद्धी नंतर ताम्राच्या वर्णात फरक पडतो. शेवटची शुद्धी झाल्यानंतर ते कुळथीच्याच काढ्यात बुडवून ठेवावे वर उघड्यावर ठेऊ नये त्यामुळे हवेशी संपर्क येऊन ते काळे पडू लागते व सर्व मेहनत फुकट जाते.

सामान्यपणे ताम्राचे मारण करताना ताम्रसिंदूराची भट्टी लावण्याचे आढले दिवशी संध्याकाळी शुद्धी कारवी आधी शुद्धी करून ठेऊ नये.

साहित्य : शेगडी/विटा, कोळसा, चार पातेली, चिमटा

शोधन द्रव्य विचार

धातूचे शोधन वर्णन करीत असताना त्याचे सामन्य शोधन व विशेष शोधन असे दोन शोधन प्रकार वर्णन केले आहेत.

अशुद्ध ताम्राचे सेवन केल्यानंतर वमन, विरेचन, भ्रांती, क्लम, विवाह यासारखे आठ उपद्रव वर्णन केलेले आहेत.

ताम्र शोधना मध्ये खनिजापासून ताम्र अलग करणे. निर्भेळ करणे मारण विधीमध्ये आड येणारे त्याचे स्वभाविक धर्म कमी करणे, अनिष्ट दोष दूर करून विशिष्ट गुणधर्म ताम्रात आणणे.

हा मुख्य हेतु असतो, हे सर्व हेतु साध्य करण्यासाठी त्याचे शोधन तेल, तक्र, गोमूत्र, कुलत्थ क्वाथ यासारख्या द्रव्यांमध्ये करणे आवश्यक असते.

तिळतैल हे तिक्त मधूर रसात्मक, गुरू, वृण्य, व्यवायी, विकासी असुन याच्या संस्काराने ताम्रामध्ये मृदूता येते तसेच मारणासाठी अनावश्यक धर्म कमी होण्यास मदत होते.

ताक हे अम्ल, कषाय रसात्मक, दीपन, वृष्य व विकासी असून यामुळे ताम्रास भंगुरत्व प्राप्त होते व स्वाभाविक दोष कमी होतात.

गोमूत्र हे क्षार असून याने ताम्र द्रुतद्रावी होऊन त्याचे मारण लवकर होण्यास मदत होते ते कटु तिक्त रसात्मक उष्णा लधू व अग्नि दीपन करणारे आहे, या बरोबर ताम्र हे निर्भेळ होण्यास त्याचे परमाणू एकमेकापासून विलग होण्यास याचा वापर होतो.

ताम्र हे तिळतैल, ताक व गोमूत्र यामध्ये शुद्ध केल्यामुळे वांती हा ताम्र दोष नष्ट होतो.

कुलत्यक्वाथ कषाय लघू सर असून अनिष्ट दोष दूर करून विशिष्ट गुणधर्म ताम्रात आणण्यास मदत करतात.

कुलत्य क्वायाने ताम्राचा भ्रांती निर्माण करणारा धर्म नष्ट होतो.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | ताम्र (मृत) | तिक्त<br>कवाय<br>मधूर | वायू आकाश<br>वायू पृथ्वी<br>पृथ्वी जल | शीत<br>गुरू रूक्ष | सर, लेखन | थकृतप्लीहागामी |
| २) | तिळतैल | तिक्त<br>मधूर | वायू आकाश<br>पृथ्वी जल | गुरू वृष्य | विकासी,<br>व्यवायी सुक्ष्म,<br>लेखन | - |
| ३) | तक्र | कषाय<br>अम्ल | पृथ्वी वायू<br>पृथ्वी अग्नि | दीपन, वृष्य | विकासी<br>प्रीणन | अम्लधर्मी |
| ४) | गोमूत्र | कटू<br>तिक्त | अग्नि वायू<br>वायू आकाश | तीक्ष्ण, उष्ण<br>लघू,<br>अग्निदीपक | मेध्य, पित्तकृत | क्षारधर्मी |
| ५) | कुलत्यक्वाथ | कषाय | वायू पृथ्वी | लघू, सर | विदाही | |

## लोह शोधन व मारण

लोहाचे शोधन करित असताना ते त्रिफळा व गोमूत्र यांच्यामध्ये करावे.

शोधन :

वराकषायसंयुते समे गवान्तु मूत्रके।
निषेचित तु सप्तधा त्वयो विशुद्धिमाप्नुयात।।
रसतरंगिणी तरंग २० ।१८

घटक :

१) अशुद्धलोह - १ भाग
२) त्रिफळा - समभाग
३) गोमूत्र - समभाग

लोह चूर्णाचे खडे घेऊन ताम्रशोधनात वर्णन केल्याप्रमाणे (पान नं.५३) अग्निवर तापवण्यास ठेवावेत. त्यावेळी एकीकडे त्रिफळाक्वाय व गोमूत्र समभाग एकत्र करून एका उभट भांड्यामध्ये घ्यावे. यानंतर ते तीन भांड्यात विभागावेत. पहिल्यांद्या लोहाचे निम्मेच खडे अग्निवर ठेवावेत, तप्त लाल झाल्यानंतर पहिल्या पात्रात टाकावे. त्यावेळी निम्मे लोह अग्निवर तापवण्यास ठेवावे, त्रिफळा व गोमूत्रातील पहिले लोह थंड झाल्यानंतर ते काढावे व त्या ठिकाणी अग्नितप्त दुसरे लोह टाकावे, पहिल्या क्रमांकाच्या भांड्यात ही क्रिया दोन वेळा करावी यानंतर दुसऱ्या नंबरच्या पात्रात वरील प्रमाणेच अग्नितप्त लोह गरम करून टाकावे पूर्ण थंड झाल्यानंतरच बाहेर काढावे. शोधन प्रक्रियेमुळे लोह मृदु होऊन त्याचे बारीक तुकडे होू लागतात ते तुकडे एका कढईमध्ये घेऊन गरम करावे व वरील भांड्यात ओतावेत.

यानंतर शेवटच्या भांड्यामध्ये हीच प्रक्रिया तीन वेळा करावी. मिश्रणात लोह पूर्णपणे बुडेल याची दक्षता घ्यावी. सात वेळा ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर काढा व गोभूत यांच्यामध्ये शिल्लक राहिलेला लोह फडक्याने गाळून घ्यावे व सर्व लोह स्वच्छ धुवून उन्हामध्ये वाळवावे संपूर्ण वाळल्यानंतर व्यास एक त्रिफण्ण क्वायाची भावना द्यावी.

साहित्य : शेगडी, पातेली, तांब्याचे भांडे, खल, ट्रे, बाटली, धान्यराशी

भावना :-

त्रिफळ्याच्या १६ पट पाणी टाकून ह्न आटेपर्यंत ठेऊन काढा करावा, एक ट्रे मध्ये सात वेळा शुद्ध केलेले लोह घ्यावे व त्यामध्ये हा काढा ओतून ट्रे दिवसभर उन्हामध्ये ठेवावा, सायंकाळच्या वेळेस ट्रे च्या बाजूस लागलेली खर काढून टाकावीव ट्रे झाकून आतमध्ये व्यवस्थित ठेवावा. मिश्रण दे दोन तासांनी हलविन राहावे (दिवसा).

भावना खडखडीत वाळेपर्यंत हा विधी करावा

भावना वाळल्यानंतर लोहास एक पुट द्यावे.

गजपुट :

गजपुटाकरिता एक खड्डा काढून शुद्ध लोह एका माठात भरावे माठाच्या तोंडास मातकापड करून एक गजपुट द्यावे स्वांगशीत झाल्यानंतर काढुन मर्दन करून त्याचे मारण करावे.

मारण विधी :

ततपूर्णसूतगंधाभ्यां पुटेत विशंतिवारकमू।
पुटे पुटे विधातव्यं पेषण दृढवतरम्।।
एवं भस्मीकृतं लौह ततत्त रोगेषु योजयेत्।
रसरत्नसमुच्चय ५-११२

घटक :

१) शुद्ध लोह - १ भाग
२) कज्जली - १ भाग
३) कोरफडीचा रस

सर्वप्रथम १ भाग पारद व २ भाग गंधक यांची विधिवत कज्जली करून घ्यावी (पान क्र. १९८)

त्यानंतर खलामध्ये शुद्ध लोह घेऊन त्यामध्ये कज्जली टाकावी व कोरफडीचा रस टाकून ते घोटत रहावे, घोटून रस पूर्णत: संपल्यावर बारीक गोळे तयार करून तांब्याच्या भांडयात घालून एरंड पत्रात बांधून वरून दुसरे तांब्याचे भांडे लावून मातकापड करावे, त्यानंतर हे भांडे धान्याच्या राशीमध्ये पुरून ठेवावी. पंधरा दिवसांनी बाहेर काढून दगडी खलात घालून घोटावे व वापरावे.

लोहाचे गुणधर्म :

‘‘लौहं कक्षं सुमधुरमलं पाकतश्चाथ तिक्त
वीर्यशितं गुरूं चतुवरं लेखनच्चातिनेत्र्यम्।।
बत्यं वृष्टा जठरगदनुत श्लेष्मपित्तामयघ्नं।
वर्ण्यमेध्यं खलु किमधिक हान्ति नानामयहनम्।।’’
रसतरंगिणी २० ।८३

लोह रूक्ष, मधूर, तिक्त कषाय रसात्मक, अतिरिक्त मेदाचे क्षरण करणारा, शीत, गुरू, लेखन, बल्य, त्वकरोगहर, बिद्धिवर्धक पांडुरोग नाशक, गुल्म, प्लीहा, क्षयरोग व उदरकृमी नाशक आहे, विसर्पहर, शोथहर, गरविष यांचा नाश करतो.

अतिसार, नवीनच निर्माण झालेला कष्टरोग, कामला, हलीमक, योषपस्मार, आमाशाय व पक्वाशयगत व्रण स्त्राव, निद्रानाश व आमवातामुळे निर्माण झालेली अस्थिविकृति दूर होते.

आमधिक प्रयोग :

| | द्रव्य | व्याधी |
|---|---|---|
| १) | दालचिनी, वेलची, तेजपत्र नागकेशन, वासा | - रक्तपित्त |
| २) | भारंगी, त्रिकटु | - श्वास |
| ३) | हिगं, त्रिकटु | - शूलहर |
| ४) | शिलाजित | - मूत्रकृच्छू |
| ५) | खदिरसार | - कृष्ठादि त्वचारोग |

‘‘शुद्ध सुतं दिृधा गन्ध खल्वेन कृतकज्जलम्।
दृयो: समं लोहचूर्ण मर्दयेत्कव्यका द्रवै:।।
या मदृयात्समुदधृत्य तदोलं कांस्यपात्रकै।
आच्छाद्यैरण्डपत्रैश्च या मार्धेत्युष्णतां व्रजेत।।
धान्यराशौ न्यसेत्पश्चातत्रिदिनान्ते समुद्धरेत।
संपेष्य गाळयेदृस्त्रे सत्यं वारीतंर भवेत।।
कान्त तीक्ष्णंच मुण्डंच निरूत्यं जायते मृतम्।।’’
रसरत्नसमुच्चय ५ ।१२८-१३२

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | लोहभस्म | तिक्त<br>मधूर<br>कषाय | वायू आकाश<br>पृथ्वी जल<br>वायू पथ्वी | शीत, रूक्ष<br>गुरू | सर, लेखन | रसरक्तगामी |
| २) | त्रिफळा | पंचरसात्मक | - | रूक्ष, शीत | चक्षुष्य रूच्य | सर, अम्लधर्मी |
| ३) | गोमूत्र | कटु<br>तिक्त | वायू आग्नि<br>वायू आकाश | तीक्ष्ण, उष्ण<br>लघु, दीपन | मेध्य<br>पित्तकृत | क्षारधर्मी |
| ४) | पारा | बडसात्मक | - | स्निग्ध<br>वृष्य | योगवाही<br>रसायन | - |
| ५) | गंधक | कटु | अग्निवायू | पाचन | सर, रसायन | - |
| ६) | कुमारी | तिक्त<br>मधूर | वायू आकाश<br>पृथ्वी जल | शीत | बृंहण बल्य<br>वृण्य | अम्लधर्मीभेदन |

शोधन द्रव्य विचार:

धातूची शुद्धी तैले तक्रे गवामूत्रे या प्रकारे वर्णन केली असली तर लोहाची शुद्धी वेगळ्या पद्धतीने करावयास सांगितली आहे, लोहावर हवेतील ऑक्सिजन वायूचा संपर्क येऊन ते कलांतराने गंजू लागते परंतू इतर कोणत्याही धातूवर असा परिणाम होताना दिसत नाही.

त्रिफळा हा पंवरसयुक्त अम्लधर्मी रूक्ष असून मलशोधन करणे असा त्याचा विशेष धर्म आहे या सोबतच त्रिफळा वह्निनाशिनी असा उल्लेख पारद मूर्च्छन संस्कारामध्ये सापडतो यावरून लोहाची शुद्धी त्रिफळ्यात योग्य वाटते.

गोमूत्रामध्ये क्षारता असून ते तीक्ष्ण उष्ण आहे. लोहाचे परमाणू एकमेकांपासून विलग करणे त्यास भंगुरत्व प्राप्त करून देणे हे कार्य यामुळे चांगले होते.

या प्रमाणे अम्लता व क्षारता या दोन्ही गुणधर्मांचा लोहावर उपकार प्रभाव पडतो.

मारण करताना वापरलेली कज्जली ही योगवाही रसायन आहे. ग्रंथामध्ये वर्णन करताना लोहाणां मारणं श्रेष्ठ सर्वेषा रसभस्मना या स्वरूपाचा उल्लेख आला आहे. जरी पारदाच्या सहाय्याने लोहाचे (धातू) मारण श्रेष्ठ असले तरी लोह हा घटक शरीरसात्म्य होण्याकरिता येथे तिक्त मधूर रसात्मक भेदन धर्माच्या कुमारीची योजना केली आहे यामुळे लोहाचा सर गुणधर्म वाढण्यास मदत होणार आहे.

मण्डूर शोधन व मारण विधी

मण्डूराचा शोधन विधी हा पूर्णपणे लोहाच्या शोधन विधी प्रमाणे करावे (पान नं. ६९)

गोमूत्रस्त्रिफला क्वाथा तत्ववाये सेचयेच्छनैः।
लोहकिट्टं सुसंतप्तं यावज्जीर्यति तत्स्वयम्।।
तच्चूर्ण जायते पेष्यं मण्डूरं त प्रयोजयेत।
रसरत्नसमुच्चय ५-१४८

त्रिफळा हा पंचरसात्मक असून त्याचा विशेष धर्म 'त्रिफला वन्हिनाशिनी' असा आहे. भावप्रकाशकार त्रिफळ्याचे वर्णन हरितक्यादी वर्गात करतात, या वरून मलशोधन हा गुणधर्म त्रिफळ्यामध्ये असतो, खनिज द्रव्यामध्ये असणाऱ्या रासायनिक अशुद्धींना वन्हिहोष म्हणतात, मण्डूर हे द्रव्य पृथ्वी या महाभूताचे प्रतिनिधित्व करून शरीरात पार्थिव धर्म वाढवण्याचे कार्य करते, गोमूत्र हे द्रव्य अनेक भुगर्भातील द्रव्यांच्या शोधनामध्ये वापरण्याचे वर्णन ग्रंथात मिळते, ते कटू तिक्त रसाचे क्षार धर्मी उष्ण तीक्ष्ण आहे, शोधनामध्ये मुख्य कार्य परमाणू एकमेकांपासून विलग होणे हे कार्य गोमूत्र चांगल्या प्रकारे करते.

मारण विधी :

चूर्णीकृत तुमण्डूरं त्रिफलाक्वथिताम्भसा।
सम्पेष्यं सम्पटे कृत्वा त्रिशद्वार ततःपुटेत।।
एवं जाति चिरादेव रक्तचंदनसप्रभम्।
मण्डूरं जायते चूर्ण ततो योगेषु योजयेत ।।
रसतरंगिणी तरंग २० ।१२

त्रिफला चूर्णाचा १६ पट पाणी घालून ⅛ शिल्लक राहीपर्यंत क्वाथ करावा त्यात समभाग गोमुत्र घालावे, या नंतर एका ट्रे मध्ये शुद्ध मण्डुर घेऊन त्यावे वर गोमुत्र ६ त्रिफळ्याचा काढा मिश्रण ओतावे, दिवसभर उन्हामध्ये ठेऊन सायंकाळी त्याच्या कडेला जमलेली खर काढुन टाकावी संपूर्ण वाळल्यानंतर गजपु....... दुसरी भावना अशा एकून ७ भावना पुठे द्याव्यात. भावना देताना दर तासाला मिक्षण चांगले हलवावे. मिश्रण वाळल्यानंतर त्यास गजपुट द्यावे.

भुहदी-भावना -पुट-भावना-पुट असे ७ वेळा

गजपुट-निर्माण विधी:

साधारणपणे एक फूट व्यासाचा व तीन फूट खोल अशा स्वरूपाचा एक खड्डा तयार करावा, यामध्ये २३ इंच घेराचा माठ बसवावा, केळश्याच्या सहाय्याने पूट लावायचे असल्यास खाली जाळी बसवावी, आकाशामुळे वायुच्या गतीस हालचालीस जागा मिळते यामुळे पुट व्यवस्थित लागते. जाळीवर कोळसा टाकून ३ इंच जाडीचा त्यावर कोळसा टाकावा, या नंतर जळणारा कोळसा टाकून त्यावर मडूर टाकलेला माठ गोपीचंदन लावून बसवावा व त्यावर सर्व बाजुंनी कोळसा भरावा. माठाच्या वर ३ इंच कोळसा भरून त्यावर जळणारे निखारे टाकावेत, कोळसे हळूहळू जळत जाऊन तीन ते चार दिवसांनी सर्व पुठ स्वांगशीत होते. या नंतर माठ काढुन घेऊन गोपी चंदन काढुन (मातकापड) मंडुर बाहेर काढावे मर्दन करावे. या प्रमाणे अजुन एक गजपुट देऊन स्वांगशीत झाल्यावर मण्डुर काढुन खलात मर्दन करावे. शेवटी मंडुरास तांबुस वर्ण येतो त्यानंतर ते ओषधात वापरावे.

राजहस्त प्रमाणेन चतुरस्त्र च निम्नकम्।
पूर्ण चोपलसाठिभिः कष्ठावध्यत विन्यसेत्।।
विन्यसेत्कुमुदी तत्र पुटनद्रव्यपूरिताम्।
पूर्वाच्छगणतोऽर्धानि गिरिण्डानि विनिक्षिपेत।
एतद्गजपुटं प्रोक्त महागुणविधायकम्।।

ररसत्नसमुच्चय १० ।५६

मण्डुराचे गुणधर्म :

मण्डुर सुमृतं वृष्य शिशिरं रूचिरं परम्।
दीपनं फ्तिशमनं रक्तवृद्धिकरं परम्।।
पाण्डु प्रमत्तमातंक मदमर्दन केशरी।
कामलाकुड्यकुलिशं मण्डुरं तु विशेषत।।
शोष प्रशमनश्चैव तथा शोफप्रणाशनम्।
हलीमकं च प्लीहानं मण्डुरं हन्त्यशेवतः।।
रसतंरगिणी तरंग २० ।१३२

मंडुर भस्म हे वृण्य, शीत, अग्निदीपक, रक्तवर्धक आहे. तीव्र पाळुरोग व कामला यामध्ये याचा चांगला वापर होतो, शोष, शोथ, हलीमक व प्लीहावृद्धी नाहीशी करणारा आहे.

या बरोबरच अनेक इतर द्रव्यांमध्ये मिसळून मंडूरांचा वापर करतात

| | द्रव्य | उपयोग |
|---|---|---|
| १) | पुनर्नवाष्टकक्वाथ | - शोध |
| २) | त्रिफळा, कुटकी, हिरडा | - कामला |
| ३) | विडंग, त्रिफळा, पंचकोल | - उदरकृमि, शोथ, अर्श, ग्रहणी, प्लीहा, पांडुरोग मोथा |
| ४) | रससिंदूर | - खतवृद्धी |
| ५) | दशमूलक्याय | - ज्वर, अतिसार शोथ |

साहित्य : शेगडी उभट भांडी, चिमटा, खल, ट्रे, बाटली

शोधन द्रव्य विचार :

लोहा प्रमाणेच मंडुर शोधन आहे.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | मण्डुर (मृत) | कषाय | पृथ्वी वायू | शीत, धन | रक्तधातूस बल्य | रक्तगामी, अस्थिगार्म |
| २) | त्रिफळा | पंचरसात्मक | - | रूक्ष, शीत | चक्षुष्य, रूच्य | सर अम्लधर्मी |
| ३) | गोमूत्र | कटु तिक्त | वायू अग्नि वायू आकाश | तीक्ष्ण, उष्ण लघू, दीपन | मेध्य पित्तकृत | क्षारधर्मी |

## वंग व मारण

नाग, वंग व यशद यांना पूतिलोग ही संज्ञा देण्यात येते, या तीन धातूंची मारणे एकाच पद्धतीने करतात.

वंग व मारण विधी

घटक

१) अशुद्ध वंग

२) हरिद्रा चूर्ण

कृती :-

सर्वप्रथम एक लोखंडी कढई ती चलीवर ठेऊन त्यामध्ये अशुद्ध वंग धातू घालून मंद अग्नि देण्यास सुरवात करावी. सर्व पूतिलोह थाड्याशा अग्नि नंतर लगेचच विरघळतात, वंगधातू उघड्या हवेमध्ये तापविल्यानंतर हवेतील ऑक्सिजन (०२) शी मिसळतो त्यामुळे लोखडी कढईवर झाकण ठेऊनच वंग पातक करावा.

वंग पातळ झाल्यानंतर कढईवरील झाकण ते थोडेसे उघडून त्यामध्ये हळदीचे बारीक चूर्ण टाकावे व लोखंडी उलथव्याच्या साहाय्याने हलवुन परत झाकण लावून ठेवावे, वंग ह उलवण्याने हलविले नाही तर खाली चिकटून बसण्याचा संभव असतो यामुळे ते साररवे हलिवत रहावे. थोड्या अवधीनंतर झाकण उघडुन हळद आत टाकत रहावी. यानंतर हळूहळी वंगाचे मारण होऊ लागते, पूर्ण भस्म झाल्यावर अधिक अग्नि देऊन स्वांगशीत झाल्यानंतर कढई खाली उतरून द्यावी.

एका भांड्यास वस्त्रगाळ करण्यासाठी धोतर बांधावे, हे वंग भस्म त्या वस्त्रगाळ फडक्यावरती टाकून त्याचे नंतर त्यावर थोडे पाणी टाकून भरम लाकडी चाटूने हलवावे व त्यानंतर जे भस्म वस्त्रगाळ होईल ते या पाण्यासोबत आत जाईल, ही संपूर्ण प्रक्रिया सर्व भस्म वस्त्रगाळ होईपर्यंत करावे, जे भस्म वस्त्रगाळ येणार नाही. ते परत कढईमध्ये घेऊन त्याचे हळदीने मारण करावे व परत वस्त्रगाळ करावे या प्रकारे संपूर्ण वस्त्रगाळ झाल्यानंतर चारपाय तासांनी सर्व भस्म तळास बसल्यानंतर वरील पाणी हळुच काढुन टाकावे, यानंतर हे भस्म उन्हामध्ये बारलीमध्ये काढून ठेवावे.

मारण झाल्यानंतर या भस्माचे वीर्य वाढविण्याकरीता म्हणू हरिद्रा व वटपारंब्याच्या काढा करून भावना देणे आवश्यक म्हणून सांगितले आहे.

भावना :

मारण संपल्यानंतर वंग भस्म एका लहान माठात अथवा मात्रा कमी असल्यास परळामध्ये घ्यावे, माणस व परळास झाकण लावून ते अग्निवर ठेवावे सुमारे ३ तास तरी द्यावा मधून झाकण काढून उलथण्याने ढवळावे. स्वांगशीत झाल्यानंतर काढुन घ्यावे व हरिद्रे काढायची भावना द्यावी, अशा तीन भावना दिल्यानंतर वट पारंण्याची भावना द्यावी.

हरित्र काढ्याची भावना देऊन सुकल्यानंतर वडाच्या पारंब्याचा विधिवत काढा तयार करून घ्यावा, या काढ्याच्या एकूण ७ भावना द्याव्यात भावना देताना खलामध्ये वंगभरम घेऊन त्याच्या मध्ये क्वाथ ओतून मर्दन करावे. सर्व मिश्रण खडखडीत वाळल्यानंतर बाटलीत भरून ठेवावे.

वंगभस्माचे गुणधर्म :

वंग लघू सरं रूक्षमुष्णं मेहकफक्रिमीन्।
निहान्ति पाण्डु सश्वासं चक्षष्यं पित्तलं मनाक।।
सिंहो यथा हस्तिगणं निहन्ति तथैव वंगडखिलमेहवर्गम्।
देहस्थ सौख्य प्रबलेंन्द्रियत्वम नरस्थ पुष्टि विदधाति नूनम्।।

भावप्रकाश निघण्टु

वंगभस्म लघु, सारक, रूक्ष, उष्ण, नेत्रास, हितकर, पित्तजनक, प्रमेह, कफ, कृमि, पाळु आणि श्वास यांचा नाश करणारे, देहास प्रबलता देणारा आहे.

रसतरंगिणी कारांनुसार वंग भस्म बुद्धिवर्धक, तिवत कषाय रसात्मक मेदोदर आहे गर्भाशयच्युति झाल्यावर वंगभस्माचा वापर केल्यास गर्भाशय आपल्या स्वस्थानी येते.

विविध द्रव्याबरोबर वंगभस्माचा वापर करण्यात येतो.

| द्रव्य | व्याधी |
|---|---|
| १) शिलजतु | - प्रमेह |
| २) गोधृत | - पाण्डुरोग |
| ३) टंकण | - गुत्मरोग |
| ४) पिप्पली चूर्ण | - अग्निमांद्य |
| ५) कस्तुरी | - वीर्यस्तंभन |
| ३) जायफळ | - शुक्रपुष्टी |
| ७) समुद्रफेन | - शुक्रधातु विकृती |
| ८) लोहभस्म | - श्वेतप्रदर |

बल्य दीपनंपाचनं रूचिकरं प्रज्ञाकरं शीतलं
सौंदर्यकविवर्धनं दृतरूज नीरोगताकारकम्।
धातुस्थैर्यकरं क्षय क्षयकर सर्व प्रमेहापहं
वंग भक्षयतो नरस्थ न भवेत्स्वप्नेडपि शुक्रक्षयः।।

रसेंद्रभास्कर।आयुर्वेदप्रकार

वंगभस्माचे सर्वात महत्वाचे कार्य होते ते शुक्रधातुवरच स्त्रीयां विषयी अधिक चिंतन केल्यामुळे वातनाडीचे उत्तेजन होते त्यामुळे शुक्ररखलन होऊन पुरूषामध्ये शुक्रक्षय निर्माण होतो, या बरोबरच रात्री झोपल्यानंतर होणारा शुक्ररखलन वंग सेवनामुळे कमी होते.

मारण द्रव्य विचार:

वंगभस्माचे शोधन हरिद्रेमध्ये आहे. हरिद्रा ही हरितकयादि वर्गातील वनस्पती असून सर्व पूती लोहांचे शोधन व मारण याच्या सहाय्याने केली जाते.

वड ही वनस्पती क्षीरीवृक्षात येते, ही ग्राही व शीत धर्माची असून स्वप्नावस्थेमध्ये वाढलेल्या शुक्रक्षयमध्ये याच्या चिकातील ग्राही धर्माचा वापर होतो तसेच गर्भाशयावर सुद्धा वडाचा चांगला उपयोग दिसून येतो त्यामुळे वंगाचे मारण झाल्यानंतर वडपारंण्याच्या भावनांची योजना पाहून आचार्य पाणीचा जयजयकार करावा वाटतो.

साहित्य:

कढई, झाकण, लोखंडी उलथणे चूल, माठ, खल, बाटली

## पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १) | वंगभस्म | तिक्त<br>कषाय | वायू आकाश<br>वायू पृथ्वी | लघू, रूक्ष<br>उष्ण | सर | शुक्रधातू |
| २) | हरिद्रा | कटु<br>तिक्त | वायू अग्नि<br>वायू आकाश | उष्ण, रूक्ष | - | अम्लधर्मी |
| ३) | वड | कषाय | पृथ्वि वायू | गुरू | ग्राही | वर्ण्यवर्ग |

वंग शोधन :

तैले तक्रे गवामूत्रे हयारनाले कुलत्यजे।
कृमान्निषेचयेत तप्तं द्रावे द्रावे तु सप्तधा।।
स्वर्णा दि लोहपताना शुद्धिरेषा प्रशरचते।।
र.समुच्चय ५ ।३१

वंगाचे शोधन हे ताम्राच्या शोधना प्रमाणेच करावयाचे असते परंतू शोधन करीताना थोडे बदल करावे लागतात (पान नं. ५३)

कृती :

१) अशुद्ध वंग
२) थेल
३) ताक
४) गोमूत्र
५) कुलत्थ क्याथ

साहित्य : भांडी, सछिद्र झाकणे, मोठी पळई (थावर)

१) सर्व प्रथम मोठी लोखंडी वळई त्यावर लोह दांडा असलेली घ्यावी त्याच्या वर धरण्यासाठी दुसऱ्या टोकास लाकडी मूठ हसवून घ्यावी यामुळे पळई गरम झाली तरी भाजणार नाही.

२) यानंतर एका चुल पेटवून व अशुद्ध वंग या वरामध्ये घालून पातक करण्यास सुरवात करावी

३) या आधी एक एका भांड्यामध्ये तेल, ताक, गोमूत्र व कुळथीचा काढा घ्यावा व त्यावर एक छिद्र असलेला पसरट पत्रा झालावा वंग पातळ झाल्यानंतर पहिल्या तेलामध्ये ओतावा, उष्ण द्रव वूतीलोहास थंड द्रवाचा स्पर्श झाल्यास तो आवाज करीत उघडतो. याकरिता छिद्र असलेल्या पातळ पत्र्याच्या मध्यभागीच तो सोडून काहीवेळ थावर त्यावर उलटे धरून ठेवावे यानंतर ते वंग गार होईपर्यंत दुसरे निम्मे वंग गरम करून पातळ करावे.

१) तेलामध्ये ओतलेले वंग हे थंड झाल्यानंतर ते धन बनते त्यानंतर ते बाजूला काढून घ्यावे व त्यामध्ये दुसरे पातळ झालेले
वंग टाकावे.

२) हा एक विधी पूर्ण झाल्यानंतर अशत्व पद्धतीने तीन-तीन वेळा ताक, गोमूत्र व कुलत्थ क्वायात वंगाची शुद्धी करावी.

३) यानंतर वंग काढून घेऊन ते स्वच्छ धुवावे व परत लगेचच मारणाकरिता वापरावे.

शोधन द्रव्य विचार :-

ताम्र शोधना प्रमाणेच (पान नं, ५४)

## नाग व मारण

अप्पा नाग ही अतिशय कोडगी वस्तू आहे असे सांगतात. कारण कितीही वेळा मारले तरी त्याचा पुन्हा जिवंत होण्याचा धर्म असतो, काही वृद्ध वैद्यांचे मते पुन:पुन: उत्थित होऊन मृत झालेले नागभस्मच उत्तम असते.

नागाचे मारण करीत असताना जर अग्नि अधिक वाढला तर परत त्याचे धातूमध्ये रूपांतर होते याकरिता योग्य अग्निने सावकाश मारण करावे लागते, नागाचे शोधन व मारण हे दोन्ही विधी वंगाच्याच शोधन व मारणाप्रमाणे करावयाचे असतात पडाच्या भावना देऊ नयेत. (पान नं. ७१)

हरिद्रा ही वनस्पती कटु तिक्त रसाची, अम्लधर्मी व रूक्ष असून, आप्पांनी ती वर्ण्य वर्गात सांगितली आहे. भावप्रकाश कार हरिद्रचे वर्गीकरण करताना ती हरितक्यदि वर्गामधील वर्णन करतात यानुसार मलशोधन करणे हा धर्म हरिद्र मध्ये पहिल्यापासून आहे हरिद्रेचा विशेष गुण वर्णन केला नसला तरी रक्तधातूची उष्णता कमी करण्यास तिचा चांगला उपयोग सांगितला आहे. हरिद्रेच्या भावना द्याव्या.

नाग मारण पूर्ण झाल्यानंतर एका पकईमध्ये घेऊन उष्णता द्यावी जर नागमृत झाले नसल्यास त्याची परत गोळी निर्माण होते. यानंतर परत हरिद्रेमध्ये टाकावे व मारण करावे.

गुणधर्म:

‘सीसं वंगगुणं ज्ञेयं विशेषान्मेहनाशनम्।
नागस्तु नागशततुल्यबलं ददाति व्याधि विनाशर्याते।।
जीवनमातनोति। वन्हि प्रदीवयति कामबलं करोति।
मृत्यूं च नाशर्याते सन्तत: सेवित:स:।।
भावप्रकाश निधष्टु

नाग हे वंगाप्रमाणेच गुणधर्म असणारे असुन मेहनाशन हा गुणधर्म याचे जवळ आहे. वंगसेवनामुळे हत्तीस मारणाऱ्या सिंहाप्रमाणे ताकद येते व नागसेवनामुळे हत्तीप्रमाणे ताकद येते, असे वर्णन आहे.

याबरोबर नाग भस्माचा नाडी संस्थान, यकृत, वृक्क व अस्थि यामध्ये वापर होतो. नागभस्म हे अस्थिगामी द्रव्य आहे यामुळे अस्थिसंधीच्या विकृतीमध्ये कार्यकरणारी द्रव्ये नागासोबत दिल्यास उत्तम कार्य करतात.

मधुमेहाच्या संन्यासावस्थेमध्ये नागभरस्माचा वापर दिसून येतो. याबारोबरच अपची, गंडमाळा, कोष्ठशुल, अर्थ, गुल्म, ग्रहणी, अतिसार यामध्ये नागभस्माचा वापर केला जातो.

रसतरंगिणी काराच्या मताप्रमाणे नागभस्म हे उत्तम जीवाणुहर, खतस्त्राव, व्रणस्त्राव, शोधस्त्राव यामध्ये लाभदायक आमाशय विकृतीजन्य आम्लपिताव याचा वापर करण्यास सांगितला आहे. आंत्रशोथास दूर करण्यासाठी नागभस्माचा वापर होतो. रक्तप्रदरा, कफप्रकोपजन्य व्रण यामध्ये याचा चांगला उपयोग दिसून येतो.

आमयिक प्रयोग :

| द्रव्य | | व्याधी |
|---|---|---|
| १) हरिद्राः आवळापूर्ण | - | प्रमेह |
| २) अशोकत्वककषाय | - | रक्तापदर |
| ३) नागकेशर | - | रक्तार्श |
| ४) रससिंदूर | - | आंत्रशोध |
| ५) जटामांसी, बला | - | वृक्कशोययुक्त आक्षेप |

साहित्य : वंगा प्रमाणे

नागशोधन :

नागाचे शोधन वंगाप्रमाणेच करावे (पान नं. ७४)

## पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | नागभस्म | मधूर<br>तिक्त | पृथ्वीजल<br>वायू आकाश | गुरू लेखन | बल्य<br>अग्निदीपन | अस्थिगामी |
| २) | हरिद्रा | कटु<br>तिक्त | वायू अग्नि<br>वायू आकाश | उष्ण, रूक्ष | - | अम्लधर्मी |

## यशद व त्रिवंग मारण

### यशद शोधन मारण विधी :

जसदाचे शोधन व  मारण हे दोन्ही विधी वंगाप्रमाणेच करावयाचे आहेत, (पान नं. ७४) मारण झाल्यानंतर हळदीच्या काढ्याच्या सात भावना देण्यास सांगितले आहे.

### गुणधर्म :

यशद वंगसदृश्य रीती हे तुश्च तन्मतम्।
यशदं स्तुवरं तिक्त शीतलं कफपित्तहत।।
चक्षुष्यं परम मेहान पाण्डुं श्वासं च नाशयेत।
भावप्रकाशनिघण्टु

यशद कषाय, तिक्त रस युक्त, नेतहितकर, प्रमेह, पांडू व श्वास यामध्ये उपयुक्त आहे.

यशद बह्य आभ्यंतर प्रयोगामध्ये स्त्रावी व शोषक असते, वेगवेगळे मेह, खेद, श्लेष्मा व आन्तीय स्त्रावांचे शोषण होण्याकरिता यशद व खर्पर दिले जाते, आन्त्रक्षयातिसारामध्ये यशदाचा वापर होतो.

### आमयिक प्रयोग :

| | द्रव्य | गुण |
|---|---|---|
| १) | पुराणधृत | - नेत्रदुर्बलता |
| २) | गोधृत | - विचर्चिका (लेप) |
| ३) | अभ्रकभस्म | - क्षथ कास |
| ४) | अशोकबक | - कष्टार्तव |
| ५) | लोहभस्म | - श्वेतप्रदर |
| ६) | सुवर्णमाक्षिकभात्म | - सूर्यावर्त |

वरील उपयोगाबरोबरच आत्रशोथ, पोथकी, अभिव्यंद, वर्त्म, शुण्डिका यामध्ये वापर गिळवृद्धी, विस्मृती यामध्ये उपयुक्त आहे.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | यशदभस्म | कषाय<br>तिक्त | वायू पृथ्वी<br>वायू आकाश | शीत | बल्य नेगहितकर | - |
| २) | हरिद्रा | तिक्त<br>कटु | वायू आकाश<br>वायू अग्नि | रूक्ष<br>उष्ण | - | अम्लधर्मी |

साहित्य : वंगाप्रमाणे

## त्रिवंग मारण

कृती :

सर्वप्रथम लोखंडी कढईमध्ये शुद्ध वंग नाग व यशद घ्यावे व पातळ करून हरिद्रेच्या सहाय्याने वंगभस्माप्रमाणे तीम तास मारण करावे (पान नं. ७१) मारण पूर्ण झाल्यावर हरिद्रेच्या भावना देऊन भाजून देऊन भाजून काढावे, यानंतर पंचमित्रात अपुनर्भण परिक्षा करावी.

अपुनर्भव परिक्षा :

पंचमित्र :-

घृत गुंजाथ सौभाग्यं क्षौद्र च पुरसंज्ञकम्।
एतत्तु मिलित विज्ञैर्मित्रश्च पंचकमुच्यते।।
विविधाना तु लोहानां द्रावणाय विशेषत:।
रसतन्त्र विशोषज्ञैर्युज्यते मित्रपंचकम्।।
रसतरंगिणी २।३७

सर्व प्रथम एक मुबा घ्यावी. एका खलामध्ये धृत, गंजा, टंकण, मध व गुग्गुळ एकत्र घ्यावा यामध्ये तयार केलेले त्रिवंग भस्म १ ग्राम टाकावे पंचमित्राची मात्रा २ ग्राम इतकी घेऊन त्यामध्ये भस्म घोटावे, घोटून झाल्यानंतर ते मुबेमध्ये भरावे, मुबेला बंद करून ती अग्नि मध्ये ठेवावी, साधारणपणे तीन तास पुट द्यावे. त्यानंतर मुबा उघडून पहावी भस्म कच्चे असल्यास त्यामध्ये धातूचे कण दिसतात, ते दिसल्यानंतर भस्म अपक्व असून त्याचे परत मारण करावे, यावेळी नाग, वंग व जशद यांची अपुनर्भव परिक्षा करावी, यावेळी भस्मे व्यवस्थित झाल्यानंतरच ती वापरावी.

साहित्य : वंगाप्रमाणे

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | वंगभस्म | तिक्त<br>कषाय | वायू आकाश<br>वायू पृथ्वी | लघु, रूक्ष<br>उष्ण | सर | शुक्रधातू |
| २) | नागभस्म | मधूर<br>तिक्त | पृथ्वी जल<br>वायू आकाश | गुरू, लेखन | बल्य<br>अग्निदीपन | आस्थिधातू |
| ३) | यशदभस्म | कषाय<br>तिक्त | पृथ्वी वायू<br>वायू आकाश | शीत | भल, नेत्य | - |
| ४) | हरिद्रा | कटू<br>तिक्त | वायू अग्नि<br>वायू आकाश | उष्ण, लघू | - | अम्लधर्मी |

## सुवर्णमाक्षिक शोधन व मारण

सुवर्णमाक्षिकाचा समावेश महारसांमध्ये करण्यात आला आहे. सुवर्ण माक्षिकाचे शोधन मारण परिताना ते उघडयावर व मोकळ्या हवेमध्येच करावे. कारण माक्षिकाचे शोधन मारणविधी करताना ते पेट घेण्याची शक्यता असते.

शोधन विधी:

एरण्डतैललुङ्गाम्बु सिद्धं शुध्यति माक्षिकम्।
सिध्दं वा कदलीकन्दतोयेन घटिकादृयम्।।
तप्तं क्षिप्त वराक्वाथे शुद्धिमायाति माक्षिकम्।।
रसरत्नसमुच्चय २-८३

घटक:

१) अशुद्ध सुवर्ण माक्षिक
२) एरंडेल तेल
३) खुरासणी तेल

मारण विधी:

अजामुत्रे ऽथवा तैले कवाये वा कुलल्थजे।
तक्रे वा धर्षित पक्व म्रियते स्वणङ्माक्षिकम्।।
रसचंडाशु

घटक

१) शुद्ध सुवर्ण माक्षिक
२) तिळ, तेल

## गुणधर्म

सुवर्णमाक्षिकं वृष्यं मधुरं तु रसायनम्।
तिक्त स्वर्यश्च चमुष्य त्रिदोषहनं परंमतम्।।
क्षयमर्शांसि मेहानि विविधा बस्तिवेदनाः।
पाण्डुश्वयधुकुष्ठनि विषदोषादिकान हरेत।।
जीर्णज्वरमपस्मार मन्दानलमरोचकम्।
अनिद्रा नाशयत्याशु योगवाहि पर मतम्।।
रसतंरगिणी २१-२६

सुवर्ण माक्षिक हे तिक्त, मधुर रसात्मक, त्रिदोषहर, वृष्य, रसायन आहे. याचा वापर क्षय, अर्श, मेह, बस्तिशुल, पाळु,शोथ, कुष्ठ, अपस्मार, जीर्णज्वर यामध्ये करतात.

माक्षिकाचा शुक्रजनन व निद्राजनन असे दोन प्रभाव आहेत. सुवर्णमाक्षिक रक्तवाहिन्या संकोचक आहे यामुळे श्वतस्त्राव बंद करण्यास याचा उपयोग होतो पित्तप्रकोपजन्य ग्रमात याचा अत्यंत चांगला उपयोग दिसून येतो. सर्व रसायनात अग्व्य असणारा पित्र जन्य विकृती उपयुक्त आहे. स्वतपित्तामध्ये माक्षिक हे एक उत्तम औषध समजले जाते रक्तार्श किंवा पित्तार्शामध्ये अधिक प्रमाणामध्ये स्वत गेल्यास रक्तवर्धक म्हणुन माक्षिकाचा उपयोग होतो.

मूत्रप्रवृत्ती अधिक होत असल्यास, थेंबथेंब होत असल्यास माक्षिकाचा वापर होतो. पित्त प्रधान व्याधीत माक्षिक उत्तम कार्य करते.

आमयिक प्रयोग

| | द्रव्य | व्याधी |
|---|---|---|
| १) | यवक्षार | - मूत्रकृच्छ्रू |
| २) | पुनर्नवा, गुंडुची, सुंठ | - शोथ |
| ३) | कज्जली | - रक्तफ्ति |
| ४) | पिंडखजूर | - गर्भिण गर्भाशाय स्त्राव |
| ५) | अभ्रक भस्म | - राजयक्ष्मा |

साहित्य: चूल, घमेले, उलथणे. लोखंडीखल, दगडीखल

शोधन द्रव्य विचार

माक्षिक हा लोहाचा उपधातु मानला जातो, माक्षिकामध्ये ताम्राचा अंश असल्यास ते दह्यात टाकल्यावर कळकते व त्यास हिरवा रंग प्राप्त होतो या भस्माच्या सेवनाने भ्रांती, वमन, या सारखी लक्षणे दिसून येतात. करिता माक्षिकामध्ये असणारे हे अंश बाहेर घालवण्या करिता एरंडेलतेल चांगले कार्य करते. एरंडेल हे मधूर तिक्त रसाचे उष्ण, विच्छिल असून सौम्य रेचक आहे. शोधनावेळी माक्षिकामधुन जी काळजी निघुन जात असावी ती वा अशुद्ध ताम्रच असावी का ? ग्रंथात एरंडेल तेलासोबत सैधवाचा सुद्धा वापर करावयास सांगितला आहे. माक्षिकातील ग्राही धर्म कमी करण्यास एरण्ड उपयुक्त ठरतो.

तिळतेल तिक्त मधूर व्यावायी विकासी, सुक्ष्म, लेखन असुन यांच्या साहाय्याने माक्षिकास स्त्रोतोगामित्व प्राप्त होण्यास मदत होते.

माक्षिक शोधन :

१) सर्वप्रथम एक लोखंडी खल स्वच्छ करून घ्यावा, त्यामध्ये अशुद्ध सुवर्ण माक्षिकाचे एक दोन खडे टाकावेत खलाखाली पोते अंथरावे.

२) खडे टाकून झाल्यानंतर ते बत्यच्या सहाय्याने बारीक करण्यास सुरवात करावी.

३) माक्षिक हे मृदु असल्याने त्याचे लगेचच बारीक चूर्ण संपूर्ण गाळुन घेतल्यानंतर ते एका भांड्यामध्ये काढून घ्यावे व वजन करावे.

४) माक्षिकाचे शोधन एरंपडेल तेलामध्ये करावयाचे असते यासाठी पसरत घमेले किंवा लोखंडी कढई घ्यावी. त्यामध्ये बारीक केलेले चूर्ण ओतावे कढई स्वच्छ असावी जर त्यामध्ये आधी कोणताही पदार्थ तयार केलेला असल्यास लिंबू स्वरसाने धुवून सुखोळ पाण्यामध्ये विसळून कोरडी करून घ्यावी.

५) एक तीन विटांच्या उंचीची चुल तयार करावी ती मोकळ्या हवेमध्येच करावी १ माक्षिक हे पेट घेत असते.

६) चुलीवर माक्षिक घातलेली कढई ठेवावी, त्यामध्ये एरंडेल तेल संपूर्ण माक्षिक बुडेल इतपत घालावे. खाली मंदाग्निला सुरवात करावी, तो देत असता लोखंडी उलथण्याच्या सहाय्याने मिश्रण एक सारखे हलविणे आवश्यक असते नाहीतर ते तळास चिकटुन बसण्याचा संभव असतो.

७) तेल यामध्ये आटु लागते व काही प्रमाणात घाण लोखंडी कढईच्या कडेस जमू लागते. या प्रकारे सर्व तेल आटुन गेल्यानंतर माक्षिक संपूर्ण लाल होईपर्यंत त्याला आच द्यावी लोखंडी उलथण्याने मिश्रण परतत रहावे येथे शोधन पूर्ण होते.

मारण

१) लाल वणाचे झाल्यानंतर त्यामध्ये तेल ओतावे यावेळी माक्षिक बुडेल इतपतच ओतावे. थेल टाकल्यानंतर माक्षिक पेटू लागते याकरिता काळजीपूर्वक लांबून न सांडता ओतावे.

२) एकदम ओतल्यास भडका होतो हे लक्षात ठेवावे, तेलपूर्ण पेट घेत व त्याच्या वरपर्यंत जातात.

३) थेल संपल्यानंतर ज्वाला विझतात व माक्षिकाच्या चूर्णामध्ये बारीक खिळ्याप्रमाणे छिद्र दिसू लागतात.

४) यानंतर कढइं चुलीवरून खाली उतरवून घ्यावी व त्याच्या बाजूस लागलेली काळी काळजी फडक्याचा बेळा करून सावकाश पुसून काढावी.

५) सर्व काळजी पुसून काढल्यानंतर माक्षिक बुडेपर्यंत ओतावे व उलथव्याने फिरवत रहावे. यानंतर कडेला जर काजळी जमली तर ती पुसून काढावी. काजळीचे प्रमाण कमी झालेले असते किंवा ती येत ही नाही.

६) तप्त झाल्यानंतर खुरासणी तेल माक्षिक बुडेपर्यंत ओतावे व उलधण्याने फिरवत रहावे यानंतर कडेला जर काळजी जर काजळी जमली तर ती पुसून काढावी काजळीचे प्रमाण कमी झालेले असते किंवा ती येत ही नाही.

७) हा विधी एकूण सात वेळा केल्यानंतर माक्षिकाचे भस्म तयार होते.

८) सातव्या वेळी झाल्यावर अग्नि बंद करून ते स्वागशीत होऊ द्यावे.

९) थंड झाल्यानंतर ते एका खलामध्ये (दगडी) काढून घेऊन मर्दन करावे.

१०) श्लक्ष्ण झाल्यानंतर वजन करून बाटलीमध्ये भरून ठेवावे.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | सुवर्णमाक्षिक भस्म | मधूर तिक्त | पृथ्वी जल वायू आकाश | वृष्य लघु, शीत | रसायन | रक्तधातू |
| २) | एरंडेल तेल | मधूर तिक्त | पृथ्वी जल वायू आकाश | उष्ण, पिच्छिल, गुरू | तीक्ष्ण, सुक्ष्म | - |
| ३) | तिळतैल | तिक्त मधूर | वायू आकाश पृथ्वी जल | गुरू, वृष्य | व्यावायी, विकासी सुक्ष्म, लेखन | - |

## अभ्रक शोधन व मारण

अभ्रक हे महारसामधील एक प्रधान द्रव्य आहे. याचे शोधन व मारण अनेक प्रकारे करतात. आयुर्वेद प्रकाश या ग्रंथामध्ये अशाच एका शोधन विधीचे वर्णन आहे.

शोधन विधी :

वज्राम्रं वन्हिसंतप्तं विक्षिप्तं सप्तसप्तधा।
गोदुग्धे त्रिफलाक्वाथे कांजिके सुरभीजले।।
मलत: शुद्धिमायाति प्रक्षिप्तं वा त्रिधा त्रिधा।
अथवा बदरीक्याथे ध्मातमभ्रं विनिक्षिपेत।।
मर्दिता पाणिना शुष्कं धान्याभ्रादतिरिच्यते।।

आयुर्वेद प्रकाश २ ।११०

घटक :

१) अशुद्ध अभ्रक
२) गोदुग्ध - संतर्पणोत्थ
३) गोमूत्र - अग्निवर्धक/टंकणमारीत
४) बदरसाल क्वाय - अपतर्पणोत्थ

कृती :- गंधकाप्रमाणेच अभ्रक कोणत्या स्वरूपाच्या व्याधीत वापरायचे यानुसार त्याची शुद्धी वर्णन केली आहे. सर्व प्रथम ताम्रशोधनास ज्या प्रमाणे शेगडी घेतली होती वा विटांनी तयार केली त्याप्रमाणे इथे तयार करून घ्यावी (पान नं. ५३) यानंतर तीन भांडी घेऊन त्यामध्ये दूध, गोमूत्र, बदरसालक्वाय घ्यावे.

अभ्रक कोळश्यामध्ये टाकून तप्त लाल करावे, लाल झाल्यावर प्रथम ते दुधामध्ये टाकावे, साधारणपणे दूधामध्ये सर्व अभ्रक बुडून ते चार अंगुले वर राहिल अशा बेताने टाकावे, यानंतर दूधाच्या भांड्यावर झाकण ठेवावे. दुसरा अभ्रकाचा तुकडा याचवेळी गरम करण्यास ठेवावा तो तप्त झाल्यानंतर गोमूत्र असणाऱ्या भांड्यामध्ये टाकावा व भांड्याला झाकण लावून ठेवावे. यानंतर क्रमाने अभ्रक तप्त करून बदरसाल क्वाथ यामध्ये टाकावे. अशा प्रकारे प्रत्येक द्रव्यामध्ये एकदा शुद्धी झाल्यानंतर गोदुग्धामध्ये टाकलेले अभ्रक बाहेर काढुन घ्यावे.

दुधामध्ये टाकलेले अभ्रक हे फुगलेले, जाड झालेले असते त्याच्या पापुद्यामध्ये गेलेले दूध नितळून बाजूला काढावे व त्यानंतर कोळश्यामध्ये परत तप्त करावयास ठेवावे, ते लाल झाल्यानंतर परत दुधामध्ये टाकावे व झाकण बंद करावे, अशा प्रकारे प्रत्येक द्रव्यात शुद्ध केलेले अभ्रक सात-सात वेळा फक्त एकाच द्रव्यात शुद्ध करावे.

प्रत्येक अभ्रकाचे गुणधर्म हे एकमेकांपासुन वेगळे असुन त्यांचा वापर सुद्धा वेगवेगळाच करावा, अभ्रक शुद्ध करताना हिसूळ होते त्याचे पापुद्रे निघू लागता अशावेळी ते घेऊन एका कढईमध्ये टाकून शुद्ध करावे. सर्व शुद्धी झाल्यानंतर गरम पाण्याने धुवून वाळवावे व त्यानंतर पुटे देऊन मारण करावे.

शोधन द्रव्याचा विचार :-

अभ्रकाच्या शोधनामुळे त्यामध्ये असणारे धनत्व, चिक्कणता हे दोष कमी होतात. यामध्ये वापलेले गोदुग्ध, मधूर, वृष्य, रसायन असून पृथ्वी व आप या महाभूताशिक्याने निर्माण झाले आहे. यामुळे अपतर्पणोत्थ व्याधीमध्ये याचा वापर चांगला होतो.

गोमूत्र हे कटु तिक्त रसाचे क्षारधर्मी असून अभ्रकास एकमेकापासून विलग करून प्राप्त करून देण्यास याचे सहाय्य होते. यात शुद्ध अभ्रक अम्लधर्मी प्रकृतीच्या व्यक्तीमध्ये संजर्पणोत्थ व्याधीची चिकित्सा करताना उपयुक्त पडते.

त्रिफळा हा पंचरसात्मक अम्लधर्मी व अनुलोमक मल नाहीसा करणारा व खनिजातील वन्हि दोष नष्ट करणारा आहे यामध्ये शुद्ध अभ्रकाच सर धर्म वाढतो व हे क्षारधर्मी प्रकृतीच्या प्रकृतीच्या रूग्णांना देता येते.

कांजी अम्ल भेदन, रोचन असून यामध्ये शुद्ध अभ्रक अग्निवर्धन करण्यास उपयुक्त ठरतो.

बदरसाल तिक्त रसाची आहे यामुळे सुद्धा अभ्रजाचा अग्निवर्धन  हा गुणधर्म वाढतो अभ्रकाचे धनत्व व चिकणता हे दोन दोष थाने कमी होतात.

अभ्रक मारण :

अभ्रकाचे मारण प्रमुख दोन प्रकारांनी केले जाते त्यामध्ये टंकण मारीत अभ्रक भस्म व वनस्पती मारीत अभ्रक भस्म अशा दोन प्रकारे केले जाते.

१) टंकण मारित अभ्रक भस्म

घटक

१) शुद्ध अभ्रक - १ भाग

२) टंकण - २ भाग

३) ३) गोमूत्र -

सर्वप्रथम टंकण घ्यावे, त्यास एका चांगल्या कापडामध्ये (ओल्या) घालून पुसून काढावे, यामुळे टंकणास लागलेली सर्व घाण निघून जाते यानंतर शुद्ध अब्रक १ भाग व टंकण २ भाग घेऊन त्यांना एकत्र लोखंडी खलात कुटावे, कुटल्यानंतर त्यांचे एकजीव मिश्रण तयार करून शरावसंपुटामध्ये घालून संधीबंधास मात्तकापड करावे व त्यानंतर पुट द्यावे पूट स्वांगशीत झाल्यानंतर शराव संपुट काटुन घ्यावे. त्यामध्ये असणारे अभ्रक खलामध्ये घेऊन परत घोटावे घोटून झाल्यानंतर परत दुसऱ्या शराव संपुटामध्ये भरावे व मातकापड करून पहिल्यापेक्षा अधिक अग्निचे पूट द्यावे हा प्रकार कमीत कमी चार ते पाच वेळा करावा लागत असतो. परंतु भस्म हे निरूत्थ झाल्यानंतरच तयार झाले असे समजावे.

भस्म तयार झाल्यानंतर व्यवस्थित बाटलीमध्ये भरून ठेवावे.

२) वनस्पती मारीत अभ्रक भस्म :

या प्रकारामध्ये संतर्पणोत्थ अभ्रक भस्म व अपतर्पणोत्य अभ्रक भस्म असे दोन प्रकार पडतात.

यामध्ये फक्त वनस्पती भावना बदलून हे दोन प्रकार केले जातात अभ्रक मारणासाठी अनेक वनस्पती सांगितल्या असल्या तरी ठिकाणी आप्पा वापरत असलेल्या वनस्पती देत आहे.

संतर्पणोत्य अभ्रक भस्म

घटक

१) गोदुग्धात शुद्ध केलेला अभ्रक

२) कांदा रस

३) गोखरू क्वाथ

४) अश्वगंधा

५) तालिमखाना (कोकीलाक्ष)

६) सारीवा

७) कुमारी

८) काळी मुसळी

९) वड पारंब्या

१०) गुळ

कृती :-

१) सर्व प्रथम दूधामध्ये शुद्ध केलेला अभ्रक घ्यावा. यानंतर गुळ घेऊन बारीक करावा, त्यानंतर थोडेसे पाणी घालुन मिश्रण पातळ करून घ्यावे एका खलात अभ्रक घेऊन त्यामध्ये वरील गुळ मिश्रित पाणी ओतुन घोटण्यास सुरवात करावी. घोटत असताना द्रव अभ्रक बुडेल इतकाच असावा जास्त असू नये. भावना देताना सर्व काळजी घ्यावी द्रव जास्त झाल्यास परत संपूर्णत जिरला जात नाही. पहिली भावना देऊन वाळल्यानंतर दुसरी भावना देण्यास घ्यावी.

कांदे चांगले घेऊन सोलावेत त्यानंतर दगडीमध्ये चेचून किंवा यांत्रिक पद्धतीने त्यामधून स्वरस काढावा. स्वरस अभ्रकावर ओतून खल करून व्यवस्थित भावना द्यावी, भावना देताना अभ्रक बाहेर पडु नये याकरीता दाब देत घासत न्यावा. भावना देताना इतर ठिकाणी लक्ष नको. यानंतर गोखरूची भरड ८ पट पाण्यात एक रात्रभर भिजवून ठेवावी, कांदा स्वरसाची भरड ८ पट पाण्यात एक रात्रभर भिजवून ठेवावी, कांदा स्वरसाची भावना वाळल्यानंतर १/४ पट शल्लिक राहिपर्यंत गोखरूचा क्वाथ करावा तो तयार झाल्यानंतर फडक्याच्या सहाय्याने गाळून घ्यावा. वरील दोन भावना देऊन झालेले अभ्रक गोखरू क्वाथाने भावित करावे, क्वाथ एकदम गरम असताना भावित करू नये. कोमट झाल्यानंतर थोड्या-थोड्या मात्रेमध्ये भावित करावा.

याच प्रमाणे अश्वगंधा क्वाथाची भावना द्यावी.

तालिमखान्याचे मूळ धेऊन त्याचे भरड चूर्ण करून घ्यावे, भरड करताना लोखंडी खलामध्ये घ्यावे. एक रात्रभर भिजवून ८ पट जल घालून ह्ल पट शिल्लक राहीपर्यंत क्वाथ करून गाळून घ्यावा, त्याने परत अभ्रकास भावना देऊन उन्हामध्ये वाळवून घ्यावे.

यानंतर सारीवा मुळाची भावना द्यावी. थी वाळल्यानंतर कोरफडीच्या पानामधून रस काढून घ्यावा याकरिता कोरफड आणून पान स्वच्छ पाण्याने पुसून घ्यावे, कडेला असणारे काटे व त्वचा सुरीने कापुन टाकावी. एक पातेले घेऊन त्यामध्ये आतील गर काढून घ्यावा व इतर भाग टाकून द्यावा. घर घेऊन परत एक सारखा हलवून घ्यावा व त्याची भावना अभ्रकास द्यावी भावना सुकवून झाल्यावर काळी मुसळी व वड पारंब्या यांच्या भरडी घेऊन रात्रभर भिजवून सकाळी क्वाथ करून एक भावना नंतर दुसरी देऊन वाळवून घ्यावी.

सर्व भावना झाल्यानंतर अभ्रक सूर्यकिरणात चांगले वाळवावे यानंतर त्यास पुट द्यायचे असते.

अपतर्पणोत्व अभ्रक भस्म :

वनस्पती :

१) काटेरिंगणी
२) अपामार्ग
३) गुडुची
४) तुल्स
५) दुर्वा
६) अगस्ता
७) हरिद्रा
८) मुंडी
९) त्रिफळा

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | अभ्रकभस्म | तिक्त<br>कषाय<br>मधूर | वायू आकाश<br>पृथ्वी वायू<br>पृथ्वी जल | लघु, रूक्ष<br>शीत<br>लघू | प्रज्ञाबांधी<br>धातूवर्धन<br>आयुष्टाकर | रक्तधातू |
| २) | गोदुग्ध | मधूर | पृथ्वी जल | शीत, रसायन<br>स्निग्ध, रस | बल्य, शुक्रकर | - |
| ३) | गोमूत्र | कटू<br>तिक्त | वायू अग्नि<br>वायू आकाश | तीक्ष्ण, उष्ण<br>लघू, अग्नि,<br>दीपन | मेध्य<br>पित्तकृत | - |
| ४) | बवरीसाल | तिक्त | आकाश वायू | शीत रूक्ष | लघू, अग्निदीपन | - |
| ५) | कांजी | अम्ल | अग्नि पृथ्वी | तीक्ष्ण, उष्ण<br>लधू, पाचन | भेदन, रोचन | - |
| ६) | त्रिफला | पंचरस | - | दीपन, लघु<br>वृंहण | रसायन,<br>अनुलोमन | सर वर्ग |
| ७) | टंकण | कटू | वायू अग्नि | अग्निवर्धन | सारक | - |
| ८) | गुळ | मधूर | पृथ्वी जल | गुरू, स्निग्ध | वृण्य, मूत्रशोधन | - |
| ९) | गोखरू | मधूर | पृथ्वी जल | स्निग्ध | अश्मरीहर | दीपन वर्ग |
| १०) | अश्वगंधा | - | - | - | - | - |

# गैरिक शोधन

सुवर्ण गैरिक हे कमी किमतीमध्ये निर्माण होणारे अमृततुल्य औषध आहे.

## शोधन विधी

गव्याजेन तु सम्मृष्टं यत्नतो मन्दवन्हिना।
सुवर्णगिरकं शीघ्रं शुद्धिमापप्नोत्यसंशयम्।।
रसतरंगिणी तरंण २२

साहित्य: खल, कढई, गॅस, उलधणे

कृती:
घटक
१) सुवर्ण गैरिक - १ भाग
२) गोधृत - १/८ भाग

१) सर्व प्रथम सुवर्णगैरिकाचे खडे दगडी खलामध्ये घेऊन बारीक करून त्याचे सूक्ष्म चूर्ण करावे.

२) एक कढई घेऊन त्यामध्ये गैरिकाच्या १/८ भाग तूप घ्यावे. कढई गॅसवर ठेऊन दीप्ताग्नि सुरू करावा

३) घृत पातळ झाल्यानंतर त्यामध्ये थोडे थोडे गैरिक टाकून उलथण्याने हलवित रहावे.

४) येथे घृतभृष्ट करावयास सांगितले आहे तुपामध्ये ते तळायचे नाही अग्नि कमी ठेवावा जर धृत अधिक झाल्यास
मिश्रणातुन धूर येतो व तूपाचा वास गैरिकास येऊ लागतो. याकरिता त्याचे प्रमाण कमी ठऊन अग्नि नियमन करावे.

५) यानंतर गैरिकाचा रंग बदलु लागतो व कढईवर उलथण्याने मारल्यास गैरिकामध्ये लहरी उत्पन्न होतात यावेळी गैरिक
शुद्ध झाला असा समजून अग्नि बंद करावा.

६) यानंतर तो एका परातीत पसरून सावलीतच वाळवावा यानंतर लगेचच ओषधात वापराव.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | गैरिक | कषाय<br>मधूर | पृथ्वी वायू<br>पृथ्वी जल | शीत, स्निग्ध | रक्तप्रसादक<br>रक्तस्तंभक | रक्तधातू |
| २) | गोघृत | मधूर | पृथ्वी जल | गुरू, सुगंधी | ओजोवर्धक, चक्षुव्य, दीपन | - |

शोधन द्रव्य विचार:

गैरिक मधूर कषाय रसात्मक असून त्याचे मुख्य कार्य हे रसधातूवर घडून येते. गोघृत हे प्रामुख्याने दीपन कर्म करणारे स्निग्ध आहे. घृतामध्ये गैरिकामधील स्निग्धता व दीपन हे दोन्ही धर्म यामुळे वाढनारच असतात परंतू त्याच सोबत गैरिक शोधनाचा मुख्य हेतु त्यामधील विरल करणे हा असतो घृतामध्ये शोधन केल्यामुळे गैरिकाचे परमाणु एकमेकांपासून चांगल्या प्रकारे विरल होतात यामुळे घृतामध्ये गैरिक शोधन उत्तम गुणधर्माचे तयार होते.

गुणधर्म व उपयोग

गैरिकाचे गुणधर्म व उपयोग पुढे गिरीज युक्त कल्प या सदराखाली देण्यात आले आहेत. वुनरावृत्ती टाळण्यास येथे ते देत नाही.

# कासीस शोधन मारण

कासीस हे उपरसामध्ये वर्णन केलेले खनिज आहे कासीसाचे वालुकासीस व पुष्पकासीस असे दोन प्रकारचा असतो यापैकी हिरव्या रंगाचा वालुकासीस येथे वापरावा. कासीसामध्ये लोहाचा अंश असल्याने काहीजण कासीसास लोहाचा उपधातु मानतात.

शोधन :

‘सकृभ्दृडाम्बुना क्लिन्नं कासीस निर्मलं भवेत।’

व्सरत्नसमुच्चय ३ ।५४

घटक :

१) अशुद्ध कासीस

२) माकास्वरस

अशुद्ध कासीस एका खलामध्ये घेऊन बारीक करावा, त्यानंतर त्यामध्ये माक्याचा स्वरस काढून घालावा, या स्वरसामध्ये कासीस विरघळून लागतो, यानंतर खलावर झाकण ठेवून द्यावे. दुसऱ्या दिवशी झाकण उघडून माक्याचा रस ओतावा व तो उन्हामध्ये सुकवावा. कासीस कोरडे करून घ्यावे या नंतर कासीस पांढरे होते. यानंतर त्याचे मारण करावे.

मारण विधी :

बलिनाहतकासीसं।

रसरत्नसमुच्चय ३ ।५५

घटक :

१) शुद्ध कासीस - १ भाग

२) गंधक (दूधात शुद्ध केलेला) - १ भाग

शुद्ध कासीस घेऊन त्यामध्ये समभाग दूधामध्ये शुद्ध केलेला गंधक टाकावा या दोघांचा खल करावा या नंतर त्यास विधीवत गजपुट द्यावे (पांन नं. ६६) भस्माचा अम्ल रस जाईपर्यंत पुटे द्यावी.

अम्लता गेल्यानंतर पुट व्यस्थित झाल्याचे समजून बाटलीमध्ये भस्म भरून ठेवावे.

शोधन द्रव्य विचार :

माका ही गुडच्यादी वर्गातील वनस्पती असून कटु, तिक्त रसात्मक, उष्ण व रूक्ष आहे. कासीस या द्रव्याचा प्रमुख वापर हा श्‍वित्रकुष्ठामध्ये होतो माका ही वनस्पती त्वच्य, कुमीहन, कुष्ठहन या गुणधर्मांची वर्णन केली आहे, सहानिकच कासीराची शुद्धी माक्यामध्ये केल्याने याचे गुणधर्म वाढण्यास मदत होणार आहे.

मारण द्रव्यामध्ये वापलेला गंधक हा सुद्धा कटु रसात्मक त्वचागामी, कुष्ठहर, सर व रसायन धर्माचा आहे. या ठिकाणी वापरावयाचा गंधक गा गोदुग्धामध्ये शुद्ध करून घेण्यास सांगितला आहे. कासीस हा उष्ण आहे त्याशिवाय उष्ण गुणाचा घेतला तर कासीस अधिक उष्ण होईल याकरिता गोदुग्धामध्ये शुद्ध केलेला गंधक वापण्याची योजना करण्याचा हेतु दिसून येतो ?

कासीस गुणधर्म :

कासीसमम्लमुण्णंच तिक्त सुवरंतथा।
वातश्लेष्महरं केश्यं नेत्रकण्डुविषप्रणुत।।
मूत्रकृच्छाश्मरीश्वित्रनाशनं परिकीर्तितम्।।
भावप्रकाश निघण्टु

कासीस अम्ल रसात्मक, तिक्त, कषाय रसाने युक्त वातश्लेष्महर मूत्रकच्छ् अश्मरी व श्वित्रनाशक आहे. हे रजप्रवर्तक, लिका रोगहर, बाह्यत संकोचक आहे.

कासीसाचा उपयोग करीत असताना नेत्राच्या विविध विकासात तो वापरण्यास सांगितला आहे. यामध्ये अभिव्यंद, नेत्रव्रण, पूयाभिष्यंद, नेत्रकनीनीका व्रण यामध्ये कासीसाचा चांगला उपयोग होता, या बरोबर आमसंशोषक हे याचे चागंले कार्य आहे. कासीसाचे सेवन केल्यामुळे पाचकरसातील पाचकत्व वाढण्यास मदत होते. रसरक्तादि धातूंच्या अनुलोम क्षयात याचा चांगला वापर दिसून येतो. ग्रहणी, निजव्रण तसेच यकृत प्लीहा यांच्या व्याधीत तो वापरतात.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | कासीस | अम्ल<br>तिक्त<br>कषाय | पृथ्वी जल<br>वायु आकाश<br>पृथ्वी वायू | उष्ण<br>शीत | ग्राही,<br>श्वित्रहर | त्वक्गामी |
| २) | माका | तिक्त<br>कटु | वायु आकाश<br>वायू अग्नि | लघू, रूक्ष | पाचन, रसायन | त्वक्गामी |
| ३) | गंधक | कटु | अग्नि वायु | पाचन | सर, रसायन | त्वक्गामी |

## शंख शोधन व मारण

शंख हा सुधावर्गातील असून त्याची उत्वत्ती क्षारधर्मात सांगितली आहे यामुळे शंख शुद्ध करत असताना अम्लवर्गाने त्याची शुद्धी सांगितली आहे.

शोधन:

अशुद्ध गुणदोषेनैव शुद्धोडम्लै:स गुणाप्रद:।
संखश्च विमल: श्रेष्ठश्चंद्रकान्ति समप्रभ:।।
आयुर्वेद प्रकाश

घटक:

१) अशुद्ध शंख

२) ताक

सर्व प्रथम गोग्धापासुन ताक मिळवावे. आंबट ताक एका पातेल्यामध्ये अथवा दगडी असल्यास दगडीमध्ये घालावे, त्यानंतर त्यामध्ये थोडे पाणी घालून शंख ओतावेत ते शंक रात्रीच्याच वेळी भिजत घालावेत, दिवसा भिजत घातल्यास दिवसा असणाऱ्या उष्णतेचा परिणाम शंखावर होती, यानंतर पातेल्यावर झाकण ठेऊन रात्रभर तसेच ठेवावे. दुसऱ्या दिवशी सकाळी पातेल्यावरील झाकण व्यवस्थित काढावे यानंतर चुलीवर पाणी तापवण्यास ठेवावे ते कोमट झाल्यावर त्या पाण्याने शंख तीन वेळा व्यवस्थित धुवावेत. श्द्धी झाल्यानंतर शंखाचा पिवळसर वर्ण पुर्णतया जाऊन ते पांढऱ्या शुभ्र वर्णाचे होतात, यानंतर फडक्याने पुसून सावलीमध्ये वाळवावेत वाळल्यानंतर एकत्र करून घेऊन त्याचे मारण करावे.

मारण विधी:

शुद्ध शंखस्थ खण्डनि शरावे स्थापयेत्सुधी:।
शरावेण विधायाथ यत्नात्सान्धि प्रलेपयेत।।
आतवे त्वय संशोष्य पुटेत गजापुटे भिषक:।
स्वत:शीतं समुदधृत्य खल्वे संचूर्णयेद् भिषक्।।
चूणितश्चाथ विज्ञाय सम्पुटस्थं तत:पुटेत।
एवं पुटठयेनैव शंखको मृत्तिमाप्नुयात।।
रसतंगिण

शरण मारणास प्रथम १॥ पावणे दोन फूटाचा एक चौकोनी खड्डा तयार करावा. या खड्याच्या तळास एक लहान चौकोन खड्डा पाडुन त्यावर जाळी बसवावी, त्यानंतर त्याच्यावरती एक ३ इंच जाडीचा कोळशाचा थर द्यावा त्या थरावर ओळीने एक शंख ठेवावा. शंख ठेवताना एका शंखाची दिशा त्याच्या जवळच्या शंखाच्या विरूद्ध असावी यामुळे एक रेषेत जास्तीत जास्त शंख द्यावा त्यावर परत शंखाची एक ओळ पसरून ठेवावी त्यानंतर परत एक कोळश्याची ३ इंची टाकावा यानंतर अशा प्रकारे अजून एकदा करावे व सर्वात वरील शंख्याच्या स्तरावर पुटाचा खड्डा भरेल इतक्या प्रमाणात कोळसा घालून त्यावर निखारे टाकावेत.

कोळसे वापरतना मोठ-मोठे वापरावेत यामुळे कोळश्याच्या मधेमधे अवकाश राहतो त्यामुळे वायू फिरढ़्यास जागा मिळते व अग्नि संशुक्षण होते. या नंतर तीन ते चार दिसामध्ये सर्व कोळसा जळतो व खड्डाच्या तळाचे ठिकाणी शंख येतात. हे शंख थंड झाल्यावर चिमट्याचे सहाय्याने एकटक उचलून माठामध्ये टाकावेत, सर्व शंख माठात टाकल्यानंतर माठाच्या मुखास धोतर बांधावे तो माठ अंधाऱ्या खोलीमध्ये नेऊन ठेवावा, शंखास यावेळी थोडासा काळपट वर्ण आलेला असतो. अंधाऱ्या खोलीत नेऊन ठेवण्याच्या प्रक्रियेस काहीजण अंधारी पुट म्हणतात.

या अंधारी पुटानंतर १५ दिवसांनी माठ काढुन पाहिल्यास शंखाचा आकार वाढलेला असतो. यानंतर एका पातेल्यास वस्त्र बांधुन त्याच्या सहाय्याने माठातील भस्म वस्त्रगाळ करावे जेवढे भस्म वस्त्रगाळ होईल तेवढे गाळून राहिलेले भस्म परत माठात भरावे (वस्त्र गाळ न झलिले).

यांनतर गजपुटा द्यावे (पान नं. ६६), गजपुट झाल्यानंतर ते काढुन जेवढे चूर्ण वस्त्रगाळ होईल तेवढे करून त्यानंतर संपूर्ण भस्म वस्त्रगाळ होईपर्यंत पुटे द्यावीत. शेवटी बाटलीत भरून ठेवावे.

शोधन द्रव्याचा विचार :

सागर संपत्तीची शुद्धी करित असताना ग्रंथर्त्यांनी ती अम्ल रसात्मक, दीपन, वृष्य, प्रीणन करणारे आहे. विविध गुणांनी ते त्रिदोषघ्न म्हणून वर्णन केले आहे. शंख हे लवण रसात्मक असते.

'क्षारो हियाति माधुर्य शीघ्र अम्लोवसहित।'

अम्ल रसाच्या ताकामध्ये जर लवण रस मिसळला तर शरीर उपकारक अशा मधुर रसाची निर्मिती होते यामुळे शंखाची शुद्धी अम्ल रसात केल्याने त्याच्यातील अतिरिक्त क्षारता कमी होते व तो शरीर धारणे उत्तम बनतो.

गुणधर्म :

शंख :सुशीतल :क्षारत्वम्लपित विनाशन:।
अग्निमांद्य हरो बल्योग्राही ग्रहणीकाहर:।।
परिणामोत्थशूलघ्नस्तारूण्य पीडिकापह:।
विषदोहहरो वर्व्यो मात्रा गुंजदृयोन्मिता।।

रसतरंगिणी १२-२०

शंख शीत, अम्लपित्तहरम, दीपन, बल्य, ग्राही, ग्रहणीरोगहर असुन परिणाम शूलात याचे चांगले कार्य दिसून येते. थारूण्यापिटीका नष्ट करण्यास याचा उपयोग होतो. अतिसारामध्ये चांगला परिणाम दिसून येतो.

आमयिक प्रयोग :

१) लिंबूरस - अतिसार, ग्रहणी
२) त्रिकटु - अग्निमांदय
३) आमलकीपूर्ण - अम्लपित्त
४) यवक्षार त्रिकटु - गुल्म
५) पंचळपण - परिणामशुल
६) आरंगी - श्वासरोग
७) शुंठी - हिक्का

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | शंखभस्म | तिक्त | वायु आकाश | शीत, लघू | ग्राही, नेत्र्य | क्षारधर्मी |
| २) | तक्र | कषाय अम्ल | वायु पृथ्वी पृथ्वी जल | दीपन, दृष्य | विकासो प्रीणन | अम्लधर्मी |

# प्रवाळ

आयुर्वेदीय वेद्याचे अत्यंत आवडीचे द्रव्य म्हणजे प्रवाळ होय, प्रवाळाचे विविध उपयोग पाहून कोणताही वैद्य त्याकडे मोहित होण्याचे राहत नाही पण आज हे बंदी गृहात अडकले आहे. सागरामध्येच याची निर्मिती असल्यामुळे साहजिकच याची शुद्धी अम्ल रसात वर्णन केली आहे.

शोधन :

घटक

१) अशुद्ध प्रवाक

२) ताक

शंख शुद्धी प्रमाणेच प्रवाळ हे रात्रभर ताकामध्ये भिजत ठेऊन वातेल्यावर झाकूण ठेवावे (पान नं ११५) प्रवाळ ताकात सोडल्यानंतर त्याच्यामध्ये विशिष्ट प्रकारचा आवाज येतो. रात्रभर शुद्ध झाल्यानंतर सकाळी काढून तीन वेळा कोमट पाण्याने धुवावे, यावेळी ब्रशाच्या सहाय्याने प्रवाळ घासून स्वच्छ करावे शोधन झाल्यावर त्याचे विष्टीकरण करावे.

प्रवाळ विष्टीकरण :

शुद्ध केलेले प्रवाळ एका लोखंडी खलामध्ये थोडे थोडे घेऊन बारीक करण्यास सुरवात करावा त्याचवेळी एका पातेल्यास स्वच्छ पाणी भरून त्याच्यावर स्वच्छ धोतर बांधावे, खलामध्ये कुटुन बारीक झालेले प्रवाळ वस्त्रगाळ करण्यासाठी त्या वस्त्रावर टाकावे व लाकडी चाटुच्या सहाय्याने हलवून वस्त्रगाळ करावे. झे कण वस्त्रगाळ होणार नाहीत ते परत खलात घेऊन कुटावेत. प्रवाळ पुष्टीकरताना लोखंडी खलच वापरावा, दगडी वापरू नये. प्रवाळ हा एक प्रकारचा दगड असल्यामुळे तो दगडीस घोटत असताना दगडीचे बारी तुकडे काढतो व ते प्रवाळमध्ये मिसळून वस्त्रगाळ होऊन प्रवाळात अशुद्धता निर्माण होते. याप्रमाणे सर्व प्रवाळ वस्त्रगाळ होईपर्यंत ही प्रक्रिया करावी वस्त्रगाळ झालेले प्रवाळ हे विष्टी स्वरूपात तळास बसलेले आढळते वाति त्यामध्ये अशिक असलेले पाणी काढुन टाकावे या नंतर प्रवाळ विष्टी एका पसरट ताटात स्टील नको काढावी त्यावर साडीचे कापड किंवा धोतर झाकूण ते वाळण्यास सावलीत ठेवावे या प्रकारे प्रवाळ वाळल्यानंतर त्याला गुलाब जलाच्या तीन भावना द्याव्यात.

भावना :

प्रवाळाच्या पिष्टीला गुलाब जलाची भावना देणे आवश्यक असते.

गुलाबजल काढण्याची पद्धती :

सर्वप्रथम एक चुल तयार करून घ्यावी. त्या चुलीवर एक पातेले ठेवावे त्या पातेल्यामध्ये बसेल इतक्या मापाचे दुसरे एक पातेले घ्यावे. पहिल्या पातेल्यामध्ये बसेल इतक्या मापाचे दुसरे एक पातेले घ्यावे.पहिल्या पातेल्यामध्ये गुलाबचूर्ण व पाणी घालावे व त्यामध्ये आकृतीत दाखल्याप्रमाणे आधारास चपटी वस्तु ठेऊन त्यावर दुसरे पातेले ठेवावे. यानंतर त्या दोन पातेल्यांच्यावर ती दोन्ही झाकली जातील या मापाने तिसरे पातेले ठेऊन घेऊन त्यामध्ये पाणी घालावे.

यानंतर खालून अग्नि सुरू करावा, अग्नि तीव्र स्वरूपचा द्यावा काही वेळाने वरच्या पतित्यामधील पाणी तपिल ते पाणी काढून दुसरे पाणी घालावे ही क्रिया तीन वेळा झाल्यानंतर अग्नि बंद करावा सावकाश वरच्या पातेल्या मधील पाणी काढून घेऊन पातेले बाजूला काढावे, मधल्या मोकळ्या पातेल्यामध्ये तयार झालेले गुलाबजल हळूच काढून घ्यावे व खलच्या पातेल्यामधील पाणी फेकून द्यावे अशा प्रकारे काढलेल्या गुलाब जलाच्या तीन भवना तीन तीन दिवसांच्या अंतराने प्रवाळास द्यायव्या असतात.

एखाद्या व्यक्तीस जीवनामध्ये संयमाचे महत्व सांगायचे असेल तर त्याला ५ केजी. प्रवाळ वस्त्रगाळ करण्यास द्यावे.

भावना :

वस्त्रगाळ केलेली प्रवाळाची पिष्टी घेऊन त्यामध्ये हे तयार झालेले गुलाबजल ओतावे त्यानंतर ते सर्व मिश्रण चांगले हलवून एकजीव करावे व सावलीमध्ये त्यावर धातर झाकून वाळवावे.

शोधन व भावना द्रव्य विचार :

शोधन द्रव्याचा विचार मागे शंख शोधनावेळी दिला आहे. गुलाब ही वनस्पती मधूर, तिक्त, कषाय रसाची, शीत, स्निग्ध व लघुगुणांची असून हदय हा तिचा प्रभाव आहे. वृद्ध वैद्य परंपरेमध्ये गुलाब जलाची भावना देऊन चंद्रपुटी प्रवाळ भस्माची पद्धती वर्णन केली आहे. प्रवाळ हे तेज या महाभुताच्या व पित्तदोषाच्या चिकित्सेसाठी वापरण्यात येणारे औषधे आहे, तेज या महाभूताच्या येणारे प्रवाळ हे रात्रीच भिजत घालणे. सावलीत वाळवणे व गुलाब जलाचीच भावना देणे या क्रिया अगदी योग्य वाटत नाहीत का ?

प्रवाळ गुणधर्म

विद्रुमं सुमृतंक्षारं मधुरं लघुशीतलम्।
दीपनं पाचनं चैव दृष्टिरोग निषूदनम्।।
त्रिदोषशमन बल्य विशेषात्कफवातनुत्।
क्षयकासहरं चैव रक्तपित्तप्रणाशनम्।।
स्वेदाति निर्गमहरं रात्रिस्वेदहरं परम्।
विषघ्न भुतशमनं वीर्यवर्ण विवर्धनम्।।

रसतरंगिणी २३-१३९

प्रवाळ क्षार, मधुर, लघु, शीत, बल्य, त्रिदोषहन, क्षयकास हर, रक्तपित्त प्रशमन करणारे पिषहन, दृष्टीदोषहर आहे.

आमयिक प्रयोग :

१) तांदूळाचे धुवण - मूत्रकृच्छ्र
२) यशद भस्म - हात व पायामधून अधिक स्वेद निघणे
३) कुटकी - बद्धकोष्ठता
४) अभ्रक भस्म - क्षयरोग
५) कष्टकारी - कस

## पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्रवाळ | मधूर<br>अम्ल | पृथ्वी आप<br>पृथ्वी तेज | शीत, शामक<br>दीपन, पचन | रसधातूस<br>बल्य (जलज) | अम्लधर्मी |
| २) | तक्र | कषाय<br>अम्ल | वायु पृथ्वी<br>पृथ्वी जल | दीपन, वृष्य | विकासी<br>प्रीणन | अम्लधर्मी |
| ३) | गुलाब<br>कंळी | तिक्त<br>कषाय<br>मधूर | वायू आकाश<br>वायू पृथ्वी<br>पृथ्वी जल | शीत<br>हदय | लघू, स्निग्ध | - |

## हरताल शोधन

हरताळाचे शोधन चुन्याच्या निवळीत करावे. हरताळाचा समावेश उपरसामध्ये करण्यात आला आहे. सोमलाचे सल्फाइड म्हणुन हरताळ संबोधला जातो.

शोधन विधी :

''स्विन्नं कूष्मांडतोये वा तिलक्षार जलेऽपि वा।
थोये वा चुर्णसंयुक्तै दोलायंत्रेण शुद्धयाति।।''
व्सरत्नसमुच्चय अ. १० ।७०

घटक

१) अशुद्ध हरताळ

२) चुन्याची निवळी

कृती :

सर्व प्रथम हरताळाचे खडे घेऊन ते खलात कुटून बारीक करावेत, या विधीकरिता दगडी खल वापरावा. बारीक चूर्ण झाल्यानंतर ती एका धोतरामध्ये घालुन त्याची पोट्टली बांधावी, एका भांड्यात पाणी घेऊन त्यामध्ये चुना टाकावा, तो चुना पाण्यामध्ये हलवून ते पाणी संथ होण्याकरिता घ्यावे, सामान्यत: ३०० ग्रम हरताळ शोधनास २ ग्राम चुना घेऊन त्याच्या सहाय्याने चुन्याची निवळी तयार करावी.

यानंतरचा सर्व विधी पारदाच्या स्वेदन संस्काराप्रमाणे करायचा आहे (पान नं. ३३) यावेळी मात्र तेथे रूईची पाने न घालता धोतराची चारपदरी पोट्टली तयार करून माठामध्ये तयार झालेली चुन्याची निवळी ओतावी. व पोट्टली पाण्यात बुडणार नाही अशा प्रकारे दोलायंत्राच्या दांडयास लावून खालून मंदाग्नि सुरू करावा. थीन तास स्वेदन करावे, स्वेदनाचे वेळी पाणी कमी झाल्यास चुन्याची निवळी गरम ओतावी, माठातून वाफा येतील.

हरताळाचे शोधन पूर्ण झाल्यानंतर ते खलात घेऊन त्याचे बारीक चूर्ण करून ताम्रमारणास वापरावे.

शोधन द्रव्याचा विचार:

चुन्याचा पाण्याशी संपर्क झाल्यानंतर त्याची पाण्याशी रासायनिक क्रिया होऊन चुना व निवळी तयार होते. चुना हा कटू, तिक्त, मधूर रसात्मक असून शीत व ग्राही वर्णन केला आहे.

चुन्याची निवळी ही कृमीहन, अतिसारनाशक व अम्लपित्तहर म्हणून कार्य करते. तसेच चुना त्वचेवर चांगले कार्य करतो. हरताळ प्रामुख्याने कृष्ठहर वर्णन केलेले आहे. यामुळे त्याचे हे गुणधर्म वाढून ते त्वचागामी होईल असे वाटते. व कुष्ठकर हा दोष नष्ट होईल.

शोधित हरतालं तु कान्तिवीर्यविवर्धनम्।
कुष्टादिपापरोगघ्नं जरामृत्यूहरं परम्।।
आ. प्र.

शुद्ध हरताळ कुष्ठ, जर, मृत्यू यीचा नाश करते. क्रांती, वीर्य व आयुष्य वाढवते. याबरोबरच स्निग्घ कृमीजन्य संक्रामक ज्वर, त्वचा विकृती नष्ट करते

हरताळ भस्माची कृती या ठिकाणी वर्णन करीत नसलो तरी सुद्धा हरताळ भस्माचे उपयोग देत आहोत.

गुणधर्म:

हरतालं कटु स्निग्धं कषायोष्ण हरेद्विषम्।
कण्डुकुण्णस्त्ररोगास्थकफपित्तकच व्रणान।।
भावप्रकाश निघण्टु

हरताळ कटु, स्निग्ध, कषाय, उष्ण असून विष, कण्डू, कुष्ठ, मुखरोग, खतरोग, व्रण विकार यामध्ये लाभकर आहे.

जुनाट फिरंग रोगात हरताळ भस्माचा वापर करतात. याशिवाय वातरक्त, विसर्व, विपादिका, विचर्चिका या सारख्या व्याधीत, विषमज्वर, भगंदर, अपस्मार, व्रण, नाडी व्रण यामध्ये वापरतात.

वातज वातरक्त, मांसकोश, त्वचा विकार, वातकफप्रधान कुष्ठात चांगला वापर फ्तिज देऊ नये, उपदंशाने निर्माण झालेल्या कुष्ठात वापरावा तसेच पुनरावर्तक ज्वरात उपयुक्त आहे.

आमयिक प्रयोग :

| द्रव्य | व्याधी |
|---|---|
| १) वासास्वरस | - श्वास |
| २) आंबेहळद | - रक्तविकृती |
| ३) देवदाली | - वातरक्त |
| ४) कुमारी | - त्वचारोग |
| ५) हिरडा | - अर्श |
| ६) हरिद्रा | - वाळुरोग |
| ७) तुलसी | - प्रमेह |
| ८) बकरीमूत्र | - जलोदर |
| ९) पिप्पली | - अग्निमांद्य |
| १०) नवसागर | - विंचूविष |
| ११) त्रिकटू | - वातनाडीशुल |
| १२) अपामार्ग | - लिंगार्श |
| १३) ताम्र, कज्जली | - मलेरिया |
| १४) कज्जली, वत्सनाभ | - मलेरियाज्वर |

## पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | हरताळ | कटु<br>कषाय | वायूअग्नि वायू | उष्ण, स्निग्ध | कुष्ठहर | त्वक्‌गामी<br>अम्लधर्मी |
| २) | चुना | कटु<br>तिक्त<br>मधूर | पृथ्वीवायु अग्नि<br>वायू आकाश<br>पृथ्वी जल | शीत,<br>कृमीहन | ग्राही | त्वक्‌गामी<br>क्षारधर्मी |

# मन:शील शोधन

मन:शील हे हरताळाप्रमाणेच सोमलाचे व गंधकाचे संयुग आहे. सामान्यपणे मन:शीलाचे भस्म करत नाहीत ते शुद्ध झाल्यानंतर तसेच वापरतात, मन:शीला ही लालवर्णाची असते.

अगस्तपत्रतोयेन भाविता सप्तवारकम्।
श्टंगबेररसैर्वाडपि विशुध्यति मन:शीला।।
रसरत्नसमुच्यय ३।९३

घटक:

१) अशुद्ध मन:शीला

२) आर्द्रक स्वरस

कृती:

सर्वप्रथम स्वरस पद्धतीने विविवत आत्याचा रस काढावा यावेळी एका खलामध्ये आले घेऊन ते बत्याने ठेवावे. ठेचल्यानंतर त्याचे तंतू एकमेकापासून अलग हो लागतात त्यानंतर एका सछिद्र धोतरामध्ये किंवा सूती कापडामध्ये घेऊन पिवळा व स्वरस एका भांडयामध्ये गोळा करावा. उन्हाळ्याच्या दिवसामध्ये स्वरस कमी निघतो याकरिता जास्त आले घ्यावे. एका खलात मन:शिला टाकून घोटावा, घोटत ासताना खलातून बाहेर सांडणार नाही याची दक्षता घ्यावी, रात्री व्यवस्थित झाकून ठेवावे पूर्ण घोटून आटल्यानंतर वाळल्यावर दुसरी भावना द्यावी अशा किमान तीन भावना तरी द्याव्यात यामुळे मन:शिला शुद्ध होते.

शोधन द्रव्याचा विचार:

आर्द्रक स्वरस अनेक द्रव्याच्या शोधनासाठी वापरतात. आले हे हरितक्यदि वर्गामधील असून मलशोधन हा गुणधर्म त्यामध्ये प्रथम पासूनच योतो. थे कटू रसात्मक उष्ण, तीक्ष्ण, अग्निदीपक असून भेदन व गुरू हे विशेष गुण त्याचे जनळ आहेत.

आद्रिक स्वरसेनेह मनोगुप्तां तु भावयेत।
सपावांर विशानेन शुद्धिमाप्नोति सवर्था।।
रसतरंगिणी ११।११४

अद्रिक स्वरसात शोधन केल्यामुळे मन शिलेचा अग्नि वर्धन करण्याच्या गुणधर्मामध्ये वाढ होते सोबत मलावष्टंभ, अश्मरीकर व मूत्रकृच्छू हे मनशि अशुद्ध सेवननि निर्माण होणारे दोष नष्ट होतात.

मन:शिला गुणधर्म

मन:शिला कटुस्तिक्ता स्निग्धोष्णा लेखनी गुरूः।
कासश्वासहरा कामं भूतोपद्रवनाशिनी।।
अग्निमांद्यक्षयानाहहन्ती कण्डु तिनाशिनी।।
रसायनी ज्वरहरा वर्ण्याकामं विषापहा।।
रसतरंगिणी ११।११५

मन:शिला कटु, तिक्त रसात्मक, सिग्ध, उष्ण, गुरू, सर, लेखन, अग्निवर्धक जीवाणुजन्य रोगांचा नाश करणारी आहे. रक्तविकाराचा नाश करणारी आहे.

आमयिक प्रयोग:

१) वासा - श्वास
२) पिप्पली चूर्ण - विषमज्वर
३) हरिद्रा - त्वचा रोग
४) सुंठ - छर्दी

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | मन:शिला | कटु<br>तिक्त | वायूअग्नि<br>वायू आकाश | उष्ण, स्निग्ध<br>गुरू | शर, लेखन | - |
| २) | आर्द्रक | कटु | वायु अग्नि | उष्ण, तीक्ष्ण | भेदन, सर | दीपन |

# सोमल

सोमल हे साधारण रसामध्ये वर्णन केलेले आहे, ते पांढऱ्या वर्णाची असेल, गौरी पाषाणाचे शोधन हे करण्याच्या रसामध्ये करावयास सांगितले आहे.

शोधन विधी :

''गौरीपाषाणकं श्रेष्ठं काखल्ली फले क्षिपेत।
स्वेद्येत हण्डिकामध्ये शुद्धो भवति मूषकः।।''
रसरत्नसमुच्चय ३।१२५

घटक :

१) अशुद्ध सोमल

२) कारले

कृती :

सर्वप्रथम एक मोठे कारले घेऊन ते मध्यभागी चौकोनी पोखरावे, पोखरून झाल्यानंतर त्यामधून आतला गाभा काढून ते मोकळे करावे व त्यामध्ये सोमलाचे खलामध्ये बारीक चूर्ण करून भरावे व कारल्याने मुख बंद करावे. त्यानंतर पारद शोधन विधीप्रमाणे पोट्टली बांधून कारले दोलायंत्रात टांगावे. माठामध्ये पाणी भरून तीन प्रहर मंदाग्नि द्यावा. यावेळी एक प्रकारचा सोमलाचा गंध येतो. त्याच्या सेवनाने चक्कर येऊ लागते म्हणुन ते मोकळ्या हवेत शुद्ध करावे व अग्नि सुरू करून त्यापासून लांब रहावे या प्रमाणे शुद्धी झाल्यानंतर कारले काढुन घ्यावे व त्यामधुन शुद्ध सोमल काढुन घेऊन गरम पाण्याने स्वच्छ करून वाळवावे व त्यानंतर त्याचे मारण करण्यास घ्यावे.

मारण विधी :

सोमलाचे एका प्रकारचे मारण वर्णन केले आहे.

घटक :

१) शुद्ध सोमल - १ भाग

२) केळीच्या सोपाचा रस - १० भाग

सोमलाचे मारण करण्यासाठी डमरू यंत्राचा उपयोग करावयास सांगितला आहे, सोमलाच्या प्रमाणात याचे दोन माठ घ्यावेत. त्यामध्ये शुद्ध सोमल टाकून केळीच्या सोपाचा रस घालावा. यानंतर त्यावर दुसरा माठ ठेऊन त्यास मातकापड करून लगेचच तो चुलीवर ठेवावा. यानंतर अग्नि सुरू करावा.

अग्निमुळे पाणी आटु लागते त्यास तीव्राग्नि द्यावा माठ हा पूर्णपणे गळ्यापर्यंत भरू नये फिरण्याकरिता पाण्यास मोकळा अवकाश हवा, या प्रमाणे अग्नि देताना माठाचा तळ लाल होतो त्यावेळी सर्व पाणी आटते यानंतर अग्नि वाढवावा यामुळे सोमलाचे वाष्प होऊन ते वरील माठाच्या तळास चिकटते. ४ तास अग्नि देऊन चूल बंद करून, स्वांगशीत होण्यास माठ ठेवावा या नंतर माठ बाजूला करून आतील भस्म काढून घ्यावे. पांढरे व पिवळसर झाक असणारे भस्म निघते ते बाटलीत भरून ठेवावे.

शोधन द्रव्य विचार:

कारले हे तिक्तरसाचे, मलभेदक, शीत, लघु व अग्नि दीपक आहे. याउलट सोमल हे उष्ण आहे. कारल्यामध्ये शोधन केल्यामुळे सोमलाची उष्णता कमी होते. याचसोबत केली ही शांत, मधुर, पितहर आहेत.

सोमल गुणधर्म:

गौरीपाषावक:स्निग्धो दोषध्नो रसबंधकृत।
कफावातामयहर:वृश्चिकादिविषण्रणुत।।
भास मात्र प्रयोगेन श्वासं परमदारूणम।
विविधानि च कुष्ठानि नाशयेन्नैव संशय:।।
रसतरंगिणी २१।१३८

सोमल सिग्ध, कफवातहर, विंचूचे विष नष्ट करणारा, संधीगत वात, श्वास, कुष्ठ, श्लीपद, विषमज्वर, राजयक्ष्मा, हदयशुळ यामध्ये उपयुक्त आहे.

आमयिक प्रयोग

१) वासासत्व - श्वास
२) कुष्ठ पंतिक्त - कुष्ठ
३) करंजबीज - विषमज्वरघ्न
४) सुंठ, पुनर्नवा - आमवात
५) लोहभस्म - तिफलाकषायानुपान
६) जायफळ - फिरंग
७) शंखपुष्पी - हददौर्बल्य
८) सुंठ - द्वातिसार

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | सोमल | - | - | उष्ण | स्निग्ध | - |
| २) | कारले | तिक्त | वायू आकाश | शीत | शर, लघु | - |
| ३) | केळे | कषाय | पृथ्वीवायू | गुरू, रुक्ष | शीत | - |

## कलखापरी

कलखापरीचा समावेश महारसामध्ये करण्यात आला असुन त्याचे शोधन ताकामध्ये करावे.

**शोधन :**

खर्पर :परिसन्तप्तस्तक्रे वा गृहवारिणी।
निषिक्त :सप्तवारं तु विमलत्वमवप्नुयात्।।
रसतरंगिणी २१।१९९

**घटक :**

१) कलखापरी

२) ताक

**कृती :**

काळसर रंगाची झाक असलेल्या मुठीच्या आकाराच्या अशुद्ध कलखापरी घ्याव्यात. ताम्रशोधनास निर्माण केल्याप्रमाणे शेगडी अथवा विटांची भट्टी तयार करावी (पान नं. ५३) यानंतर एका भांड्यात ताक घेऊन कलखापरीचे तुकडे लाल होईपर्यंत गरम करावे व ताकात बुडवावे या प्रमाणे सात वेळा ही कृती केल्यानंतर कलखापरीची शुद्धी पूर्ण होते.

शुद्धी पुर्ण झाल्यावर एका शेगडीमध्ये कलखापरीचे गोळे घेऊन त्यावर कोळसा भरून पेटवून द्यावा. आग विझल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी कलखापरीचे गोळे काढुन घ्यावेत यावेळी त्याचा वर्ण बदलतो यानंतर ते खलात घेऊन बारीक करावे व नंतर हिंगुळासोबत मारण करावे.

**मारण विधी :**

**घटक :**

१) शुद्ध कलखापरी - १ भाग

२) शुद्ध हिंगुळ - १ भाग

सर्व प्रथम लिंबाच्या रसामध्ये शुद्ध केलेला हिंगुळ घ्यावा (पान नं. ४७) एका खलामध्ये शुद्ध कलखापरी चुर्ण घालुन परत त्यामध्ये १ भाग हिंगुळ घालून त्याचा खल करून घ्यावा. त्यानंतर डमरू यंत्रामध्ये वारद निर्माण विधीप्रमाणे हे मिश्रण डमरू यंत्रामध्ये घालून विधिवत १२ तास अग्नि द्यावा (पान नं. २०४) बारा तासानंतर माठ काढुन आडवा करून ठेवावा व स्वांगशीत होू द्यावा. स्वांगशीत झाल्यानंतर वरील माठामधुन वारा काढुन घेऊन खालील माठातुन रसकभस्म मिळेल ते घ्यावे सामान्यपणे ४०० ग्राम इतके रसक व हिंगुळाचे मिश्रण घालावे.

कलखापरीचे भस्म खलात घेऊन मर्दन करून परत उघड्या माठामध्ये घालुन त्याला अग्नि द्यावा, या प्रकारे तीन वेळा भाजुन मर्दन करावे व त्यानंतर वापरावे.

शोधन द्रव्याचे गुणधर्म :

ताक हे कषाय, अम्ल रसात्मक, अग्नि दीपन करणारे तसेच विकासी गुणधर्माचे आहे. कलखापरी सारखे द्रव्य अग्निमांद्य असताना कार्य करणारे असते विशेषतः धात्वाग्निमांद्य असताना जीर्णज्वरात याचा वापर करावयास सांगितला आहे. शक्लखापरी शीत वीर्याची असून शुद्धा अग्निवर्धनाचे कार्य करते.

हिंगुळ हा तिक्त, कटू रसाचा उष्ण आहे या सोबत मारण केल्यामुळे साहजिकच रसकामध्ये उष्णगुणाची वाढ होणार आहे व अग्नि वर्धन करण्याचे त्याचे कार्य उत्तम प्रकारे दिसून येते.

रसक गुणधर्म :

सुमृतं खर्पर :शीत: कफपत्तिापोह :परम् ।
चक्षुण्य सर्व मेहनो रक्तो्रदरनाशन: ।।
श्क्तपित्ताश्मरी श्वास गुदामयनिषुदन: ।
जीर्णज्वरहर: कामं त्वतीसारनिबर्हण: ।।
योगवाही विशेषेण त्रिदोषघ्नो विषावह: ।
विवर्चिका कुष्ठहरो बलवीर्य विवृद्धिकृत ।।

रसतरंगिणी २१ ।१९४

खर्पर भस्म शीतवीर्य, कफपित्तहर, प्रमेह, रक्तप्रदर, अश्मरी, रक्तपित्त, श्वास, जीर्णज्वर, गुदगत रोग, राजयक्ष्म यात उपयुक्त ओत्याच्या विधिपूर्वक वापरामुळे शरीरामध्ये बलवृद्धी होते.

आमयिक प्रयोग

१) गोखरूक्वाथ - मूत्रकृच्छ्र
२) वंशलोपन - कास
३) कांतलोहभस्म - पाण्डु शोथ
४) प्रवाळ भस्म - धातुगत ज्वर, जीर्णज्वर

# पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १) | रसक | कटु<br>कषाय | वायू अग्नि<br>वायू आकाश | लघू, लेखन<br>मलभेदक | शीत | - |
| २) | ताक | कषाय<br>अम्ल | पृथ्वी वायू<br>पृथ्वी अग्नि | दीपन,<br>वृण्य | विकासी<br>प्रीणन | अम्लधर्मी |
| ३) | हिंगुळ | तिक्त<br>कटु<br>कषाय | वायू आकाश<br>वायू अग्नि<br>पृथ्वी वायू | ज्वरहर<br>दीपन | उष्ण | - |

## शिलाजित शोधन

शिलाजिताचा समावेश हा महारसामध्ये करण्यात आला असून औषधात वापराकरिता गोमूत्र शिलाजित वापरावा.

शोधन:

‘शिलाजतुसमंक्वाथःजलअष्टगुणं ततः।
पदांशशोषितंः क्वाथः शिलामयविशुद्धये।।’
रसतरंगिणी २२।७९

घटक:

१) अशुद्ध शिलाजित
२) त्रिफलाक्वाथ

सर्वप्रथम आपल्या दिवशी त्रिफलाक्वाथ द्रव्ये भिजत घालावीत, त्या दिवशी शिलाजित काढून घेऊन पाण्याने स्वच्छ धुवावे, फोडून घ्यावे. यामुळे त्याच्यामधील भौतिक अशुध्दी दूर होऊन जातील, दुसऱ्या दिवशी त्रिफळ्यामध्ये ८ पट पाणी टाकून त्याचा क्वाथ ह्ल आटेपर्यंत कारावा व त्यानंतर अशुद्ध शिलाजित त्यामध्ये घालून संपूर्ण विरघळवावा, संपूर्ण विरघळल्यानंतर तो पतिल्यास धोतर लावून गाळून घ्यावा व गाळूण घेतल्यानंतर तो थंड होऊ द्यावा, थंड झाल्यानंतर शिलाजित परत कडक बनतो त्यानंतर तो काढयातून बाहेर काढून पाण्याने स्वच्छ धुवून बारीक करून औषधात वापरावा.

शोधन द्रव्य विचार:

त्रिफळा पंचरसात्मक, सर, कच्य अम्लधर्मी असून हरितक्यादि वर्गामध्ये याचा समावेश करण्यात आला आहे यामुळे मलशोधन करणे हा उत्तम गुण त्यामध्ये असल्यामुळे अनेक खनिजांच्या शोधनाकरिता त्याचा वापर केला जातो, शि;ाजतूचा प्रमुख वापर शारीरामधील विषारी द्रव्ये मूत्रपिंडाकरून उत्सर्जन करणे हा आहे. त्रिफळा हा सुद्धा शरीरातील मल बाहेर टाकण्यासाठी वापरला जातो म्हणून त्रिफळ्यामध्ये शोधन करणे अधिक योग्य वाटते.

अशुद्ध शिलाजित सेवनाच्या परिणाम स्वरूपी वाह, मूर्च्छा, भ्रम, रक्तपित्त, मलावष्टभ या सारख्या लक्षणांची निर्मिती होते ही सर्व तेज महाभूताचे उण्ण, तीक्ष्ण गुण वृद्ध होऊन सरत्वम द्रवत्व गुण कमी झाल्याने निर्माण होणारी लक्षणे आहेत त्रिफळ्यामध्ये शोधन केल्याचे परिणामी सरत्व व द्रवत्व गुण वाढून उष्ण, तीक्ष्ण गुण कमी होतात.

शिलाजित गुणधर्म व आमयिक प्रयोग

शिलाजतु कटु तिक्तोष्ण कटुपाकंरसायनम्।
छेदि योगवहं हन्ति कफमे हाश्मशर्करा:।।
मूत्रकृच्छ्ं क्षयं श्वासं वातार्शांसि च पाण्डुताम्।
अपस्मारं तथोन्मादे शोथकुष्ठोदरकृमीन्।।
भावप्रकाश निघण्टु

शिलाजित कटु तिक्त रसात्मक, उष्णवीर्य, रसायन, छेदी, योगवह, अश्मरीहर, मूत्रकृच्छ्रू, क्षय, श्वास, वातज अर्श, पाण्डु, अपस्मार, उन्माद, शोथ, कुष्ठ, उदर, कृमी यासारख्या व्याधीमध्ये वर्णन केला आहे.

रसतरंगिणीकारांनुसार उच्च रक्तदाबामध्ये शिलिविताचा चांगला उपयोग होतो. यासोबतच पित्ताश्मरी, पित्ताशय शोथ, मधुमेह जन्य संण्यास, कामला, आक्षेप यामध्ये उपयोग वर्णन केला आहे.

शिलाजिताच्या सेवनामुळे उदरकला व संधीच्या ठिकाणी असणारे जलं शोषित होते. याच्या सेवनामुळे मूत्राशयजन्य शोध निघून जातो. मूत्राची मात्रा वाढते. णूत्रामधून अल्ब्युमिन जात असल्यास ते कमी होते.

आमयिक प्रयोग:

१) मध - शुक्रावहोधजन्य मूत्रकृच्छ्रू
२) दशमूलक्वाथ - अष्ठिलिका, वातबस्ति, वातकुण्डलिका
३) वरूण - मूत्राघात
४) कापूर - मूत्रातीत, मूत्रजठर
५) गोखर - मूत्रकृच्छ्रू
६) त्रिफलाक्वाथ - वीर्यवर्धक
७) लोहभस्म - राजयक्ष्मा
८) दूध - प्रमेह
९) सुवर्णमाक्षिक - रक्तवृद्धि
१०) अग्निमंथ - स्थौत्य
११) हरिद्राचूर्ण - कुम्भकामला

## पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | शलिाजित | कटु<br>तिक्त | वायू अग्नि<br>वायू आकाश | उष्ण<br>मूत्रल | योगवाही<br>रसायन | क्षारधर्मी |
| २) | त्रिफळा | पंरसात्मक | - | रुक्ष, शीत | वक्षुष्य<br>रुच्य | अम्लधर्मी |

## मृगशृंग मारण ऍ३(इ्ध्उ)२

वर्गीकरणामध्ये मृगशृंगाचा समावेश हा सुधा वर्गात करण्यात आला आहे. मृगशृंग प्राणीज पदार्थ असल्यामुळे तो शरीरास सात्म्य असतो करिता त्याचे शोधन वर्णन करत नाहीत शृंगाचे मारण पुढील प्रमाणे करतात.

मारणः

मृगशृंग समादाय करपत्रेण कर्तथेत।
खण्डशःकारयित्वाच अंड्गाराग्नौ दहेत्ततः।।
सुदग्धाश्च विज्ञाय खल्वे संचूर्णयेभ्दिषक्।
रविदुग्धेन संवेष्य चक्रिकाः कारयेत्ततः।।
शरावसम्पुटान्तःस्थ पुटेतीव्राग्निना भिषक।
त्रिवारं पुटनादेय विषाणं मृत्तिमाप्नुयात।।

रसतरंगिणी तरंग १२।१०५

सर्व प्रथम मृगशृंग गरम पाण्याने स्वच्छ धुवावे, त्यानंतर त्यास करवतीच्या सहाय्याने कापावे व त्याचे बारीक तुकडे करावेत, ते तुकडे एका माठामध्ये घालून त्याच्या मुखाशी मातकापड करून गजपुटामध्ये विधिवत पुट लावावे. (पान नं. ५६) यानंतर स्वांगशीत झाल्यावर ते बाहेर काढावे, मातकापड काढून झाकण उघडावे व आतील मृगशृंग हे पांढऱ्या रंगाचे व ठिसूळ झालेले असते यानंतर ते काढून दुसऱ्या माठात भरावे व परत गजपुट द्यावे. अशा प्रकारे चार पुटे दिल्यानंतर पांढरे शुभ्र वर्णाचे मृगशृंग भस्म तयार होते नंतर ते खलामध्ये घेऊन बारीक करून वस्त्रगाळ करून घ्यावे व भरून ठेवावे. जवळपास मृगशृंगाच्या मात्रेच्या निम्मे भस्म मिळते.

गुणधर्म व आमयिक प्रयोग

मृगशृंग समुभूता विभूतिर्गव्य सर्पिषा।
विनाशयेत क्षणादेव हच्छुलमतिदाकणम्।।
हरिणविषाणसमुत्याभूतिः क्षोद्रेण रकिमिता।
अपहरतीहं निकाम हच्छूल पार्श्वशूलश्च।।

रसतरंगिणी १२।१०२

मृगशृंग मधूर कषाय रसात्मक, गुरू, स्निग्ध, शीत गुणधर्माचे असून त्रिदाषटन आहे. वेदना व शोथयुक्त विकाशात दूधामध्ये उगाळून त्याचा लेप करतात, बल्य असल्याने हदयशुलामध्ये दिले जाते.

शृगभस्म प्राणवह स्त्रोतसावर बल्य कार्य करते. आस्थिधातूवर याचा चांगला उपयोग दिसून येतो असे वर्णन आहे.

१) दूध, लोणी, गोघृत - हदयशूल

२) अपामार्गबीज विप्पलीचूर्ण - हिक्का श्वास

३) भारंगी मरिच मनुका - श्वास

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | शृंगभस्म | मधूर<br>कषाय | पृथ्वीजल<br>पृथ्वीवायू | गुरू, स्निग्ध | शीत<br>पार्थिव | - |

उपयोग :

क्षयरोगाच्या प्रथमावस्थेमध्ये वापरल्यानंतर उत्तम कार्य करतो. श्वासनलिकेमधून अत्याधिक प्रमाणामध्ये रक्तस्त्राव बाहेर पडत असल्यास याचा उपयोग होतो परंतू याचा वापर शुष्क कासात करू नये असे वर्णन आहे.

## जेपाळ शोधन

जेपाळ या वनस्पती द्रव्याचा समावेश उपविषामध्ये केला आहे त्यामुळे शोधन करीत असताना प्राणीज द्रव्याच्या सहाय्याने त्याचे शोधन चांगल्या प्रकारे होऊन शरीरत्म्य होण्यारिता जेवाळाचा वापर करतात.

शोधन विधी :

जैपाल निष्तुषंकृत्वा दुग्धे दोलायुतं पचते।
अंतर्जिव्हा परित्यज्य युज्जाश्च रसकर्मणि।।
योगरत्नाकर

घटक :

१) अशुद्ध जेपाळ बीज - १ भाग

२) दुग्ध - १/२ भाग

कृती :

सर्व प्रथम अशुद्ध जेपाळ बीज घेऊन धोतराच्या कापडामध्ये त्याची पोट्टली बांधावी, पारदाच्या स्वेदन विधीप्रमाणे सर्व विधी करावयाचा आहे (पान नं३४) पोट्टली दोलयंत्राच्या आडव्या दांडयास बांधावी व माठामध्ये अशा पद्धतीने सोडावी जेणे करून ती बुडू नये.

माठामध्ये ॠ भाग दूध व इतर भाग पाणी घालून पोट्टली बुडेल इतपत पातळी करून ठेवावी. यानंतर मंदाग्नि सुरू करावा. णंदाग्नि असताना दूधातून फक्त वाफा याव्यात ते उकळून नये याची खबरदारी घ्यावी. तीन तास स्वेदन झाल्यानंतर अग्नि बंद करावा व माठ स्वांगशीत होू द्यावा. यानंतर पाण्यातून काढल्यानंतर जेपाळ कोमट पाण्याने धुवावे, त्या वरील टरफले काढून टाकावीत, ओले असताना बियावरील टरफले लगेचच निघतात वाळल्यानंतर निघण्यास अवघड पडते यामुळे ओले असतानाच काढावे. ते काढल्यानंतर बियांमधील नीभ काढावी, बिया टरफले काढल्यानंतर ती फेकून द्यावे व .... .... .... .... .... .... आटुन

जेपाळाचे बिया काढल्यानंतर जर चुकून हात शरीराच्या इतर भागास लावला तर काही वेळा त्या ठिकाणी पुरळ व शोथ येण्याची शक्यता असते करिता हात व्यवस्थित स्वच्छ साबणास धुवावेत.

शोधन द्रव्य विचार :

गोदुग्ध हे मधूर रसात्मक, शीतवीर्य, वृष्य, वुष्टीकर, स्निग्ध, ओजोवर्धक आहे. जयपाल गुडुच्यादि वर्गातील मलभाग बाहेर काढून शरीरास स्थिरता प्राप्त करून देणारे रेचन व उष्ण आहे. जयपाळ बाह्य प्रयोगास विस्पोटक प्रक्षोभक आहे. तसेच हे तीव्र रेचन करणारे असल्यामुळे त्याचे मधील वाह, उष्णता व तीक्ष्णता कमी करण्यासाठी गोदुग्धाची योजना या ठिकाणी करण्यात आली आहे.

गुणधर्म :

जेपाल कटुरूष्णश्च कृमिहारि विरेचन: ।
दीपन :कफवातहनी जलोदर विनाशन: ।।
रा.नि.
जेपाल गुरू :स्निग्धोरेचि पित्तकफावह: ।
मा.प्र.

जेपाळ कटू, उष्ण, कृमीघ्न, विरेचक आहे. ते जलोवर नाशक आहे. गुरू, सिग्ध, तिक्ष्ण आहे. याच्या तेलामुळे पातळ जुलाब होतात व पोटामध्ये मुरडा येतो. आंत्रकला शोथामध्ये याचा वापर करतात. रक्तगत जलीय अंश कमी झाल्यावर याचा वापर करतात.

मस्तिष्क गत रक्तस्त्राव झाल्यामुळे निर्माण होणाऱ्या अर्धांगामध्ये याचा वापर केला जातो. आमवात, संधीशोथ, वातविकार आदिमध्ये याच्या तैलाचा बाहय प्रयोग केला जातो.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | जेपाल | कटु | वायू अग्नि | उष्ण, तीक्ष्ण | रेचन, गुरू | दीपन |
| २) | दुग्ध | मधूर | पृथ्वि जल | स्निग्ध, शीत | वृष्य, रसायन | - |

## बचनाग शोधन

बचनागस साक्षात विष ही संज्ञा देतात,

विषं प्रानहरं युक्त्या प्राणकृच्च रसायनम्।

योगवाहि परं श्लेष्मवात हत्संनिपातजित।।

योगरत्नाकर

वत्यनाभ प्रागहर आहे परंतु युक्ति पूर्वक प्रयत्न केल्यानंतर प्राणकारक व रसायन आहे ते उत्तम योगवाही, कफवातहन व सन्निपात दूर करणारे आहे.

शोधन :

घटक :

१) अशुद्ध बचनाग

२) गोमय

कृती :

सर्व प्रथम बचनाग काढून सुटेकरून घ्यावे त्यानंतर याचा सर्व विधी जेवाळ शोशनाप्रमाणेच करावयाचा असून गोदुग्धाचे ऐवजी गोमयाचा वापर करावा (पान नं. १५८)

पाण्यामध्ये गोमयाचा काला करून घ्यावा व तीन तास अग्नि देऊन दीलयंत्रास स्वेदन करावे यानंतर स्वांगशीत झाल्यावर काढुन घ्यावे व दगडीमध्ये चेचून परातीमध्ये त्याचे उभे गोळे करून ठेवावेत व त्यांना उन्हामध्ये वाळवावे.

शोधन द्रव्याचा विचार :

पंचगव्यामध्ये गोमयाचा समावेश करण्यात आला आहे.

गुणधर्म व आमयिक प्रयोग :

विषं तु कटुकं तिक्तमुष्णं चैवकषायकम्।
योगवाहि परं चैतन्महोत्कृष्टं रम्यनम्।।
त्रिदोषघ्नं विशेषेण मतं वातबलसनुत।
दीपनं शितशमनं बृंहण बलवर्ध्दनम्।।

रसतरंगिणी १४-२६

वत्सनाभ कटु, तिक्त कषाय रसात्मक, उष्ण, योगवाही, त्रिदोषघ्न, रसायन, अग्निदीपक, बृहण व बलवर्धक आहे अग्निमांद्य रोग, प्लीहोवर रोग, वारक्तरोग, श्वास कास, संग्रहणी, पाण्डु, ज्वर, कुष्ठ, आमवात, नेत्ररोग यामध्ये उपयुक्त असुन उंदीर व विंचवाच्या विषात ते नष्ट करते.

वेदनाहर, हदय, हदयविकृति मुळे निर्माण झालेल्या शोधात उपयुक्त श्रेष्ठ ज्वरघ्न, उच्च रक्तभार कमी करण्यास उपयुक्त, मस्तिष्कगत रक्तसंचय दूर करण्यास उपयुक्त, गिलायुशोथ, गलशुण्डिका, तुण्डिकेरी, शिरोवेदना, शिंक, प्रतिश्याय, प्रवाहिका यामध्ये चांगले कार्य करतो.

जत्रु उर्ध्वगामी पाचवीनाडी (इर्र्ग्ीहर्ग्ेत्हाहा) याच्या शुलामध्ये उपयुक्त १००० इ. पेक्षा ज्वर कमी झाल्यानंतर विषाचा वापर करू नये, नाडीगती पाढल्यानंतर मलेरिया, तृष्णा, कास हस्तपादकंप, यात उपयुक्त आहे. असे वर्णन आहे.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | भचनाग | कटु तिक्त कषाय | वायुअग्नि वायुआकाश वायुपृथ्वि | दीपन शीत शमन, बृंहण बलवर्धन | योगवाही रसायन | सर्व स्त्रोतागाम हदय |
| २) | गोमय | - | - | - | - | - |

## गुग्गुळ शोधन

गुग्गुळ हे सर्व वैद्यांचे आवडते द्रव्य, गुग्गुळ हा निर्यास असुन तो पचनास सुलभ व्हावा याकरिता त्याच्यावर शोधन संस्कार आवश्यक असतो.

शोधन विधी:

घटक:

१) गुग्गुळ - १ भाग

२) त्रिफळा भरड - १ भाग

३) वाणी - १६ पट

कृती:

गुग्गुळ शुद्ध करण्याचा आदल्या दिवशी त्रिफळा भरड १ पट पाण्यामध्ये रात्रभर भिजत ठेवावी, दुसऱ्या त्याचा १/४ राहीपर्यंत विधिवत क्वाथ करून घ्यावा. गुग्गुळ निवडुन त्यामधील अनावश्यक घटक बाजूला काढून टाकावायाकरिता प्रमाणापेक्षा १०० ग्राम अधिक गुग्गुळ घ्यावा यानंतर तो लोखंडी खलामध्ये कुटुन बारीक करावा. यामुळे तो गुग्गुळात लवकर विरघळतो.

त्रिफळ्याच्या क्वाथामधील थोडासा त्रिफळा क्याथ बाजूला काढुन घ्यावा, व इतर काढ्यात गुग्गुळ एक दिवस भिजत घालावा, जर गुग्गुळाच्या आत गुठल्या तयार झाल्या असतील तर हाताने कुस्करून त्याच्या गाठी मोडाव्या व बाजूला काढुन ठेवलेल्या त्रिफळा क्वाथाच्या सहाय्याने हात धुवावेत एक दिवस २४ तास भिजु द्यावे.

यानंतर पातेले मंदाग्निवर ठेऊन उलथण्याने हलवित रहावे, पातेल्याच्या तळास गुग्गुळ चिकटणार एक धोतर घेऊन ते पातेल्यावर लावावे व गरम काढा त्यावर ओतावा, त्यानंतर थोडेसे गरम पाणी धोतरावर ओतावे व उलथण्याने हलवुन सर्व गुग्गुळ धोतरावर घट्ट झालेला पातेल्यात जातो व परत स्वच्छ होते यानंतर पोतेले रात्रभर झाकून ठेवावे.

तिसऱ्या दिवशी हा गुग्गुळ वेगळ्या पातेल्यामध्ये काढुन घ्यावा शिल्लक राळेवर पाणी ओतुन राहिलेला गुग्गुळ काढुन घ्यावा व रेती फेकुन द्यावी.

यानंतर साठवून ठेवलेला गुग्गुळ मंदाग्निवर आटवण्यास ठेवावा, लाकडी उलथण्याने गुग्गुळ हलवत रहावा, यानंतर तो पिठल्यासारखा घट्ट होईल अग्नि मंदच ठेवावा. शेवटी पातेल्याच्या मधोमध उलथण्याने ढवळल्यास गुग्गुळ तयार झाला समजून पातिले अग्निवरून उतरवावे व ताटास तूप लावून वाळत घालावे, व नंतर गोळ्या करून ठेवावा.

शोधन द्रव्याचा विचार :

त्रिफळा हा पंरसात्मक मलशोधन करणारा, रूच्य, चक्षुष्य अशा धर्माचा आहे. हरितक्यादि वर्गात आहे. ग्ग्गुळाचे शोधन केल्यामुळे त्याच्यामध्ये अधिक असणारा उष्ण तीक्ष्ण गुण कमी होतात, तसेच गुग्गुळाची विच्छिलता कमी होते.

गुग्गुळ गुणधर्म व उपयोग :

गुग्गुळ गुणधर्म व उपयोग सविस्तर गुग्गुळयुक्त औषधे या ठिकाणी देत आहोत (पान नं. ..)

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | गुग्गुळ | तिक्त<br>कषाय<br>कटु | वायुआकाश<br>वायुपृथ्वि<br>वायुअग्नि | उष्ण, रूक्ष,<br>पिच्छिल, विशद | सर<br>रसायन | क्षारधर्मी |
| २) | त्रिफळा | पंचरसात्मक | - | - | - | अम्लधर्मी |

## हिंग शोधन

हिंग हा पदार्थ उष्ण आहे याकरिता त्याचे शोधन करून घ्यावे लागते.

शोधन विधी :

रामठं समशुद्धाज्यसंयुतं दर्विकागतम्।
विपक्वमग्नितापेन शुद्धिमाथात्यमुत्तमाम्।।
रसतरंगिणी तरंग २४-५७८

घटक :

१) हिंग - १ भाग

२) घृत - १ भाग

साहित्य : चुल, कढई, उलथणे, खल, धोतर

कृती :

१) सर्व प्रथम अखंड हिंगाचे खलामध्ये घेऊन बारीक चूर्ण करावे.

२) यानंतर एक घेऊन ती चुलीवर ठेवावी त्यामध्ये हिंगाच्या समभाग घृत टालावे व खालुन दीप्ताग्नि सुरू करावी. चुली ऐवजी गॅस वापरला तरी चालते.

३) घृत पातळ झाल्यानंतर त्यामध्ये वरील हिंगचूर्ण थोड्या थोड्या मात्रेमध्ये टाकत रहावे. सारखे उलथन्याच्या सहाय्याने व्यचस्थित हलवित रहावे.

४) या शोधनामध्ये हिंग 'घृतभृष्ट' झाल्यानंतर त्याची शुद्धी होते असे सांगितले त्यामुळे अधिक वेळेपर्यंत अग्निवर ठेवल्यास ती दुग्धपाळी होण्याचा संभव असतो त्यामुळे त्याचे हिंगामध्ये स्नेह दिसू लागल्यानंतर व घृत हिंगामध्ये मिसळून गेल्यानंतर त्याची शुद्धी झाली असे समजावे यानंतर हिंग गॅस वरून खाली उतरवावा.

५) उतरल्यानंतर एक धोतर अंथरूण त्यावर पसरून घालावे. हा विधी सावलीमध्ये करावा यानंतर तो हिंग बाटलीमध्ये व्यवस्थित भरून ठेवावा किंवा औषधामध्ये वापरावा.

शोधन द्रव्याचा विचार :

या ठिकाणी घृत हे शोधनास वापरावयास सांगितले आहे. गोघृत हे मधूर, सुगंधी, शीत गुणात्मक सांगितले आहे. विसशमन करण्यासाठी श्रेष्ठ म्हणून याचे वर्णन ग्रथांत आले आहे. हिंग द्रव्याच्या ठिकाणी उष्ण, तीक्ष्णता जास्त असते. येथे हिंगाचे शोधन करण्याचा हेतू त्याचे तीव्रत्व कमी करणे हा आहे. या ठिकाणी हिंगाचे उग्रत्व शुद्ध केल्याने कमी होते.

गुणधर्म व उपयोग :

हिगुण्ण पाचनं रुच्यं तीक्ष्ण वातबलासनुत।
शुलगुल्मोदरानाहकृमीहनं पित्तवर्धनम्।।
भावप्रकाश निघण्टु

हिंग उष्ण, कटू, रसात्मक, तीक्ष्ण, उष्ण, वातहर, शूल, गुल्म, उदर, आनाह, कृमीघ्न आहे तसीच ती पित्तवर्धन करणारी आहे यामुळे तिची घृतात शुद्धी वर्णन केली आहे.

हिंग ही वातानुलोमन करणारी आहे जर एखाद्याच्या पोटामध्ये शूल असेल तर हिंग देतात यामुळे वातानुलोमन होऊन शुल थांबतो.

याबरोबरच श्वास, कास, हदय शुलामध्ये हिचा वापर करतात. हिंग गर्भाशय संकोचक म्हणून कार्य करते. आक्षेपामध्ये याचा उपयोग होतो. विषमज्वर प्रतिबंधाकरिता हिंगाचा वापर करतात. प्रसवाचे वेळी आर्तवशुद्धीस वापर होतो. असे वर्णन आहे.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | हिंग | कटु | वायु अग्नि | उष्ण | तीक्ष्ण, पित्तवर्धन | पाचन |
| २) | गोघृत | मधूर | पृथ्विजल | गुरू, सुगंधी | ओजोवर्धन | दीपन |

लसूण शोधन

रसोन हे पंचरसात्मक अम्लवर्जित द्रव्य आहे. याच्या मध्ये उग्रत्व हा अधिक प्रमाणात असतो त्यामुळे त्याचे शोशन अम्ल रसात करावयास सांगितले आहे.

साहित्य : भांडे, गरम पाणी

शोधन विधी :

घटक

१) लसूण

२) ताक

कृती :

१) सर्व प्रथम लसूणाचे गड्डे घेऊन त्याचे वरील पापुद्रे काढुन लसूनाच्या पाकळ्या तयार कराव्यात

२) यानंतर पापुद्रे फेकून देऊन पाण्याच्या सहाय्याने सर्व लसूण पाकळ्या स्वच्छ धुवाव्यात व त्यानंतर पुसून घ्याव्यात.

३) एका पातेल्यामध्ये अथवा दगडीमध्ये आंबट ताक घ्यावे, त्या ताकमध्ये या लसणी बुडवून त्याच्यावरती झाकण झाकावे. सर्व लसणी ताकामध्ये पूर्ण बुडलेल्या असाव्यात.

४) लसणाची शुद्धी ही रात्रीच करावी दिवसाच्या उष्णतेचा त्याच्यावर वाईट परिणाम होतो.

५) दुसऱ्या दिवशी सकाळी भांडयाचे झाकण उघडावे व लसणी ताकामधून काढाव्यात, ताकामध्ये शुद्धी झाल्यानंतर त्यांचा आकार वाढलेला असतो.

६) एका भांड्यात कोमट पाणी घेऊन त्याच्या सहाय्याने सर्व लसणी स्वच्छ धुवाव्यात व फडक्याने पुसुन घ्याव्यात.

७) यानंतर प्रत्येक लसणी फोडून तिच्यामध्ये असणारा मोड काढून बाजूला करून टाकावा यानंतर त्याची शुद्धी पूर्ण होते.

शोधन द्रव्याचा विचार :

लसुण हा हरितक्यादि वर्गामधील असून अम्लवर्जित पंचरसात्मक उष्ण, तीक्ष्ण असतो, लसूणाच्या अधिक मात्रेत केलेल्या सेवनामुळे वमन, विरेचन व शिर :शूला सारखी लक्षणे दिसून येतात त्या करीता या ठिकाणी लसणीचे उग्रत्व कारणभूत असते ते उग्रत्व कमी करण्यासाठी अम्ल रसात त्याची शुद्धी करतात.

ताक हे कषाय, अम्ल रसात्मक, त्रिदोषघ्न, अनुष्ण दीपन करणारे व प्रीणन आहे. येथे ताक वापरताना आंबट वापरावयास सांगितले आहे. अम्ल रस हा हिमस्पर्शी आहे. भावप्रकाश लसून सेवन करत असताना 'मद्यं, मांस तथा डम्लश्च हितं लशुनसेविनाम्।' या स्वरूपामध्ये पथ्य सांगतात, तसेच अम्लं रसाचा संस्कार होऊन त्याचेमुळे लसूणाचे दुष्परिणाम कमी होतात.

गुणधर्म व उपयोग :

रसोनो बृहणोवृष्य: स्निग्धोष्ण: पाचन :सर:।
रसे पाके व कटुकस्तीक्ष्णो मधुरको मत:।।
भग्नसंन्धाजकृत्कढयो: गुरू पित्तास्त्रवृद्धीद:।
बलवर्णकरो मेधाहितो नेत्र्य रसायन:।।
हद्रोगजीर्ण कुक्षीशूल-विबन्धगुल्मारू विकास शोफान।
दुर्नामकुष्ठानमसादजन्तु-समीरणश्वासकफाश्चहन्ति।।

भावप्रकाशनिघळु

लसूण हा अम्लवर्जित पंचरसात्मक कटू रसप्रधान, स्निग्ध, उष्ण, पाचन सर गुणांचा भग्नसंधानकर, मेघ्य, रसायन आहे. याच सोबत तो हृद्रोग, जीर्णज्वर, कुक्षीशुल, वात निबंध, गुल्म, अरूचि, कास, शोथ, कुष्ठ, अग्निमांद्य नष्ट करतो.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | लसूण | पंचरसात्मक | - | तीक्ष्ण<br>स्निग्ध, बृहण | शर, उष्ण | पाचन |
| २) | ताक | कषाय<br>अम्ल | वायु पृथ्वि<br>जल पृथ्वि | दीपन, वृष्य | विकासी<br>प्रीणन | अम्लधर्मी |

# टंकण शोधन

टंकण हे प्रामुख्याने स्थावर विषनाशाक म्हणून काम करतो तरी सुद्धा टंकणामध्ये असणारा स्नेह कमी करने आवश्यक असते या करिता त्याचे शोधन करतात.

शोधन:

सुचुर्णित टंकण तु खलु पंचवलोन्मितम्।
समुज्ज्वलोदरे क्षुद्रकटहि विन्यसेत्तत:।।
चुल्लिकायां निधायाथ पचेद दर्व्या प्रचालयन।
सुपुष्पित नष्टनीरं शुद्धिमायाति टंकणम।।
रसरंगिणी १३।७७

साहित्य: कढई, चूल, उलथणे, लोखंडी खल

घटक:
अशुद्ध टंकण

कृती:
१) सर्व प्रथम अशुद्ध टंकण घेऊन त्यास ओल्या फडक्याने पुसावे, यामुळे टंकणास लागलेली माती व घाण सूर होते व तो चकाकू लागतो.
२) यानंतर एका लोखंडी खलामध्ये घ्यावा व त्याचे कुटून बारीक चूर्ण करणे. या प्रक्रियेत तो लगेचच बारीक हो् लागतो. सर्व चूर्ण झाल्यानंतर त्याला एका कढईमध्ये टाकावे.
३) कढई चूलीवर अथवा गॅसवर ठेऊन दीप्ताग्नि द्यावा (पान नं...) यानंतर उलथण्याच्या सहाय्याने तो सारखा हलवित ठेवावा.
४) ज्यावेळी टंकणामधील जलीयांश निघून जाईल त्यावेळी तो फुलून मोठा होईल यालाच टंकणलाही असे म्हणतात यानंतर कढई चुलीवरून खाली उतरून व नंतर एका परातीमध्ये पसरून टाकावे.
५) थंड झाल्यानंतर बाटलीत भरून ठेवावे. अथवा औषधात वापरावे.

शोधन क्रिया विचार :

शोधन प्रक्रियेमध्ये भर्जन ही एक प्रक्रिया आहे. या क्रियेमध्ये द्रव्य हे फक्त कढईमध्ये भाजतात यामुळे त्यात असणारे अतिरिक्त जलांश निघून जातात, टंकणामध्ये असणारा जलांश या क्रियेने निघून जाते या सोबत त्यामध्ये आधिक्याने असणारा स्नेह निघून जातो यानंतर तो ओषधास वापरण्यास उपयुक्त ठरतो.

गुणधर्म :

टंकण: कटुरिष्णश्च रूक्षस्तीक्ष्णश्च सारक:।
कफ विश्लेणणो हृदयो वातामय निषूदन:।।
कासश्वासहर सम्स्थावरादि विषापह:।
अग्निदीप्ति करश्चापि भूशमाध्यान नाशन:।।
रसतरंगिणी

टंकण कटू, उष्ण, रूक्ष, तीक्ष्ण, सर, कफ निघतो. हा हृदय आणि वायुरोग नष्ट करतात. कास श्वास रोगात उपयुक्त आहे.

तो हृदय वातहर आहे. स्थावर विषनाश करण्यासाठी श्रेष्ठ म्हणुन सांगितले आहे. यामुळे स्वनागाचा अवसादक धर्म कमी करण्यास याची योजना करातो. टंकण गर्भाशय सकोपन करते.

आमयिक प्रयोग :

१) कायफळ, बासा - कफ पातळ करण्यास
२) त्रिकटु - मृदुरेचन
३) बोलचूर्ण - दंतविकार

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | टंकण | कटु | वायु अग्नि | रूक्ष, तीक्ष्ण सर | अग्निदीपन | - |

# कुचला शोधन

संधर्भ :

घटक :

१) अशुद्ध जुचला

२) गोमूत्र - यथावश्यक

साहित्य : दगडी किंवा पातेले, झाकण, कोमट पाणी, फडके

कृती :

१) सर्व प्रथम अशुद्ध कुचला वेगळा करून पाण्याने स्वच्छ धुवावा व त्यावर असणारी माती काढून टाकावी.

२) एका दगडी किंवा पातेल्यामध्ये कुचला बुडेल इतक्या प्रमाणात गोमूत्र घ्यावे.

३) त्यानंतर त्यामध्ये अशुद्ध कुचला टाकून झाकण बंद करावे व एका बाजुस ठेऊन द्यावे.

४) शात दिवसानंतर झाकण उघडुन कुचला बाहेर काढुन घ्यावा.


५) कोमट पाण्याच्या सहाय्याने तीन वेळा धुवावा.

६) फडक्याने स्वच्छ पुसावा व त्यानंतर चूर्ण करावयास न्यावा.

शोधन द्रव्य विचार :

गोमूत्र कटु, तिक्त रसात्मक, क्षारधर्मी

सिद्ध संप्रदायमध्ये औषधी द्रव्याच्या निर्माण प्रक्रियेनुसार त्याचे चर्गीकरण केले आहे.




१) खल्वीरसायन :

पारदाच्या (चापल्य) गतीस बंध घालण्यास इतर द्रव्ये घालून बंध निर्माण करण्याची आवश्यकता वाटल्यावर खलाचा जन्म झाला यामध्ये मर्दन विधीच्या सहाय्याने एक औषध दुसऱ्या औषधामध्ये पूर्णपणे जिरवण्यास मदत होते मर्दनामुळे रगडणे घासणे गती व दाब या क्रियामध्ये उष्णता निर्माण होऊन औषध अधिक सुक्ष्म होण्यास मदत झाली.

औषधास चिक्कणता यावी त्यांचा संयोग दृढ व्हावा हा उद्देशयेथे असतो. या नंतर रस, हिम, फांट, कषाय आदि द्रव्यांनी हे रसायन भावित करणे. चंद्र, सुर्य व अग्नि यांच्या सहाय्याने पुट व शोषण हे दोन संस्कार औषधावर करणे. ओषध तयार झाल्यावर त्याच्या गोळ्या तयार करून त्या व्यवस्थित वाळवणे या सर्व घटकांचा समावेश खल्वी रसायनात होतो.

२) पर्पटीरसायन :

खल्वी रसायनामधील पारदाचा बंध अस्थिर असतो. फक्त मर्दनजण्य अग्निचा त्यावर परिणाम झालेला असतो परंतू पर्पटीमध्ये साक्षात अग्निच्या सहाय्याने बंध निर्माण करतात. हा बंध फक्त पित्ताच्या साहचर्यात विलग होतो. या प्रक्रियेत कज्जली पातळ करणे ती विधिवत वसरून त्याची योग्य पाकाची योग्य प्रमाणाची पर्पटी बनने या गोष्टींचा समावेश होतो.

३) पोट्टली रसायन :

पर्पटी बंधापेक्षा अधिक पक्क्या स्वरूपाचा बंध, यामध्ये औषधीचे मर्दन करून संयोजन करणे त्यास वनस्पतींच्या भावना देणे त्यांचे गुटीकरण करून त्या वाळवणे नंतर एका वस्त्रात गुडाळुन रेशमी धाग्याने बांधणे लेपन करून गंधकामध्ये पाचन करणे. काठिण्यावर रसायन कार्यकारित्व अवलंबुन असते. याकरिता पाचन संस्कारात यथोक्तकाल पाचन करणे, वस्त्र जळेपर्यंत पाचन, गंधक आतमध्ये शिरेपर्यंत पाचन, बुडबुडे बंद होई पर्यंत पाचन या विधींचा समावेश होतो.

४) कूपीपक्व रसायन :

सर्वात पक्व स्वरूपाचा बंध खलामध्ये औषध संयोग, वालूका यंत्रात अग्निच्या सहाय्याने पचन, कृमाग्नि देणे. सिंट कंणस्थ तलस्थ किंवा उभयस्थ औषध निर्माण करणे काढून परत खलून औषधात वापरणे या प्रक्रियांचा समावेश होतो.

कज्जली निर्माण विधी

व्याख्या :

अर्धसमान द्विगुण मिताद्या गन्धक चूर्णात पारदकस्य।
मर्दनजन्या मसृणकाया कज्जलरूपा कज्जलिका सा।।

रसतरंगिणी-६

आवश्यक साहित्य : खल्वयंत्र, पेपर, धोतर ब्रश

कृती :

घटक

१) शु पारद

२) शुद्ध गंधक

१) शोधन संस्कारांनी युक्त असा शुद्ध पारद घ्यावा (पान नं. ३३) यानंतर कोणत्या प्रकारच्या व्याधीमध्ये कज्जली वापरायची त्यानुसार शुद्ध गंधक घ्यावा (पान नं. ३९)

२) सर्व प्रथम एक खल्वयंत्र घ्यावे. खलामध्ये आधीचे औषध केले असले तर खल व बत्ता त्यामध्ये लिंबू पिळून लिंबाच्या रसाने स्वच्छ धुवून त्यानंतर तो सुकवुन स्वच्छ फडक्याने पुसून घ्यावा.

३) सर्व प्रथम खलाच्या खाली एक पोते अंथरूण त्यावर वर्तमान पत्राचा पेपर पसरून टाकावा व त्यानंतर त्याच्यावर खल्वयंत्र ठेवावे खल्व खोलगट त्याचा बत्ता उंच असावा.

४) यानंतर पोत्यावर खलाच्या एका बाजूस खलण्यास बसावे. व पायावर पेपर पसरावा यामुळे जर कज्जली खल करताना उडाली तर कपडयावर पडून कपडे घाण होण्याचा संभव रहात नाही व कज्जली वाया जात नाही.

५) या पूर्वकर्मानंतर खलामध्ये शुद्ध गंधक घेऊन फक्त गंधक घोटण्यास सुरवात करावी. सर्व गंधक बारीक श्लक्ष्ण करावा.

६) एका बाटलीत शुद्ध पारद घ्यावा, गंधक श्लक्ष्ण झाल्यानंतर शु. पारद थोडासा टाकून बत्त्याने घोटण्यात सुरवात करावी.

७) पारद ओतताना सावकाश ओतावा गडबडीने ओतल्यास ती बाहेर सांडण्याची शक्यता अधिक असतो त्यामुळे सावधानता पाळावी.

८) पारद ओतुन खलताना मिश्रणास हळूहळू काळपट रंग येऊ लागतो. मर्दन करताना त्यावर दाब देऊन तो फिरवावा, मर्दनामध्ये उष्णता निर्माण होऊन त्या उष्णतेच्या सहाय्याने कज्जली बंध निर्माण होत असतो, या घोटण्यास यांत्रिक शक्ति ऐवजी मानवी शक्तीचाच वापर करावयास सांगितला आहे.

९) मर्दन करताना बत्ता हिंगुळ शोधन विधीमध्ये वर्णन केल्याप्रमाणे फिरवावा (पान नं. ४७)

१०) मर्दन करत असताना कज्जली ही खलाच्या बाजुला चिकटुन राहते व ती मूळ मर्दनामध्ये येत नाही या करिता ब्रशच्या सहाय्याने ती हकलवून खाली पाडावी, सर्व मिश्रण त्याखाली येईल याची काळजी घ्यावी.

११) याप्रमाणे खल करत राहिल्यानंतर काळपट मिश्रण तयार होते मिश्रणाची चकाकी नाहीशी झाल्यानंतर परत शुद्ध पारद थोड्या मात्रेमध्ये घालून बत्याने मिश्रण घोटावे. बत्ता जर वरच्यावर फिरत राहिल्यास पारा खाली तसाच राहतो व वरती बंध तयार झाल्यासारखे वाटते याकरिता तो खालून फिरवून घ्यावा.

१२) एका दिवसाचा खल करून झाल्यानंतर एक धोतराचे कापड घेऊन त्यामध्ये खल ठेऊन कापड सर्व बाजूंनी गुंडाळून बांधून ठेवावे.

१३) खल करित असताना दोन मनुष्य एका समोर बसल्यास खल करणे सेपे जाते व हात अवघडुन येत नाहीत.

१४) यानंतर दुसऱ्या दिवशी घोतर सोडावे. सोडत असताना धोतरामधील घाण खलात पडु नये याची काळजी घ्यावी ती दोन्ही बाजूना झटकून टाकावी

१५) काही वेळा गंधकामधून आवश्यवक उष्णता निर्माण होत नाही असे समजावे व त्यावेळी मर्दन क्रिया चुकीची होत असते व ती व्यवस्थित करावी.

१६) कालातंराने सर्व शुद्ध पारद हळूहळू मिश्रणात ओतावा व खल करावा, आता खल करत असताना कज्जली श्लक्ष्ण झालेली असते यावरून बत्ता फिरण्याची शक्यता असते या करिता तो हळूवार व तळातून फिरवावा.

१७)  असा खल कज्जलीच्या मात्रेनुसार अधिक करावा लागतो. खल पुढे तसाच चालु ठेवल्यानंतर गंधक पारदाशी एकत्र झाल्यामुळे कज्जलीचे आकारमान कमी होते.

१८)  शेवटी पारदाचे कण खूपच कमी होू लागतात. कज्जलीला काळेभोर स्वरूप येऊ लागते व घड्या पडण्यास सुरवात होते.

१९) घड्या पडत असताना बत्ता एका बाजूने दुसऱ्या बाजूस घासत न्यावा यावेळी त्या बत्याच्या मागे ठराविक अंतरावर कज्जली तुटत असते.

२०) घड्या पडण्यास सुरवात झाल्यापासून एक तास तरी कज्जलीचे चांगले मर्दन करते आवश्क असते या नंतर कज्जलीमध्ये बोट लावून दुसऱ्या हाताच्या तळव्याच्या पाठीमागे त्या कज्जलीने रेघ ओढावी.

२१)  उन्हामध्ये जाऊन ती रेघ पहावी जर मध्ये जर चकाकी शिल्लक नसेल तर कज्जली तयार जाईपर्यंत घोटावी.

२२)  यानंतर खलास चिकटलेली सर्व कज्जली मध्यभागी पाडुन लाकडी चमच्याच्या सहाय्याने बाटलीमध्ये भरून ठेवावी किंवा औषधात वापरावी.

२३) पहिल्यांदाच चमचाभर गंधक खलामध्ये घालुन घोटण्यास सुरवात करावी यामुळे खलाच्या बारीक छिद्रामध्ये अडकलेला पारद बाहेर येतो व त्या गंधकाशी मिसळतो.

२४)  कज्जली बंध हा अस्थिर स्वरूपाचा बंध आहे त्यामुळे विधिवत कज्जली करून ठेवली तरी हा बंध सुटतो करिता औषध निर्माण करण्यापूर्वी सर्व प्रथम खलात कज्जली घेऊन तिचा खल करणे आवश्यकच असते.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | पारा | बडरसात्मक | - | स्निग्ध, वृष्य | योगवाही रसायन | - |
| २) | कटु | कटु | वायु अग्नि | पाचन | सर, रसायन | त्वचागामी |

गुणधर्म:

सहपानानुपानानां वैशिष्टयादिह कज्जली।
सवमियहरा वृष्या मता दोषत्रयापहा:।।
रसतरंगिणी

विविध औषधांसोबत व अनेक अनुपानांसोबत कज्जली सर्व रोगाचे शमन करते ती वृण्य व त्रिदोषघ्न आहे.

आमयिक प्रयोग:

१) वरूणादिगण - विद्रधीहर
२) वासा - श्वास, कास
३) जायफळ - स्वप्नमेह
४) सैधव, अर्कक्षीर - गण्डमाला (लेप)
५) लोणी - गजचर्म

उपयोग:

कज्जली अवस्थानुरूप गलायुवृद्धी, प्रतिश्याय, श्वास, कास, वमन, जंतुज अतिसार, विसर्प व उपदंश यात उपयुक्त असते.

## हिंगुलोत्थ पारद निर्माण विधी

''उर्ध्वपातन यंत्रेण ग्राह्य:स्यात निर्मलोरस:।
कंचुकै:नागवंगाद्यै: निर्मुक्तो रसकर्मणि।।
विनाकमष्टिकेनैव सूतो डयं सर्वकर्मकृत।
रसेंद्रसार संग्रह

पारदावर अष्टसंस्कार करून वेळ, काळ पैसा यांचा अपव्याथ करून घेण्योऐवजी हिंगुळापसून पारद निर्माण करण्याची विधी आज वापरली जाते. येथे अंतर्धूमविपाचन पद्धतीने हिंगुळातून पारद काढता.

निर्माण विधी:

साहित्य:

१) डमरूयंत्र (एकामेकात तोड बसतील असे दोन माठ)
२) चुन्याची निवळी
३) मातकापड (गोपीचंदन)
४) सळया व बाइंडिग तारा
५) जाडकापड (बारदान)
६) सलाईन बॉटल, टाचणी, पत्रे (पन्हळ)
७) विटा
८) लाकूड (फोडलेले)

कृती:

भट्टी बांधण्याची पद्धती:

१) भट्टी बांधत असताना सर्व प्रथम चुल बांधावयाची असते १kg हिंगुळ असल्यास तीन विटांची व यापेक्षा अधिक असल्यास चार विटाची उंची असणारी चुल बांधावी

२) चुल ही सपाट जागी तिचे तोंड हे पश्चिम दिशेकडे असावे. या प्रकारे तयार करावी.

यानंतर दोन फुट लांबीच्या १२स्स-जाडीच्या ती सळ्या घ्याव्यात, चुलीवर त्या तिठा करून ठेवण्यात यानंतर लहान माठ घ्यावा व तो या तीन सळ्यांवर उभ्या क्षितीजास समांर रेषेमध्ये ठेवावा. माठाचा संपूर्ण तळ त्या सळ्याच्या तिठ्यामधून खाली येईल या प्रमाणे बसवून सळ्याच्या संधीस बाईडिंग तारा बांधून माठ काढुन घ्यावा. अशा प्रकारे प्राथमिक तयारी पूर्ण करून घ्यावी.

माठाची सिद्धता :

१) माठ हे सछिद्र असतात त्यामुळे उष्णतेमुळे बाष्प स्वरूप बनलेल्या माठामधुन पारद बाहेर जाण्याची शक्यता असते. याकरिता चुन्याचू निवळी तयार करून घ्यावी (पान नं १२७) ती निवळी माठामध्ये ओतून हाताने सर्व माठभर पसरावी यामुळे ती ज्या ठिकाणी सछिद्रता असेल त्या ठिकाणी जाऊन बसते व पारद उडून जात नाही हि क्रिया दोन्ही माठांना करावी.

डमरूयंत्र निर्माण विधी :

१) लहान माठ घेऊन चुलीवर ठेवावा त्यामध्ये शुद्ध हिंगुळ (लिंब) ठेवावा (पान नं. ४७) यानंतर मोठ्या माठाचे तोंड लहान माठाच्या वर झाकावे, जर खालील माठ कळशी सारख्या तोडांचा असेल तर त्यावर मोठ्या माठाचे तोंड व्यवस्थित बसते.

२) यानंतर सळयावर माठ व्यवस्थित एकावर एक समांतर धरावेत खलामध्ये मुलतानी माती पाण्यात भिजवून त्यामध्ये धोतराचे लांब तुकडे भिजवून घ्यावेत (चुलीवर).

३) माठाच्या मुखाशी दोरखंडाप्रमाणे पोरिगळून ते गोल लावावेत लावल्यावर त्यावरून एक मुल गोपीचंदनाचा (मुलतानी माती) हात फिरवून घ्यावा अशा प्रकारे एक कए मातकापड करून मुख पूर्णपणे बंद करावे.

४) यानंतर मातकापड वाळुण्यासाठी ते काहीवेळ ठेवणे आवश्यक असते.

५) मातकापड वाळेपर्यंत एक बारदान पाण्यामध्ये भिजवून ते वरील माठावर तोयाधार स्वरूपात टाकावे व यानंतर त्याच्या चारही टोकांना पन्हळ पत्रे लावून ठेवावेत यामुळे ते पाणी खलाच्या माठावर पडण्याचा धोका टळतो.

६) शलाइनची बॉटल तळाच्या ठिकाणी ब्लेडने कापून घ्यावी व त्यामध्ये पाणी ओतून एका आशारास टांगून ठेवावी यानंतर तिचे दुसरे टोक बारदानावर टाचणिच्या सहाय्याने लावावे व हळूहळू पाणी सुरू करावे.

७) पारद हा बाष्प स्वरूपात उडून वरच्या माठास चिकटत असते. ण्हणुन वरील प्रमाणे रचना करावी. सलाईन बॉटलमुळे अग्निजळत जावे लागत नाही. धूराचा त्रास होत नाही व बारदान सर्व बाजूंनी ओले रहाते.

८) या प्रकारची तयारी करून भट्टीची पूजा करावी व अग्नि सुरवात करावा :

आकृती :

अग्नि प्रक्रिया :

१) अग्निदेत असताना हिंगुळाच्या आतील प्रमाणानुसार अग्नि देणे आवश्यक असते.

२) मंदाग्निअसताना एका तासाला ५० ग्राम इतका हिंगुळ जळतो या प्रमाणे २४ तासात १२०० ग्राम इतका हिंगुळ जळतो याकरिता १ॄ इतका हिंगुळ असेल तर मंदाग्नि द्यावा. (पान नं. ) मंदाग्नि वेळी लहान लाकडाचे तुकडे वापरावेत, माठाचा तळाचा रंग पालटून तो काळपट पडल्यावर तो मंदाग्नि समजावा.

३) माठाच्या ज्वाला उघड्ु वर जाऊ नयेत याची काळजी घ्यावी.

४) सलाईनच्या बॉटलमधील पाणी कमी झाल्यानंतर ते परत भरून ठेवावे, पाण्याचा थेंब माठावर पडू नये याची पुरेपुर काळजी घ्यावी जर माठावर पाण्याचा थेंब पडणाच तर माठ फुटण्याची शक्यता असते.

५) या प्रकारे २४ तास फक्त योग्य अग्नि देत रहावा.

६) माठात जर ४टु इतका हिंगुळ असल्यास माठाचा सळ पांढरा राहिल असा मध्यामाग्नी अथवा तीव्राग्नि द्यावा तो काळा पडु देऊ नये.

७) २४ तास अग्नि देऊन पूर्ण झाल्यावर अग्नि देणे बंद करावे, वरील बारदान काढून अर्धातास वरील माठाच्या तळावर पाणी शिंपडत रहावे यानंतर तो माठ चुलीवरून उतरून घ्यावा.

८) उतरवल्यानंतर एक विट ठेऊन त्यावर लहान माठ येईल अशा पद्धतीने आडवा माठ ठेवावा शीत होू द्यावा.

९) थंड झाल्यावर दुसऱ्या दिवशी मात कापड कापुन काढावे व माठ एकमेकापासुन वेगळे करावेत

१०) यानंतर मोठ्या माठात घासणीच्या सहाय्याने घासुन संपुर्ण पारद एकत्र करून घ्यावा.

११) तो एका परळात काढुन घ्यावा त्यानंतर धोतराचे एक कापड घेऊन त्यामध्ये पारद घेऊन स्वच्छ खलामध्ये किंवा दुसऱ्या परळात गाळुन घ्यावा.

१२) यानंतर तो पाण्याच्या सहाय्याने स्वच्छ स्वच्छ धुवुन घ्यावा व बाटलीत भरून ठेवावा.

१३) हा पारद जरी शुद्ध असला तरी त्याच्यावर स्वेदन व मर्दन हे दोन संस्कार करणे आवश्यक असते त्याप्रमाणे ते करावे (पान नं. ३३)

१४) सामान्यत: १टु हिंगुळापासुन पारा निघण्यास २८०दण ते इतके २९०दण माठाच्या आतमधील तापमान असावे.

## कुपीपक्व रसायन निर्माण विधी

कुपीपक्व रसायनाचा स्थानपरत्वे तीन प्रकारचे वर्गीकरण होते. गलस्थ, तलस्थ व उभयस्थ

कूपीच्या कंठाशी लागतो तो गलस्थ, कंठस्थ, कुपीच्या तळाशी राहतो तो तलस्थ व कुपीच्या कंठ व तळ या दोन्ही ठिकाणी औषध तयार होते ते उभयस्थ होय, यामध्ये रससिंदूर हा कुपीच्या कंठाशी तयार होतो या करिता ते कंठस्थ रसायन आहे.

कुपीच्या तळाशी समीरपन्नग तयार होतो त्यामुळे ते तलस्थ रसायन होय, तर सोमनाथी ताम्र तयार होतो त्यामुळे ते तलस्थ रसायन होय, तर सोमनाथी ताम्र तयार करताना कुपीच्या कंठाशी व तळाशी काही औषध शिल्लक राहते ते उभयस्थ रसायन आहे.

सर्व कुपीपक्व रसायनामध्ये कुपी वालुकायंत्रात ठेवायची असते याकरीता भट्टीचे तापमान सहन करता येईल इतके तरी ती जाड नसते म्हणुन त्यावर गोपीचंदनाच्या सहाय्याने मातकापडे करणे आवश्यक असते अन्यथा बाटली वितळून जाईल करिता खालील प्रमाणे मातकापड करावे.

कुपीचे मातकापड :-

१) कुपीची संपुर्ण उंची साधारणतः १0 इंच इतकी असावी याचे तळ, खलचा २/३ भाग उभट वरचा १/३ भाग नळीसारखा असे असतात.

२) कुपीच्या सर्व बाजूस अग्नि चांगला निर्माण व्हावा. उष्णता चांगली लाजावी, द्रव ते पासून संरक्षण व्हावे याकरिता बाटलीवर माती व कापड यांचे लपेट देतात, अग्निच्या कालानुसार मातकापडांची संख्या ठरवावी. यामध्ये २४ तासांच्या भट्टीकरिता ९ मातकापडे व ताम्राच्या ४८ तासाच्या भट्टी करत चौदा मातकापडे करावीत.

३) सर्व प्रथम बाटलीच्या तळापसून गळ्यापर्यंत मातकापडास वापरायच्या कापडाचे माप घ्यावे. हे घेताना थोडे जास्त घ्याव्या कारण ते परत मुलतानी माती मध्ये बुडवल्यानंतर आकसते.

४) एका खलात मुलतानी माती घेऊन त्यामध्ये थोडे पाणी ओतुन त्याचा काडा तयार करावा

५) मुलमाती माती कमवल्यानंतर त्यामध्ये वरील कापड भिजत टाकावे व सर्व बाजुने व्यवस्थित भिजल्यानंतर बाटलीस लावावे.

६) भाटलीस लावताना सर्व प्रथम ते पसरून त्यानंतर त्यावर उभी बाटली ठेवावी खालुन वर हात फिरवत आणावा, यावेळी हात थोडासा मुलतानी मातीच्या कालामध्ये भिजवल्यास त्याचा चांगला उपयोग होतो.

७) वर टोके ताणून घेऊन घट्ट कापड लावून घ्यावे. यालेपात मातीचा खडा किंवा हवेचा बुडबुडा राहु नये याची काळजी घ्यावी जर हवा राहिल्यास बद्बद असा आवाज येते यावेळी उष्णतेने बाटली फुटण्याची शक्यता असते.

८) एक मातकापड झाल्यानंतर बाटली सावलीत व्यवस्थित वाळविण्यास ठेवावी यावेळी त्यास कोणत्याही प्रकारची घाण लागु नये याची दक्षता घ्यावी.

९) हे एक मातकापड वाळल्यानंतर दुसरे मातकापड करण्यास घ्यावे.

माठास मातकापड :

काही वेळा माठास माठास मातकापड केले जाते यामध्ये माठ अग्निसह बनावा एवढच यामधील उद्देश असतो.

माठाच्या आकाराचे सर्व प्रथम धोतर फाडुन घ्यावे व त्यानंतर कुपीस ज्या विधीने मातकापड करावे, मातकापड केले जाते त्याच पद्धतीने या ठिकाणी मातकापड करावे, मातकापड वाळल्यानंतर माठ उपयोगात आणावा.

# रससिंदुर निर्माण विधी
## (कंठस्थ रसायन)

निर्माण विधी :

‘‘पलमातं रस शुद्धं तावन्मात्रं तु गन्धकम्।
विधिवाकज्जली कृत्वा व्यग्रोधाइरवारिणा।।
भावनात्रितयं दत्वा स्थालीमध्ये निधापयेत।
विधाय कच्छपं यंत्र वालुकाभि प्रपुरयत।।
ददत्तदनु मन्दांग्नि भिषग्यामचतुष्टयम्।
जायते रससिंदूर तरूणारूणसनिभम्।।
अनुपान विशेषण करोति विविधान्गुणान।
क्षयकुष्ठमरूवीहमेहघ्नं पाण्डुनाशनम्।।
योगरत्नाकर

साहित्य : गलुकायंत्र माठ, शलाका, कुपी, अग्नि, सळया, इंधन, नरसाळे

कृती :

भट्टी निर्माण विधी :

कुपी पक्व रसायन निर्मिती ही ३ हिंगुलोत्थ पारदापेक्षा वेगळी वर्णन केली आहे.

१) प्रथमत : सपाट मोकळया जागेमध्ये १५ इंच लांब, १५ इंच रूंद असा चौकोन आखून घ्यावा.

२) यानंतर कुदळीच्या सहाय्याने १५ इंच खोल खड्डा खणावा, या चौकोनाच्या पश्चिम दिशेला लाकडे आत सारण्याकरिता एक मार्ग काढावा यालाच सोपान म्हणतात, याची रूंदी ५ इंच ठेवावी, हा वरून तिरकस खाली खाली नेत भट्टीच्या तळास भिडवाव, सोपानाचा मार्ग काढतना लाकडे व्यवस्थित आत जातील व भट्टीस त्याचा कोणत्याही प्रकारचा धक्का लागू नये.

३) यानंतर भट्टीचा तळ पिटाच्या सहाय्याने समतल करून घ्यावा व दोन्ही बाजूंनी विटांचे माती व पाण्याच्या सहाय्याने बांधकाम करून घ्यावे.

४) सोपानाच्या (भट्टी प्रवेश द्वाराच्या) दिशेला सुद्धा विटा लावून तो मार्ग व्यवस्थित बनवून घ्यावा यानंतर पाच सळ्या ऱ्२ फूट लांबीच्या १२स्स् जाडीच्या घ्याव्यात. या सळ्या भट्टीच्या वरील दिशेस बांधायच्या असतात.

५) प्रथम भट्टीच्या आडव्या बाजुने दोन सळ्या टाकाव्यात यानंतर दोन सळ्याना आडव्या व एकमेकास समांतर अशा दुसऱ्या दोन सळ्या टाकाव्यात.

६) यानंतर या चौकोनी सळ्यांमध्ये माठ बसवून माठाचा तळ फक्त खाली येईल येथेपर्यंत आत बसवावा.

७) नंतर माठ क्षितीन समांतर आहे का नाही ते पहावे. ब्नसल्यास तो करून घ्यावा तो वाकडा बसवू नये यानंतर सळ्यांनी केलेला चौकोन बाइडिंग तारेच्या सहाय्याने पक्का बांधावा व माठ बाजूला काढून घ्यावा, माठाच्या तळास एक छिद्र पाडुन घ्यावे.

८) यानंतर अजुन एक सळई भट्टी द्वाराचे वर आडवी टाकावी. व इतर दोन सळ्यांना बाइडिंग तारेच्या सहाय्याने बांधावे.

९) यानंतर तो माठ सळ्यांवर ठेऊन एका हाताने धरावा. क्षितीज समांतर झाल्यानंतर तो लिवण्यास सुरवात करावी.

१०) भट्टीच्या आग्नेय व नैॠत्य दिशेला दोन गोल पाईप घालुन ठेवण्यात व त्या पाईप घालुन ठेवाव्यात व त्या पाईप सुद्धा लिंपाण्यात.

११) विटा चिखल मातीच्या सहाय्याने सर्व बाजुनी लावून घ्याव्यात यानंतर त्या चिखलाच्या सहाय्याने लेपुन घ्याव्यात.

१२) हा विधी करत असताना सर्व माठ आतमध्ये घालुन घ्यावा, जर माठाचा काही भाग उघडा राहिल्यास तो तडकण्याचा संभव असतो.

१३) सर्व बाजूंनी लिंपुन झाल्यानंतर आग्नेय व नैऋत्य दिशेने तिरकस घातलेल्या नळ्या फिरवून काढुन घ्याव्यात त्यानंतर या ठिकाणी छिद्राची निर्मिती होते यातुन त्रिवाग्निवेळी ज्वाला बाहेर येतात यास नाळवे निघणे असे संबोधले जाते. आप्पा यास अग्निच्या शेपट्या असा शब्द वापरत.

१४) यानंतर दुसऱ्या दिवशी भट्टी शेणाच्या सहाय्याने सारवून घ्यावी व वाळल्यांनतर उपयोगात आणावी. या विधीनुसार सर्व कुपीपक्व रसायनाची भट्टी बांधली जाते.

रससिंदूर निमिती :

घटक

१) पारा - १ भाग

२) शु. गंधक - १ भाग (माका शुध्दी)

१) सर्व प्रथम कज्जली विधीनुसार पारा व गंधक यांची विधिवत कज्जली तयार करून घ्यावी (पान नं. १९८).

२) सात मातकापड केलेली बाटली घेऊन त्यामध्ये नरसाळे धरून कज्जली भरावी, जर कज्जली आधीच तयार करून ठेवली असल्यास ती खलामध्ये घेऊन घड्या पडेपर्यंत घोठावी.

३) यामध्ये कज्जली ही २००ग्र-इतक्या मात्रे पर्यंत भरावी, यापेक्षा जास्त भरू नये.

४) कज्जली बाटलीमध्ये भरून झाल्यानंतर ती माठामध्ये ठेवायची असते. माठाच्या तळास सुमारे २ अंगुले इतक्या उंची पर्यंत बारीक वाळु भरावी. त्यानंतर त्यावर कज्जली भरलेली बाटली मधोमध व क्षितीज समांतर ठेवावी.

५) यानंतर बाटलीच्या वर एक नारळाची करंवटी ठेवावी व त्यामध्ये वळीच्या सहाय्याने वाळू भरण्यास सुरवात करावी, बाटली हाताने धरून ठेवावी ती हलू देऊ नये.

६) वाळूची पातळी बाटलीच्या मुखापासून खाली ३ इंच किंवा माठाच्या मुखापर्यंत ठेवावी.

७) वाळूच्या पातळी बद्दल अनेकांची मतमतांतरे दिसुन येतात परंतु उष्णता लागुन वर उडालेला सिंदूर ज्या ठिकाणी चिटकणे अपेक्षित आहे त्या ठिकाणापर्यंत वाळूची उंची घ्यावी.

८) यानंतर पाच कुमारिकांच्या सहाय्याने (मिळाल्यास) पूजा करून घ्यावी. भट्टीवर हळद कुंकू फुले वाहून अग्नि देण्यास सुरवात करावी.

९) अग्नि पेटवण्यास घृत, कापूर यांचा वापर करावा लगेचच लाकपे पेट घेत नाहीत याकरिता प्रथम वाळलेला पाळापाचोळा वापरावा.

१०) अग्निमान :

अग्निदेण्यावरून त्याचे पाच प्रकार आहेत.

१) दीप्ताग्नि - यंत्र तापविण्यास

२) मंदाग्नि - कज्जली पातळ होण्यास

३) मध्यमाग्नि - पचनास

४) तीव्रग्नि - उत्थापन (सिंदूर उडण्यास)

५) स्वागशीत - पात्र थंड होण्यास औषध पक्व होण्यास

११) या प्रमाणे प्रथम दीप्ताग्नि सुरू करावा व अर्ध्यातास मध्ये मंदाग्नि सुरू करावा. माठाच्या तळावरून अग्निमान ठरवितात.

१) मंदाग्नि - माठाचा तळकाळा पडतो

२) मध्यमाग्नि - माठाचा तळ आहे तसा राहतो किंवा पांढरा होतो

३) तीव्राग्नि - माठाचा तळ लालबुंद होतो.

१२) याप्रमाणे रससिंदूरास व १२ तास मंदाग्नि ८ तास मध्यमाग्नि व ४ तास तीव्राग्नि द्यावयाचा असतो.

१३) काही वेळा अग्नि व्यवस्थित न बसल्यास जेवढा वेळ मध्यमाग्नि देतातत त्यावेळेच्या निम्मा अवधी तीव्राग्निस द्यावा.

१४) मंदाग्नि देत असताना सामान्यपणे लाकडाच्या लहान लहान तुकड्यांचा (पिसाळलेली) वापर करावा यामुळे लाकडे लगेचच पेटतात व अग्नि चांगला बसतो.

१५) यावेळी भट्टीच्या तोंडासमोर दोन दोन लाकडे ठेवावीत (सोपान मार्गात) यामुळे ती भट्टीच्या आतील उष्णतेने लवकर गरम होतात व आत टाकल्यानंतर लगेचच जळतात.

१६)  लाकडे जळत असताना ती आतील पोकळीमध्येच जळावीत कारन जर ती भट्टीच्या मुखाशी किंवा सोपान मार्गात जळत राहिली तर अग्नि वाया जातो व भट्टीचा अवधी वाढण्याची शक्यता जास्त असते.

१७) जर लाकूड पेटून बाहेर येत असेल तर पाण्याचे शितोंड टाकून ते विझवावे पण भट्टीवर पाणी पडता कामा नये पाण्याचे थेंब माठावर पडल्यास माठ तडकतो त्यामुळे हे काम कौशल्याने करणे आवश्यक असते.

१८) मांदाग्नि सुरू केल्यानंतर सामान्यपणे दीड-दोन तासात बाटलीतून मंद धूर येऊ लागतो. यानंतर तीन तासामध्ये पांढरा धूर बाहेर येऊ लागतो काही अवधीनंतर तो पिवळ्या रंगात परिवर्तित होतो.

१९) यावेळी बाटलीस शलाका करण्यास  सुरवात करावी, शलाका ही ३ ते ४ फुट लांब तिला धरण्यास एका टोकास लाकडी मुठ व दुसऱ्या टोकास ती गोल व टोकदार करून घ्यावी.

२०) शलाका ही सोपान मार्गात लाकडावर ठेऊन लालबुंद झाल्यानंतरच कूपीमध्ये घालायची असते.

२१) यावेळी बाटलीच्या तळास असणारा गंधक उडून तो कंठाशी येऊन चिकटु लागतो, तो चिकटुन बाटलीचे तोंड मोकळे करण्यास शलाका करावी.

२२) शलाका करत असताना २ ती फार आतमध्ये घालू नये फक्त कंणस चिकटलेला गंधक घासुन जाळुन काढावा ही क्रिया अत्यंत हळु व कौशल्याने करावी गंधक परत बाटलीत पडु नये याची काळजी घ्यावी.

२३) १२ तास मंदाग्नि चालु ठेवावा. भट्टी मध्ये नवीन लाकुड टाकत असताना जळणारे जुने लाकुड सळईच्या सहाय्याने वर उचलुन धरावे व नवे लाकुड खाली टाकावे. यामुळे जुने लाकुड सर्व जळून जाते व त्या ठिकाणी कोळसा साचत नाही.

२४) १२ तासानंतर गंधक अधिकच प्रमाणात जळु लागतो त्यावेळी वारवार सळई करणे आवश्यक असते, यावेळी हयगय करू नये, जर किट्ट अधिक प्रमाणामध्ये येत असेल तर एक बाइडिंग तार टोकास पळवून त्यामधून सर्व किट्ट बाजूला काढून टाकावे.

२५) १२ तासानंतर मध्यमाग्नि सुरू करावा यावेळी तयार होणारे किट्ट काढण्यास दोन-तीन तासांचा अवधी तर लागतोच.

२६) सर्व किट्ट निघून गेल्यानंतर बाटलीचे तोंड मोकळे होते व तळ सरळ दिसू लागतो ही अवस्था येण्यास साधारणपणे १७ ते १८ तासांचा अवधी लागतो.

२७) बाटलीचे तोंड मोकळे झाल्यानंतर तीव्राग्नि देण्यास सुरवात करावी. तीव्राग्नि देत असताना गाठीच्या लाकडाचा अग्नि देणे आवश्यक असते.

२८) यावेळी लाकडे घालत असताना खरी कसरत असते अग्नि जास्त द्यायचा असतो लाकडे आत सारताना माठास धक्का लागू नये याची काळजी घ्यायची असते लाकडे चोंदू नयेत तसेच सळ्या, विटा गरम झालेल्या असतात त्यांना धक्का द्यायचा नसतो.

२९) भट्टी चोंदल्यास अवकाश कमी होतो या ठिकाणी वायू महाबूताची विकृती होते व अग्नि कमी होतो. शरिरामध्ये ज्याप्रमाणे आमाने स्त्रोतोरोध होऊन वायूस अवरोध होतो व आग्निमांद्य तयार होते तद्वतच भट्टी मांद्य तयार होते. व त्यामुळे अपक्व औषध निर्माण होू शकते शरिरात अग्निमांद्य असताना ज्याप्रमाणे धातू पोषण योग्य होत नाही तद्वतच येथे ही व्यवस्थित पाक होत नाही करिता व्यवस्थित अग्नि द्यावा.

३०) मध्यमग्नि ८ तास देताना शेवटी बाटलीच्या तळास लाल रंगाची रिंग दिसु लागते व त्यानंतर सर्व तळ लाल दिसू लागतो यावेळी तीव्राग्निस सुरवात करायची असते.

३१) सामन्यपणे भट्टी पहाटेच्या वेळी येते व त्यावेळी रात्री १० च्या सुमारास तीव्राग्नि देण्याची वेळ येते व त्यावेळी अंधारात लाल रिंग व्यवस्थित दिसू शकते व तीव्राग्नि देणे सुकर बनते.

३२) तीव्राग्नि देताना कोळसा काळा पडू नये कारण जर तो काळा पडल्यास अक्षरशः रपवतो कारण जर तो काळा पडला तर कितीही वेळ अग्नि दिला तरी तो सिंदूर उडत नाही. तो काळा पडू नये याकरिता दोन लांब सळ्या होऊन त्यांनी सारखे घुसळावे ही कला गुरूकडूनच शिकता येते.

३३) तीव्राग्नि देतानाची अजून एक खूण म्हणजे माठाचा तळ लालबुंद होणे व आग्नेय व नैऋत्य दिशेने उघड्या असनाऱ्या नाकळ्यामधून अग्नि बाहेर येणे होय यालाच आप्पा अग्निच्या शेवटया म्हणतात.

३४) सिंदूर कंठाशी येऊन चिकटू लागल्यानंतर एक वलय तयार होते व सिंदूराच्या सहाय्याने कंठास लागून त्याचे तोंड/छिद्र हळूहळू बंद होू लागते, काही वेळात भट्टी होते. मुगा एवढे बारीक छिद्र राहिल्यानंतर भट्टीतून सर्व लाकडे बाजूल काढून घ्यावीत.

३५) यानंतर बाटलीच्या मुखावर कापर अथवा नारळाची करवंटि झाकावी, भट्टीच्या सर्व बाजूंनी वाळू टाकावी आग्नि विझवून भट्टीवर घमेले झाकून दोन दिवस स्वांगशीत होण्यास ठेवावी.

३६) जेवढा वेळ अग्नि दिला जातो. त्याच्या दुप्पट वेळे पर्यंत तरी भट्टी स्वांगशीत होण्यास ठेवायला सांगतात.

कूपी फोडण्याची विधी:

१) भट्टी स्वांगशीत झाल्यानंतर घमेले काढून घ्यावे, माठातील वाळू पळईच्या सहाय्याने बाजूला करून घ्यावी, यानंतर कुपी उपसून काढावी.

२) काढल्यानंतर सुरीच्या सहाय्याने सर्व मातकापड कापून टाकून बाटली बाहेरून एकदम स्वच्छ करून घ्यावी.

३) त्यानंतर थोड्या रॉकेलमध्ये सुत्तळी बुडवून ती बाटलीच्या मध्यावर गुंडपाळून पेटवून जाळावी.

४) यानंतर त्यावर पाण्याचे दोन-तीन शिंतोडे मारावेत याने गरम झालेल्या ठिकाणी बाटली फुटते.

५) बाटली फोडल्यावर ती जमीनीवर ठोकून ठोकून सिंदूराची सोंगठी बाजूला काढावी.

६) आम्ही केलेल्या सर्व भट्यामध्ये सोंगठी मिळालेली आहे.

७) यानंतर याचे थोडे कण घेऊन सहाणेवर उगाळून पहावेत, त्यास सिंदूरी ‘अपाकुसुम संज्ञकम’ अशा स्वरूपाचा रंग येतो. सामान्यत: २०० ग्राम च्या कज्जलीस ८० ते १०० ग्राम पर्यंत रससिंदूर भेटतो.

‘प्रत्यक्षतो हि यवदृष्ट शास्त्रदृष्टं च यभवेद्। या सूत्रानुसार हा विधी गुरूच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत चांगल्या पद्धतीने शिकता येतो, मनुष्याच्या प्रकृति प्रमाणे प्रत्येक भट्टीची बेगळी प्रकृति असते त्यामुळे प्रत्येक भट्टी वेगळी असते व त्याचा आस्वाद प्रत्येक विद्यार्थ्याने घ्यावा असाच असतो.

## ताम्र सिंदूर

सोमनाथी ताम्र निर्माण विधी :

‘‘शुल्बतुल्येन सूतेन बलिना तत्समेन च।
तदर्धांशेन तालेन शिलया व तदर्धया।।
विधाय कज्जली श्लक्ष्णां सूक्ष्मकज्जलसंनिभाम्।
कज्जल्या ताम्रपत्राणि पर्यायेण विलेपयेत।।
यन्त्राध्यातविनिर्दिष्टवालुकाथन्त्रगं पचेत।
प्रपचेदयुगयामं तु स्वांगशीतं समुध्दरेत।।
तत्तद्रोगहरानुपानसंहित ताम्रं द्विवल्लोन्मितं।
तल्लीढं परिणामशुलउदरं शूलच पाण्डुज्वरम्।
गुल्मप्लीहक्षयाग्नि सादसदनं श्वासं चकासं तथा।।
दुष्टांच ग्रहणी हरेद्ध्रुवमिंद तत्सोमनाथाभिवम्।।
इति सोमनाथ ताम्रम

-योगरत्नाकर

घटक :

| | | |
|---|---|---|
| १) | शुद्ध ताम्र | - १ भाग |
| २) | शुद्ध पारद | - १ भाग |
| ३) | शुद्ध गंधक | - १ भाग |
| ४) | शुद्ध हरताळ | - १/२ भाग |
| ५) | शुद्ध मन :शिला | - १/४ भाग |

कृती :

१) सर्व प्रथम शुद्ध पारद (पान नं. ३३) घेऊन माक्याचा रसात शुद्ध केलेला गंधक (पांन नं. ३९) घेऊन त्याची विधीवत
कज्जली करावी (पानं नं. १९८)

२) यानंतर हरताळाची (पान नं. १२७) व मन : शिळेची (पान नं. १३४) विधीवत शुद्धी करून घ्यावी.

३) या नंतर कुपीपक्व रसायनास भट्टी निर्माण विधि, मातकापड यांची तयारी रससिंदूराप्रमाणे करावी (पान नं. २१२)

४) यानंतर एका खलात शुद्ध हरताळ व मन:शील घेऊन त्यांना घोटून एकजीव करावे.

५) ते एकजीव झाल्यानंतर एका खलात कज्जली घेऊन त्यामध्ये हरताळ व मन:शील एकत्रित टाकून घड्या पडे पर्यंत घोटावे.

६) एकत्र घोटून कज्जली तयार झाल्यानंतर ताम्राचे शोधन करून घ्यावे (पान नं. ३३)

७) ताम्र शोधन आदल्या दिवशी करून दुसऱ्या दिवशी कज्जली काचकूण्यामध्ये भरावी (पान नं. २१४) त्यावर बारीक झालेल्या ताम्राच्या तारा टाकाव्यात व बाटली विधीवत माठात ठेऊन दीप्ताग्नि सुरू करावा (पान नं. २१५)

८) ताम्र सिंदूर करताना ४८ तास कृमाग्नि द्यायचा असतो यामध्ये २४ तास मंदाग्नि, १८ तास मध्यमाग्नि व ६ तास तीव्राग्नि द्यावा (पान नं २१५)

९) पहिल्या २४ तासामध्ये मंदाग्नि असताना जवळपास सर्व गंधक उडून जातो.

१०) यानंतर मन:शिला उडण्यास सुरवात होते यावेळी लालरंगाच्या वाफा कूपीमधून येऊ लागतात व त्यानंतर काहीवेळाने हरताळ व मन:शील यांचा मिश्रित धूर येऊ लागतो यावेळी पहिल्यापासून मध्यमाग्नि संपेपर्यंत सळई करत रहावे. मध्यमाग्नि वेळी शलाकाकरण्याच्या वेळा वाढवाव्यात, जर कीट जास्त असेल तर ते बाहेर काढून टाकावे (रससिंदूर पहा)

११) मध्यमाग्निच्या १८ तासांच्या कालावधीत सर्व किट् बाहेर निघून जाऊन ती मोकळी होते व तळास लाल रिंग दिसू लागते यानंतर तीव्राग्नि द्यावा.

१२) ताम्र उडण्यास जड असते त्यामुळे या विधीत रससिंदूरापेक्षा अधिक वेळ सुमारे ६ तास अग्नि द्यावा लागतो.

१३) सिंदूर हळूहळू गळयास येऊन चिकटू लागतो. मुगा एवढे बारीक छिद्र राहिल्यावर बालाकडे काढून वाळूने भट्टी विझवावी व स्वांगशीत होण्यास ९ दिवस ठेऊन यानंतर विधिवत फोडावी (पान नं. २१८)

१४) यावेळी बाटलीच्या कंठाशी ताम्रसिंदूर (रससिंदूर) व तळाशी ताम्रभस्म मिळते अशा पसद्धतीने हा उभयस्य रसायन निर्माण विधी पूर्ण होतो.

## सुवर्णराज वंगेश्वर
## (तलस्थ रसायन)

'प्रक्षिपेद भाजने वंगामायसे वा मृण्मये।
विद्रुत वन्हितप्तेन तस्मिन तन्मानंच रसम्।।
क्षिप्ता संचूर्णयेतत्र नरसारंसच गन्धकम्।
तनुचासौ मृदालिप्त काचकूप्या निशायच।।
तत्सर्व सिकता यंत्रे पचेद्यामचतुष्टयम्।
पाकात संजायते चित्रकीर्ण हेमामणैरिव।।
रमणीयवरं स्वर्णवंग नाम रसायनम्।।'

भैषज्यरत्नावली

१) शुद्ध पारद - १ भाग
२) शुद्ध वंग - १ भाग
३) शुद्ध गंधक - १ भाग
४) शुद्ध नवसागर - १ भाग
५) सैंधव - १/१६ भाग

साहित्य : भट्टी, काचकूपी, खल्वयंत्र, शेगडी, कढई इ.

सुवर्णराज वंगेश्वराची कज्जली निर्माण करीत असताना इतर कज्जली प्रकारांपेक्षा थोड्या वेगळ्या पद्धतीने बनवायवी असते.

१) सर्व प्रथम एक खल्वयंत्र स्वच्छ धुवुन व पुसून घ्यावे. ते कळल्यानंतर त्यामध्ये शुद्ध पारद घ्यावा. (पान नं. ३३)

२) यानंतर एका कढईमध्ये (लहान) शुद्ध वंग घ्यावे (पान नं. ७४) ती कढई गॅसवर ठेऊन वंग पातळ करण्यास सुरवात करावी. थोड्या अवधीतच वंग पातळ होईल.

३) पातळ झालेला वंग खल्वयंत्रामध्ये घेतलेल्या पारदामध्ये ओतावा व त्यानंतर बत्याच्या सहाय्याने लगेचच घोटण्यास सुरवात करावी.

४) वंग हे परत धन स्थितीत येत असल्यामुळे पारा व वंग एकत्र मिसळून त्यांचे वन स्वरूपी मिश्रण तयार होते.

५) हे मिश्रण एकत्र केल्यानंतर त्या मिश्रणाला काळसर वर्ण प्राप्त होण्याची शक्यता असते व त्यामुळे निर्माण होणारा वंगेश्वर काळसर तयार होतो.

६) तो काळसर वर्ण निघून जावा याकरिता त्यास सैधवाने धुणे आवश्यक असते.

७) याकरिता त्याच खलामध्ये थोडेसे पाणी व सैंधव टाकून ते मिश्रण घोटण्यास सुरवात करावी.

८) मिश्रण घोटत असताना वंग व पारा यांच्या मिश्रणातील काळा वर्ण निघून तो पाण्यात मिसळतो व पाणी काळपट होऊ लागतो. हे मिश्रण कणकी प्रमाणे मृदू असते.

९) ते काळ्या वर्णाचे पाणी लाकडी चमच्याच्या सहाय्याने बाजूला काढून त्यामध्ये परत नवीन पाणी व थोडेसे सैंधव टाकून घोटण्यास सुरवात करावी.

१०) ही क्रिया काळेपाणी होणे बंद होईपर्यंत करत रहावी. सामन्यपणे वंगेश्वर करतानाच पारा व वंग एकत्र केले असल्यास अर्धा ते एक तासाच्या अवधीत सर्व काळे पाणी निघून जाते पण हे मिश्रण आधीच करून ठेवलेले असल्यास त्याचा वर्ण निघून जाण्यास खूप अवधी लागतो याकरिता वंगेश्वराचे हे मिश्रण आधीच करून ठेऊ नये.

११) स्वच्छ पाणी निघू लागल्यावर मिश्रण स्वच्छ झाले असे समजुन पाणी काढुन खल्वयंत्र पुसुन कोरडे करावे.

१२) यानंतर त्यास गंधकासोबत मर्दन करावयाचे असते या ठिकाणी माक्याच्या रसात शुद्ध केलेला गंधक घ्यावा.

१३) गंधकाचा खडा असल्यास प्रथम खलात त्याचे सूक्ष्म चूर्ण करावे व त्यानंतर वरील पारा-वंग यांचे मिश्रण त्यामध्ये घालून घोटण्यास सुरवात करावी.

१४) वरील तीन द्रव्यांचे मिश्रण योग्य पद्धतीने झाल्यानंतर त्यामध्ये शेवटी नवसागर बारीक चूर्ण करून मिसळावा.

१५) यानंतर घोटून विधीक्त कज्जली तयार झाली असे समजावे व ती विधीवत मातकापड केलेल्या बाटल्यांमध्ये भरावी (पान नं. २१४)

१६) वंग व नवसागर ही दोन द्रव्ये उष्णतेच्या सान्निध्यात फुलतात व त्याकरिता त्यांना अवकाश जास्त असणे आवश्यक असते याकरिता कज्जली भरताना जास्तीत जास्त २०० ग्राम भरावी त्यावर भरू नये भरण्यास बाटली फुटण्याचा संभव असतो.

भट्टी :

१) वंगेश्वराची भट्टी करताना भट्टीची सर्व रचना ही रससिंदूराच्या रचने प्रमाणेच करावी (पान नं. २१२)

२) कज्जली काचकूण्यात भरून विधीवत माठामध्ये ठेवावी (पान नं. २१४)

३) वंगेश्वर हा तलस्थ रसायन आहे याकरिता एकूण २४ तास अग्नि द्यावयास सांगतात पण १६ तासात चांगल्या प्रतीचा वंगेश्वर तयार होतो.

४) अग्निमान-

वंगेश्वरास १० तास मंदाग्नि ४ तास मध्यमाग्नि व २ तास तिव्राग्नि द्यावा (पान नं. २१५)

५) यावेळी मंदाग्नि सुरू असताना दीड ते दोन तासामध्ये गंधक उडू लागून प्रथम पांढऱ्या व त्यानंतर पिवळ्या वाफा येऊ लागतात त्यावेळी शलाका गरम करून गळ्याभोवती असणारा गंधक जाळून काढावा. जाळत असताना वंगेश्वरास तज शलाका लागणार नाही याची काळजी घ्यावी कारण त्यामुळे तो जळण्याची शक्यता असते.

६) दहा तासांच्या मंदाग्निच्या कालावधीत सर्व गंधक उडून जाती व नवसागर उडव्यास सुरवात होते.

७) नवसागर उष्णतेने फुलून वर येत असतो त्यामुळे गळ्याचे ठिकाणी अधिक साचून तोंड बंद होण्याची शक्यता असता करिता तप्त शलाकेने वारंवार तो जाळून काढावा.

८) तोंड पूर्ण मोकळे झाल्यानंतर खाली तीव्राग्नि सुरवात करावा, दोन तास सलग तीव्राग्नि दिल्यानंतर बाटलीचा तळ लाल दिसू लागतो यावेळी वंगेश्वर तयार झाला असे समजावे.

९) त्यानंतर वाळू ओतून भट्टी शांत करावी व बाटलीच्या तोंडावर नारळाची करवंटी झाकून दोन दिवस स्वागशीत होऊ दयावी.

कूपी फोडणे :

वंगेश्वर तलस्थ रसायन असल्यामुळे मध्याच्या थोड्या वरील बाजूस बाटली फोडावी. (पान नं. २१८)

बाटली फोडल्यावर त्यामधून आरक्त, पिवळसर, सोनेरी, चकाकणारा उत्तम फुटलेला अशा स्वरूपाचा वंगेश्वर दृष्टीस पडतो.

वंगेश्वराची औषधी गुणधर्म पुढे वर्णन केले आहेत (पान नं. ..)

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | पारद | षडरसात्मक | - | स्निग्घ, वृष्य | योगवाही रसायन | - |
| २) | शुद्ध वंग | तिक्त कषाय | वायु आकाश वायु पृथ्वि | लघू, रूक्ष उष्ण | सर | शुक्रधातु |
| ३) | शुद्ध गंधक | कटु | वायु अग्नि | पाचन | सर, रसायन | त्वचागामी/ अम्ल |
| ४) | शुद्ध नवसागर | लवण | जल अग्नि | सिग्न, सुक्ष्म लघु, उष्ण | तीक्ष्ण, पाचन सारक | - |
| ५) | सैंधव | लवण मधूर | जल अग्नि पृथ्वि जल | लघु, रुच्य स्निग्ध | सुक्ष्म, शीत वृष्य, ह्रदय | दीपन, पाचक |

समीर पन्नग रस

पारदं गन्धकं मल्लं हरितालं मनःशिला।
एतच्चूर्णीकृतं सर्व मर्दयेच्च दिनत्रयम्।।
काचकूण्या विनिक्षिव्य वालुकायन्त्रके न्यसेत।
क्रमाग्निना पचेत्सम्यग्य माष्टेन च मुद्रयेत।।
स्वांगशीत समुध्दृत्य नाम्नाडसौ वातपन्नगः।
सन्निपाते कफोन्मादे सन्धिबन्धे कफामये।।
नागवल्ल्या दलेनैव भक्षयेद् गुंजिकामित्तम्।
र.चं.

सुवर्णराज वंगेश्वरा प्रमाणेच समीर वन्नग हे तलस्थ रसायन आहे पण यामध्ये क्रमाग्निच्या सहाय्याने २४ तास पचन करावयाचे असते.

घटक :

शुद्ध पारद - १ भाग

शुद्ध गंधक - १ भाग (माका शुद्धी)

शुद्ध सोमल - १ भाग

शुद्ध हरताळ - १ भाग

शुद्ध मन :शिला - १ भाग

साहित्य : सर्व रस सिंदूराप्रमाणे

कृती :

१) सर्व प्रथम शुद्ध पारद (पान नं. ३३) व शुद्ध गंधक (पान नं. ३७) घेऊन त्याची विधीवत कज्जली करावी (पान नं. १९८)

२) यानंतर त्यामध्ये शुद्ध सोमल १ भाग टाकून मिश्रण एकत्र करावे (पान नं. १३८)

३) यानंतर दुसऱ्या खलात शुद्ध हरताळ (पान नं. १२७) व शुद्ध मन :शिला (पान नं. १३४) घेऊन एकत्र घोटून एकजीव करावे.

४) हरताळ व मन :शिला एकत्र झाल्यानंतर ती वरील मिश्रणात टाकून घड्या पडेपर्यंत घोटून त्यांची कज्जली निर्माण करावी

५) कज्जली तयार झाल्यानंतर ती काचकूण्यांमध्ये भरून विधिवत माठात ठेऊन अग्नि सुरू करावा (पान नं. २१२)

६) मंद अग्नि सुरू केल्यानंतर सर्व प्रथम दोन तासामध्ये गंधकाच्या पांढऱ्या व त्यानंतर पिवळ्या वाफा बाहेर पडू लागतात. शलाकेच्या सहाय्याने त्या जाळून काढाव्यात.

७) यानंतर सहा-सात तासांनी पांढऱ्या व पिवळ्या अशा गंधक व सोमलाच्या वाफा बाहेर पडू लागतात.

८) बारा तासांच्या अवधीमध्ये सर्व गंधक व सोमल निघून जातो व त्यानंतर अग्नि वाढवून तो मध्यमाग्नि करावा.

९) मध्यमाग्निचे वेळी हरताळ व मन :शीलं यांच्या पिवळ्या व लाल रंगाच्या वाफा बाहेर पडून बाटलीचे तोंड मोकळे होते. यावेळी शलाका करणे बंद करून तीव्राग्नि सुरू करावा.

१०) चार तास तीव्राग्नि दिल्यानंतर बाटलीचा तळ लाल वर्गाचा दिसू लागतो यावेळी अग्नि देणे बंद करून भट्टी दोन दिवस स्वागंशीत होण्यास ठेवावी.

११)  स्वांगशीत झाल्यानंतर वंगेश्वराप्रमाणे काचकूपी फोडून घ्यावी व समीरपन्नग बाहेर काढावा. (पान नं. २२६)

१२)  समीरपन्नग चकचकीत काळसर वर्णाचा असतो पण उगाळल्यानंतर तो पिवळसर दिसून येतो, स्पर्शास गुळगुळीत वाटतो.

१३)  कापडामध्ये गुंडाळून तो खलामध्ये बारील करून त्यानंतर बाटलीत भरून ठेवावा.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | शुद्ध पारद | षडरसात्मक | - | स्निग्ध, वृष्य | योगवाही, रसायन | - |
| २) | शुद्ध गंधक | कटू | वायु अग्नि | पाचन | सर, रसायन | अम्लधर्मी |
| ३) | शुद्ध सोमल | - | - | उष्ण | स्निग्ध | - |
| ४) | शुद्ध हरताळ | कटू कषाय | वायु अग्नि वायु पृथ्वी | उष्ण, स्निग्ध | कुष्ठहर | त्वक्गामी |
| ५) | मन:शिला | कटू तिक्त | वायु अग्नि वायु आकाश | उष्ण, स्निग्ध गुरू | सर, लेखन | - |

शोधन चिकित्सा करीत असताना अनेकदा व्यापदांची निर्मिती होते. प्रक्रिया करीत असताना होणाऱ्या चुकांमुळे व्यापदे निर्माण होतात यास्तव त्यांची चिकित्सा करणे आवश्यक असते व ते निर्माण होू नयेत म्हणून योग्य काळजी घ्यावयावी असते.

कूपीपक्व रसायन करताना सुद्धा अनेक वेळा व्यापदे निर्माण होतात या व्यापदांची चिकित्सा करणे आवश्यक असते. अनुभवातील काही व्यापदे पुढे देत आहे.

१) माठास तडा गेल्यास :

अपक्व माठ असल्यास लाकडे सारत असताना धक्का लागल्यामुळे माठास तडा जाऊ शकतो अशा वेळी प्रसंगावधान म्हणून आधीच एक माठ छिद्र पाडून तयार ठेवावा.

माठास तडा जातोय का यासाठी सारखे लक्ष ठेवावे जर तडा गेल्यास लगेचच एक मोठे पातिले घेऊन त्यामध्ये वाकु तापविण्यास सुरवात करावी, माठाखालील अग्नि कमी करावा, वाळू तापण्यास १/२ ते १ तास जातो पुरेशी कोमट वाळू झाल्यानंतर माठातील बाटली अलगद कापड गुंडाळून उचलून घ्यावे. यावेळी खालील तड्यामधून थोड्या-थोड्या प्रमाणात वाळू खाली पडत असते. व त्यामुळे बाटली काढणे सेपे जाते, याचवेळी माठाच्या बाजूच्या विटा काढून टाकण्यात व तो माठ तसाच खाली दाबावा व त्यावर दुसरा माठ बसवावा जर दाबून खाली जात नसल्यास उचलून बाजूला काढावा व तिथे नवीन माठ बसवून कडेने विटा लावाव्यात.

यानंतर गरम झालेली वाळू माठाच्या तळास दोन अंगुळे ओतून त्यावर बाटली ठेवावी व कडेने गरम वाळी घालून पक्की बसवून टाकावी, ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर भट्टीच्या खाली पडलेली वाळू हरवून नवीन लाकडे भरून अग्नि द्यावा.

अग्नि नियोजित वेळेपेक्षा जास्त द्यावा लागतो काही वेळा दुसऱ्यांदा माठा ऐवजी कढई वापरल्यास चालते पण त्यावेळी उष्णता खूप लागते व लोह पातळ होण्याचा संभव असतो.

भट्टीकाळातील विहार :

क्षारधर्मी उष्णतेमुळे नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात जन्म असणाऱ्या व्यक्तींना भट्टीचा त्रास अधिक प्रमाणात जाणवतो करिता त्यांनी जास्त वेळ थांबू नये. याउलट मार्च, एप्रिल महिन्यात जन्म असणाऱ्या व्यक्ती चांगल्या प्रकारे उष्णता सहन करू शकतात पण अतिरेक हा वाईटच असतो.

जागरण केल्याने वात वाढतो म्हणून तीन-चार जणांनी आळीपळीने झोपून भट्टीकडे लक्ष द्यावे, रात्री जागण्याची क्षमता असल्याने गप्पा मारत सर्वच जागतात व बरोबर पहाटे ३ च्या वेळेस सर्वांनाच झोप येते याकरिता योग्य नियोजन करावे व आधी एकाने झोप घ्यावी.

भट्टीच्या काळामध्ये इतस्त्र फिरू नये. औषध हे व्याधीनाशनाकरिता बनवायचे असते, उगीच मजा म्हणून कोणी औषधी तयार करत नाही, हा काळ तद्विध संभाषेकरिता उत्तम असतो याकरिता ज्या औषधाची भट्टी आहे त्याची सर्व माहिती उपयोग एकत्र करून यावेळी विधायक गोष्टीवर चर्चा कारवी, गुरू जवळ असल्यास सर्व शंका निरसन करून घेण्याची यापेक्षा चांगली वेळ कोणतीच नसते, टेप लावणे गाण्याच्या भेंडया खेळणे असे प्रकार करू नयेत याकरिता फुटक वेळ घालवण्यापेक्षा औषधी करणास न जाता खुशाल झोपावे.

जर एखाद्यास उष्णतेचा त्रास होत असल्यास गिरीज परीपाठादि काढा, विद्रुम, जिंगी शारदी, रजनी योग यांचा प्रकृतीनुसार विचार करून वापर करावा.

## औषध सेवन काल व अनुपान विचार

‘‘रोगमादौ परिक्षेत तदनंतरमौषधम्।
ततःकर्म भिषक पश्चात ज्ञानपूर्व समाचरेत।।
निवृत्तोऽपि पुनर्व्याधिरल्पेनायाति हेतुना।
देहे मार्गीकृते दोषःशेषः सुक्ष्म खानलः।।
तस्मात्तमनुबन्धीया त्प्रयोगेणान पायिना।
सिध्दानामपि योगानां पूर्वेवां दादर्यमावहन।।’’

अ.स.सू. २३/२४-२६

वैद्याने निरनिराळ्या उपाय व साधनांनी प्रथम व्याधी परीक्षा करावी नंतर औषध ठरवून आपले ज्ञान वापरून योग्य औषध योजना करावी. कारण विकृत दोष थोड्या प्रमाणात शिल्लक राहिल्यास बरा होणारा रोग परत होतो. कारण अग्नि विझत आला असताना त्यात आलेल्या सुक्ष्म कणांनी परत तो प्रज्वलित होतो त्याच प्रमाणे अहितकर आहार विहाराने बरा झालेला व्याधी परत होतो.

यावेळी योग्य प्रकारे दोषांचा उपक्रम करून व्याधी जिंकावा.

आयुर्वेदीय चिकित्सा करताना निदान औषध व औषध देण्याची पद्धती या तीन ही गोष्टींना अत्यंत महत्व आहे. जर यामध्ये अस एखादी गोष्ट जर चुकली तर उपशय मिळत नाही.

## आयुर्वेद चिकित्सा पथदर्शक

दूष्यदेश बलं कालं अनलं प्रकृति वयः।
सत्व सत्म्य तथा आहारं अवस्थाश्च पृथाग्विधाः।।
सूक्ष्म सूक्ष्माः समीक्ष्येषां दोषौषधनिरूपणे।
यो वर्तते चिकित्सायां न स सखलति जानुचित।।

वा.सू. १२/६७-६८

चिकित्सा करण्या अगोदर व्याधीचे अचूक निदान आवश्यक असते त्यानंतर दूष्य, देश, बल, काल आदि परीक्षा करून रूग्णास औषध दयावे लागते.

हा विषय या पुस्तकाच्या मर्यादांच्या बाहेर असला तरी थोडक्यात त्याचे वर्णन करीत आहोत.

निदान (अंधार)
(Darkness)

लक्षणे :
व्याधी
व्याधीप्रकार
दोष
धातु
मल
अधिष्ठान
उदभवस्थान
इंद्रिय
अग्निपरीक्षा :
दशविध परिक्षा :
देश
काल
बल
वय
प्रकृति
साम्य
गुणवमहाभूते

---

व्याधीहर
व्याधीप्रकासानुसार
दोषनाशक
धातुंना बल देणारे
मलविकृती नाशक
अधिष्ठान गामी
उद्वस्थानी कार्यकारी
इंद्रियांना सुखकर
अग्निसंरचा चिकित्सा
परिक्षेनुसार
देशविरुद्ध
कालानुसार
बलानुरूप
पयानुसार
प्रकृतिविरुद्ध
सात्म्य
गुणविरूद्ध व महाभूताविरूद्ध

चिकित्सा (औषध)
(प्रकाश) Brightness

रूग्ण आपल्या चिकित्सा मंदिरामध्ये प्रवेशित झाल्यानंतर सर्व प्रथम त्याची प्रमुख लक्षणे केसपेपर वर नोंदवावीत आधी रूग्ण परीचय लिहावा हे ओधाने आलेच. त्यानंतर सामन्य परिक्षणे त्रिविध, अष्टविध, दशाविध परिक्षा, आप्पांच्या यकृत, प्लीहा व मूत्रपिंड यांच्या भरण, पोषण व उत्सर्जन परिक्षा यामध्ये स्पर्शासहत्व, पीडनासहत्व व ताडन परीक्षा करावी. योग रत्नाकरोक्त अष्टविध परिक्षणे करावीतच.

लक्षणांवरून व्याधी निश्चिती करावी, काही वेळा आपणास व्याधी निश्चिती करून त्यास नाव देता येत नाही अशा वेळी चरकाचार्याच्या आदेशानुसार दोषांच्या अवस्थानुरूप चिकित्सा करावी, व्याधीस नाव देता आले नाही म्हणून उणेपणा वाटून घेऊन नये चिकित्सा करता आली म्हणजे झाले ते वैद्याचे परम कर्तव्य त्याने पार पाडले. पण आधुनिक शास्त्राच्या व्याधीस गोंडसपणे आयुर्वेदिक नावे देण्याचा प्रयत्न न केलेला बरा (उदा. Rhumatic Arthritis म्हणजे आमवात, Diabetes Millitus म्हणजे प्रमेह मधुमेह) कारण एकाच मानवी शरीराकडे पाहण्याचे आधुनिक कायचिकित्सा Medicine आधुनिक शत्यचिकित्सा (Surgery) व आयुर्वेद निदान पद्धती हे तीन वेगवेगळे दृष्टीकोन आहेत ती विद्वानांची कामे आहेत आपणास चिकित्सक बनायचे आहे हे लक्षात ठेवावे.

यानंतर दूष्य म्हणजे कोणता धातू दूषित झाला आहे व कोणता मलं दूषित आहे याचे परिक्षण करावे याचवेळी रूग्णाचे धातुसारासारत्व काढावे, आप्पा याकरिता वापरातात ती पद्धती वापरावी. अधिष्ठानामध्ये देह (शरीर), मन, बुद्धी व इंद्रिय यांचा विचार करावा आप्पा यास चिकित्सा चतुष्टय म्हणतात. यानंतर यकृत, प्लीहा व मूत्रपिंड यांची दुष्टी पहावी याच बरोबर स्त्रियांमध्ये गर्भाशय विकृती पाहने आवश्यक असते.

प्रकृतिचा विचार करताना शरिर व मानस या दोन्ही प्रकृतींचा विचार करावा या बरोबरच अम्लधर्मी, क्षारधर्मी व समधर्मी या तीन प्रकृतींचा विचार करावा.

यामध्ये सर्वात महत्वाचा व शेवटचा मुद्दा म्हणजे आपण देणारे औषधे हे व्याधीस कारणभूत असणाऱ्या गुणाच्या विरूद्ध व वृद्धी पावलेल्या महाभूतांच्या विरूद्ध असणे आवश्यक असते.

पंचमहाभूतांनुसार शरीरामध्ये जर पृथ्वी व आप या दोन महाभूतांची वृद्धी झाली असेल तर आकाश, वायू व तेज महाभूतात्मक औषधाची योजना करावी व याउलट परीस्थिती असल्यास त्याप्रमाणे चिकत्सिा करावी.

गुणांचा विचार सुद्धा अत्यंत आवश्यक यामध्ये वाताची वृद्धी जर शीत व रूक्ष गुणांनी झाली असेल तर आपली चिकित्सा ही उष्ण स्निग्ध गुणांची असावी. शेवटी सर्व खेळ हा पंचमहाभूते व विशंती गुणांचाच आहे.

**पंचमहाभूते**

- **संतर्पण (पृथ्वि) (आप)**
- **नापन (तेज)**
- **अपतर्पण (आकाश) (वायु)**

औषध सेवन काल :

चरक, वाग्भट, सुश्रुत, शारंगधर यांनी आपल्या ग्रंथामध्ये औषधे सेवन काळासाठी यथोचित मार्गदर्शन केले आहे.

यामध्ये वात, पित व कफ या दोषांच्या कालानुसार वायुच्या गतीनुसार असे दोन प्रकारे त्यांचे वर्णन केले आहे. वायुच्या गतीचा विचार करताना अन्नाच्या शरीरामध्ये मध्ये प्रवेशित केल्या जाणाऱ्या अवस्थानुसार त्यांचे वर्णन केले आहे. याबरोबर विशिष्ट व्याथीच्या प्रभावानुसार औषध सेवन करावयास सांगितले आहे उदा. श्वास, कास या सारख्या व्याधीत व प्राणरक्षनार्थ वारंवार औषध द्यावयास सांगतात तर अतिसाराच्या चिकित्सेत 'उपेक्षा एव भेषजम्' असे वर्णन करतात. शोधन चिकित्सेकरिता वेगळा काळ व शमन चिकित्सेस वेगळा काळ वर्णन करतात. आमावस्या, पच्यमानावस्या व पक्वावस्था यानुसार वेगळे काल सांगतात.

औषध सेवनाबाबत अष्टांग संग्रह कारांनी वर्णन केलेला ‘भेषजावचरणीय’ अध्याय खूप मार्गदर्शक ठरतो.

काल हा दोन प्रकारचा असतो.

क्षणादिर्व्याध्यवस्याच कालौ भैषज्य योगकृत्।।

अ.स.सू.अ. १-४४

क्षणादि म्हणजे लव, मुहुर्त, प्रहर, अहोरात्र, पक्ष, ऋतू यानुसार व दुसरा औषधी प्रयोगार्थ रूग्णाच्या व्याधी अवस्थेनुसार होय. आपणास भैषज्य नुसार काल जास्त विचारात घ्यावयाचा असतो.

‘‘वयोऽहोरात्रि भुक्ताना ते डन्त मध्यादिगा कृमात।।’’

अ.स.सू. १-२२

वात, पित्त व कफ हे तिन्हि दोष आयुष्य, दिवस, रात्र, भोजन यांच्या शेवटी मध्ये व सुरवातीस असतात.

दिवसाचा सकाळी ६ ते १० वाजेपर्यंतचा कालावधी हा कफदोषाचा असतो. पांचभौतिक चिकित्सेत याचवेळी उदर परीक्षण करावयास सांगितले आहे. सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंतचा काल हा पित्तदोषाचा असतो. याचप्रमाणे रात्रीचा काल जाणावा. वातदोषाच्या कालात तो अनुलोभ गतीने असल्यास त्रास होत नाही पण वातदुष्टी असताना या काळात चिकित्सा करावी.

‘कफोद्रेके गदेडनन्न बलिनो रोंहरोगिणो:।
अन्नादौ विगुणे ऽपाने समाने मध्य इष्यते।।
व्यानेऽन्ते प्रातरश्स्थ सायमास्थ तुत्तरे।
ग्रासग्रासान्तयो: प्राणे प्रदुष्टे मातरिश्वनि।।
मुहुमुहुंर्विषच्छर्दि हिध्मा तृटश्वासकासिषु।
योज्य संभोज्य भैषज्यं भौज्येश्चितैररोचके।।
कम्पाक्षेपक हिध्मासु सामुद्रं लघुभोजिनाम्।
उर्ध्वजत्तू विकारेषु स्वप्नकाले प्रशस्यते।।’

वा.सू.अ. १३/३८-४१

१) अभक्त काल :

'तत्ताभक्तं नाम केवल मेवौषधम् । तन्निरन्नोपयोगादतिवीर्यम् ।
कफोद्रेके विमुक्तामाशयस्त्रोता: प्रातर्बल वानुपयुंजित । इतरस्तु
प्रग्भक्तादिकम् अन्नसंसर्गण हि तन्नातिग्लानिकर भवति।।
आ. सं. सू. २३/१३

'तत्ताभक्तं तु यत केवलमेवौषधमुपयुज्यते । वीर्याधिक भवतिभेषजं
अन्नहीनं हन्या तथा ऽऽमयमसंशयमाशु चैव ।।
सु. उ. अ. ३४/६६

'तद्बाल वृद्धिवनिता मृतवस्तु पीत्वा ग्लानि परा समुपयत्नि बळक्षयंच
सु. उ. अ. ६४/६७

''यत्राहारे जीर्ण भेषज, भेषजे जीर्ण चाहार: तत् अनन्नम अभक्त नाम ।''
हेमाद्रि।

''प्राय: पित्तकफोद्रेके विरेके विरेक वमनार्थयो:।
लेखनार्थ चे भैषज्यं प्रभाते तत्समाहरेत।।
भैषज्यंमभ्यवहरेत प्रभाते प्रायशोबुध:।
कषायांश्च विशेषेण तत्र भेदस्तु दर्शित:।।
(शा.सं.प्र.२/१)

''रोग्यवेक्षो यथा प्रातनिरन्नो बलवान भवेत ।
(च.चि. ३०/२९७)

प्रातःकाळी सूर्योदयानंतर लगेचच उपाशी पोटी ओषध सेवन करण्यास अभक्त काल म्हणतात.

दोषानुसार विचार करताना वाताचा काळ संपून कफाच्या काळास सुरवात झालेली असते, कफाची वृद्धी झाल्यामुळे आमाशयाची स्त्रोतसे उघडी झालेली असतात याकाळी रूग्ण बलवान असताना कफोद्रेक असताना औषध दिव्याने ते औषध आपले कार्य पूर्ण वीर्याने करते जाठराग्निच्या सहाय्याने सेवन केलेल्या औषशाचे योग्य पचन होण्यास यामुळे मदत होते. व ते त्याच्या योग्यस्थानी जावून कार्य करते.

बालक, वृद्ध, स्त्री, सुकुमार यांच्यामध्ये जर या काळात उष्ण, तीक्ष्ण औषधाचे सेवन केले तर ग्लानि येण्याचा संभव असतो याकरिता बलानुरूप या काळाचा विचार आवश्यक असतो.

शारंगधरांनुसार पित्त व कफ दोषाच्या वृद्धीमध्ये, वमन, विरेचन लेखनार्थ करावयास प्राप्तः काली औषध सेवन करावे.

या ठिकाणी दोषशोधन करताना आमावस्या नसेल तरच करावे असे ते सांगतात. लेखनाचा वापर व्यक्ती व दोषांना कमी करण्यास करावयाचा असतो.

स्थूल व्यक्तीची चिकित्सा करताना यथास्थूलस्य 'मध्वम्बुना' म्हणजे मध व उष्णोदक प्रात:काळी योजावे तसेच दोषांकरिता म्हणून वात दोष शमनासाठी तैल, पित्त दोष शमनास घृत व कफदोष शमनास मध यांचा वापर करावयास सांगतात.

सर्व प्रकारच्या काढ्याचे सेवन हे प्रात:काली करावे हेमाद्रीनुसार मागील औषधाचे पचन होईपर्यंत कोणताही आहार सेवन करू नये व आहाराचे पूर्ण पचन झाल्यावर सेवन केलेले अन्न हे अभक्त काली असते.

औषध सेवन केल्यानंतर अवस्यपाकाचा परिणाम प्रत्येक ओषधीच्या रसावर होत असतो तो माहित असणे आवश्यक असल्याने येथे देत आहोत.

अवस्थापाकाचा विचार करताना आहार परिणामकर भावांचा विचार अगत्याचा ठरतो, औषध सेवन केल्यानंतर प्राण व उदानाच्या सहाय्याने ते आमाशयात आणून सोडले जाते त्यानंतर तेथे क्लेदक कफ मिसळतो. रंजक फ्तिाच्या सहाय्याने त्याचे पचन व समान वायूच्या सहाय्याने घुसळण्याची प्रक्रिया सुरू होते. यामध्ये पहिला मधुरावस्यपाक निर्माण होतो यावेळी पृथ्वी व जल हे दोन महाभूते वेगळी होतात ज्याय ओषधी द्रव्यात या दोन महाभूताचे अधिक्य असते त्यांचा मधुरावस्यापाक चांगला तयार होतो व ज्यामध्ये वरील महाभूते कमी प्रमाणात असतात त्यांचा लघु अवस्यापाक तयार होतो.

यानंतर ते औषध ग्रहणीमध्ये प्रवेशित होते त्यावेळी यकृतामधून क्षारफ्तिाचे उदीरण होते व स्वादुपिंडाकडुन विशिष्ट रस त्यामध्ये येऊन मिसळतो त तेज महाभूताच्या सहाय्याने त्याचे पचन होते यावेळी औषधामध्ये असणारे सारभूत घटक विभागून किटभाग पुढे पक्वाशयात पाठवला जाते. येथे अम्लावस्यापाक निर्माण होतो व अच्छ पित्त निर्माण होते.

औषधाच्या तृतीय अवस्थापाकाच्या सुरवातीस सारभूत घटकांचे शोषण व किटभाग मलात मिसळण्यास पाठविला जातो.

आहारापेक्षा थोड्या वेगवेगळ्याप्रमाणात संस्कारने या ठिकाणी घडून स्थायी विपाक निर्माण होतो व त्या औषधाच्या स्वभावधर्माप्रमाणे व गामित्वानुसार ते कार्य करते.

मधुर रसावरील परिणाम :

पृथ्वि व जल या दोन महाभूतांच्या आधिक्याने निर्माण झालेला असल्यामुळे अग्नि संस्कार होताना उत्तम स्वरूपातील मधुरावस्थापाक तयार होते. गुरू, सिग्ध अशा गुणांची वृद्धी होते.

अम्लावस्था पाकामध्ये मधुर रसाने क्लेद वर्धन होऊन पित्ताचे द्रवत्व वाढते, पार्थिव महाभूतांनी युक्त असल्याने अधिक प्रमाणात अच्छ पित्ताची निर्मिती होते. पित्ताच्या उष्ण व तीक्ष्ण गुणांचे शमन होते.

मधूर रस पक्वाशयात गेल्यावर वाताच्या रूक्ष, खर गुणांचे शमन होते या ठिकाणी मधूर रसात उपस्थित वायू व आकाश महाभूतांचे मान कमी असल्यामुळे अल्प प्रमाणात हा अवस्थापाक तयार होतो.

अम्ल रसावरील परिणाम :

अम्ल रस हा पृथ्वि व तेज या दोन महाभूतांपासून तयार झालेला असतो त्यामुळे मधुरावस्था पाकाची निर्मिती होतान सहाजिकच पार्थिव अंशाची निर्मिती अधिक होते.

द्वितीयावस्थापाकामध्ये पित्ताच्या उष्ण तीक्ष्ण गुणांची वृद्धी होते. पार्थिव अंशामुळे द्रव व स्निग्ध गुणांची वाढ अपेक्षित असते. यामुळे पित्ताची वरील गुणांची वृद्धी होते.

कटु अवस्थापाकात वात विरूद्ध गुणांनी युक्त असल्याने अल्प प्रमाणात वात निर्माण होते.

लवणरसावरील परिणाम :

जल व तेज या दोन महाभूतांपासून निर्माण होणारा रस असल्याने द्रवरूप कफाची वृद्धी होते. उष्ण, तीक्ष्ण गुन वृद्धी होते.

वात दोषाच्या विरूद्ध स्निग्ध, उष्ण, द्रव, गुणांनी युक्त असल्याने वातशमन करतो.

कटू रसावरील परिणाम :

कटू रस व वायू व अग्नि महाभुतात्मक असून कफाच्या स्निग्ध, शीत, गुरू या गुणांच्या विरूद्ध असल्याने कफाची निर्मिती अत्यल्प असते. हा कफशमानास वापरतात.

द्वितीयावस्यापाकाचा विचार करताना उष्ण, तीक्ष्ण गुणांनी तुक्त अच्छपित्ताची निर्मिती होते.

वात दोषाची निर्मिती कटू अवस्यापाकनंतरच होत असल्यामुळे वातवृद्धी होते.

तिक्त रसावरील परिणाम :

तिक्त रसामध्ये वायू व आकाश महाभुतांचे आशिक्य असते. प्रथमावस्यापाकात शीत गुणांनी कफाची वाढ झाली तरी इतर गुणांनी कफाचे शोषण होते यास्तव ज्वरात सर्व श्रेष्ठ म्हणून वर्णन.

द्वितीयावस्यापाकात पित्ताच्या द्रव गुणाचे शोषण करतो तर वाताची वृद्धी शेवटी होणे अपेक्षित असते.

कषाय रसावरील परिणाम :

पृथ्वि व वायू या दोन महाभूतांच्या एकत्रिकरणातून निर्मित कषाय रसाचा प्रथमावस्थापाकात कफाच्या स्थिर, गुरू या गुणांचे वर्धन करतो, शोषण हा गुणधर्म अधिक प्रमाणात असल्याने कफाची मात्रत :क्षीणता निर्माण होते.

द्वितीयावस्थापाकामध्ये ग्रहणीस्य पित्ताचे शोषण करतो व त्याची उष्ण तीक्ष्णता कमी होते.

तिसऱ्या अवस्या पाकात रूक्ष व शीत गुणांनी युक्त वातवृद्धी करण्यास कारन होतो.

या सर्व अवस्याोक परिणामा नंतर शेवटी स्थायी स्वरूपाचा विपाक तयार होतो व तो सुक्ष्म पचनात कार्यकारी होतो.

प्राग्भक्तकाल :

‘‘प्राग्भक्तनाम यदनंतरभक्तम् । तद्पानानिलविकृतावधः कायस्थच बलाधानार्थ तद्गतेषु च व्याधिषु प्रशमनायच कृशीकरण योग्यम् ।।’’

अ.सं.सू.अ २३/१४

‘‘अपाने विगुणै पूर्व.... ।

च.चि. ३०/२९९

‘‘प्राग्भक्त-यत प्राग्भक्त उपयुज्यते ।
शीध्रं विपाकमुपयति बलं न हिस्यादन्नावृत्तन च मुहुर्वदनान्निरेति ।
प्रताग्भक्तसेवितम थौषधमेव दद्याच्च वृद्धः शिशु, भिरू, कृशांडनाभ्यः ।।

शु.उ. ६४/६९

‘‘भैषज्यं विगुणेऽपाने भोजनाग्रे प्रशस्यते ।

शां.सं. २/५

सकाळी व सायंकाळाच्या भोजनाच्या आधी सेवन केलेल्या औषध काळास प्राग्भक्त काळ म्हणतात. या ठिकाणी रूग्णाने जेवणाचे ताट समोर वाढुन घेऊन त्यानंतर औषधाच्या मात्रेचे सेवन करून मग पहिला घास सेवन करावा.

आहाराच्या सेवनापूर्वी आमाशयाचा भाग मोकळा असतो. ज्या ज्या ठिकाणी अवकाश असतो त्या ठिकाणी वायुच्या संचार होण्यास सुरवात झालेली असते प्राकृतावस्थेमध्ये वायूची गती अनुलोम असते. अपानाची प्राकृत गती ही वरून खालच्या दिशेने असते परंतु अपानवायूची दृष्टी झाल्यानंतर तो प्रतिलोमित होतो व तो इतर वायूंना व कफ, पित्तास दुष्ट करू लागतो.

‘गुदजैरावृतो मार्गोपरोधाद्वायुरपानः प्रत्यारोहन समानव्यान प्राणोदानान पित्तश्लेष्माणौच प्रकोपयति एते सर्व एव प्रकुपिता पंचवायवः पित्तश्लेष्माणी चार्श समभिद्रवन्त एतान विकारनुपजनयन्ति ।

इत्यक्तानि सहजान्यर्शांसि ।।

च.चि.अ. १४/८

यामुळे अपान प्रतिलोमित होऊ लागताच त्याची गती बदलण्यास प्राग्भक्त औषध द्यावे. या बरोबरच अधःकाय बल देण्यास, त्या ठिकाणी निर्मिती व्याधीत व कृश होण्याकरिता प्राग्भक्तकाली औषध योजावे. या काळी दिलेले औषध उष्न, तीक्ष्ण, स्निग्ध व सर गुणात्मक असावे.

वृद्ध, कृशाम भित्रे व बालकांना औषधे देताना प्राग्भक्तकाली औषधाची योजना करावी.

स्त्रियांमध्ये गर्भाशयावर द्रव्य कार्यकारी होण्यास अपानकाळी द्यावे. पुरूषात शुक्रवह दूष्टीत द्यावे.

'भोजनाग्रे सदा पथ्य लवणार्द्रकभक्षणम्। अग्नि दीपन करण्यासाठी सुद्धा प्राग्भक्त काळी औषध सेवन करावे.

मध्यभक्त:

''मध्यभक्त मध्ये भक्तस्थ तत्समानानिल विकृतौ कोष्ठगतेषु व्याधिषुच व्यथेषुच पैत्तिकेषुच ।।

अ.सं.सू. २३/१५

''मध्ये तु पीतमपहन्त्य विसारि भावाद्यै मध्यदेहमभिभूय भवन्ति रोगा:।।

शु.उ. ६४/७२

''समानवाते विगुणे मन्देऽग्नावग्निदीपनम् ।
ददयात भोजनमध्ये च भैषज्यं कुशलो भिषक ।।

शारंगधर २/६

जेवण करीत असताना पहिले तीन-चार घास खावून झाल्यानंतर औषध सेवन करून परत जेवन करावे या काळास मध्यभक्त असे म्हणतात. थोड्या आहाराच्या सेवनानंतर आमाशयातील अवकाश कमि होतो व कार्य करणारे द्रव्य अग्नि समीपस्थ अशा समान वायुवर कार्य करते. त्यामुळे समान वायूच्या विकृतीत कोष्ठाश्रित व्याधी असताना पित्त दोषाची चिकित्सा करताना व दीपन कर्मास या काळी औषध द्यावे.

‘स्वेददोषाम्बुवाहिनी स्त्रोतांसि समधिष्ठितः ।
अंतरग्नेश्च पार्श्वस्थः समानोऽग्निबलप्रदः ।।
च.चि. २८-८

समान वायूच्या वरील स्थानांचा विचार करता स्वेदवह स्त्रोतस व उदकवह स्त्रोतसाची दृष्टी असताना समानकाली औषध दिल्यास उपयोग होऊल असे वाटते. या बरोबरच ग्रहणी व आंत्राची विकृती निर्माण झाल्यास किंवा त्या ठिकाणी दोषांनी स्थानसंश्रय केल्यास समानकाली औषधाचा उपयोग होईल.

अधोभक्तः

‘‘भक्तानंतरम् । तच्चुव्यान विकृतौ प्रातराशांतमुदानविकृतौ पुनः
सायमांसातम् । पूर्वकायस्थ च बलाधानार्त तद्गतेषु च व्याधिषु
श्लैष्मिकेषु च प्रशमनाथ स्थलीकरणार्थच ।
अ.सं.सू. २३/१६

‘‘व्याने तु प्रातर शितम हि उदाने भोजनोत्तरम् ।’’
च.चि. ३०

‘‘व्यानेकोप च भैषज्य भोजनान्ते समाहरेत ।’“
उदाने कुपिते वाते स्वरभंगादिकारिणि ।।
शा.सं. २/७,८

‘‘अधोभुक्तं नाम-यदभुक्त्वापीतये ।
पीतं यदन्नमुपयुज्य तदूर्ध्वकाये हन्यादगदान बहुविधाश्च बल ददाति ।
सु.उ. ६४/७२

जेवन पूर्ण झाल्यानंतर औषधी द्रव्याची योजना करीत असताना सकाळच्या जेवणानंतर व्यान वायू व सायंकाळी जेवणानंतर उदान वायूच्या क्षेत्रामध्ये असणाऱ्या दुष्टीकरिता औषधाची योजना करावयाची असते. सकाळ जेवणाच्या वेळी सामान्यत १० ते २ वाजेपर्यंत पित्त दोषाचा काळ असतो त्यामुळे पित्ताच्या शमन करिता याकाळी औषध देणे अधिक चांगले असते, याच बरोबर व्यान वायू रस रक्ताचे विक्षेपण सर्व शरीरभर करून धातू पोषणाचे कार्य करीत असतो या करिता हृदयस्थ विकृतीत व्यानकाळी औषधे चांगले कार्य करते. व्यानाचा संचार सव७ देहभर चालू असतो याकरिता त्वचेच्या ठिकाणी असणारी विकृती व्यानकाली दिलेल्या औषधाने लवकर बरी होईल असा अंदाज आहे. या बरोबरच व्यान विक्षेपित रसामार्फत सर्व धातूंचे पोषण घडत असते त्यामुळे बलवर्धनार्थ व्यानकाळी औषध चांगले कार्य करेल असे वाटते.सांयकाळच्या जेवणानंतरचा काल हा उदान वायूचा असतो त्यामुळे वाक्प्रवृत्ति प्रयत्नोर्जा या त्याच्याकार्यात दुष्टी आल्यावर या काळी औषध योजना करावी. विशेषतः फुफुसाना बल देण्यास व प्राणवह

स्त्रातसाची विकृती असताना उदानकाळी दिलेल्या औषधाने लाभ होतो.

समभक्त :

'समभक्त यद्न्नैन समं साधितम् पश्चाहा समालोडितम् ।
तब्दालेषु सुकुमारे षौषधद्वेषिष्रूरूचौ सर्वागेषु ।।
अ.सं.सू. २३/१७

''पथ्य सभक्तंबलाबलयोर्हि नित्य, तद द्वेषिणामपि तथा शिशुवृध्दयंश्च
सु.उ.६४/७५

अन्नाच्या बरोबर औषधाचि योजना समबक्त म्हणून ओळखली जाते. बाल, वृद्ध औषधद्वेषी यांना आहारात मिसळून याचे सेवन करणे आवश्यक असते असूची सर्वांग रोग तसेच कृमींची चिकित्सा करताना या काळाचि योजना करावी लागते.

सग्रास :

''यत्ग्रासससंप्रक्तम् । द्वयमपि उतत्प्राणानिल विकृतौ ।
तथा च सग्रासं चूर्णलेहवटिका दिकम्म्ग्निदीपन वाजीकरणानि चोपयुंजित ।।
अ.सं.सू. २३/२१

'ग्रासेषु चूणङमबलाग्निषु दीपनीय वाजीकरव्यापि तु योजयितुं यतेत
सु.उ. ६४/८२

अन्नाच्या य्येक घासामध्ये मिसळून औषध दिले जाते यास सग्रास काल म्हणातात.

प्राणवायूची विकृती असताना या काळात औषध देतात, याबरोबर दीपन व वाजीकर औषधाचे सेवन याकाली करावे ह्रदय विकारामध्ये प्राण वायूस बल देण्यास याकाळी औषध द्यावे.

मुहुर्मुहं :

''मुहुर्मुहुस्तु पुन :पुनर्भुक्ते यदभुक्ते वा । तच्छवासकास
हिध्मातृटछर्दिषु विषनिभित्तेषु च विकारेषु ।।
अ. सं.सू. २३०/२०

''श्वासकास पिपासासु त्क्ववार्य मुहुर्मुहुः ।

उरस्थानामध्ये निर्माण होणाऱ्या श्वास, कास या व्याधींची चिकित्सा करताना प्राणास बल देऊन त्याची अनुलोभगती प्राप्त करून देणे आवश्यक असते याबरोबरच तृष्णा, धर्दि, विष सेवन यामध्ये वारंवार औषधाचे चाटण आवश्यक असते. विषाचा प्रबाव नष्ट करण्याची व प्राण रक्षणार्थ वारंवार औषध देण्याची आवश्यकता असते.

सामुदग :

''तत्तु लघ्वल्पान्नयुक्त पाचनावलेचूर्णादि हिध्माया
कंपाक्षेपयोरूर्ध्वाधसंश्रयेच दोषे ।।
अ.सं.सू. २३/१९

जेवणाच्या सुरवातीस व जेवणानंतर औषध घेण्यास सामुदग काळ म्हणातात यावेळी सामान्यपणे हिक्का, कंप, आक्षेप, उर्ध्व व अधोभागी विकृत दोषांच्या शमनार्थ वापरतात.

निशाया :

उर्ध्वजत्तु विकारेणु लेखने बृंहणे तथा ।
पाचनं शमनं देयं अनन्न भेषजं निशि ।।
शां.स. २/११

मन व बुद्धेंद्रियाचि चिकित्सा करण्यासाठी औषध हे रात्रीच्या काळी देतात.

जत्तूर्ध्वबाग हा आकाश महाबूताचे वस्तिस्थान आहे तसेच पाच ज्ञानेंद्रियांपैकी चार ज्ञानक्रिये याच भागात असतात यामुळे उर्ध्व जत्रूगत विकारात रात्री औषध देणे महत्वाचे ठरते. यावेळी मनुष्य निद्रा घेण्यास जात असतो त्यामुळे प्राग वायूचा काळ असल्यामुळे झोपताना.

## अनुपान

‘‘अनु-सह पश्चाद पीयते इति अनुपानम् ।
अल्पदोषमदोषं वाऽप्यनुपानेन जीर्यते ।।’’

अ.ह.सू. ८/५०

औषध किंवा भोज्य पदार्थाचे सेवन केल्यानंतर जे द्रव दिला जातो त्यास अनुपान म्हणातात.

अनुपान महत्व :

‘अनुपानं हित युक्त तपर्थत्याशु मानवम् ।
सुखं पचति चाहारमायुषे बलाय च् ।।

च.सू. २७/३२६

अनुपान हे तर्पक औषध सुखाने पचवणारे, बलवर्धक असते, ज्याप्रमाणे एवाद्या जलात तेलाचा थेंब टाकल्यानंतर ते सर्वत्र पसरते त्याप्रमाणे अनुपानामुळे औषध शरीरात त्वरीत पसरते.

अनुपान हे प्रीणन, बृंहण, उर्जादेणारे, शरीराची रक्षा करणारे सूक्ष्मकण विभाजित करणारे मार्दवता आणणारे, क्लेदन करणारे असते.

वाग्भटाचार्यांनुसार आहार द्रव्याच्या गुणांच्या विपरीत पण विरूद्ध नसणारे अनुपान श्रेष्ठ असते.

वातज विकारामध्ये स्निग्ध, पित्तविकारात शीत व कफ विकारात उष्ण अनुपान योजावे अनुपान उरविताना व्याधी विरूद्ध, रुग्णाच्या प्रकृती विरूद्ध म्हणजे कृश व्यक्तीस बलदायक व स्थूलव्याक्तीस कृश करणारे व औषधाचे अवगुण घालणारे असावे.

उदा. शरीरामध्ये वायूचा चल गुण वाढला असताना त्याच्या शमनास डिंकासारखे अनुपान योजणे आवश्यक असते.

सामन्यत: गरम पाणी, साधे पाणी वृत मध व डिंक या चार अनुपानांचा वापर जास्त केल्याचा दिसते.

मात्रा विचार :

औषध द्रव्य देत असताना त्याच्या मात्रेचा विचार करणे आवश्यक असते.

दोषप्रमाणनुरूपो हि भेषजप्रमानाविकल्पो बल प्रमाणरूप भवति । चि.वि.८

रूग्ण बल व दोष बल पाहूनच औषधाचि मात्रा ठरवतात. मात्रेचा विचार करताना बाल, तरूण व वृद्धावस्थांचा विचार करावा लागतो. बालकांना प्रौढां एवढी मात्रा देता येत नाही, शारंगधरांनी यांचे वर्णन केले आहे. वृद्धावस्थेमध्ये धातूचा क्षय असतो या काळात वातवर्धन करनाऱ्या औषधींचा वापर जपून करावयाचा असतो. बाल्यवस्थेमध्ये सामान्यपणे विषकल्प व ज्र्य करावेत, तरूणावस्थेत बलाचा विचार करून मात्रा ठरवावी.

अग्निबल, कोष्ठ, लिंग, प्रकृति, देश या बाबीचा औषध देताना विचार करावा लागतो. अग्निबल कमी असणाऱ्या व्याक्तींना पचनास जड औषधे देऊ नयेत मृदुकोण्ठी व्याक्तींना तीव्र औषधे विचारपूर्वक द्यावीत. स्त्रीया या मुलतच: नाजुक प्रकृतीच्या असतात त्यामुळे उष्न, तीक्ष्ण औषधे जपुन वापरावीत गर्भिणी काळात अशा गर्भपातास कारणभूत औघधांचा वापर टाळावा सूतीका काळात स्तन्यदोष निर्माण होणार नाही त्याची काळजी घ्यावी प्रकृतीचा विचार करता औहध हे प्रकृती विरूद्ध असावे. क्षारधर्मी प्रकृतीच्या व्यक्तीस अम्लधर्मी व याउलट चिकित्सा करावी.

समधर्मी व्यक्तीची आवड निवड, देश बलं व काल यानुसार औषध योजना करावी.

उष्ण देशात शीत औषधे जास्त द्यावीत. याप्रमाणे मात्रांचा विचार करावा. चूर्ण सूक्ष्म केल्यानंतर वीर्य वाढविण्यास त्याच द्रव्याची फांट कल्पना करून भावना देऊन ते सुकवून वापरावे याने मात्रा कमी लागते/

औषधांचा संयोग व्यवस्थित केल्यास मात्रा कमी लागते करिता या सर्व गोष्टी विचारात गेऊन मात्रा ठरवावी.

ग्रामित्व विचार :

'दोष दूण्य संमूर्च्छना जनितो व्याधी ।'

दोष व दूण्य यांच्या समूर्च्छने मधून व्याधीची निर्मिती होत असते, याचा दोष हे स्वकारणांनी प्रकुपित होऊन धातू व मलांना दूषित करतात. ज्या ठिकाणी स्त्रोतसांमध्ये वैगुण्य निर्माण होईल (ख वैगुण्य) त्या ठिकाणी व्याधी निर्माण होत असतो. निदान पूर्ण झाल्यानंतर चिकित्सेचा विचार करताना स्त्रोतोगामित्वाचा विचार आवश्यक आहे, वायु शिवाय गती नाही यामुळे स्थनांचा विचार करताना प्राण अपानादी कालानुसार औषधे द्यावे लागते याचा संपूर्ण विचार औषधे सेवन कालामध्ये मांडला आहे. आता धातू विचार आवश्यक आहे.

गामित्व व धातू :

शरीरामध्ये विविध अव्यवांची निर्मिती व पोषण रक्तधातूच्या सहाय्याने होत असते त्यामुळे एवादे द्रव्य विशिष्ट अवयवावर कार्य करण्यासाठी तो अवयव कोणत्या धातूंनी बनला आहे पोषण हे पहाणे अत्यावश्यक असते. पुढे त्या अवयवाची दुष्टी असताना विचारात घ्यावे लागणारे धातू देत आहोत स्तव सुश्रुताचार्याचे वर्णन अधिक उपयुक्त आहे.

| अ.नं. | अवयव | निर्मिती | अ.नं. | अवयव | निर्मिती |
|---|---|---|---|---|---|
| १) | यकृत, प्लीहा | शोणित | १३) | कंडरा सिरा | रक्त धातू |
| २) | फुफ्फुस | शोणित फेन | १४) | त्वचा | मांस धातू |
| ३) | उण्डुक | शोणित किट्ट | १५) | दंत | अस्थि धातू |
| ४) | गुद, बस्ति, आंत्र | शोणित कफ | १६) | केश | अस्थि, मज्जा |
| ५) | जिव्हा | शोणितकफ मांस | १७) | ओज | शुक्र |
| ६) | सिरा, स्नायू | मेद स्नेह | १८) | पित्त दोष | रक्त |
| ७) | वृक्क | रक्त मेद प्रसादात | १९) | वायू | आहार परिणमन, अस्थे |
| ८) | वृषण | मांस, रक्त, कफ वद | २०) | कफदोष | मेद, रस, मांस, शुक्र |
| ९) | हृदय | शोणित कफ | | | |
| १०) | पेशी | पिशीत वायू | | | |
| ११) | स्तन्य | रसधातू | | | |
| १२) | आर्तव | रस-रक्त धातू | | | |

गामित्व पंचमहाभूते :

गामित्वाचा विचार करताना दुसरा महत्वाचा विचार येतो तो पंचमहाभूतांचा विचार होय.

'यथा स्वं स्वं व पुण्यन्ति देहे द्रव्यगुणा प्रवक् ।
पार्थिवा पार्थिवा नैव शेषा शेषश्च कृत्स्नशः ।।'

च.चि. १५-१२/१४

आहारावर अग्नि प्रक्रिया झाल्यानंतर ते ज्या महाभूत समान गुणांचे असेल त्या ठिकाणी ते जाते या करिता आप्पांच्या पुस्तकामध्ये वर्णित महाभूतांचे स्नान देते आहोत.

पृथ्वि तत्व :

अस्थि - पृथ्वि + इतर
मांस - पृथ्वि + जल + इतर
त्वचा - पृथ्वि + वायू
नाड्या - पृथ्वि + तेज
रोम - पृथ्वि + आकाश

आप तत्व :

शुक्र - जल पृथ्वि
रक्त - जल + पृथ्वि
लाला - जल + आकाश
मूत्र - जल + तेज
स्वेद - जल + वायू

तेज तत्व :

क्षुधा - तेज + इतरः तत्व
वृष्णा - तेज + वायू
निद्रा - तेज + आकाश
कांती - तेज + जल
आलस्थ - तेज + पृथ्वि

वायु तत्व :

श्वसन - वायू + इतर तत्वे
विकास (प्रसारण) - वायु + आकाश
संकोचन - वायू + पृथ्वि
बलन - वायू + तेज
चलन - वायू + जल

आकाश तत्व :

शोक - आकाश + इतर तत्वे
काम - आकाश + वायू
क्रोध - आकाश + तेज
मोह - आकाश + जल
भय - आकाश + पृथ्वि

गामित्व वनस्पती स्वभाव धर्म व उत्पत्ती :

वनस्पतीज, खनिज व प्राणीज अशा तीन प्रकारची द्रव्ये चिकित्सेत वापरली जातात. भावप्रकाशकार वनस्पतींचे वर्णन करताना हरितक्यादी, गुडुच्यादि व कर्पुरादी असे वर्ग करतात. दोषांना बाहेर घालवणे, शरीरास स्थिरता देणे इंद्रिय प्रसन्नता अशी या तीन वर्गाची क्रमश कार्ये आहेत.

वनस्पतीच्या दीपन, पाचन, सर, वृष्य, भेदन अशा वर्गाचा धर्माचा चिकित्सेत वापर करायचा असते अशा वेळी ते द्रव्य कोणत्या स्त्रोतसाशी गामित्व करून आहे याचा विचार करता येतो. उदा. तिळाचे तेल हे बद्धविटकता निर्माण करणारे असून त्याचा या धर्माचा वापर इतर द्रव्ये गुदगामी होण्यास वापर करता येऊ शकतो. विषद्रव्यांचा विचार सुद्धा असाच असून त्यांना वचनाची अपेक्षा नसते त्यामुळे या द्रव्यांचा वापर करून सुक्ष्म स्त्रोतोगामित्व प्राप्त करून देता येते.

या बरोबर वनस्पतीची निर्मिती स्थलं व स्वरूप यावरून सुद्धा त्याचे गमित्व काढता येते. याकरिता काही उदाहरणे खाली देत आहोत.

पलंकषा - फुफ्फुसगामी

कदलीसार - मूत्रपिंड

वंशलेचन - संधी

वाळा - जलीय व सूक्ष्म स्त्रोतसे

वड पारंण्या - सिरा

गुग्गुळ - त्वचागामी (त्वचा उवंर्जन)

गामित्व व पाचक योग :

कलिगंका पटोळस्थ पत्रं कटुकरोहिणी ।
पटोल सारीवा मुस्ता पाठा कटुकरोहिणी ।।
पटोल निम्ब त्रिफळा मृद्विका मुस्त वत्सकौ ।
किरात तिक्त अमृता चंदन विश्वभेषजम् ।
धात्री अमृता मुस्ता क्षोद्र-अर्थ श्लोक समापन ।।
कषाय शमयंत्याशु पंचपचविध ज्वरान ।
संतन संतन्न अन्येद्युतृतीयक चतुर्थकान ।।
१ । चि. अ १.

धातुगत ज्वरात कार्य करणारा वरील विषमज्वर घ्न क्वाय म्हणजे प्रत्येक धातूची दुष्टी घालवण्यास उपयुक्त आहे.

रसधातूवर - इंद्रजव, पटोल पत्र, कुटकी
रक्तधातूवर - पटोल, सारीवा, मुस्ता, पाठा, कुटकी
मांसधातूवर - पटोल, निंब, त्रिफला, मृद्विका, मुस्ता, इंद्रजव
मेदधातूवर - किराईत, अमृता, चंदन, विश्वभेषजम
अस्थिमज्जाधातूवर - आमलकी, गुडुची, मुस्ता

या प्रत्येकाचे चूर्ण उकत्र करून वापरल्यास त्या त्या धातूची दृष्टी नष्ट होण्यास मदत होते.

गामित्व व औषध निर्माण कल्पना :

औषध निर्माणामध्ये वर्णन केलेल्या कल्पनांचा वापर गामित्व प्राप्त करून देण्याकरिता उपयुक्त ठरत असतो याची उदाहरणे खालील प्रमाणे.

रस व रक्त धातू - स्वरस, क्षीरपाक, क्वाथ
मांस व मेद धातू - क्वाथ, अवलेह, आसव (अत्सिंधान कल्पना)
अस्थि, मज्जा व शुक्र धातू - घृतादि स्नेह गुग्गुळ, मध

याबरोबरच ग्रहणी गामित्वास पर्पटी बंध सर्व शरीरात त्वचे पर्यंत गामित्व प्राप्त करून देण्यास गुग्गुळ कल्पना यांचा उपयोग होतो.

गामित्व व वनस्पती :

एका वनस्पतीचा वेगवेगळ्या द्रव्यांसोबत एकत्रीकरण करण्याचा परिणाम म्हणू वेगवेगळया स्त्रोतसाठा त्याचे कार्य होत असते. उदा. शतावरी चूर्ण गोक्षुरा सोबत एकत्र केल्यास मूत्रवह स्त्रोतसावर तर नागकेशरासोबत उकत्र केल्यास गुरीषवह स्त्रोतसावर कार्य दिसुन येते.

गुग्गुळ युक्त औषधे :

पंचविध कषाय कल्पना या भैषज्य कल्पनेच्या आधारभूत कल्पनांवर संस्कार करून इतर कल्पनांचा उद्भ झाला यामध्ये प्रामुख्याने येते ती गुग्गुळ कल्पना गुग्गुळ कल्पांचा वापर व्यावसायामध्ये करीत नाही असे म्हणाणारा वैद्य क्वचितच. रसशास्त्रामध्ये ज्या प्रमाणे कज्जली या संकल्पनेस योगवहित्व असल्याने महत्व प्राप्त झाले त्याच प्रमाणे वनस्पती मध्ये गुग्गुळास आहे याचे कारण म्हणजे गुग्गुळाची कर्मुकता होय. आयुर्वेद ग्रंथामध्ये गुग्गुळ कल्पनेचा उल्लेख अनेक व्याधीमध्ये वर्णण केला आहे. क्वचितच असा एवादा व्याधी असेल की ज्याच्या अधिकारामध्ये गुग्गुळ नाही. गुग्गुळ हा दिलेल्या घटक द्रव्यांच्या एकूण प्रमाणामध्ये किंवा ५० टक्के प्रमाण असेल अशा कल्पांना गुग्गुळ कल्पना म्हणतात यामध्ये गुग्गुळाचे त्या व्याधीमध्ये वर्णन कामासोबतच योगवाहित्व हे कार्य प्रामुख्याने अपेक्षित असते या करिता गुग्गुळाचा वापर आहे. गुग्गुळाजवळ असणाऱ्या गुणधमांचे कार्य वाढवणारी वनस्पती एकत्रित करून गुग्गुळाचे गुणवर्धन केले आहे.

गुणवर्धन करणारे गुग्गुळ कल्प :

१) भग्न संधानकर - लाक्षादि गुग्गुळ

२) रसायन - अमृता गुग्गुळ

३) दीपन - अमृता गुग्गुळ

४) बल्य - लाक्षादि गुग्गुळ, त्रयोदशांग गुग्गुळ

५) व्रणरोपक - त्रिफळ गुग्गुळ

६) अपची - कांचनार गुग्गुळ कोंबडनखी गुग्गुळ

७) मेदोहर - नवक गुग्गुळ

८) मेहदर - त्रिकण्टकादि गुग्गुळ

९) आमवातहर - सिंहनाद गुग्गुळ

१०) क्लेदहर - गोक्षुरादि गुग्गुळ

११) कुष्ठहर - पांचतिक्तघृत गुग्गुळ

१२) पिडीकाग्रंथी - अमृतादि गुग्गुळ

१३) अर्शोहन - त्रिफळा गुग्गुळ

१४) शोफहर - पुनर्नवादि गुग्गुळ

१५) कृमीहर - त्रिफळा गुग्गुळ

स्त्रोतसांवर कार्यकारी गुग्गुळ कल्प:

१) रसवह स्त्रोतस- गोक्षुरादी गुग्गुळ, सिंहनाद गुग्गुळ

२) रक्तचह स्त्रोतस - महामंजिष्ठादी काढा गुग्गुळ, अमृतादि गुग्गुळ

३) मांसवद स्त्रोतस - कांचनार गुग्गुळ

४) मेदोवह स्त्रोतस - नवक गुग्गुळ, चातुर्थल गुग्गुळ

५) अस्थिवह स्त्रोतस - लाक्षा गुग्गुळ, त्रयोदशांग गुग्गुळ पंचकषाय

६) मज्जाचह स्त्रोतस - त्र्यूषणदि उटिका गुग्गुळ

७) शुक्रवह स्त्रोतस - त्रिकण्कदि गुग्गुळ

८) प्राणचह स्त्रोतस - सिंहनाद गुग्गुळ

९) उदकवह स्त्रोतस - पुनर्नवादि गुग्गुळ

१०) अन्नवह स्त्रोतस - महायोगराज गुग्गुळ

११) मूगवह स्त्रोतस - गोक्षुरादि गुग्गुळ

१२) पुरी ववह स्त्रोतस - गुग्गुळ वटक

१३) स्वेदवह स्त्रोतस - स्वायंभुवारव्य गुग्गुळ

व्याधीनुसार कार्यकारी गुगगुळ कल्प:

१) ज्वर - गोक्षुरादि गुग्गुळ

२) रक्तपित्त -

३) गुल्म - पथ्यादि गुग्गुळ

४) प्रमेह - महिषारव्य गुग्गुळ

५) कुष्ठ - नवकार्षिक गुग्गुळ

६) राजयक्ष्मा - पंचतिक्तघृत गुग्गुळ

७)उन्माद - सप्तविशंतिको गुग्गुळ

८) क्षतक्षीण - बृहम योगराज गुग्गुळ

९) शोथ - पुनर्नवादि गुग्गुळ

१०) उदर - कैशोर गुग्गुळ
११) अर्श - पंचतिक्तघृत गुग्गुळ
१२) ग्रहणी - एकविशांतिको गुग्गुळ
१३) पाण्डु / कामला - फलत्रिंकादी गुग्गुळ
१४) श्वास / हिक्का - सिंह गुग्गुळ
१५) कास - योगराज गुग्गुळ
१६) अतिसार -
१७) छर्दि -
१८) विसर्प - नवकषाय गुग्गुळ
१९) वृण - त्रिफळा गुग्गुळ
२०) दूद्रोग - योगराज गुग्गुळ
२१) अश्मरी - गोक्षुराहि
२२) शिराशूल -
२३) वातव्याधी - त्रयोदशांग गुग्गुळ
२४) वातरवत - अमृतादि गुग्गुळ
२५) उरूस्तंभ -
२६) योनिव्यपद - त्रिफळा गुग्गुळ

फलत्रिकादी गुग्गुळ

यकृत, प्लीहा व मूत्रपिंड ही अग्नि संस्थेची तीन प्रमुख इंद्रिये आहेत. या तीन इंद्रियावर अग्निसंस्थेचा डोलारा उबा राहत असतो. भरण पोषण व उत्सर्जन ही तीन प्रमुख कामे या तीन इंद्रियांची असून कोणताही व्याधी निर्माण झाल्यानंतर त्याचा परिणाम या इंद्रियावर होत असतो. किंबहुना या तीन अवयवाच्या विकृतीमुळेच व्याधीचा पाया षातला जातो कारण चरकाचार्य सर्व व्याधींची संप्राप्ति वर्णन करताना म्हणतात. रोगा सर्वेडपि मंदेग्नो सुतराम उदराणिच ।।

च.चि. १३

त्यामुळे व्याधीची संप्राप्ति भंग करावयाची असेल तर प्रथम रूग्णाचा अग्नि व्यवस्थित करणे आवश्यक असते यकृत हे पंचमहाभूताग्निचे स्थान असून अहारा रसावर या अग्निची प्रक्रिया होऊन तो पुढे ह्रदयाकडे पाठविला जातो, परंतु प्रज्ञापराधादि त्रिविध कारणांमुळे या इंद्रियाची दुष्टी होऊन शरीरातील विजातीय विषद्रवे यकृताच्या ठिकाणी सातु लागतात. या करिता तेथे निर्माण होणारा स्त्रोतोरोध दूर करणारे फलत्रिकादी हे अमृत आहे.

पाठ संदर्भ :-

"फल त्रिकामृतावासा तिक्ता भूनिम्बनिम्बजै :।

क्वाथ :क्षौद्रयुक्तो हन्यात पाण्डुरोग सकामळामू।।'

भैषज्य इत्नावली । पाण्डु कामलाचिकित्सा

फलत्रिक म्हणजे हिरडा, बेहडा व आवळा, गुडुची, वासा, कुटकी, किराईत, निबंत्वक यांच्या विधीवत क्वाथ प्रयोगाने पाण्डु व कमला या व्याधीपासून मुक्ती मिळते.

पाठ :

| औषध | प्रमाण |
| --- | --- |
| सुरवारी हिरडाचूर्ण | ४ भाग |
| बेहडा चूर्ण | ४ भाग |
| आवळकाठी चूर्ण | ४ भाग |
| गुळवेल चूर्ण | १ भाग |
| अडुळसा चूर्ण | १ भाग |
| किरात तिक्त चूर्ण | ४ भाग |
| निंबत्वक चूर्ण | ४ भाग |
| कुटकी | ४ भाग |
| शुद्ध गुग्गुळ | १३ भाग |

भरड :

गुग्गुळ सोडून इतर सर्व चूर्ण २ बाग मात्रेत भरड या स्वरूपामध्ये घ्यावीत.

कृती :

१) सर्व प्रथम प्रत्येक औहधाची चुर्णे तयार करून घ्यावीत व विधीवत गुग्गुळाचि शुद्ध करावी (पान नं. १६८)

२) गुग्गुळाची शुद्धी आधीच करून ठेवण्याऐवजी औषध करतानाच केलेली उत्तम यामुळे परत तो वितळवावा लागत नाही.

३) औषधी द्रव्याची भरड चूर्णे आठ पट पाण्यात एक रात्रभर भिजत ठेवावीत व दुसऱ्या दिवशी त्याचा एक चतुर्थांश शिल्लक राहीपर्यंत काढा करावा.

४) त्यानंतर हा काढा एका पातेल्यात गाळून घेऊन त्यामध्ये त्रिफळ्यात शुद्ध केलेला गुग्गुळ धोतरातून गाळून ओतावा.

५) वरील मिश्रण एक रात्रभर तसेच ठेवावे, त्यानंतर सकाळी हे मंदाग्निवर ठेवावे, उलथण्याच्या सहाय्याने ते हलवित रहावे.

६) मिश्रण हळूहळू आटु लागते, त्यावेळी तळास पन्हळ पडते का ? याचे निरिक्षण करावे, पन्हळ पडु लागताच मिश्रण तयार झाले असे समजावे व अग्नि बंद करून ते खाली उतरून

७) हे मिश्रण गार झाल्यानंतर त्यामध्ये वरील औषधे मिसळून ती एकजीव करून घ्यावीत. (त्रिफळा, गुळवेल,

वासा, किराततिक्त, निबत्ववू

८) ह्या मिश्रणाचे लहान गोळे करून ते खलामध्ये घेऊन घोटावेत. एकदम सर्व मिश्रण घोटता येत नाही. मिश्रण

घोटताना थोडेसे तूप बत्यास लावल्याने गुग्गुळ बत्याला चिकटत नाही.

९) हे सर्व मिश्रण घोटून त्यास एकसारखा रंग आल्यानंतर ते तयार झाले असे समजून त्याच्या लहान थाबड्या

तयार कराव्यात व त्या उन्हामध्ये वाळवाव्यात.

१०) थांबड्या चांगल्या वाळल्यानंतर त्या खलात कुटून त्याचे चूर्ण करून बाटलीत बरून ठेवावे.

**घटक द्रव्यांचे कार्य:**

**१) त्रिफळा:**

**'त्रिफळा कफपितघ्नी मेहकुष्ठहरा सरा ।**
**चक्षुण्या दीपनीरूच्या विषमज्वरनाशिनी ।।'**
**भा.प्र.**

**त्रिफळा पंचरसात्मक, लवणवर्ज व अम्लरसप्रधान, रूक्ष, शीत, सरधर्मी असून मेह व कुष्ठहर आहे. याशिवाय तो हरितक्यादि वर्गामध्ये येतो. वनस्पती या दोषांना बाहेर घालविणाऱ्या, इंद्रियांना प्रसन्नता आणणाऱ्या व शरीरास स्थिरता देणाऱ्या अशा तीन स्वरूपाच्या असतात यापैकी त्रिफळा दोषांना बाहेर घालवणारा आहे.**

**सर हा प्राकृतिक स्वरूपाचा प्तिदोष व आप या महाभूताचा गुणधर्म आहे. शरीरामध्ये विजातीय द्रव्ये बाहेर न टाकता ती शरीरामध्ये साठतात त्यावेळी पित्ताचा सर धर्म कमी होतो त्यावेळी तेथे पार्थिवता वाढून मल पुढे सरकता नाही अशा स्वरूपाच्या रक्तामध्ये असणाऱ्या मलाची वाढ यकृताच्या ठिकाणी होते व स्त्रोतोरोध वाढतो त्रिफळा हा सर वर्गातील असून या विकृत मलांना शरीरा बाहेर काढून स्त्रोतोरोध दूर करण्याचे कार्य करीत असतो.**

**२) गुळवेल :**

**गुडुची कटु, तिक्त, कषाय रसात्मक, लघु, उष्ण, रसायन, दाहनाशक आहे. शरीरास स्थिरता निर्माण करणारी अग्नि, वायू व आकाश महाभूत प्रधान असणारी व दीपन वर्गामधील वनस्पती आहे. आमाने स्त्रोतोरोध होऊन यकृत स्थित फ्तिाचे योग्य प्रकारे स्त्रवण होत नाही. पित्तदोषाची झालेली दुष्टी तिक्त रसाच्या सहाय्याने दूर करते स्त्रोतोरोध नाहीसा झाल्याने पित्त स्त्रवण व्यचस्थित होते व शरीरामध्ये विमार्गग झालेले पित्त हे यकृताकडे मदत होते.**

३) अडुळसा :

वासा तिक्त कषाय रसात्मक, लघु, शीत, ह्रदय असून गुडुच्यादि वर्गातील आहे. तिक्त रसामध्ये वायू व आकाश महाभूतांचे प्राधान्य असते. या महाभूतांचा वापर पृथ्वी व आप महाभूतांचे प्राधान्य असते. या महाभूतांचा वापर पृथ्वी व आप महाभूतांच्या चिकित्सेत करतात. आकाशामुळे स्त्रोतस अवरोध कमी होतो व त्यामुळे वायु संचार सुरू होतो. वासा ही वनस्पती रक्त पित्तामध्ये वापरली जाते. या ठिकाणी पित्त दोषाने रक्त धातूची दुष्टी केलेली असते यामुळे रक्तामध्ये असणारा विस्त्रगुण किंवा पार्थिवता वाढलेली असते. वासा पित्ताच्या उष्ण, तीक्ष्ण व विस्त्र गुणाचे शमन करतो.

४) किराईत :

किराईत तिक्त रसात्मक रूक्ष, लघू, शीत असून दाह नाशक आहे. फ्तिाशिवाय दाह या लक्षणाचि उत्पत्ती होत नाही. ज्यावेळी यकृत स्थित पित्त रक्तास दुष्ट करू लागते त्यावेळी दाह हे लक्षण निर्माण होते. किराईत हे पित्तघ्न व सर धर्माचे असून विमार्गग झालेलले पित्त परत यकृताच्या ठिाकणी आणून सोडणारे आहे. आप या महाभूताचे अस्तित्व असणारी ही वनस्पती आहे. तिक्त रस हा यवत्तोत्तेजक आहे. यामुळे यकृतस्थ अग्निस बळ मिळते.

५) निंबात्वक:

निंब तिक्त, कषाय रसात्मक लघू, रूक्ष, ग्राही धर्माचा आहे. यकृताकडून पित्ताचे योग्य स्त्रवण न झाल्यामुळे आहारमध्ये होणारे परिवर्तन व्यवस्थित होत नाही, निंबत्वक ही तिक्त रसाने यकृताचे उत्तेजन करणारी गुडुच्यादि वर्गातील असल्यामुळे शरीरास स्थिरता देणारी आहे. फलत्रिकादिच्या या पाठात कुटकी सारखे भेदन कर्म करणाऱ्या द्रव्याचा समावेश केला आहे. कोणताही पाठ तयार करताना संयोजक ग्रंथकर्ते अनेक गोष्टींचे भान ठेवतात यावेळी कुटकीमुळे रूग्णाच्या यकृतामधून पित्ताचे योग्य स्त्रवण व्हावे परंतू त्याला रेच होऊ नयेत याकरिता निंबत्वक वापरण्याचे प्रयोजन दिसते. यामुळे यकृत्तस्थ स्त्रोतोरोध दूर करून रेच होऊ न देण्याची काळजी निंबत्वक होते असे दिसून येते.

६) कुटकी:

कुटकी तिक्त, कटू रसात्मक, लघू, रूक्ष, हृदय, शीत व भेदन करणारी असुन दीपन वर्गामध्ये आहे. भावप्रकाशकार या वनस्पतीचे वर्णन हरीतक्यादि वर्गामध्ये करतात, दोष व मलांचा संचय बाहेर काढून टाकणारी हा विशेष धर्म या वर्गातील वनस्पतींकडे असतो.कुटकी ही प्रामुख्यानेपित्तविरेचन करणारि वनस्पती आहे. पित्त व रक्तधातून यांचा आश्रय ः आश्रयी असा संबध आहे. ज्यावेळी आहारीय द्रव्याचे योग्य परिणमन होत नाही तेव्हा रक्तधातूमध्ये पार्थिव धर्माची म्हणजेच विस्त्र गंधाची वाढ होऊ लागते. हा रक्तधातू व पित्तदोष या दोन्हीकडे असणारा गुण आहे. यकृतस्थ पित्तामध्ये ज्यावेळी हा पार्थिव धर्म वाढवयास सुरवात होते त्यावेळी आप या महाभूताचा असणारा सर धर्म कमी होतो त्यावेळी पित्तदोषाचे व्यवस्थितरित्या स्त्रवण होत नाही यामुळे पार्थिव घ;क सक्त व पित्ताचे माहेर असणाऱ्या यकृयाच्या ठिकाणी साठू लागतात. वुःटकी ही वनस्पती या पित्ताचा सर धर्म वाढवते मलाचे भेदन करून अन्नवह स्त्रोतसामधून सर्व दोष बाहेर घालवून टाकते यामुळे यकृताच्या ठिकाणी जमा झालेली पार्थिवता कमी होऊ लागते आहाराचे परिमन योग्य होऊन स्त्रोतोरोध दूर होतो.

७) शुद्ध गुग्गुळ :

या कल्पामध्ये गुग्गुळाचे प्रमाण हे इतर सर्व द्रव्यांच्या अर्धे आहे. गुग्गुळ ही वनस्पती कटु, तिक्त, कषाय, रसात्मक, उष्ण, संधान वर्गामधील रूक्ष, विशद, रसायन, पिच्छिल, गंडमाळानाशक व सर धर्माची आहे मागे वर्णन केल्याप्रमाणे मार्गावरोधजन्य संप्राप्ति असताना गुग्गुळाचा उत्कृष्ट वापर होतो. या ठिकाणी यकृताच्या ठिकाणी निर्माण झालेला स्त्रोतोरोध दूर करण्यासाठी यामध्ये असणाऱ्या सर धर्माचा वापर होतो.

कर्मकता :

''यकृतप्लीहानौ शोणितजौ।''

सु.शा.

शरिरामध्ये असणाऱ्या विविध अवयवांची उत्पत्ती वर्णन करीत असताना यकृत व प्लीहा या दोन अवयवांची उत्पत्ती ही रक्तधातू पासून होते असे वर्णन आहे.

यकृत हा अग्निसंस्थेमधील एक प्रमुख अवयव आहे. आधुनिक वैद्यकशास्त्रामध्ये सुद्धा या इंद्रियाचे अनन्य साधारन महत्व वर्णन केले आहे. रक्तापासून निर्माण झालेला हा अवयव मनुष्याच्या सर्व जीवनकाळात रक्तधातू व पित्तदोषाची निर्मिती करत असतो. 'रक्तजीव इति स्थिती।' असे वर्णन करताना आपण केलेल्या सर्व आहार-विहाराचा परिणाम या धातूवर पडतच असतो व तो परिणाम आपणास त्याच्या मूळस्थानी म्हणने यकृत व प्लीहा या दोन अवयवांवर नेहमीच पहायला मिळतो.

शोनितवहानां स्त्रोतसां यकृन्मूलं प्लीहा च।

च.वि. ५/८

रक्तवह स्त्रोतसाच्या मूलस्थाना बरोबरच यकृताच्या ठिकाणी पंचमहाभूताग्निचे स्थान वर्णन केले आहे. (वृद्धवैद्य) आहार रसावर याच्या ठिकणी असणाऱ्या महाभूतांच्या पचनोत्तर तो पुढे ह्रदयाकडे धात्वाग्नि प्रक्रियेकरिता पाठविला जातो.

'अन्नमिण्ट हयुहितमिष्टैर्गधादिभिः पृथक।
देहे प्रीणाति गंधादिन् प्राणादिनीन्द्रियाणि च।।
भौमाप्यग्नेयवायव्याः पंचोष्माणःसनामसाः।
पंचाहारगुणान्स्वानन्पार्थिवादीन्वचन्ति हि।।
यथास्वं स्वं च पुष्यन्ति देहे द्रव्यगुणापृथकः।
पार्थिवा पार्थिवा नेव शेषा शेषाश्च कृत्स्णशः।।'

चरकार्यांनी ग्रहणी चिकित्सा अध्यायामध्ये पंचमहाभूताग्नि वर्णन केले आहेत. या पाचभूताग्निची जाठराग्नि पाचित आहाराचे आहार रसावेत परिमन झाल्यानंतर क्रिया होते. यामुळे शरीरामध्ये असनाऱ्या पार्थिव, जलीय, तैजस, वायवीय आणि आकाशीय अवयवयांचे इंद्रियांचे पोषण होते.

अशा पंचभूताग्निची व्याक्ती यकृताच्या ठिकाणी होत असते.

ज्यावेळी यकृतस्थ अग्निची विकृती होऊ लागते त्यावेळी त्याच्या ठिाकणी पार्थिवादि मलाची संचिती होऊ लागते. पांचभोतिक चिकित्सा पद्धतीचा विचार करताना पार्थिव नादाची संप्राप्ति पुढिल प्रमाणे असते.

पार्थिवनाद संप्राति:

पृथ्वि गुणाधिक्य असनारया आहाराचे अधिक मात्रेत सेवन

↓

पृथ्वि अंशाची प्रमाणापेक्षा जास्त वाढ

↓

यकृतावरील पार्थिव आहार पचनाचे असामर्थ्य

↓

अपाचक अंश शरीराच्या पार्थिव भागाकडे जाता

↓

यकृताच्या पार्थिव भागात विकृत वृद्धी

↓

आकाशाचा अवकाश कमि होतो

↓

वातूच्या गतीस अवरोध होतो

↓

सर्व शरीरात वातास अवरोध होतो

↓

यकृतावर पार्थिव नाद येतात

याप्रमाणे सप्राति घडून यकृत स्थित पित्ताचे योग्य प्रकारे स्त्रवण होत नाही त्यामध्ये असणाऱ्या सर धर्माचा क्षय होतो व विस्त्र गुण वाढु लागतो यामुळे भक्ष्य भोड्यादि चतुर्विध आहारावर अग्निची व्यवस्थित प्रक्रिया न झाल्यामुळे अवस्थापाक व्यवस्थित होत नाहि व रीग्णास बध्दकोष्ठासारकि लक्षणे जाणवू लागतात व व्याधीचा पाया घातला जातो. ज्यावेळी रूग्ण विकित्सा मंदिरात येतो त्यावेळी व त्याच्या यकृत प्रदेशी स्पर्शासहत्व पीडनासहत्व जाणवू लागते व ताडन परिक्षेत पार्थिव नाद उमट्ु लागतात.

अशा वेळी चिकित्सा करण्यासाठी फलत्रिकादी गुग्गुळाचा अमृताप्रमाणे उपयोग होतो.

दोषा कदाचित कुप्यान्ति जिता लंधन पाचनैः।।
येतु संशोधनेः शुध्दा, न तेषां पुनरूभ्दवः।।
च.वि.

आप्पानुसार दोषाचे निर्हरण संशोकाधन करताना पंचकर्माबरोबरच यकृत प्लीहा व मूत्रपिंड या ठिकाणी संचित मलांना शरीराबाहेर काढून टाकणे असा अर्थ अपेक्षित वाटतो. अग्निसंस्थेचे भरण हे कार्य करणारे प्रधान इंद्रियच अधू झाल्याने व्याधीची निर्मिती होते अशा वेळी फलत्रिकादि गुग्गुळाच्या सहाय्याने पित्ताचा सर धर्म वाढविला जातो याच्या सेवनामुळे पार्थिव संचित मल हळूहळू बाहेर पडू लागतो या कल्पात वापरलेली सर्व द्रव्ये ही आकाश वायु व अग्नि महाभूत भूयिष्ठ असल्यामुळे पृथ्वि महाबूत प्रधान असणारी ही विकृती दूर हाऊ लागते.

पित्ताचे योग्य स्त्रवण होऊन यकृत व्यवस्थित कार्य करू लागते यानंतर यकृताच्या ठिकाणी असणारे स्पर्शासहत्व व पीडनासहत्व कमी होते व यकृतावर प्राकृत नाद उमटू लागतात.

रोगाधिकार:

यकृताची दुष्टी निर्माण होणाऱ्या विकृतीमध्ये फलत्रिकादि गुग्गुळाचा वापर होतो.

१) कामला:

पित्त दोषाची चिकित्सा वर्णन करीत असताना विरेचन सांगितले आहे.

पाण्डुरोगी तु यो डत्यर्थ पित्तलानि निषेवते।
तस्थ पित्तडस्कृक मांस दग्धा रोगाय कल्पते ।।

अंत्यत पित्तकर आहाराच्या सेवनामुळे प्रकुपित झालेले पित्त रक्त व मांस या दूण्यांना दूषित करून कामला या व्याधीची निर्मिती करत असते.

बहुपित्ता कामलेमध्ये उष्ण, तीक्ष्ण या गुणांनी वाढलेले पित्त हे आप या महाभूताचा ओलावा नष्ट करते त्यामुळे रूक्षत्व निर्माण होऊन सर धर्माचा क्षय होऊ लागतो यानंतर हे वाढलेले पित्त विभार्जन होते व रक्त व मांस यांना

दूषित करते यावेळी हे वाठलेले पित्त संपूर्ण शरीरामध्ये रक्ताबरोबर संचार करत असते त्यामुळे ज्या ज्या अवयवांना त्याचे पोषन होते ते या पित्ताने दुष्ट रक्ताचे होत असते् यानंतर नेत्र, त्वचा, मूत्र, मल यांना पिवळा रंग येऊ लागतो व रूग्णास कामला झाली असे संबोधले जाते. यावेळी पित्ताचे विकृत गुणांनी अतिप्रवृत्ति व विमार्गगमन होते ते पित्त परत आंत्राकडे आणण्यास त्याचा कमी झालेला सर गुण वाढविणे आवश्यक असते फलत्रिकादी गुग्गुळातील कुटकी हे द्रव्य भेदन व पित्तविरेचन करणारे आहे त्यामुळे विणार्गग झालेले पित्त परत आंत्रावाटे शरीराबाहेर काढून टाकण्याचे कार्य केले जाते व संपूर्ण विकृत पित्त शरीराबाहेर निघून गेल्यानंतर कामला व्याधी बरा होतो. यावेळी 'संशोध्योमृदुभि स्तिक्तै : कामली तु विरेचने।' या सूत्राची महती जाणवते.

यानंतर सररक्तादि धातूंवर झालेला परिणाम दूर करण्यास वेगळी चिकित्सा करावी लागते.

२) मलावष्टंभ:

शरीरामध्ये वात, पित्त व कफ दोषांमध्ये वात दोषाला सर्वाधिक महत्व आहे.

वात हा सर्व शरीरामध्ये गती निर्माण होतो त्या त्या ठिकाणी वायुचा संचार सरू होतो. ज्यावेळी शरीरामध्ये पंचमहाभूतांचे कार्य व्यावस्थित चालू असते त्यावेळी भरण पोषण व उत्सर्जन या क्रिया व्यवस्थित चालु असततात, परंतु प्रज्ञापराधिकारणांच्या सेवनामुळे शरीरामध्ये असणाऱ्या या महाभूतांचा समतोल ढासळू लागतो. रूक्षान्न सेवन, जागरण आदि कारणांनी शरीरामध्ये असनाऱ्या वायु महाभूताची वृद्धी होऊ लागते.

अशा वृद्धी पावलेल्या वायू महाभूतामुळे आप या महाभूताचे प्राकृत सर मृदू हे गुणधर्म कमी होऊ लागतात. यामुळे सार, किट्ट वभजनानंतर निर्माण होणारा स्थूल मल बराच काळ पक्वाशयात साठून राहू लागतो. वात दोषाच्या कलामध्ये या मलाचे उत्सर्जन होत नाही व मलावष्टंभ निर्माण होते. सुरवातीला जाहिराती वाचून लोक रेचक आणून सेवन करतात त्यामुळे रेच होऊन जातात पण वायूचे रूक्षादि गुणांची शरीरामध्ये अजूनच वाढ होऊ लागते. अशा दुष्ट चक्रात रूग्ण अडकून ग्रहणी अर्श अशा व्याधींची पायाभरणी होते.

स्थूलात्रामध्ये मलसंचिती झाल्याने अपान वायूची अनुलोम गती प्रतिलोतम्मित होते व तो वायू शरीरातील इतर चार वायूंची व सर्वकफ,पित्त दोषांची दुष्टी करतो.

फलत्रिकादिगुग्गुळामुळे अशा प्रकारच्या अवष्टभाचा कायमचा नाश होण्यास मदत होते. या औषधामुळे पित्ताचा सर धर्म वाढवून पार्थिव मल शरीराबाहेर टाकला जातो व आकाशाचा अवकाश निार्माण होतो. स्त्रोतोरोध नष्ट होऊन वायुची प्रकृत गती निर्माण होते व रूग्णाच्या चेहऱ्यावर हास्य उमटते.

फलत्रिकादिक्वाथ :

व्याधीला जिकण्याकरिता क्वाथ ही कल्पना सर्वश्रेष्ठ असते. पृथ्वितत्व पाण्यामध्ये विरघळते या न्यायानुसार (रूध्दपथ) कामलेच्या रूग्णात फलत्रिकादी काढ्याचा चांगला उपयोग होतो. यामुळे पित्तवहनलिकेच्या ठिकाणी निर्माण झालेला अवरोध दूर होतो व पित्ताचे योग्य प्रकारे विरेचन होऊन व्याधी संप्राप्ति भंग होते.

फलत्रिकादि अरिष्ट :

फलत्रिकादि काढ्याचे अरिष्ट पद्धतीने हे औषध तयार करतात. यकृताच्या ठिकाणी असणाऱ्या क्षारधर्मी पित्ताची विकृती झाल्यास या अरिष्टाचा उपयोग होतो.

## पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | त्रिफळा | पंचरसात्मक | - | रूच्य लघु | सर, | यकृतगामी |
| | | | | शीत | मेहकुष्ठहर | |
| २) | गुडुची | तिक्त | वायू आकाश | रूक्ष, ग्राही | रसायनी | दीपन |
| | | कटु | वायू अग्नि | लघू | | |
| ३) | वासा | तिक्त | वायू आकाश | लघू | हृदय, वातकर | रक्तगामी |
| | | कषाय | वायू पृथ्वि | शीत | | |
| ४) | किराईत | तिक्त | वायू आकाश | रूक्ष, लघू | दाहनुत | सर |
| ५) | निंबत्वक् | तिक्त | वायू आकाश | शीत, ग्राही | | यकृतगामी |
| | | कषाय | वायू पृथ्वि | लघू | अग्निवातनुत | |
| ६) | कुटकी | कटु | वायू अग्नि | रूक्ष. लघू | शीत, हृदया | दीपन |
| | | तिक्त | वायू आकाश | दीपन, दाहहर | भेदन | |
| ७) | गुग्गुळ | कटु | वायू अग्नि | उष्ण | रूक्ष, विशद | सर |
| | | तिक्त | वायू आकाश | | विच्छिल, वृष्य | |
| | | कषाय | वायू पृथ्वि | | रसायन | |

फलत्रिकादि गुग्गुळः शुल्ब

घटक

| | |
|---|---|
| १) फलतिकादि | - १ भाग |
| २) ताम्र भस्म | - ०.००२ भाग |

कृती :-

१) सर्व प्रथम फलत्रिकादी चूर्ण एका खलामध्ये घेऊन घोटण्यास सुरवात करावी.

२) ते एकजीव झाल्यानंतर निम्मे टाकून घोटावे, घोटत असताना ताम्र भस्म हे एकच ठिकाणी न राहता सर्व फलत्रिकादि गुग्गुळाच्या चूर्णात मिसळून जाईल याची काळजी घ्यावी.

३) हे एकजीव झाल्यानंतर शिल्लक राहिलेले ताम्रभस्म पसरून टाकून घोटीत रहावे यानंतर संयोग व्यवस्थित झाल्यानंतर औषध तयार झाले असे समजून बाटलीत भरुन ठेवावे.

घटकद्रव्यांचे कर्म :

१) फलत्रिकादि गुग्गुळ :

या औषधाचे गुणधर्म सविस्तर वर्णन केले आहेत (पान नं. २७८)

२) ताम्रभस्म

या ठिकाणी वापरावयाचे ताम्रभस्म हे सोमनाथी ताम्र भस्म विधी प्रमाणे तयार केलेले असावे (पान नं. २२०)

ताम्रं कषाय मधुरं स तिक्त अम्ल च पाके कटुसारकं च ।
पित्तापह श्लेष्महर च शीत तत्त रोपण स्थालघुलेखनं च ।।

भावप्रकाश ७/३/६८

ताम्रभस्म कषाय, मधुर, तिक्त व अम्ल रसात्मक, कटु विपाकी शीत, रोपण, लघु सारक व लेखन या गुणधर्मानी युक्त आहे.

ताम्र भस्माचे प्रमुख कार्य यकृत व प्लीहा यांची वृद्धी झाली असता होत असते. शरीरामधील मृतपेशी सजीव पेशींपासून बाहेर काढून टाकण्याचे काम ताम्रभस्माच्या सहाय्याने केले जाते. यकृतस्थ पित्ताचे सर धर्माने स्त्रवण घटविण्याचे कार्य ताम्र करत असते. यामुळे यकृताच्या ठिकाणी संचित झालेले घटक हळूहळू निघून यकृताची वृद्धी कमी होऊ लागते. याशिवाय त्याकडे असणाऱ्या लेखन या धर्माने वृद्धी पावलेल्या घटकांचे लेखन घेण्यास मदत होते. याचा सारकधर्म कुटकीसारखा तीव्र नसल्याने कमी मात्रेत मुळा किंवा मधासोबत गर्भिणीस द्यावे असे आप्पांनी कामला चिकित्सेत वर्णन केले आहे. ज्यावेळी यकृताच्या ठिकाणी पित्ताची द्रवता कमी होते. त्या ठिकाणी ताम्रभस्माचा वापर करावा याच्या सारक धर्माचा वापर मलावष्टंभासारख्या अवस्थांमध्ये करता येतो.

कर्मुकता :-

फलत्रिकादी गुग्गुळ हे यकृतावर कार्य करणारे औषध असले तरी ज्यावेळी पित्तदोषाला अवरोध निर्माण झालेला असतो अशावेळी तो अवरोध दूर करण्यास लेखन धर्माची आवश्यकता असते. असे लेखन कर्म करणारे यकृतगामी असणारे ताम्र असल्यामुळे ज्यावेळी अतिशय मोठ्या प्रमाणात स्त्रोतसांचा अवरोध असतो अशा वेळी या मिश्रणाचा वापर अधिक फायदा देणारा ठरतो.

पित्तदोष हे उष्ण, तीक्ष्ण या धर्माची वाढल्यानंतर जर त्याच्या ठिकाणी असणारा आप महाभूताचा सर गुण कमी झाल्यास या कल्पाचा वापर त्या ठिकाणी करता येतो. याबरोबरच पित्तामध्ये पार्थिवादि घटकाची वृद्धी होऊन त्यामध्ये असणारी द्रवता कमी होते त्या ठिकाणीया कल्पाचा वापर करावा.

रोगाधिकार:-

१) कामला

कामला व्याशीच्या दोन्ही प्रकारामध्ये या कल्पाचा चांगला उपयोग होतो. रूध्दपथ कामलेमध्ये रूक्ष, शीत, गुरू. मधुर अशा आहाराच्या सेवनाने व्यायाम व वेगनिग्रह केल्याने निर्माण झालेला अवरोध दूर करण्यासाठी कुटकीच्या भेदन धर्माबरोबरच ताम्राचा लेखन हा धर्म सुद्धा उपयुक्त वाटतो. याच्या वापरामुळे निर्माण झालेला स्त्रोतोरोध दूर होतो व यकृतामधून विमार्गगामी होणारे पित्त ग्रहणीमध्ये उतरून पुरीषास पिवळा रंग आणते. शरीरामध्ये वाढ झालेले हे पित्त गुदाद्वारे बाहेर टाकले गेल्यामुळे कामला बरी होते.

‘वद्ध्या विष्यदनात पाकात स्त्रोतोमुख विशोधनात् ।
शाखा मुक्तामल:कोष्ठ यान्ति वायोश्च निग्रहात्।।
स्वस्थानमागते पित्ते पुरीषे पित्त पुरूषे पित्तरंजिते।
निवृत्तोपद्रवस्था्स्य पूर्व:कामलिको विधी:।।’

च.चि. १६।१२९-१३०

२) पित्ताश्मरी:-

पित्तदाषाच्या प्राकृत द्रवत्व या धर्माचा क्षय होऊन त्यामध्ये पित्तदोषाच्या ठिकाणी पृथ्वी महाभूताचे गुणधर्म वाढु लागतात. यामुळे यकृताच्या जवळ असणाऱ्या पित्ताशयामध्ये या पार्थिव धर्माचे एकत्रीकरण होऊ लागते व तेथे पित्तास घन स्वरूप येऊ लागते यास ‘पित्ताश्मरी’ असे संबोधले जाते.

या व्याधीमध्ये रूग्ण हा मलावष्टंभाची तक्रार करत असतो, यावेळी ाप महाभूताचा सर गुण कमी होत आहे हे लगेच लक्षात येणे हरजेचे असते याच अवस्थेत रूग्ण आल्यास पुढे पित्ताश्मरी टाळता येऊ शकेल. पित्ताश्मरी झाल्यानंतर ती फोडून बाहेर काढणे आवश्यक असते याकरिता कुटकी सारख्या वनस्पतीचा चांगला उपयोग होतो. ताम्र सुद्धा सर लेखन असल्याने याचे सेवन सुरू केल्यानंतर पित्ताची द्रवता वाढू लागते व ते योग्य रीतीने ग्रहणीमध्ये येते. पृथ्वि तत्व हे पाण्यामध्ये विरघळते व दोन्ही महाभूतांचा ग्रास होण्याकरिता वर तेज महाभूत उपलब्ध असते. स्थूलाची चिकित्सा वर्णन करीत असताना स्थूलांना तु मधुदकम् या स्वरूपामध्ये मध व उष्ण जल ्यांचे सेवन करावयास ग्रंथकार सांगतात. नेमका त्याच सूत्राचा वापर करून पित्ताश्मरीच्या रूग्णाचि चिकित्सा करावी. या ठिकाणी वरील द्रव्यांचा क्वाथ चांगला उपयोगी पडेल असे वाटते.

३) उदररोग:-

उदर या व्याधीमध्ये यकृताच्या ठिकाणी दुष्टी असताना या कल्पाचा उपयोग होतो. यामध्ये असणारी द्रव्ये सारक धर्माची आहेत. उदराची चिकित्सा वर्णन करताना पुढिल प्रमाणे सांगितली आहे.

दोषातिमात्र उपचयात स्त्रोतोमार्ग निरोधनात ।
संबवति उदरं तस्मात् नित्यमेव विरेचयेत् ।।
च.चि. १३ । ६१

ताम्र भस्म हे उदर चिकित्सेत वापरण्यात येत असते. यामुळे सर धर्म वाढुन रूग्णाच्या उदरामध्ये संचित झालेले जल हळूहळू कमी होऊ लागते याबरोबर त्याच्या ठिकाणी जर यकृतवृद्धी झाली असेल तर तेथे या कल्पाचा उपयोग चांगला होतो. लेखन या धर्माने त्या ठिकाणी असणारा संग दूर होऊ लागतो.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | ताम्रभस्म | कषाय | पृथ्वि वायू | शीत रोपण | लघू. लेखन सर | यकृतगामी (अम्लधर्मी) |

फलत्रिकादि गुग्गुळः जिंगी

घटक

| | |
|---|---|
| १) फलतिकादि गुग्गुळ | - १ भाग |
| २) मंजिष्ठा चूर्ण | - १/२ भाग |
| ३) सारीवा चूर्ण | - १/२ भाग |

कृती :-

१) सर्व प्रथम फलत्रिकादी गुग्गुळाची कृतीनुसार निर्मिती करावी (पान नं. २७८)

२) एका खालामध्ये फल त्रिकादी गुग्गुळ घेऊन त्याच्या सोबत थोडे थोडे सारीव मंजिष्ठा चूर्ण टाकूण घोटावे. आधी दोघांचा संयोग करावा (पान नं. ..)

३) घोटत असताना सर्व भागास मंजिष्ठा सारीवा जाईल याची काळजी घ्यावी. मिश्रण एकजीव झाल्यानंतर परत बाटलीमध्ये भरून ठेवावे.

घटक द्रव्यांचे कार्य :-

१) फलत्रिकादि गुग्गुळ :-

फौलत्रिकादी गुग्गुळाचे गुणधर्म मागे वर्णन केले आहेत. (पान नं. २७९)

२) मंजिष्ठा :-

मंजिष्ठा मधुरा तिक्ताकषाया स्वरवर्णकृत।
गुरूरूष्मा विषश्लेष्म शोथयोन्याक्षि कर्णरूक ।।
रक्तातिसार कुष्ठास्त्र विसर्प व्रणमेहनुत ।।

भावप्रकाश -

मंजिष्ठा मधुर, तिक्त, कषाय, रसात्मक, गुरू उष्ण गुणांची आहे. याबरोबरच ती वर्ण्य रक्त शोधक योनी रोग नाशक, स्तन्यशोधक व आर्तवजनन करणारी आहे.

भावप्रकाशकारांनी मंजिष्ठा हरितक्यादी वर्गामध्ये सामविष्ट केलेली आहे. यामुळे दोषांना व मलांना बाहेर काढून टाकणे हा गुणधर्म या वनस्पती मध्ये आहे. मंजिष्ठा प्रामुख्याने रक्तवह स्त्रोतसावर कार्य करणारी आहे रक्ताच्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या बहुतेक विकारांमध्ये मंजिष्ठेचा चांगला उपयोग होतो. मंजिष्ठा ही वनस्पती रक्त धातूच्या ठिकाणी असणारी द्रवता वाढवते याबरोबरच ती तिक्त असल्यामुळे रक्तधातू व पित्तदोषामध्ये असणारी पार्थिवता कमी करण्यास मंजिष्ठेचा चांगला उपयोग होतो.

कुष्ठासारख्या त्वचेच्या ठिकाणी निर्माण होण्याऱ्या व्याधीमध्ये प्रामुख्याने रक्तधातू व यकृताच्या ठिकाणी दुष्टी असते अशा स्वरूपाची विकृती असताना मंजिष्ठेचा उपयोग होतो.

कर्मुकता :

बहुतेक त्वचा विकारामध्ये रक्तधातूची दुष्टी असते यामध्ये रक्ताचे मूलस्थान असणाऱ्या यकृत व प्लीहा या दोन अवयवांची सुद्धा दृष्टी झालेली असते. याबरोबरच बहुतेक त्वचारूग्णांना मलावष्टंभाची सवय असते या सर्व प्रक्रियेत यकृताचे कार्य बिघडल्यामुळे त्यामध्ये निर्माण होणाऱ्या पित्ताची विकृती असते. हे विकृत पित्त परत रक्तास दूषित करीत करीत असते यामुळे यकृतामधून पित्ताचे व्यवस्थित क्षरण व्हावे याकरिता या कल्पाचा वापर होतो.

ज्या रूग्णामध्ये यकृताच्या ठिकाणी असणाऱ्या दुष्टीबरोबरच विस्त्र गुणांनी युक्त रक्तदुष्टी असते तेथे हा कल्प वापरावा. यामुळे रक्तधातू व पित्तदोषामधील द्रवता वाढव्यास उपयोग होतो व पार्थिवादि दोष पित्तावाटे शरीराबाहेर टाकले जातात.

सारीवा चूर्ण :

सारीवा मधुर तिक्तरसाची, स्निग्ध, शीत, आमविषहर स्तन्यशोधन करणारी आहे. गुडुच्यादी वर्गातील व वृष्य धर्म असणारी ही वनस्पती आहे.

रक्तशुद्धीकर करणारी असून रक्तामध्ये वाढलेल्या विजातीय धर्माचा नाश करण्यास याचा वापर होतो. रक्तामध्ये विस्त्रगुण वाढल्यावर त्या गुणाचे क्षरण सारीवा करते याच्याकडे असणाऱ्या पृथ्वी महाभूताची आठवण होते यामुळे ती रक्त गामी होऊन विस्त्रता कमी करण्यास कारण होते.

# गोक्षुरादि गुग्गुळ

१) पाठ संदर्भ :

‘‘त्रिकटु त्रिफला तुल्यं गुग्गुळ समांशकम् ।
गोक्षुरक्वाथ संयुक्ता गुटिका कारयेदबुध:।।
देशकालबलापेक्षी भक्षयेच्चानुलोमिकाम् ।
न चात्र परिहारो डास्ति कर्म कुयदिथेप्सितम् ।।’’

योे.र. ।प्रमेहचिकित्सा

२) पाठ (पाठ बदल)

| घटक | प्रमाण |
|---|---|
| १) गोखरू चूर्ण | १ भाग |
| २) धमासा चूर्ण | १ भाग |
| ३) लाकडी पाषाण | १ भाग |
| ४) सुंठ चूर्ण | १ भाग |
| ५) मिरे चूर्ण | १ भाग |
| ६) पिंपळी चूर्ण | १ भाग |
| ७) सुरवारी हिरडा | १ भाग |
| ८) बेहडा चूर्ण | १ भाग |
| ९) आवळा चूर्ण | १ भाग |
| १०) नागेमुस्ता चूर्ण | १ भाग |
| ११) शुद्ध गुग्गुळ | १० भाग |

| भरड | १३ भाग |
|---|---|
| १) गोखरू | १३ भाग |
| २) धमासा | १३ भाग |
| ३) लाकडी पाषाण | १३ भाग |

३) कृती :

१) सर्व औषधीमध्ये असणारी भौतिक अशुद्धी दूर करून त्याची चूर्ण करून घ्यावीत.

२) एका ठिकाणी गुग्गुळ शुद्धीची तयारी करावी (पान नं. १६८)

३) गोखरू, धमासा व लाकडी पाषाण यांची भरचूर्ण ८ पट पाण्यात रात्रभर भिजत घालून दुसऱ्या दिवशी त्याचा १/४ काढा
करावा.

४) काढा तयार झाल्यानंतर शुद्ध गुग्गुळ त्यामध्ये घालून एक रात्रभर तसाच ठेवावा.

४) या नंतर ते मंदाग्निवर ठेऊन पन्हळ पडेपर्यंत आटवावे आटवीत असताना तो सारखा हलविणे आवश्यक असते.

६) पन्हळ पल्यानंतर मिश्रण चुलीवरून उचलून खाली काढून ठेवावे व थंड झाल्यावर त्यामध्ये चूर्ण घालावीत.

७) चूर्णे एकत्रित करताना सुंठ, मिरे, पिंपळीव सुवारी हिरडा, बेहडा आवळा व गोखरू धमासा, लाकडी पाषाण यांचे

वेगवेगळी चूर्णे एकत्र घोटावीत यानंतर ती क्रमाने एकत्र करून त्यानंतर शेवटी त्यामध्ये नागरमोथा चूर्ण टाकावे.

८) चूर्णाचे एकत्रिकरण झाल्यानंतर ती वरील मिश्रणात टाकून खलामध्ये बारीक गोळे घेऊन घोटावीत बत्यास तूप

लावावे.

९) मिश्रणाचा संयोग व्यवस्थित झाल्यानंतर त्याच्या गोळ्या करून ते उन्हात वाळवावे.

१०) वाळल्यानंतर बाटलीत भरावे.

घटक द्रव्यांचे कार्य:

१) गोखरू:

गोक्षुर मधूर रसात्मक स्निग्ध, शीत असून बस्तिशोधन हा विशेष धर्म या द्रव्याजवळ आहे. शरीरामध्ये निर्माण झालेला क्लेद बस्तीवाटे बाहेरू काढून शरीर धारणेचे कार्य करीत असल्याने याचा समावेश गुडुच्यादि वर्गात केलो आहे.

आमाशयात निर्माण झालेल्या क्लेद बाहेर काढून व मूत्रवेगावरोधाने निर्माण झालेल्या अग्निमांद्यामध्ये शीत असून सुद्धा याचे दीपन कार्य दिसून येते.

याच्यामुळे शरीरामध्ये जलमहाभूताची वाढ होतो व रक्तामध्ये निर्माण झालेली दुष्टता मूत्रावाटे बाहेर काढून टाकण्याकरिता गोक्षुराचा वापर केला जातो.

‘गोक्षुर मूत्रकृच्छ् डनिल हराणाम।’

च.सू.२५

गोक्षुर मूत्रकृच्छ्, प्रमेह, हृद्रोग यामध्ये अवस्थानुरूप वापरता येतो.

२) धमासः

धमासा मधुर, तिक्त कषाय रसात्मक शीत, सर असून मद व भ्रांतीहर या विशेष धर्माचा आहे. भावप्रकाश याचा समावेश गुडुच्यादि वर्गात करतात. भ्रमहारी व जलतत्व प्रधान असणारा धमासा शरीरामध्ये जलीय तत्वाची वाढ करतो. रक्तधातूमध्ये अनेक प्रकारचे घटक साचू लागतात त्याचे मूत्रवाटे उत्सर्जन होत नाही व अशाच रक्तधातूच्या सहाय्याने सर्व शरीराचे पोषण होत असते यामुळे अनेक व्याधी निर्माण होतात. धमासा ही वनस्पती रक्तामध्ये जलीयता वाढवून मूत्रावाटे विषद्रव्ये उत्सर्जित करण्यास मदत करणारी असते.

या कार्यामुळे तो गोखरू सोबत वापरतात अशी रक्ताने मस्तिष्कास पुरवठा झाल्यानंतर भ्रम हे लक्षण दिसल्यास त्या ठिकाणी धमासा उपयोगी पडतो.

३) लाकडी पाषाणः

मूत्रविरेचनीय गणात वर्णण केलेला पाषाणभेद तिक्त व कषाय रसात्मक शीत, भेदन व बस्तिशोधन या गुणधर्मांनी युक्त असणारा आहे. भावप्रकाश कारांनी हरितक्यादि वर्गात वर्णन केला असून आप्पांनी याचा समावेश भेदन वर्गात केला आहे. मूत्रोत्वत्ती कमी झाल्यामुळे निर्माण झालेल्या व्याधीमध्ये याचा वापर करणे उपयुक्त असते इतिर मूत्रल द्रव्यांना सहकार्य यामुळे होते. अश्मरी सारख्या व्याधीमध्ये भेदन करण्यासाठी याचा वापर केला जातो.

४) सुंठः

सुंठ ही कटु रसात्मक, उष्ण, रूच्य, स्निग्ध, आमपाचक, वृष्य असून हरितक्यादी वर्गात व दीपन पाचन धर्म असणारी ही वनस्पती आहे. संठीचे मुख्य कार्य हे अन्नवह स्त्रोतसावर होते, शरीरामध्ये निर्माण होणाऱ्या आम दोषाचे पाचन करण्याचे काय७ सुंठ करीत असते. उष्ण धर्माची असल्यामुळे जलतत्व प्रधान औषधामध्ये असणारा पाचन धर्म यामुळे वाढतो त्यामुळे शरीरामध्ये असणाऱ्या पार्थिव घटकाचे पचन होऊन त्याचे जलतत्वाने वस्तीवाटे उत्सर्जन होण्याकरिता मदत होते.

याकरिताच वाग्भटांनी शृंतशीत जलात सुंठीचा समावेश केल्याचे दिसून येते.

५) मिरे:

श्वेतमिरे कटू रसात्मक, रूक्ष, तीक्ष्ण, उष्ण, दीपन व प्रमाथी या गुणांनी युक्त आहेत. प्रमाथी धर्माने स्त्रोसामध्ये संचित झालेले विकृत दोष याच्या सहाय्याने काढून टाकण्यास मदत होते याशिवाय मिरे हे मूत्रवहस्त्रोतसाच्या श्लेष्मल कलेला उत्तेजिन करून मूत्राची मात्रा वाढविण्याकरिता उपयुक्त ठरतात.

६) पिंपळी:

पिंपळी कटू रसात्मक, रसायन, अनुष्ण, स्निग्ध, वुष्य असून हरितक्यादी वर्गातील रक्तगामी आहे. कफ, मेद व मूत्र याचे पाचन करण्याचे कार्य पिंपळीच्या सहाय्याने केले जाते. आमकफ, आममेद व मामूत्र पिंपळी सेवनाने पक्व होतात. याच्या सहाय्याने औषध रक्तगामी होण्यास मदत होते तसेच रक्तामध्ये असणारी विषद्रव्ये पचनास उपयुक्त ठरते.

७) हिरडा:

सुरवारी हिरडा कषायरसात्मक, अनिलोमक, उष्ण, लघू, रूक्ष आहे. हिरड्याकडे मलशोधन करणे हा प्रमुख धर्म असल्याने त्याच्या या धर्माचा वापर अनेक ठिकाणी होतो याच्या सेवनामुळे वातानुलोमन होते अपान वायूची प्रतिलोम गती व्यवस्थित होण्यास याचा उपयोग होतो.

८) बेहडा:

बेहडा कषाय रसात्मक, उष्ण व भेदन करणारा आहे. याच्या भेदन धर्माचा वापर करून स्त्रोतोरोध दूर होतो सतेच पार्थिव व आप महाभूतात्मक गुणांचे पचन याच्या सहाय्याने होते.

९) आमलकी:

आवळा अम्लरसप्रधान पंचरसात्मक शीत, वृष्य, प्रमेघ्नव रसायन आहे. हरितक्यादी वर्गात असून मूत्रल आहे. रक्तधातूवर याचे चागले कार्य दिसुन येते, हा अम्लधर्मी असून शरीरामध्ये शीत धर्माची वाढ होण्यास याचा उपयोग होतो.

१०) नागरमुस्ता:

कटु, तिक्त. कषायरसात्मक, शीत, ज्वरघ्न, ग्राही, दीपन व पाचन करणारा क्षारधर्मी असा असून कर्पूरदि वर्गात याचा समावेश केला आहे. नागरमोथ्याला एक विशिष्ट सुगंध असून यामुळे तो शरीरामध्ये पार्थिव अवयवांकडे जातो तसेच जलतत्वप्रधान अशा पाणतळ जागी याची वाढ होत असल्यामुळे याचा वापर रक्तामध्ये असणारी पार्थीवता जलामध्ये विरघळून मूत्रावाटे बाहेर काढून टाकण्यासाठी करता येतो. याकरिता याची योजना पाठ बदल करून घेतली आहे.

११) शुद्ध गुग्गुळः

गुग्गुळ कटु, तिक्त, कषाय, रसात्मक, उष्ण, सर, रसायन, विच्छिल असून संधान करणारा आहे. या ठिकाणी गामित्व प्राप्त होण्याकरिता गुग्गुळाचा वापर करण्यात येत असला तरी सुद्धा पृथ्वितत्वाचे पाचन करण्याचे सामर्थ्य असणारा आहे. गुग्गुळाच्या या धर्माचा उपयोग या ठिकाणी होत असतो याबरोबरच गुग्गुळ हा क्लेदाचा नाश करणारा आहे.

कर्मुकताः

अग्निसंस्थेच्या भरण पोषण व उत्सर्जन या त्रयीवर सर्व आरोग्य अनारोग्याचा खेळ चाललेला असतो शरीरामध्ये रक्तधातूची निर्मिती उत्तम प्रकारे करण्याचे कार्य यकृत करत असते. प्लीहेच्या ठिकाणी या रक्ताचा साठा केला जातो तर मूत्रपिंडाकडुन याच्यामध्ये असणाऱ्या विषद्रव्यांचे विर्सजन केले जाते.

''शोणित मेद प्रसादात वृक्कौः।''

रक्त व मेद यांच्या प्रसादभागापासून वृक्काची निर्मिती होते. शरीरामध्ये अनावश्यक घटकाची निर्मिती होत असते ती शरीराबाहेर काढून टाकून देण्याचे कार्य मूत्रपिंडाकडून वारंवार होत असते. यामूत्राचे पांचभौतकत्व पहात असताना त्यामध्ये आप व तेज या महाभूतांचे अधिक्य असते या महाभूतांच्या तर-तम वृद्धीमुळे मूत्राबाबत अनेक लक्षणे दिसून येतात.

ज्यावेळी रक्तामध्ये असणारी विषद्रव्ये शरीराबाहेर काढून टाकण्याचे कार्य हे बोघडते त्यावेळी मूत्रपिंडांना सूज येण्यास सुरवात होते. रूग्णाची मूत्रपिंडे तपासताना त्याला झोपवून नाभीच्या दक्षिण व वाम बाजूस वीडनासहनत्व व स्पर्शासहनत्व तपासायचे असते. जर यामध्ये विकृती असेल तर या परिक्षा होकारार्थी येतात.

आमुखात सालिले न्यस्तः पार्श्वेभ्यः पूर्यते नवः।
घटोयथा तथा विद्धि बस्तिर्मूत्रेण पुर्यते ।।
सु.नि. २३

आयुर्वेदोक्त मूत्रनिर्मिती वर्णन करताना वरील प्रकारे वर्णन केली आहे. मूलस्थानांचा विचार करताना वंक्षणाऐवजी वृक्क हा पाठभेद दिला आहे. मूत्राचे प्रमुख कार्य हे शरीरामध्ये असणारा क्लेद शरीराबाहेर मूत्रावाटे काढून टाकणे अशा स्वरूपाचा आहे. मूत्राची घटना पहाता त्यामध्ये लवण व कटु रस उपस्थिती आहे. बस्ति हा अवयव आपान क्षेत्रात कार्य करणारा आहे त्यामुळे अपान वायूची दुष्टी झाल्यानंतर त्याचे मलमूत्रविर्सजनाचे कार्य विकृत होते व यामुळे बस्तिप्रदेशात पीडनासहनत्व जाणवते.

मूत्रपिंड वेदना संप्राप्ति:-

यकृत व प्लीहा यांच्या भरण पोषण कार्यात विकृती

↓

आहार रसावर योग्य संस्कार होत नाही

↓

रक्तामध्ये पार्थिव विषारी पदार्थाची संचिती

↓

अवस्थाापक अयोग्य (अपान विकृती)

↓

रक्ताने अयोग्य पोषण व अपान प्रतिलोमतेमुळे
मूत्रपिंडातून विषद्रव्ये उत्सर्जित होत नाहीत.

↓

मूत्रपिंडाना सूज व विषद्रव्ये परत
शरीरात शोषली जातात

↓

बस्तीप्रदेशी पीडनासहनत्व व स्पशासिहनत्व

यकृत व प्लीहा यांच्या ठिकाणी ताडन करावयाचे असते तर वृक्कांच्या ठिाकणी फक्त पीडनाससहत्व व स्पर्श सहत्व पाहतात. रक्तामध्ये संचित झालेली ही विषद्रव्ये शरीराच्या बाहेर काढुन टाकण्यासाठी गोक्षुरादी गुग्गुळाचा अमृता प्रमाणे उपयोग होतो. गोक्षुरादी गुग्गुळाच्या सेवनामुळे रक्तामध्ये असणारी जलीयता वाढते यामुळे त्यामध्ये संचित झालेल्या विषद्रव्यावर प्रभाव पडून ती या वाढलेल्या आप महाभूतामध्ये हळूहळू विरघळू लागतात. मूत्राची निर्मिती वाढते व वृक्काहारे ही विषद्रव्ये बाहेर काढुन टाकली जातात. या प्रक्रियेमुळे मूत्रपिंडाना निर्माण झालेली सूज हळूहळू कमी होऊ लागते. अकार्यक्षम असणारी ही मूत्रपिंडे चांगक्या प्रकारे कार्य करू लागतात. रक्तामध्ये संचित सर्व विषद्रव्ये बाहेर निघून गेल्यानंतर त्या ठिकाणी पूर्वी आढळणारे स्पर्शसहत्व व पीडनासहनत्व निघून जाते, अपान वायूची योग्य प्रवृती होऊ लागते व व्याधी बरा होतो. गोक्षुरादी जातो पण याबरोबर यकृताची दुष्टी असल्यास त्याची वेगळी चिकित्सा या बरोबर करावी लागते तसेच प्लीहेची दुष्टी असल्यास त्ायची चिकित्सा करावी.

रोगहनता:-

प्रमेहन्वात रोगाश्च वातशोणित मेव च।
मूत्राधातं मूत्रदोष्प्रदर चानु नाशयेत ।।
योगरत्नाकर । प्रमेहचिकित्सा

१) प्रमेह:

प्रमेहामध्ये साक्षात जलमहाभूताची दूष्टी असते, यामध्ये हस्तपादतल दाह व वृष्णा स्वाद्वास्यता, दन्तादिच्या ठिकाणी मलाढयत्व असते. चरकाचार्यांनी याचे वर्णन करताना बहुद्रवश्लेष्मा दोषविशेष या स्वरूपा याचे वर्णन केलेले आहे.

''दोषो हि वस्ति सत्पेत्य मूत्र संदूष्य मेहाज्जन येत यथास्वम्।'

चरकांनी प्रमेह चिकित्सेत वरील सूत्र सांगितले आहे. मूत्राचे मुख्य कार्य हे शरीरामध्ये निर्माण होणाऱ्या विषारी पदार्थाचे शरीराबाहेर समूळ उच्चारण करणे हे आहे. प्रमेह सर्व दोष हे दूष्याना दूषित करून बस्तिच्या ठिकाणी आणतात यामध्ये चिकृतगंध वर्णाची मूत्रप्रवृत्ती होण्यास सुरवात होते.

अशा वेळी मूत्राचे शोधन करण्यासाठी गोक्षुरादी गुग्गुळांचा उपयोग होतो. याने मूत्रामध्ये तसेच रक्तामध्ये निर्माण झालेल्या विकृत घटकांना शरीराबाहेर टाकण्यास मदत होते.

२) वातरक्त :

वातरक्तामध्ये वातदोह व रक्तधातूची वेगवेगळी दुष्टी झालेली असते. वातदोष प्रकुपित होऊन रक्तधातु त्यासोबत मिसळून याची निर्मिती करतो. रक्तदुष्टी शरीरामधून काढून टाकण्यासाठी त्याचे मूत्रपिंडाकडून उत्सर्जन होणे अपेक्षित असते, गोक्षुरादी गुग्गुळामुळे जलमहाभूताची वाढ होऊन रक्तामध्ये संचित झालेली विषारी घटक द्रव्ये यामधून बाहेर टाकली जातात यामुळे रक्ताची शुद्धी होते व वातरक्तापासून उपयश मिळतो.

३) मूत्राधात :-

मूत्रधातामध्ये मूत्रोत्पती व्यवस्थित होत नाही अशा वेळी त्या ठिकाणी गोक्षुरादी गुग्गुळाचा वापर करता येतो. यामुळे शरीरामध्ये जल या महभूताची वृद्धी अधिक प्रमाणामध्ये होते व मूत्राचे प्रमाण वाढून मूत्राधात नष्ट होतो. परंतू मूत्राधाताच्या सर्वच अवस्थांमध्ये याचा वापर होईल असे नाही वातकुंडलिका मूत्रोशुक्र, उष्णघात मूत्रसाद यात या कल्पाचा वापर होईल.

४) प्रदर :-

प्रदरामध्ये रक्तधातू व (रसाचा उपधातू) रज याची गर्भाधय या अवयवाच्या ठिकाणी दुष्टी होते. ही सर्व संप्राप्ति अपानाच्या कार्यक्षेत्रामध्ये घडून येणारी आहे त्यामुळे अपान वायूची विकृती होऊन त्याचा परिणाम मूत्रपिंडावर होऊ लागतो व त्यास सूज येऊ लागते. गोक्षुरादी गुग्गुळाचा प्रदराच्या अवस्थेत उपयोग होईल असे वाटत नाही परंतु याचा वापर करून रक्तामध्ये निर्माण झालेली दुष्टी कमी होईल, विषद्रव्यांचे उत्र्सजन होऊन प्रदर बरा होण्यास याचा वापर होऊ शकेल.

मात्रा :-

अनुपान - साधेपणी

काल :-

मर्यादा :-

गोक्षुरादी गुग्गुळ हा अम्लधर्माकडे झुकणारा कल्प असल्यामुळे अम्लधर्मी रूग्णांमध्ये याचा वापर करता करता येणार नाही.

५) गोवर व कांजिण्या :-

गोवर, कांजिण्या आल्यानंतर तेज महाभूताची अतिशय प्रमाणामध्ये वृद्धी झालेली असते या महाभूताने सर्व शरीरामध्ये उष्ण तीक्ष्ण गुणांनी आपले पाय या महाभूताने सर्व शरीरामध्ये उष्ण तीक्ष्ण गुणांनी आपले पाय पसरलेले असतात यामध्ये होणारी उष्णता ही क्षारधर्मी स्वरूपाची असते अशा वेळी त्या ठिकणी उष्णतानाशक अम्लता असणारे औषध आवश्यक असते. तेज व जल ही दोन महाभूते उकमेकांच्या विरूद्ध गुणांची असतात. रक्ताची झालेली दुष्टी व त्यामुळे विकृत पोषण झालेले मूत्रपिंड असताना गोक्षुरादी गुग्गुळाचा वापर चांगला होतो.

अम्लधर्मी गुणांनी क्षारधर्मी गुणांचे शमन होते त्या सोबतच रक्ताची द्रवता वाढल्यामुळे उष्ण, तीक्ष्ण गुणांचे शमन होते व रक्तामध्ये असणारी विजातीय द्रव्ये मूत्रापिंडावाटे बाहेर टाकली जाऊन गोवर कांजिण्याचा नाश होण्यास मदत होते

६) अनार्तव कष्टार्तव :-

रज :क्षय मार्गावरोधजन्य किंवा दोषदुष्टी अशा दोन प्रकारांनी होत असतो ज्यावेळी शरीरामध्ये वायू व तेज महाभूताचे प्राबल्य वाढते त्यावेळी रक्ताच्या ठिकाणी असणारा द्रवता हा धर्म कमी होऊ लागतो यामुळे रजाची कमी प्रमाणात निर्मिती होऊन गर्भाशय शुष्क होऊ लागतो. गोक्षुरादी गुग्गुळ रक्तामध्ये असणारी द्रवता वाढवून रस रक्त क्षीणता व दुष्;ीमध्ये निर्माण झालेल्या अनार्तवामध्ये याचा उपयोग होईल.

७) संधीशूल / कटीशुल :-

श्वेतप्रदर पूतिमेह, नाडीव्रण, पूयदंत या सारख्या चिरकारी विकृती परिणामी शरीरामध्ये पूयमता निर्माण होऊन रूग्ण संधीशुलाची तक्रार घेऊन येतो अशावेळी गोक्षुरादी गुग्गुळाच्या वापराने संचित पूय शरीराबाहेर टाकून रक्तशुद्धी होते व संधीशुलापासुन रूग्ण मुक्त होतो.

८) मलावष्टभ :-

मूत्रवेगाचे विधारण केल्याच्या परिणामी अपान वायूच्या गतीमध्ये बदल घेऊन प्रतिलामता येते अशावेळी मल पक्वाशयातून बाहेर टाकला जात नाही त्या वेळी या कल्पाचा वापर केल्यास व्यवस्थित मूत्रप्रवृत्ती होते व अपान वायूची गती अनुलोम बनून मलावष्टभ नष्ट होतो.

९) भ्रम :-

रक्तामध्ये संचित झालेले विषारी घटक मूत्रपिंडावाटे बाहेर न पडल्याने रक्तासोबत इतर अवयवांकडे जाऊ लागतात मस्तिष्कास अशा रक्ताचा पुरवठा झाल्यास ठरतो भ्रम हे वाताचे पित्तानुबंध दर्शवणारे लक्षण आहे.

१०) श्वास /कास :-

मूत्रपिंड विकृतीचा परिणाम म्हणून फुफ्फुसांमध्ये रव वैगुण्य प्राप्त झालेले श्लेष्मभूयिष्ठ दोष श्वास कासाची निर्मिती करतात त्यावेळी त्या दोषांना शरीरा बाहेर काढुन टाकण्यासाठी गोक्षुरादी गुग्गुळाचा उपयोग होतो व्यान व उदान वायूच्या कालामध्ये वापर केल्यास मूत्रपिंडाकडुन दोषांचा निचरा घेऊन  व्याधी नष्ट होतो.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | गोखरू | मधुर | पृथ्वी आप | शीत, सिग्ध | अश्मरीहर<br>बस्तिशोधन | दीपन/अम्लधर्मी |
| २) | धमासा | मधुर<br>तिक्त<br>कषाय | पृथ्वी आप<br>आकाश वायु<br>पृथ्वी वायु | सर, शीत<br>लघु | मदभ्रांती जित | - |
| ३) | पाषाणभेद | तिक्त<br>कषाय | आकाश वायु<br>पृथ्वी वायु | शीत | बस्तिशोधन | भेदन |
| ४) | त्रिफला | पंचरसात्मक | - | दीपनी, रूच्या | मेहकुष्ठनुत | सर |
| ५) | सुंठ | कटु | वायुअग्नि | उष्ण, लघु<br>ग्राही | आमवातहनी<br>स्निग्ध, वृष्य | दीपन-पाचन |
| ६) | श्वेतमिरी | कटु | अग्निवायु | रूक्ष, तीक्ष्ण | प्रमाथी, पित्तकर | दीपन |
| ७) | पिंपळी | कटु | अग्निवायु | रसायन | स्निग्ध अनुवण | रक्तगामी<br>दीपन |
| ८) | मुस्तक | कटु<br>तिक्त<br>कषाय | वायुअग्नि<br>वायु आकाश<br>वायु पृथ्वी | अरूचिहर<br>शीत | ग्राही | क्षारधर्मी<br>दीपन पाचन |

११) अध्वशोष :-

सततच्या प्रवासाचा परीणाम रक्ताच्या अनिष्ठातेवर वायुचे रक्तामधील गुण वाढल्याने प्लीहेमध्ये विकृत घटक संचित अध्वशोषाची निर्मिती होते यावेळी ते घटक शरीराबाहेर काढुन टाकण्यासाठी  गोक्षुरादी गुग्गुळाचा उपयोग होईल.

१२) व्रण :-

व्रणामध्ये अत्याधिक प्रमाणामध्ये क्लेद निर्माण घेऊन व्रणरोपण होत नसेल अशावेळी गोक्षुरादि गुग्गुळाचा वापर केल्याने क्लेदाचे उत्सर्जन होऊन व्रण भरून येण्यास मदत होते.

१३) हृद्रोग :-

कृमिज हृद्रोगामध्ये किंवा आमवाताच्या उपद्रवस्वरूप निर्माण होणाऱ्या हृद्रोगामध्ये गोक्षुरादी गुग्गुळाचा वापर होईल यामुळे कृमींना वृद्धी करिता अनुकुल असणाऱ्या भूमिचे शोधन होईल सोबत हृदयावर पडणाऱ्या अतिरिक्त ताण याने कमी होईल.

१४) उच्चरक्तदाब :-

रक्ताचे विस्त्रता व द्रवता हे गुण वाढुन रक्ताची घनता वाढल्याने रक्त वाहिन्यांमधुन पुढे ढकलण्यास हृदयास अल्पाधिक कार्य करावे लागल्याने उच्च रक्तदाबाची निर्मिती होते. यावेळी ही वाढलेली पार्थिवता जलामध्ये विरघळून मूत्रपिंडावाटे बाहेर टाकून उच्च रक्तदाब नष्ट होतो.

१५) अर्श :-

अर्श व्याधी मध्ये मलावष्टंभ असताना व अपान प्रतिलोम घेऊन शूल असता गोक्षुरादी गुग्गुळाचा वापर केल्याने यातील सरत्व असणाऱ्या गोखरु, त्रिफळा व धमासा यांनी मलावष्टंभ दूर होऊन वातानुलोमन होऊन वेदना नष्ट होतात.

१६) वातव्याधी :-

मूत्रपिंड विकृतीच्या परिणामी सिरा स्नायू यांच्या ठिकाणी आश्रय मिळल्यामे निर्माण होणाऱ्या वातव्याधीमध्ये या कल्पाचा वापर केल्याने विकृत दोष मूत्रपिंडावाटे शरीराबाहेर टाकले जाऊन वातव्याधी निार्माण होतात त्यावेळी या कल्पाचा वापर संप्राप्तिभंग करण्यास होतो. मूत्रावृत्त वात रक्तावृत्त असताना मूत्रप्रवृती व्यवस्थित करून वायूवरील आवरणे दूर करण्यास उपयुक्त ठरते.

१७) पूतिकर्ण :-

रक्तामध्ये वाढलेल्या विस्त्रतेच्या परिणामी कानामध्ये कफ दोष विदग्ध घेऊन पूतिकर्णाची निर्मिती होत असते यावेळी वारंवार पुय व शूल होत असतो अशावेळी गोक्षुरादी गुग्गुळाच्या प्रयोगाने विस्त्रतेचे निर्हरण होऊन कर्णाची शुद्धी होते व नि पुय निर्मिती बंद होण्यास मदत होते.

१८) अधिमंथ :-

अभिण्यंद व्याधीच्या उपेक्षेमुळे अधिमंथाची निर्मिती होते यामध्ये नेत्र मंथन केल्याप्रमाणे वेदना व नेत्रामध्ये दाब वृद्धी होऊन शिरशूल होतो अशा वेळी अतिरिक्त दाब कमी करण्यासाठी गोक्षुरादी गुग्गुळाचा उपयोग होतो.

वरील उपयोगांसोबत वृद्धी अष्ठीला व सांयक्लम यामध्ये मूत्रपिंड विकृती असता उपयुक्त ठरते.

## गोक्षुरादी गुग्गुळ ६ चातुर्थक

पाठ

१) गोक्षुरादी गुग्गुळ - १ भाग

२) चातुर्थक चूर्ण - १ भाग

कृती :

१) सर्व प्रथम गोक्षुरादी ग्ग्गुळाची निर्मिती करून घ्यावी (पान नं. ३०८) यानंतर चातुर्थक चुर्ण तयार करून घ्यावे ( पान नं. )

२) एका खलामध्ये गोक्षुरादी गुग्गुळ घालुन त्यामध्ये थोड्या थोड्या प्रमाणामध्ये चातुर्थक घालुन घोटण्यास सुरवात करावी ज्यावेळी सर्व चातुर्थक व गोक्षुरादी गुग्गुळ यांचा एकत्र बंध झाल्यानंतर औषध तयार झाले असे समजावे व त्याच्या गोळ्या करून वापराव्यात.

घटक द्रव्यांचे कार्य :-

१) गक्षुरादी गुग्गुळ

या औषधाचे कार्य सविस्तर वर्णन केले आहे. (पान नं. ३०८)

२) चातुर्थक :-

किरात तिक्त, अमृता, चंदन व सुंठ या चार द्रव्यांच्या एकत्री करणातुन तयार झालेल्या या औषधाचा वापर मेदोधातू मध्ये निर्माण झालेल्या विकृतीमध्ये करता येतो.

कर्मुकता :

'रक्तमेद प्रसादात वृक्कौ'

रक्त व मेद या धातूंच्या प्रसाद भागापासून वृक्काची निर्मिती झाली आहे. यामुळे वृक्काच्या रचनात्मक व कार्यात्मक विकृतींचा विचार करीत असताना या गोष्टीचा विचार करणे आवश्यक असते याबरोबरच मेदो धातूमध्ये निर्माण होणाऱ्या विविध व्याधींचा परिणाम या वृक्कावर घेतो कारण रक्त व मेद धातुपासूनच वृक्कांचे पोषण होत असते यामुळे मूत्रपिंडाच्या उत्र्सन या कार्यासाठी अडचण उत्पन्न होऊन रक्तामध्ये असणारी अशुद्धी बाहेर टाकणे अवघड होते या परिस्थिती मध्ये मेदोधातूचे ठिकाणी निर्माण झालेली विकृती दूर होऊन मूत्रपिंडे उत्र्सजनाचे कार्य व्यवस्थित करू लागतात.

रोगाधिकार:-

गोक्षुरादी गुग्गुळामध्ये वर्णन केलेल्या सर्व रोगांमध्ये याचा वापर होतो या सोबतच मेदोवृद्धी असताना त्याचे क्षरण करून बाहेर टाकण्यासाठी याचा वापर केला जातो.

मूत्राश्मरी:-

अश्मरीच्या हेतूंचे वर्णन करीत असताना सुश्रुताचार्य दिवास्वाप, समशन, अध्यशन, शीत, स्निग्ध व गुरू आहार सेवन यांचे वर्णण करतात ही सर्व कारणे शरीरामध्ये अग्निमांद्य निर्माण करणारी आहेत, आयुर्वेदाने मूत्राची निर्मीती होताना पक्वाशयाचा सुद्धा विचार केला आहे. यामुळे अश्मरीचा विचार करताना सुद्धा अग्निसंस्थेचा विचार आवश्यक असतो. अश्मरीच्या रूग्णामध्ये जाठराग्नि सोबतच धात्वग्नी सुद्धा बिघडलेला आढळतो यामुळे शरीरामध्ये निार्माण होणाऱ्या क्लेदामध्ये पार्थिव गुणधर्मांची वाढ होऊ लागते. मूत्रामध्ये तेज व आप या महाभूताचे आधिक्य असते शरीराचा क्लेद बाहेर टाकीत असताना अपाचित पार्थिव भाग त्या ठिकाणी साठू लागतो. ज्या प्रमाणे एका पाईपमधून गळून पाणी खूपच काळ येत राहिले तर त्या ठिकाणी संग दिसुन येतो त्याप्रमाणे वयूमहाभूताच्या अधिक्याने शुष्कता येऊन त्याचप्रमाणे वायूमहाभूताच्या अधिक्याने शुष्कता येऊन मूत्रवह स्त्रोतसाच्या अवकाशात पार्थिव स्वरूपात अश्मरीची निर्मिती होत असते.

अपानक्षेत्रामध्ये निर्माण झालेल्या या अडथळ्यामुळे वायु प्रतिलोमित होतो व बस्तिप्रदेशी आध्मान पीडा (शूल) थेंब थेंब स्वरूपी मूत्र प्रवृत्ती या स्वरूपाची लक्षणे निर्माण होऊ लागतात.

गोक्षुरादी गुग्गुळ व चातुर्थक यांच्या संतुक्त कल्पामुळे अश्मरीची वरील संप्राप्ति भंग होण्यास मदत होते.

महाभूतांचा विलीनीकरण क्रम पाहिल्यास पृथ्वी तत्व आपतत्वामध्ये विलीन होते व याक्रमाने आप तेजतत्वात तेज वायू व वायू तत्व आकाशा विलीन होत असते. याच सिद्धांताचा वापर चिकित्सा करीत असताना आपणास करावयाचा असतो.

वरील कल्पाध्ये अम्लता असणाऱ्या द्रव्यांचा समावेश आहे अम्ल रसाचे प्रीणन, भेदन व वातानुलोमन अशा तीन प्रकारची कार्ये आहेत.

याच्या भेदन धर्मामुळे अश्मरीच्या धन, गुरू, स्थिर व स्थूल गुणांची युक्त पार्थिव भागाचे भेदन होते यासोबतच वातानिलोमन या कार्यामुळे अपान वायूचे अनुलोमन होऊन अश्मरी खाली सरकण्यास मदत होते या सोबतच हा कल्प जल व तेज महाभूताची वृद्धी करणारा असल्यामुळे अश्मरी लवकर फुटते बेहडा व पाषणभेद ही दोन भेदन वर्गातील द्रव्ये या ठिकाणी सहाय्यभुत ठरतात.

परंतु सर्वच अश्मरीत याचा उपयोग होईल असे नाही कारण आयुर्वेदात एवादे औषध एका व्याधीचा सर्व प्रकारे नाश करेल असे नाही यासोबतच यकृत व प्लीहा यांचा विचार डावलुन चालणार नाही हे देखील निश्चित आहे.

मेदक्षयातील प्लीहाविकृती

'मेदसि स्वप्नं कट्याः प्लीहनो वृद्धीः कृशांगता।'

अ.ह.सू. ११-१८

मेदाचा क्षय निर्माण होऊन प्लीहेची वृद्धी होते, रक्त व मेद धातूच्या प्रसाद भागापासून वृक्काची निर्मिती होत असते. मेद धातूचा क्षय झाल्यानंतर त्याचा स्नेह, त्व या गुणांचा क्षय होतो यामुळे वृक्काचे योग्य पोषण होत नाही त्यामुळे त्या ठिकाणी वात दोषाचे रूक्ष खर गुणांची वृद्धी होऊ लागते यामुळे मूत्रपिंडाचे प्रमुख कार्य उत्सर्जन यामध्ये विकृत येऊ लागते रक्तामध्ये संचित असणारा विजातीय घटक द्रव्ये शरीराबाहेर टाकली जात नाहीत, त्यामुळे ती रक्तधातूच्या मूलस्थानी प्लीहेमध्ये संचित होऊ लागतात व प्लीहावृद्धी हे लक्षण दिसून येते. यावेळी मेदोधातुचे पाचन करण्यास किराईत अमृता, चंदन व सुंठ याचा वापर होतो यामुळे मेदामध्ये संचित असणाऱ्या विकृतीचे पाचन होऊन जाते व मेदधातूचा अग्नि व्यवस्थित होऊ लागतो. यावेळी पाचन केलेली विषद्रव्ये मूत्रपिंडाकडून शरीराबाहेर टाकली जाऊ लागतात व प्लीहा वृद्धी हे लक्षण कमी होते.

# गोक्षुरादी गुग्गुळ + महामृत्युंजय रस

घटक

१) गोक्षुरादी गुग्गुळ - १ भाग

२) महामृत्युंजय रस - १ भाग

कृती :

१) सर्व प्रथम विधीवत गोक्षुरादी गुग्गुळाची निर्मिती करावी (पान नं. ३०८)
या बरोबर महामृत्युंजय रसाची तयारी करावी (पान नं. )

२) खलामध्ये गोक्षुरादी गुग्गुळ घ्यावा त्यामध्ये थोडाथोडा महामृत्युंजय रस टाकून घोटत रहावे.

३) सर्व मिश्रण एकजीव झाल्यानंतर त्याच्या गोळ्या बनवून सुकवाव्यात व बाटलीत भरून ठेवाव्यात.

घटक द्रव्यांचे कार्य :-

१) गोक्षुरादी गुग्गुळ

या द्रव्याचे संपूर्ण कार्य मागे वर्णन केले आहे. (पान नं. ३०४)

२) महामृत्युंजय रस :-

महामृत्युंजय रसाचा रागाधिकार जीर्णज्वर असा वर्णन केला आहे. महामृत्युंजय रसामध्ये जयपालाचा समावेश आहे यामुळे याचा उपयोग कोष्ठ शुद्धी होण्यास या कल्पाची मदत होत असते.

कर्मुकता :-

‘अपानो डपानग:श्रोणिबस्तिमेढ्रू उरूगोचर: ।
शुक्रार्तव शकृन्मूत्र गर्भनिष्क्रिमण क्रिय: ।।’

वा. सू.

अपान वायूचे प्रमुख कार्य हे शुक्रार्तव मल मूत्र यांचे शरीरामधून असणारे उत्सर्जन आहे. यामध्ये शुक्र व आर्तव यांचे निष्क्रमण कायम होत नसते परंतू मल व मूत्र यांचे निष्क्रमण नियमित चालू असते.

महामृयत्युंजय रसामध्ये असणारा जेपाळ मल शोधन करणारा आहे याच्यामुळे आंत्रगत स्त्रावाची वृद्धी होते मलाची वटक बनण्याची प्रवृत्ती नष्ट होते याबरोबरच गोक्षुरादी गुग्गुळामध्ये असणारी रक्तातील विषारी द्रव्ये उत्सर्जन करण्याची क्रिया सुकर होते यामुळे अपान कक्षेमध्ये निर्माण होणारे स्पार्शासहत्व दूर होते. मूत्रपिंडाची सूज कमी होऊन ते चांगल्या प्रकारे कार्य करू लागते.

रोगघ्नता :-

१) जवर

ज्वरामध्ये अग्निमांद्य निर्माण झालेले असते. यावेळी यकृतामध्ये असनारे क्षार पित्त योग्य प्रमाणात स्त्रवत नसतो पण याचवेळी धात्वग्नि मात्र तीव्र झालेला असतो आमदोषामुळे स्वेदवह स्त्रोतसांचा अवरोध निर्माण होतो. तेज या महाभूताची विकृत स्वरूपामध्ये वृद्धी झालेली असते हे तेज शरीरामधून बाहेर काढून टाकणे आवश्यक असते, मूत्रामध्ये तेज व आप हे महाभूते अधिक्याने असतात. या कल्पामध्ये असणाऱ्या गोक्षुरादी गुग्गुळामुळे आप हे महाभूत वाढविले जाते यामुळे तेज या महाभूताची तिव्रता कमी होऊन ते जलाशी मिश्रित होऊन शरीराबाहेर टाकले जाते.

याचवेळी अन्नवह स्त्रोतसाचा विचार करताना अग्निमांद्यामुळे आहारवर अयोग्य संस्कार झाल्यामुळे पक्वाशयात निर्माण होणारा मल तेथील अवकाश व्यापू लागतो.

अशावेळी वायूची गती प्रतिलोम होऊन तो सर्व वायूंना दुष्ट करून परतत अग्निमांद्य निर्माण करू लागतो. अशा वेळी पक्वाशयात संचित होणारा मल शरीराबाहेर घालवुन टाकणे आवश्यक असते महामृत्युंजय रसामध्ये असणाऱ्या जेवाळा शारख्या औषधामुळे मलशुद्धी होऊन वातानुलोमन होते.

अशा प्रकारे या कल्पाचा पूरक स्वरूपामध्ये वापर ज्वरघ्न म्हणून करता येतो.

पांचभौतिक पद्धती प्रमाणे रूग्णाचे उदर परीक्षण करत असताना मूत्रपिंडाच्या ठिकाणी जोरदार वेदना व सूज असते या सोबतच बद्धकोष्ठात असताना कल्पाचा चांगला वापर होतो.

# सिंहनाद गुग्गुळ

सिंहनाद कृती :-

१) सर्व प्रथम सुवर्णमाक्षिक भस्म (पान नं. ९१), शुद्ध गंधक (पान न. ३९)
व शुद्ध गुग्गुळ (पान नं. १६८) दिलेल्या प्रमाणात घ्यावा.

२) एका खलामध्ये सुरवारी हिरडा, बेहडा आणि आवळा यांचे एकत्र चूर्ण करून घ्यावे.

३) माक्षिक व गंधक उष्णतेने जळण्याची शक्यता असते. याकरिता एका लोखंडी पात्रामध्ये वाळु भरावी.

४) ते पात्र चुलीवर ठेवावे त्यावर लोखंडी कढई ठेवावी. सुवर्णमाक्षिकभस्म, शुद्ध गंधक (माक्यामध्ये) व शुद्ध गुग्गुळ बारीक
करून कढईमध्ये टकावा.

५) या तयारीनंतर त्यामध्ये उरंडेल तेल ओतावे (थोडे थोडे) व मंदाग्नि (पान नं. ) सुरू करावा.

६) लोखंडी उलथण्याच्या सहाय्याने सर्व मिश्रण हलवित रहावे गुग्गुळासारखा पदार्थ खाली चिकटून राहण्याचा संभव असतो

७) अग्नि देताना गंधकाचा वास येत असल्यास तो जळत आहे हे लक्षात घेऊन होण्यास कमी ठेवावा.

८) मिश्रणाचे पचन होण्यास अधिक वेळ लागत असतो. एरंडेल तेल एकदम न घालता थोड्या-थोड्या प्रमाणात घालावे.

९) सर्व तेलामध्ये व्यवस्थित पचन झालल्यानंतर मिश्रण खाली उतरवून अग्नि बंद करावा.

१०) सर्व मिश्रण थंड झाल्यानंतर त्यामध्ये त्रिफळाचूर्ण मिसळावे

११) मिश्रण करून खलामध्ये घ्यावे, बत्यास तुप लावून घोटावे

१२) घोटून झाल्यानंतर एका परातीमध्ये तुप लावुन वाळवावे वाळवित असताना सारखे पसरावे

१३) वाळत आल्यावर गोळ्या कराव्यात संपूर्ण वाळल्यानंतर बाटलीत भरून ठेवावे.

## सिंहनाद गुग्गुळ

पाठ संदर्भ:-

‘फ्लत्रयं कषाययस्य त्रिफलाया: सुचुर्णितम् ।
सोगन्धिल पलं चेक कौशिकस्य पलं तथा ।।
कुडवं चोरूबुकस्य तैलमादाय यत्नत ।
पाचप्त्पाक विद्वैद्य: पात्रे लोहमये दृढे ।।’
थो.र. आमवात चिकित्सा

पाठ बदल

| द्रव्य | प्रमाण |
|---|---|
| १) सुवर्ण माक्षिक | ४ भाग |
| २) सुहिरडा चूर्ण | १ भाग |
| ३) बेहडा चूर्ण | १ भाग |
| ४) आवळा चूर्ण | १ भाग |
| ५) शुद्ध गंधक (माका) | १ १/२ भाग |
| ६) शुद्ध गुग्गुळ | १ १/२ भाग |
| ७) एरंडेल तेल | ६ भाग |

कृती:-

१) सर्व प्रथम सुवर्ण माक्षिक (पान नं. ९१) गंधक शोधन माक्याचे (पान नं. ३१) व गुग्गुळ शोधन त्रिफळ्यामध्ये (पान नं.
१६८) करून घ्यावे.

२) यानंतर एका खलात सु. हिरडा, बेहडा व आवळा यांचे चूर्ण एकत्र करून घ्यावे माक्षिक व गंधकावर उष्णतेचा परिणाम
होतो म्हणून वाळू लोखंडी कढई वापरवित.

३) एक लोखंडी कढई घ्यावी त्यामध्ये पाठातील प्रमाणाप्रमाणे औषधे घ्यावीत वाळू असलेल्या लोखंडी पात्रात कढई ठेऊन पात्र चुलीवर ठेवावे.

४) सवर्ण माक्षिक भस्म, गंधक, गुग्गुळ घेऊन त्यामध्ये एरंडेल तेल टाकावे (माक्षिक पेट घेण्याची शक्यता असते यामुळे

येथे कौशल्य लागते.)

५) यांनतर मांदाग्नि (पान नं.    ) सुरू करावा.

६) लोखंडी उलथण्याच्या सहाय्याने सर्व मिश्रण अ्ण्वण्यास सुरवात करावी, यामध्ये गुग्गुळासारखा खाली चिटकून राहणारा

पदार्थ आहे हे लक्षात ठेवावे.

७) अग्नि देत असताना जर गंधकाचा वास येत असेल तर तो अग्नि जास्त झाला आहे व गंधक जळत आहे असे समजावे

याकरिता अग्नि व्यवस्थित ठेवणे सिंहनाद करताना आवश्यक आहे.

८) मिश्रण आटण्यास खुप वेळ लागतो एरंडेल तेल एकदम न घालता थोडे थोडे घातल्यास लोखंडी पळईने हलवणे सोपे जाते.

९) सर्व तेल आल्यानंतर अग्नि विझवून मिश्रण खाली उतरवून घ्यावे त्रिफळ चूर्ण मिसळून घोटावे व एका परातीत तूप लावून

पसरून ठेवावे.

१०) मिश्रण थंड झाल्यानंतर त्याच्या गोळ्या करून वाळवून घ्याव्यात व बाटलीमध्ये भरून ठेवाव्यात.

घटक द्रव्यांचे कार्य

१) सुवर्ण माक्षिक भस्म

मधुर तिक्त रसात्मक वायु आकाश व पृथ्वी आप महाभूत प्रधान्य असणाऱ्या सुवर्ण माक्षिकाने होते सोबतच घटक द्रव्यामध्ये असणारा गंधक हा उष्ण प्रकृतीच्या रूग्णांना मानवत नाही माक्षिकाच्या शीत गुणामुळे गंधकाच्या आळा बसतो व उष्ण प्रकृतीच्या रूग्णास तो सहय होतो.

आमवातामध्ये आमपचन करण्याची चिकित्सा करताना रक्तक्षयाची अवस्था निर्माण होते ती अवस्था लक्षात घेऊन माक्षिकाची या पाठामध्ये योजना करण्यात आली आहे.

माक्षिकाचे शोधन उरंडेल तेलामध्ये केल्याच्या परिणाम स्वरूपी माक्षिका जडत्व कमी करून सरत्व निर्माण होते आमवाताच्या रूग्णास उपयुक्त ठरते.

२) त्रिफळा चूर्ण :

पंचरसात्मक व सर गुणात्मक असणाऱ्या त्रिफळा चूर्णाने या कल्पाचे गामित्व गुह्य प्रवेशाकडे वाढवले जाते, आम निर्मितीचे प्रमुख स्थान असणाऱ्या आमाशयावर कार्यकारी घेऊन आम पक्व करून अधोमार्गाने पक्व करून पाठवले जाते या अनुलोमन प्रक्रियेच्या परिणामी यकृताच्या ठिकाणी निर्माण झालेली घनता स्थिरता मोडीस लागते.

३) गंधक :

माक्यामध्ये शुद्ध केल्याने गंधकाच्या पाचन धर्मामध्ये अधिक प्रमाणामध्ये वृद्धी होते. आमाचे स्वरूप हे पृथ्वी व आप महाभूतात्मक घटकांनी होत असते या अपाचित आमाचे पचन गंधकाच्या सहाय्याने होतो व इतर द्रव्यांनी हे पक्व झालेले घटक शरीराबाहेर टाकण्याचे कार्य होते.

४) एरंडेल :

‘आमवातगजेन्द्रस्य शरीरवनवारिण:।
एकमेवग्रहणीर्हन्ता एरण्डगजकेसरी ।।’

मधुर तिक्त कटु रसात्मक सूक्ष्म, तीक्ष्ण, उष्ण या तेज आकाश महाभूत प्रधान गुणांनी युक्त असणाऱ्या एरंडेल तेलामध्ये आप महाभूताकडे असनारे सरत्व आल्याने व स्त्रोतोमुख विशोधन या कार्यकरित्वाने आमावृत्त वातामध्ये या तेलाचा प्रमुख उपयोग होतो.

पार्थिव धर्माच्या आधिक्याच्या परिणाम स्वरूपी पृथ्वी व आप महाभूतात्मक अशा घटकांनी निर्माण झालेला स्त्रोतोरोध नष्ट करण्याचे कार्य या तेलाने होते. अनुलोमन वा विरेचन या गुणाने पक्व झालेल्या आमाचे शरीराबाहेर योग्य प्रकारे निस्सरण केले जाते व प्रतलिामित वायूचे अनिलोमन होऊन व्याधी नष्ट होतो.

या तेलाचे कार्यक्षेत्र हे दोषांचे मूळस्थान असल्याने व्याथी नष्ट होण्यास याचा उपयोग होतो. वाताचे अनुलोमन पित्ताचे अधोमार्गाने निस्सरण व कफाचे शोधन यामुळे आमवातामध्ये एरंडेल तेलाचा प्रमुख उयोग होतो.

माक्षिकाच्या योगाने रसवह स्त्रोतस पर्यंत स्त्रोतो विशोधन गुणधर्माचा उपयोग होतो.

५) शुद्ध गुग्गुळ:

गुग्गुळाकडे असणाऱ्या सरत्व व पाचन या गुणधार्माची वृद्धी करून या आमाचे पचन स्त्रोतोशोधन व अनुलोमन करण्याचे कार्य होते.

कर्मुकत्व:

'वायुनाप्रेरितो ह्यामं श्लेष्मधानं प्रधावति।
तेनात्यर्थ चिदग्धोऽसौ शमनी प्रतिचद्यते ।।'
मा. नि. (आमवात)

विरूद्धाशन व्याधी निर्मितीमधील प्रमुख घटक चरकाचार्यांनी विरूद्धाहाराचे १७ प्रकार आत्रेयभद्रकाव्यीय अध्यायामध्ये वर्णन केले आहेत. अग्नि हा पचविणारा व शरीर घटकांमध्ये रूपांतर करणारा प्रमुख घटक हा अग्नि जर मंद झाला तर आहाराचे शारिरीक पांचभौतिक घटकांमध्ये होणारे रूपांतर करण्याची निर्मिती होते अशा घटकास आम अशी संज्ञा दिली जाते.

या आमाचे स्वरूप पिंक्रिल असून स्त्रोतसांमध्ये अभुव्यंद निार्मण करण्याची घटना होते यामुळे अग्निवर आवरण येऊन अग्निमांद्य होते. सार, किट्ट विभाजन अयोग्य झाल्याने व सोबत व्यायामासारख्या वातप्रकोपक विहाराचे सेवन केल्याच्या परिणामी वाताची गती प्रतिलोमित चिहाराचे सेवन केल्याच्या परिणामी वाताची गती प्रतिलोमित होते व या वायूच्या गतीमध्ये अडथळा आणणारा हा अपाचित पृथ्वी व आप महाभूतात्मक घटक वायूच्या सहाय्याने शरीरामध्ये आपल्या सारक्या गुणांनी समान असणाऱ्या श्लेष्मस्थानी जाऊ लागतो, हे अपाचित घटक यकृताच्या ठिकाणी सर्व प्रथम संचित होऊम यकृतामधून स्त्रवणाऱ्या पित्ताचे सरत्व, द्रवत्व कमी करून या ठिकाणी घनता निर्माण करतो. यकृतरच अग्निमांद्य निर्माण करून हा आम अवलंबक कफाच्या स्थानी येतो. आधी आमाशयामध्ये क्लेदक कफाची दुष्टी झाल्याने (पोषक दोष) अवलंबक या पोष्य दोषाची दुष्टी होते.

श्लेष्मप्रधान अशा सरधातुच्या सहाय्याने तो आम सर्व शरीरभर फिरवण्याचे कार्य केले जाते पण अपाचित घटकांचे शरीरस्य धातूमध्ये परिवर्तन न झाल्याच्या परिणामी स्त्रोतसामध्ये मोठ्या स्वरूपामध्ये अवरोधाचि निर्मिती होते व सर्व शरीरभर पसरून विविध स्वरूपाच्या वेदना निर्माण करू लागतो.

पित्ताचे सरत्व कमी झाल्याने मल पक्वाशयामध्ये संचित होऊन अपान वायूची गती प्रतिलोमित करतो वायुच्या द्रुतत्वाचा परिणाम म्हणून हा आम सर्व शरीरणर रसधातूमधून पसरू लागतो.

परिणामी अंगमर्द, अरूचि, तृष्णा (विदग्धावस्था) आलस्थ, गोरव या सारखी लक्षणे निर्माण होतात ही सर्व आमाने स्त्रोतसे अवरूद्ध केल्याचीच लक्षणे आहेत. रस वह स्त्रोतस दुष्टूच्या परिणामी ज्वराची प्रमुख लक्षण या स्वरूपामध्ये निर्मिती होत.

मेद हा सुध्दा कफाचा प्रमुख आश्रय असल्याने रक्त व मेद या धातूंच्या प्रसादभूत भागांपासून निर्माण होनाऱ्या वृक्‍काचे पोषण या आमाने घेऊन मूत्रपिंडाना सूज येते.

रक्तनिर्मिती होणारी प्लीहा या आमाच्या शीत गुणाने अकार्यक्षम होते व या पार्श्वभुमिवर आमवात रूपी गजेद्राच हल्ला मनुष्यावर होतो.

या व्याधीमध्ये संधी प्रदेशी असणाऱ्या श्लेषक कफामध्ये अत्याधिक आम संचितीच्या परिणामी संधीधील शोथ व उष्ण स्पर्शता या सारख्या लक्षणांची निर्मिती होते.

अत्याधिक आमाची संचिती आमाशयामध्ये झाल्यास क्लेदक उत्वलेश होऊन प्रसेक (बोधक कफ) अरोवक वमन या लक्षणांची निर्मिती होते.

आमाने पित्ताचे सरत्व कमी होऊन मलावष्टंभ, भ्रम, मूर्च्छा अवयवांमध्ये जडता आनाह, शुल, या लक्षणाी निर्मिती होते.

पुढे अवलंबक कफाची दुष्टी होऊन हृदग्रहाची निर्मिती व हा आम शरीराबहेर टाकण्याच्या मूत्रपिंडाच्या प्रयत्नांमुळे अत्यधिक वारंवार मूत्रप्रवृत्ती या लक्षणाची निर्मिती होते.

रूग्णास सर्वास त्रासदायक घटना म्हणजे संधीशूल, आप महाभूताच्या आधिक्याने चलन वलनास आवश्यक तेज महाभूताच्या गुणांवर आवरण येऊन संधीग्रहासारखी लक्षणे निर्माण होतात व रूग्ण हालचाली करण्यास अकार्यक्षम बनतो.

स्त्रियांमध्ये ही रक्तगत सामता मासिक (रज-द्रवृच) स्वरूपामध्ये बाहेर टाकली जात असते व तिचे शरीर शुद्ध बनत असते परंतू विरूद्धाशनाचा हेतू प्रबल बनल्याने ही सामता शरीराबाहेर टाकली न गेल्याच्या परिणाम स्वरूपी गर्भाशयास सूज येऊ लागते व पुढे ही विषारे रक्तामध्ये संचित होऊन आमवाताची लक्षणे निर्माण होतात.

आमाने आवृत असणाऱ्या या वायूची प्रमुख चिकित्सा ही आमाचे पचन करून पक्व झालेला आम शरीसाबाहेर टाकणे या स्वरूपाची असते यामध्ये विरेचन या कर्माचा वापर करण्यास योगरत्नाकर चिकित्सा सूत्रामध्ये वर्णन केले आहे.

तिक्त कटी या वायु, आकश व अग्नि महाभुत प्राधान्याने असणाऱ्या द्रव्यांनी आमाचे वायूवर आलेले आवरन दूर करून वायूची गती प्राकृत करणे ही मुख्य चिकित्सा राहते.

स्नेहपान व विरेचन या गोष्टींचा विचार करताना शरीरास व व्याधीस विरोधी होणार नाही अशा स्वरूपाच्या स्नेहाची आवश्यकता असते असा स्नेह म्हणजे एरंडेल तेल होय, गुडुच्यादि वर्गात असल्याने अत्याधिक वापराच्या परिणामी सुद्धा त्राय बलक्षय करीत नाही व शरीरामध्ये महास्त्रोतस हेच प्रमुख कार्यक्षेत्र असल्याने पोषक दोषांचे आलेले  जाठराग्नि वरील आवरण दूर करून आम निर्मितीची प्रक्रिया नष्ट करण्याचे प्रमुख कार्य या तेलाने होते, सोबतच स्वतः जवळ

असणाऱ्या सुक्ष्म व स्त्रोतोविशोधन या गुणधर्माच्या सहाय्याने स्त्रोतसामध्ये निर्माण झालेल्या अभिष्यंदनाचे निर्हरण (मेदोधातूपर्यंत) या तेलाजवळ आहे माक्षिकामुळे याचे गामित्व प्राप्त होते.

धातूगत आमाचे पचन हा आमवात चिकित्सेमधील महत्वाचा भाग माक्याच्या रसामध्ये शुद्ध केलेल्या गंधकामध्ये वायू , आकाश व तेज या महाभूतांची अत्याधिक प्रमाणामध्ये वर्धन झाल्याने धातूगत आमाचे पचन करण्यासाठी याचा वापर होतो असा अपक्व आम पक्व होऊन त्रिफळ्याच्या सरत्व गुणाने शरीराबाहेर टाकीन दिला जाऊ लागतो. यामुळे यकृताच्या ठिकाणी झालेली घनता मोड्डु लागते व मलशुद्धी होते.

आम रसवह स्त्रोतसामध्ये निर्माण केलेल्या स्त्रोतोरोधाच्या परिणामी रक्तक्षयाची अवस्था निर्माण होते यावेळी रक्तवृद्धीकरिता माक्षिक भस्माचा वापर होतो अशा प्रकारे आम निर्मिती व प्रसाराची संप्राप्ति भंग पावते स्नेहामुळे वातानुलोमन होऊन शूल या लक्षणांची शांती व अग्निवरील आवरण नष्ट होऊन अग्नि प्रदीप्त होतो हा प्रदीप्त अग्नि शिल्लक आमाचे पचन करतो व भुकेची संवेदना रूग्णास जाणवू लागते आप महाभूताचे शीतत्व कमी झाल्याचे परिणामी संधीमध्ये निर्माण झालेला ग्रग दूर होऊन रूग्ण संधीच्या हालचाली करू लागतो आवरणामुळे आलेले संधीशूल हे लक्षण अवरोध दूर झाल्याच्या परिणामी नष्ट होते व निवचित पडलेल्या आमवाताचा रूग्ण सिंहरूपी या गुग्गुळाने व्यवस्थित चालू लागतो.

गर्भाशयाची निर्माण झालेली सूज एरंडेल तेलाच्या वातानुलोमनामुळे कमी होऊ लागते. माक्षिकामुळे रक्तवृद्धी होऊन रज-प्रवृत्ती प्राकृत होण्यास सुरवात होऊन

आमवाताची संप्राप्ति भंग पावते.

रोगाधिकार : फलश्रुती

हन्ति वातं तथा पित्त श्लेष्माणं खजपगुताम्‌ ।
श्वास सुदुर्जयं हान्ति कासं पचविध तथा ।।
कुष्ठानि वातरक्तंच गुल्मशूलोदरणानि च ।
आमवात जयेदडपि वैद्यविवर्जितम्‌ ।।
योगरत्नाकरा आमवात चिकित्सा

१) आमवात :
कार्मुकतेमध्ये वर्णन केले आहे.

२) खंजत्व / पंगुत्व

''वायु कटयाश्रित:सक्थ्न: कष्डरामाक्षिपेद्यदा ।
खंस्तदा भवेजन्तु: पंगु: सवय्योर्द्वयोर्वधात्‌ ।।''

कटयाश्रयी असणारा वायु हा मांड्याच्या कण्डरा आश्रित होतो यामुळे अनुष्य नीट न चलता लंगडतो त्या खंज व दोन्ही मांड्याच्या आश्रयाने पंगुत्व निर्माण होते.

या अवस्थेमध्ये अपान वायूच्या क्षेतामध्ये ही विकृती निर्माण होते यावेळी कण्डराश्रित वायुचे अनुलोमन करणे आवश्यक असते कण्डर या रक्तधातूच्या उपधातु असून रक्तदुष्टीची विरेचन ही प्रमुख चिकित्सा होते.

सिंहनाद गुग्गुळामध्ये असणाऱ्या द्रव्यांमध्ये एरंडेल तेल सोम्यरेचक व वातानुलोमन करते यासोबतच त्रिफळा गुग्गुळ यांच्या सरत्व या गुणाने रक्तामध्ये असणारी दुष्टी दूर होते खंजत्व व पंगुत्व असून आमावस्या असताना सिंहनाद गुग्गुळाचा वापर स्त्रोतोरोध दूर करून वातानुलोमन करण्यासाठी होतो व माक्षिकामुळे रक्तधातु निर्मिती योग्य होऊन कंडराचे व्यवस्थित पोषण होते.

३) श्वास :

श्वास या व्याधीमध्ये फुफ्पुसांमध्ये पार्थिव व आप महाभुतात्मक घटक संचित होऊन संग व वमिार्गगमन या स्वरूपाची संप्राप्ती निर्माण होते. कफ हा अत्यधिक स्वरूपात बाहेर पडत असतो पण निर्माण होण्याची प्रक्रिया थांबत नाही मलावष्टंभ असुन सकस रक्त निर्माण न होता आमावस्थेमुळे स्त्रोतोरोध असता सिंहनाद गुग्गुळाचा वापर होतो, यामध्ये गंधक हा पाचन करणारा असल्याने विकृत घटकांचे पचन होऊन संग दूर होतो, मलावष्टंभ एरंडेल त्रिफळा गुग्गुळ यांनी दूर जोऊन वातानुलोमन होते व माक्षिकामुळे रक्त चांगल्या प्रकारे निर्माण होऊन फुफ्फुकसांचे पोषण होते व स्वासाची संप्राति भंग होते.

४) कास :

कास या व्याधीमध्ये प्राणाची गती प्रतिलोमित झालेली असते ती प्राणवायूची गती अनुलोमन करण्यासाठी सिंहनाद गुग्गुळाचा वापर होतो, कफज कासामध्ये प्रामुख्याने व इतर प्रकारांमध्ये स्त्रोतोाध असताना उपयुक्त ठरतो.

५) कुष्ठ :

कुष्ठामध्ये ज्यावेळी रक्तदुष्टी प्रधान्याने व वायु तेज महाभुतांनी दुष्टी घडवुन आणली असता स्त्रोतोरोध असुन कुष्ठाचि आमावस्था असता सिंहनादाचा वापर होतो. गंधक हे कुष्ठहन (मार्क व शुद्धी) के असून विरेचन वा अनुलोमन अपेक्षित असताना उपयुक्त ठरते.

काही वेळा कुष्ठ व अस्थि संधी शूल अशा स्वरूपाचा व्याधी संकर दिसून येतो अशा वेळी या दोन्ही संप्राप्तिचा भंग करण्यासाठी संहिनाद गुग्गुळाचा वापर होतो.

७) वातरक्त :

वातरक्तामध्ये वायू महाभूताची व रक्त दोषाची वेगवेगळी दुष्टी होते व विस्त्रता अत्याधिक प्रमाणामध्ये वाढून हे दुषीत रक्त शारीरामध्ये संचार लहान संधीच्या आश्रयी जाऊन पर्वसंधी वेदना, शोथप्पर्शसहनत्व या लक्षणांची निर्मिती करते.

विरेच्य स्नेहयित्वादौ स्नेहयुक्तविरेचनै : ।

च.चि. २९ ।३८

चिकित्सेमध्ये स्नेहयुक्त विरेचन हे प्राधान्याने आवश्यक असते, अशा वातरक्ताच्या अवस्थेमध्ये सिंहनाद गुग्गुळ उपयुक्त ठरतो. एरंडेल तेलाने आवश्यक स्नेहयुक्तर्विरेचनाची प्रक्रिया पूर्ण होते व रक्तामध्ये वाढलेली वार्थिवता व उष्णता कमी होते वातानुलोमन होऊन संप्राप्तिभंग होतो.

वातरक्तामध्ये संधीशुल हे लक्षण प्रधान असला सिंहनादाचा वापर उपयुक्त ठरतो.

८) गुल्म :

वायुच्या प्रतिलोमनामुळे पित्त व कफ यांची दुष्टी होऊन गुल्माची निर्मिती होते यामध्ये आमावरचा - पच्यमान व पक्वावस्था यांचे वर्णन केले आहे. मार्गाविरोधाच्या परिणामी वायू एका ठिकाणी ग्रथित स्वरूपामध्ये गुल्म निर्माण करतो, यावेळी अरूची मल, मूत्र व वात यांची कृच्छ्रप्रवृत्ती आनाह या सोबत अन्ननाभिलाषा, अरोचक, अविपाक या सारखी आनावस्थेची लक्षणे दिसतात यावेळी वातानुलोमन करिता स्नेहयुक्त सिंहनादाचा वापर होतो गंधक, त्रिफळा व गुग्गुळ यांनी आमपाचन घेऊन स्त्रोतोरोध दूर होतो व एरंडेल तेलाने वाताचे अनुलोमन होते व गुल्म या व्याधीचा लंप्राप्ति भंग होतो.

९) शूल :

आनशूके क्रिया कार्याकफशुविनाशिनी ।

शेषमामहरं सर्व यदू यदू अग्निवर्दनम् ।।

आमज शूलामध्ये आमावृत्त वायूप्रमाणे लक्षणे दिसू लागतात यामध्ये आटोप, हल्लास, गुरूत्व, स्तैमित्य या प्रकारची लक्षणे दिसून येतात. यावेळी चिकित्सा करिताना वायूच्या मार्गातील आम काढून वातानुलोमन करणे या गोष्टींची आवश्यकता असते अशा वेळी गंधक, त्रिफळा यांचे पाचक व सर कार्य एरंडेलाने वातानुलोमन होते व शूल नष्ट होतो.

१०) उदर :

वातोदरं बलमत : पूर्व स्नेहैरूपाचरेत।

स्निग्धाय स्वेदितांगाथ दद्यात स्नहविरेचनम्।।

च.चि. १३ ।५७

वातोदरामध्ये स्निग्ध विरेचनाची अपेक्षा असते, ज्यावेळी स्त्रोतोरोध अधिक प्रमाणामध्ये असेल व मलावष्टभ असेल अशावेळी सिंहनाद गुग्गुळाचा वापर उदर रूग्णाच्या चिकित्सेकरिता करता येईल यामुळे पित्ताचे सरत्व वाढून मल शरीराबाहेर टाकून अग्नि वर्धन होईल व उदराचा संप्राप्ति भंग होईल.

## पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | सवर्णमाक्षिक भस्म | मधुर तिक्त | पृथ्वी जल वायू आकाश | वृष्य, लघू शीत | रसायन | रक्तधातु |
| २) | गंधक | कटु | वायू अग्नि | पाचन | सर, रसायन | त्वचा |
| ३) | त्रिफळा | पंचरसात्मक | - | रूच्य, लघू शीत | सर, मेहकुष्ठहर | यकृत गुद |
| ४) | एरंडेल तेल | मधूर तिक्त कटु | पृथ्वी जल वायु आकाश वायु अग्नि | उष्ण पिच्छिल गुरू | तीक्ष्ण सूक्ष्म | - |
| ५) | गुग्गुळ | कटु तिक्त कषाय | वायू अग्नि वायू आकाश वायू पृथ्वी | उष्ण, रूक्ष पिच्छिल विशद | सर रसायन | क्षारधर्मी |

# पंचकषाय गुग्गुळ

पाठ संदर्भ :

गुडुची आमलकीमुस्ता अर्थ श्लोक समापनः ।
कषाय शमयन्त्याशु पंचपंचविध ज्वरान ।।
च.चि.अ.३

पाठ

| द्रव्य | प्रमाण |
|---|---|
| १) गुळवेल चूर्ण | १ भाग |
| २) आमलकी चूर्ण | १ भाग |
| ३) नागरमोथा चूर्ण | १ भाग |
| ४) गुग्गुळ | १ भाग |

भावना :-

गुडुची, आमलकी व मुस्ता भरड

कृती :

१) सर्व प्रथम गुळवेल आवळकाठी व नागरमुस्ता यांची चूर्णे तयार करून घ्यावीत.

२) यानंतर गुळवेल आवळकाठी व नागरमोथा यांच्या भरडी १६ पाण्यात रात्रभर भिजत ठेवाव्यात.

३) सकाळी त्यांच्या १/४ पट शिल्लक राहीपर्यंत काढा तयार करून घ्यावा, व एका फडक्याने गाळुन घ्यावा.

४) यानंतर त्यामध्ये त्रिफळा्यात शुध्द केलेला गुग्गुळ टाकून रात्रभर झाकून भिजत ठेवावा (पान नं. १६८)

५) सकाळी तो सहाय्याने मिश्रण हलवत ठेवावे व पन्हळ पडु लागल्यास औषध तयार झाले असे समजून अग्नि बंद करून खाली उतरवून घ्यावे.

६) मिश्रण थंड झाल्यानंतर त्यामध्ये गुळवेल, आवळकाठी व नागरमोथा पूर्णे समभाग मिसळून गोळे करुन खलामध्ये घोटावे व एकजीव झाल्यावर त्याच्या गोळ्या तयार करून वाळत घालाव्यात वाळल्यावर स्वच्छ बाटलीमध्ये भरून ठेवाव्यात ताटास व बत्यास तूप लावण्यास विसरू नये.

घटक द्रव्यांची कार्ये :-

१) गुळवेल

गुळवेल तिक्त कटु रसात्मक, उष्णवीर्य, सर, लघू व रसायन गुणांची आहे. गुडुची ही प्रामुख्याने रक्तगामी असणारी वनस्पती आहे, शरीरास स्थिरता प्राप्त करून देणे हा याचा मुळ गुणधर्म आहे, स्थिर हा गुण पृथ्वी महाभूतामध्ये आहे. गुडुची चे उपयुक्तांग कांड आहे. याची रचना पाहिल्यानंतर शरीरामध्ये असणाऱ्या लांब व पोकळ अशा अवयवाची कल्पना येते. याची बाहेरील साल काढल्यानंतर ती हिरवा रंगाची व जाडसर असते. यामुळे ती अस्थि मज्जेवर कार्य करते.

याबरोबर गुळवेल ही जीर्णज्वरामध्ये वापरावयाची असते. याचे प्रमुख कार्य दीपन असून याचा वापर या ठिकाणी करावयाचा असतो. सर्व धातूंचे अग्नि वाढवते.

२) आमलकी :

अमलकी पंचरसात्मक शीत असून हरीतक्यादी वर्गामध्ये असणारी असून दोषांचे शोधन करणारी आहे. या वनस्पतीचा फळ हा उपयुक्त भाग असून यामुळे शुक्रधातूपर्यंत कार्य होते, या बरोबरच हरीतकीच्या गुणांना समान असल्यामुळे दीपन कार्य दिसून येते.

यामुळे ज्वरोत्पादक दोषांचे पाचन व शोधन घेण्यास मदत होते.

३) नागरमुस्ता :

मुस्ता हा कटु, तिक्त, ग्राही असणारा, शीत, सुगंधी असून कर्पुरादी वर्गातील इंद्रियांना स्थिरता देणारी अशी वनस्पती आहे. या वनस्पतीचे उपयुक्तांग मुळ हे आहे. यावरून या वनस्पतीमध्ये पृथ्वी व आप या महाभूतांचे आधिक्य दिसून येते पण तरीही ही वनस्पती ज्वरघ्न म्हणून अनेक कल्पांमध्ये वापरण्यास सांगितली आहे. याचे कारन ती वनस्पती दीपन, पाचन या गुणधर्मांनी युक्त आहे. यावेळी ती आम गामी होऊन आपल्या दीपन पाचन धर्माच्या सहाय्याने दोष व मलांचे पाचन करण्याचे कार्य करणारी आहे.

मुस्तावचाग्नि द्विनिशा.... मलपाचनाश्च ।। वा.सू.अ. १५ व मुरता संग्राहक दीपनीय पाचनीयानाम् (च.सू.२५)

वरील सूत्राचा विचार करताना मुस्ता मलपाचन करण्याचे कार्य करतो यासोबतच जलाची मात्रा वाढवून शरीराबाहेर टाकण्याचे कार्य करतो.

४) शुद्ध गुग्गुळ:

कटु, तिक्त, कषाय रसात्मक, उष्ण, सर, पिच्छिल, क्षारधर्मी सुगंधी असून संधान वर्गातील आहे.

वरील द्रव्यांना स्त्रोतोगामित्व प्राप्त करून देण्याबरोबरच अस्थि मज्जा धातूवर त्याचा संधान कर्माचा उपयोग या ठिकाणी होत असतो, यामुळे अस्थिधातूच्या ठिकाणी निर्माण होणारी विकृती दूर होते.

कार्मुकता:

अस्थिमज्जागत ज्वरावर वापरण्यास उपयुक्त असणारा हा कल्प अस्थिमज्जाश्रित सोष दुष्टीमुळे निर्माण होणाऱ्या व्याधीमध्ये सुद्धा फारच उपयुक्त ठरतो.

यामध्ये असणारी द्रव्ये अस्थिमज्जगामी व दीपन पाचन धर्मांनी युक्त आहेत. या दोन धातूंच्या ठिकाणी धात्वग्नि मांद्यामुळे निर्माण झालेला व्याधीत याचा वापर करता येतो.

या सोबत अस्थिधातूच्या ठिकाणी वात दोषाचा आश्रय असतो या वातदोषाच्या उपस्तंभीत वातव्याधीमध्ये या कल्पाचा उपयोग होईल असे वाटते.

यामधील द्रव्याचे पाचन होऊन ती मूत्रपिंडावाटे शरीराबाहेर टाकून देण्याचे कार्य या औषधामुळे होते यामुळे याचा वापर सर्वच वैद्यवर्ग मुक्त हस्ताने करतात.

अस्थि व मज्जाधातूच्या उपधातू मलाच्या विकृती सोबतच पाण्डु रोगामध्ये या कल्पाचा उपयोग होईल असे वाटते.

वृद्धवैद्यांनी यावर कारण गुळवेल व मुस्ता दोन वनस्पती रक्तगामी असुन पाण्डुमध्ये

असणारी रसरक्त दुष्टी पाचन धर्मांनी कमी करून वापरता येतील असे वाटते तरी वृद्ध वैद्यांनी यावर प्रकाश टाकावा.

रोगघ्नता:

१) चातुर्थक:

अस्थि व मज्जा या दोन धातूंच्या ठिकाणी विषमज्वर असताना या प्रकारचा ज्वर निर्माण होतो. यामध्ये ज्वरवेग ज्या दिवशी येतो त्याच दिवशी त्याचा विसर्ग होतो मध्ये दोन दिवस त्याचा शम असतो पण परत चौथ्या दिवशी ज्वराची निर्मिती होते. या ज्वरात शूल तोद, भेदवत वेदना, द्रवमलप्रवृत्ती, हिक्का, श्वास असा स्वरूपाची लक्षणे रूग्णाजवळ असतात.

यामध्ये असणाऱ्या दोषांचे पचन होऊन त्याचे मूत्रावाटे शरीराबाहेर उत्सर्जन केले जाते व ज्वराचे मान कमी होते.

२) वातव्याधी:

वात दोष हा अस्थिधातूच्या आश्रयाने राहतो. शरीरामध्ये वातव्याधी हे प्रामुख्याने दोन प्रकारचे असतात ते उपस्तंभित व निरूपस्तंभित होय. गुग्गुळ कल्प उपस्तंभित वातव्याधीमध्ये चांगल्या प्रकारे कार्य करतात.

यामध्ये वायूच्या प्राकृत वहनास संधीच्या ठिकाणी अडथळा निर्माण झाल्यामुळे त्या ठिकाणी संधी शूल हे लक्षण निर्माण होते अशावेळी तो अडथळा दूर करण्यासाठी त्या ठिकाणी दीपन-पाचन या कर्माची आवश्यकता असते. या कल्पामुळे अस्थि धातूच्या अग्निचे वर्धन होऊन वायु महाभुतावरील आवरण काढून ते बाजूला काढुन टाकले जाते व वायुची गती व्यवस्थित होते.

३) अस्थिविकृती :

वातरक्ता सारख्या व्याधीमध्ये अस्थिधातूच्या ठिकाणी विकृती होते, यावेळी शोथ, शूल, आरक्तवर्णता, उष्णस्पर्श यासारखी लक्षणे निर्माण होऊ लागतात.

अशा विकृतीमध्ये या कल्पाचा वापर करता येऊ शकतो, यामध्ये असणाऱ्या गुडुची व आमलकी या वनस्पती रक्तामध्ये असणारी दृष्टी दूर करतात तर गुग्गुळ व मुस्ता यांचे वातघ्न व पाचन कार्य चांगले होऊन वातरक्तासारख्या व्याधीत उपयश मिळतो.

४) अस्थिक्षय व अस्थिवृद्धी :

लक्षणे- अस्थिक्षयेऽस्थिशूल दन्तनरव भंगोरौक्ष्यंच ।

सु.सु. अ.१५

केश-लोम-नख-श्मशु द्विज प्रपानश्रम : ।
ज्ञेयमस्थिक्षये रूप सन्धिशैथिल्यमेव च ।।
च.सू.अ. १७

मज्जा क्षये ऽल्प शुक्रता पर्वभेदोऽस्थिनिस्तोदोऽस्थिशून्यता च
सु.सु.अ.१७
पर्वसु स्थूलमूलानि कुर्याकृच्छाव्यरूषिंच ।। वासू

अस्थि क्षयामध्ये शूल, दन्त, नख, रूक्षता, केस, लोम, नख, श्मश्रु यांचे गळणे तसेच संधीच्या ठिकाणी शिथीलता निर्माण होणे यासारखी लक्षणे निर्माण होतात.

या अवस्थेमध्ये अस्थि व मज्जा धातूच्या अग्निची अधिक प्रमाणात वृद्धी झालेली असते यामुळे तेषां साद ऽति दौप्तीभ्याच्या या सूत्रानुसार या ठिकाणी या विकृत अग्नि वृद्धी सम करणे अपेक्षित असते अशावेळी अस्थिपाचक योगाचा त्या ठिकाणी चांगल्या प्रकारे वापर होत असतो.

यामुळे अग्नि प्राकृत होऊन क्षय थांबतो.

या उलट अस्थि धातूच्या वृद्धीमध्ये ठिकठिकाणाची हाडे वाढणे, मज्जेमध्ये नेत्रांग गौरव, पर्व ठिकाणी वेदना अशी लक्षणे जाणवू लागतात यामध्ये इतर स्थानिक औषधांबरोबर याचा वापर करावा यामुळे निर्माण झालेले अग्निमांद्य दूर होऊन अस्थि वृद्धी नाहीशी होते.

५) पाळु :

अस्थि व मज्जा धातूच्या ठिकाणी निर्माण झालेल्या विकृती बरोबरच पाण्डु रोग निर्माण होण्याची शक्यता असते. या पाण्डुरोगात द्रवमलप्रवृती देत कृष्ण वर्णीय होणे अस्थि संधी शूल नेत्र बाहेर आल्यासारखे वाटणे या स्वरूपाच्या लक्षणांची उपस्थिती असते.

या अवस्थेत या योगाचा पाचक स्वरूपात वापर केल्यानंतर त्या ठिकाणी निर्माण होणारी अस्थिमज्जेतील विकृती दोषांचा पाक झाल्याने नष्ट होते. यामध्ये असणाऱ्या रक्तवृद्धीकर द्रव्यांनी रक्तधातूची वाढ होते व पांण्डु नष्ट होतो.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | गुळवेल | कटु<br>तिक्त<br>कषाय | वायु अग्नि<br>वायु आकाश<br>वायु पृथ्वी | रूक्ष, उष्ण<br>लघु | रसायन | दीपन |
| २) | आवळा | पंचरसात्मक | - | शीत | वृष्य, रसायन | अम्लधर्मी |
| ३) | मुस्ता | कटु<br>तिक्त<br>कषाय | वायु अग्नि<br>वायु आकाश<br>वायु पृथ्वी | शीत, रूक्ष | ग्राही<br>ज्वरघ्न | दीपन-पाचन |
| ४) | गुग्गुळ | कटु<br>तिक्त<br>कषाय | वायु अग्नि<br>वायु आकाश<br>वायु पृथ्वी | उष्ण, रूक्ष<br>सर | वृष्य<br>रसायन | संधानवर्ग<br>क्षारधर्मी |

# प्रयोदशांग गुग्गुळ

पाठ संदर्भ

आभाडश्वगंधा हवुषा गुडुची शतावरी।
गोक्षुर कंच रास्ना ।।
श्यामाशटी षोषवती यवानी स नागरा।
चेति सम विचूर्ण्यः।
सर्वे समं गुग्गुळुमत्र दत्त्वा कुर्यात्ततोडर्ध प्रणिधाय सर्पितः।।
यो.र.ग्रुथसी चिकित्सा

पाठ

| घटक | प्रमाण |
| --- | --- |
| १) बाभूळ साल चूर्ण | १ भाग |
| २) अश्वगंधा चूर्ण | १ भाग |
| ३) हपुषा | १ भाग |
| ४) गुडुची | १ भाग |
| ५) शतावरी चूर्ण | १ भाग |
| ६) गोक्षुर चूर्ण | १ भाग |
| ७) रास्ना चूर्ण | १ भाग |
| ८) अजमोदा चूर्ण | १ भाग |
| ९) कपुरकाचरी चूर्ण | १ भाग |
| १०) श्यामा चूर्ण | १ भाग |
| ११) मिश्रेया चूर्ण | १ भाग |
| १२) सुंठ चूर्ण | १ भाग |
| १३) शुद्ध गुग्गुळ | १२ भाग |
| १४) घृत | ६ भाग |

कृती :

१) सर्व प्रथम एक रात्रभर औषधांच्या भरडी १६ पट पाण्यात भिजत घालाव्यात व सर्वाची चूर्णे करून घ्यावीत.
२) सकाळी उठून त्याचा १/४ पट शिल्लक राहीपर्यंत क्वाथ तयार करावा यानंतर तो गाळून घ्यावा व त्यामध्ये शुद्धा केलेला
गुग्गुळ घालावा व रात्रभर ते मिश्रण झाकून ठेवावे (पान नं. १६८)
३) सकाळी तो काढा अग्निवर ठेवावा. यावेळी जर गुग्गुळाचे खडे झाले असतील तर ते हाताने फोडावेत यानंतर मंदाग्नि सुरू
करून त्यामध्ये ६ भाग शुद्ध घृत टकावे.
४) लाकडी चाटूच्या सहाय्याने सर्व मिश्रण हलवित रहावे गुग्गुळ आटू लागतो यावेळी पन्हळ पडेपर्यंत तो आखावा.
५) पन्हळ पडावयास लागल्यानंतर अग्निवरून खाली उतरून घ्यावा व थंड झाल्यानंतर त्यामध्ये वर तयार केलेली सर्व चूर्णे
टाकावीत मिश्रण एकजीव झाल्यानंतर त्याचे लहान गोळे तयार करावेत.
६) ते गोळे खलामध्ये घेऊन घोटावेत. यानंतर उन्हात वाळवून बाटलीत भरून ठेवाव्यात.

घटक द्रव्यांची कार्ये :
१) बाभूळ सालं :-

बाभूळ, कषाय रसात्मक शीत वीर्याची गुरू, रूक्ष असून वटादि वर्गामधील वनस्पती आहे. वटादि वर्गात असणाऱ्या वनस्पती सामान्यत स्थिर व स्थूल स्वरूपाच्या आहे. पांचभौतिक शरीराचा विचार करताना अशाच स्थिर व स्थूल स्वरूपातील अस्थि, मांस धातूवर शरीरचा डोलारा उबा राहत असतो यामध्ये वापरण्यात येणारी साल सुध्दा कठिण टणक अशा स्वरूपाची असते. कमी पावसाच्या ठिकाणी विपुल प्रमाणात आढणारी ही वनस्पती आहे. वायु या महाभूताची अधिक प्रमाणात वाढ झाल्यास साहजिकच पृथ्वी महाभूताचे स्थिरादी गुण कमी होऊ लागतात याचा वापर शरीरामध्ये असणारे पृथ्वी महाभूताचे गुणधर्म वाढण्यास मदत होते यामुळे शरीरात निर्माण करणारे वायू महाभूत स्वत :चे कार्य व्यवस्थित करण्यास सुरवात करीत असते.

२) अश्वगंधा :

अश्वगंधा मधुर, उष्ण, बल्य, रसायन, वृष्य, शोथहर असून गुडुच्यादी वर्गामध्ये असल्यामुळे शरीराला स्थिरता देणारी वनस्पती आहे.

अश्वगंधा या वनस्पतीच्या मुळाचा वापर येथे करावयाचा असून नावावरूनच या वनस्पतीकडे असणाऱ्या पार्थिवतेची जाणीव निर्माण होते. अश्वगंधा वायू महाभूताच्या रुक्ष चल या गुणांवर तिच्या स्थिर स्निग्ध गुणाच्या सहाय्याने नियंत्रण ठेवण्यास मदत करते, यबरोबर तिच्याकडे असणाऱ्या वृष्य धर्माने धत्तुवर्धन करून धातुक्षयात्मक वातवृद्धी नाहीशी करण्यास मदत करते.

३) हपुषा :

हपुषा तिक्त कषाय रसात्मक, उष्णवीर्य, मृदु, गुरू, सुगंधी असून हरितक्यादी वर्गामध्ये असणारी वनस्पती आहे, याबरोबरच वातासंबंधी व्याधी, गुल्म, शूल, ग्रहणी अर्श आदि व्याधीमध्ये या वनस्पतीचा वापर होतो.

वात दोषाचे अनुलोमन करण्यासाठी या वनस्पतीचा वापर होतो अनेक वात व्याधीत वायु आपली स्वत:ची गती सोडुन प्रतिलोमित होत असतो अशा वेळी त्याची गती व्यवस्थित करण्यास हपुषा वापरतात हपुषा दीपन व पाचक धर्माची आहे. या वनस्पतीचे फल चिकित्सेच्या दृष्टीकोनामधून महत्वाचे आहे.

४) गुडुची चूर्ण :

गुळवेल कटू, तिक्त, कषाय रसात्मक, उष्ण, धात्वाग्नि वर्धन रसायन असून शरीरास स्थिरता देणे हे या वनस्पतीचे मुख्य कार्य आहे.

वात दोषाच्या स्वैरगतीस विरोध करण्यास धातुंची योग्य निर्मिती होणे आवश्यक असते या परिस्थितीत गुडुची धात्वाग्नि वर्धन करते व त्यामुळे आहार रसाचे योग्य परिणमन होऊन धातूची पुष्टी होते.

५) शतावरी चूर्ण :

सर्व वैद्य परीचित अशि वनस्पती विद्यार्थी तर याच्या प्रेमातच पडलेले असतात, शतावरी कल्प तयार करणे हे यांचे आवडते कार्य असते.

शतावरी तिक्त मधुर रसात्मक, शीत वीर्याची गुरू, स्निग्ध, बल्य, अग्नि वर्धक, रसायन गुणांची असते. मांस धातूवर या वनस्पतीचे चांगले कार्य असून मांसधातूचे पोषण या वनस्पतीमुळे होते.

शरीरामध्ये ज्यावेळी क्षय निर्माण होतो त्यावेळी प्रामुख्याने अग्नि व वायु या महाभूताची वाढ होते व ही वाढ झालेली महाभूते आप व पृथ्वी महाभूताचे पचन करू लागतात. शतावरी रस रक्त व मांसधातूची दुष्टी करते व अग्नि व वायू महाभूतांचे शमन करण्यास कारणभूत होते.

६) गोक्षुर चूर्ण :

गोक्षुर मधुर रसात्मक, शीत, बल्य, बस्तिशोधन, वृष्य व दीपन कार्य करणारा आहे.

या सोबत स्निग्ध व मधुर रसाने वायु महाभूताच्या वृद्ध झालेल्या गुणांचे शमन करण्याचे कार्य या वनस्पतीमुळे होते. यासोबतच शक्तमध्ये निर्माण झालेले दोष शरीराबाहेर टाकण्याचे कार्य या चूर्णामुळे होते.

७) सस्ना चूर्ण :

सस्ना तिक्त, गुरू, उष्ण आमपाचनी असून वातदोषाच्या शमनाकरिता अधिक प्रमाणात याचा वापर होतो. हरतक्यादी वर्गात समाविष्ट असणारी ही वनस्पती शरीरामध्ये असणाऱ्या विकृत पृथ्वी व आप महाभूतांचे पाचन करून त्यांना शरीराबाहेर घालवते. तिक्त रसामुळे या औषधाच्या ठिकाणी सूक्ष्म स्त्रोतोगामित्व प्राप्त होते. तसेच तेज या महाभूताने वायू या महाभूताचे शमन होते, यामुळे मध्यम मार्गाश्रित व्याधींमध्ये या वनस्पतीचा उपयोग दिसुन येतो.

८) अजमोदा :

अजमोदा हे कटु, तिक्त रसात्मक, उष्ण, तीक्ष्ण, गुणांचा असून वृष्य, हृदय व दीपन पाचन धर्माचा आहे.

अजमोदा शरीरामध्ये प्रतिलोम स्वरूपामध्ये असणाऱ्या वातदोषाचे अनुलोमन करणारा आहे. यामध्ये असणारे उष्ण, तीक्ष्ण गुण वायूच्या शीत चल या सारख्या गुणांविरूद्ध कार्य करणारे आहेत. हरितक्यादी वर्गातील या वनस्पतीच्या ठिकाणी अशा स्वरूपाचा गुणधर्म आहे. याबरोबरच शूलघ्न कार्याचा अनेक ठिकाणी वापर करून घेतला जातो.

९) कपूर काचरी चूर्ण :

कपूर काचरी कटु, तिक्त, कषाय, रसात्मक, तीक्ष्ण, उष्ण, लघू गुणांची असून सुगंधी वनस्पती आहे. कपुर्रादी वर्गातील असून इंद्रियांना स्थिरता देण्यासोबतच शूलघ्न, दीपन, ग्राही धर्माची आहे. याबरोबर वायूचे अनुलोमन करण्याचे कार्य करणारी आहे.

१०) प्रियंगु चूर्ण (श्यामा) :

प्रियंग तिक्त, कषाय रसात्मक, शीत, दोर्गन्धनाशक असणारी ही वनस्पती कपूर्रादी वर्गामध्ये असणारी आहे. याचे सुद्धा प्रमुख कार्य वायुवर होते. वेदनेच्या ठिकाणी या वनस्पतीचा वापर केला जातो.

११) मिश्रेया :

कटु, तिक्त, रसात्मक, उष्ण वीर्याची, स्निग्ध पित्तकर असून वातानुलोमक व शूलघ्न कार्य करणारी आहे दीपन हा विशेष धर्म या वनस्पतीकडे आहे.

१२) सुंठचूर्ण :

सुंठ कटु रसात्मक, उष्ण, रूच्य, स्निग्ध असून पाचन हा विशेष धर्म या वनस्पतीकडे आहे ही क्षारधर्मी असून दोषांचे पाचन करून शोधन कर्म करते.

१३) शुद्ध गुग्गुळ :

गुग्गुळ सर धर्माचा योगवाही कार्य करणारा संधानकर असून वायुच्या स्वर, शूल, शीत आदी गुणांचे शामन करणारा आहे.

१४) धृत :

सर्व स्नेहामध्ये श्रेष्ठ स्वरूपात असणारे घृत मधूर असून अग्निदीपक व योगवाही आहे. आपल्याजवळ असणाऱ्या स्निग्ध गुणामुळे वायूच्या रूक्ष गुणांचे शमन करणारे असुन अस्थि व मज्जाधातूपर्यंत वरील औषधांना गामित्व प्राप्त करून देण्याचे कार्य यामुळे होते यासोबत वरील वनस्पतीमुळे शरीरामध्ये पित्तदोषाचे वर्धन होऊ नये याकरिता घृताचा वापर करतात.

अव्याहत गतीर्यस्थस्नास्थः प्रकृतिस्थित।

वायु:स्थात सोडधिक जीवेत वातरोग:समा:शतम्।।

वायु या महाभूताची शरीरामध्ये अव्याहत गती सुरू असते. या गतीमुळेच शरीरामध्ये सर्व क्रिया घडून येत असतात.

वातव्याधी प्रामुख्याने दोन प्रकारचे असतात. निरूपस्तंभित व उपस्तंभित पृथ्वी व आप या दोन महाभूतांच्या वृद्धीमुळे निर्माण होणाऱ्या अडथळ्यामुळे वायूच्या अव्याहत गतीस अडथळा निर्माण होऊ लागतो व त्या ठिकाणी प्रकोपाची लक्षणे दिसू लागतात.

याउलट निरूपस्तंभित प्रकारामध्ये वायू या महाभूताचा अवकाश प्रमाणापेक्षा अधिक वाढल्यामुळे त्या ठिकाणी वायूचे संचरण वाढू लागते पृथ्वी या तत्वाची घनता स्थूलता व आप या महाभूताचा ओलावा कमी होऊ लागतो यावेळी तेथे निर्माण झोलेल्या अवकाशामध्ये वायू फिरू लागतो व देवना उत्पती होते.

या दोन प्रकारच्या वातव्याधीची चिकित्सा करत असताना संकोच व विकसन या दोन क्रियांची तपासणी करणे आवश्यक असते. संकोच या अवस्थेमध्ये वायु महाभुतासोबतस पृथ्वी या महाभूताचे आधिक्य असते संकोचावस्थेमध्ये पृथ्वी या महाभुताचे घनता गुरूता आदि गुणधर्म असतात.

विकसन या अवस्थेत आकाश महाभूताच्या गुणांची वाढ झालेली असते. या सोबत वायूचे चलन योग्य प्रकारे चालावे या करिता त्या ठिकाणी आप या महाभुताची द्रवता अपेक्षित असते, जर त्या ठिकाणी अतिप्रमाणामध्ये आर्द्रता निर्माण झाल्यास स्तंभावस्या येत असते, यावेळी ती निर्माण झालेली आद्रता कमी करून वायूची गती व्यवस्थित करणे आवश्यक असते यामुळे ग्रहा वस्या निघून जाते वलन तत्वास तेजाची अपेक्षा असते.

त्रयोदशांग गुग्गुळ हा कल्प गृध्रसी रोगाधिकारात वर्णन केला आहे.

यामध्ये असणारी द्रव्यात वायूच्या रूक्ष गुणास विरोधी शतावरी गोक्षुरा साररव्या द्रव्यांचा स्निग्ध, लघू गुनास रास्ना, शतावरी, बाभूळ, हपुषा, अश्वगंधा यांचा गुरू गुण शीत गुणास अश्वगंधा हपुषा, गुळवेल, रास्ना, अजमोदा, गुग्गुळ या वनस्पतीचा उष्ण गुण, रवर गुणा विरूद्ध गुग्गुळ व घृतचा पिच्छिल, सूक्ष्म गुणाविरूद्ध बाभूळ, रातावरी, गुग्गुळ, प्रियंगु यांचा स्थिर गुण उपयुक्त असतो. प्रत्येक महाभूताची वृद्धी त्याच्या गुणांची असते, अशाप्रकारे या औषधाने वायू महाभूताच्या सर्व गुणांचा शम होतो. याबरोबरच वाढलेली शीतता कमी करून टाकली जाते व यामुळे हे लक्षण कमी होते व वायूच्या सर्व गुणांचा शम होऊन संप्राप्ती भंग होतो.

असा हा कल्प निरामावस्थेत व धातूक्षयजन्य अवस्थेत वापरका जातो.

रोगघ्नता :

कटिग्रहे गृध्रसी बाहुवृष्ठे हनुग्रहे जानुपद ग्रहेच ।
संन्धिस्थितेच अस्थिगते समीरे मज्जा श्रिते स्नायुगात डतिदुष्टे ।।
शूलद्रये पार्श्वाशीरोरूजायां मन्याग्रहे कष्ठह्रदिग्रहेच ।
त्रयोदशांग डयन्मति प्रशास्तो जयेतगदान वातकफप्रभुतान ।।
थो.र. ग्रृध्रसी चिकित्सा

१) गृध्रसी :

स्फकपूर्व कटिपिष्ठोरूजानुजंड् पदं क्रमात।
गृध्रसीस्तंभरूक्तोदै र्गृहण्याति स्पन्दते मुहु:।।
योगरत्नाकर

गृध्रसी या वातव्याधीच्या प्रकारामध्ये वायू व आप या दोन महाभूतांच्या ठिकाणी विकृत वृद्धी झाल्यामुळे कटि, पुष्ठ, उरू, जंघा तसेच पायाच्या ठिकाणी वेदना, स्तंभ, तोद सुई टोचल्याप्रमाणे वेदना निर्माण होतात तसेच त्याठिकाणी वारंवार स्पंदने आढळतात.

वंक्षण संधीच्या ठिकाणी शूल क्रियात्पता या सारख्या लक्षणांची दिसावयास सुरवात होते. गृध्रसीमध्ये वातज व वातकफज असे दोन प्रकार असतात. या ठिकाणी वात दोषाच्या वृद्धी धातुक्षयजन्य असता त्रयोदशांग गुग्गुळाचा वापर करता येतो.

२) कटिग्रह, हनुग्रह, जानुपादग्रह , मन्याग्रह व स्नायुगत वात

स्नायु हा पृथ्वी तत्वाचा अवयव असून याचे उपलेपन सर्व अस्थिवर झालेले असते या रुग्णांना परत वातवह नाड्यांकडुन चेतना मिळत असते कटि, हनु, जानु वा मन्या अशा अवयवांच्या हालचालींना वायु महाभूतासोबत आप व तेज या दोन महाभूतांची आवश्यकता असते मेदोधातूचे मुख्य कार्य पूरण असून ग्रहास्थेमध्ये वायु या मगाभूताची शीत गुणवृध्दी असते तसेच तेज महाभूताच्या ठिकाणी विकृती निर्माण होते व रूग्णास रंग लागते त्याला अवयव हलवता वेदण होतात अशावेळी धात्वग्निचे वर्धन करून वायु महाभूताची शीर्तत: कमी करून वात दोषाचा शम करण्यास त्रयोदशांग गुग्गुळाचा आभ्यंतर वापर करावा, ग्रहात अवयवाची हालचाल होते.

यामुळे तेज महाभूताचे नियमन होऊन शीर्तता कमी होऊ लागून ग्रह दूर होतो. बाह्योपचारासाठी या ठिकाणी तेजाच्या सहाय्याने वायू महाभूतांचेच नियमन केले जाते.

३) संधीगत वात:

संधीगत वातेचे सुद्धा निरूपस्तंभित व उपस्तंभित प्रकार आहेत

वातपूर्णद्वतिस्पर्श: शोथ: सन्धिगतेडनिले।
प्रसारणाकुंनयो: प्रवृत्तिश्च वेदना।।
च.चि. २८/३७

संधीशुल व संधीशोथ या दोन प्रमुख लक्षणांनी युक्त असणाऱ्या या प्रकारात संधी स्पर्शी वाताने भरलेल्या प्रखाली प्रमाणे जाणवते निरूपस्तंभित वा धातुक्षयजन्य प्रधान असणाऱ्या संधीगत वातामध्ये त्रयोदशांग गुग्गुळाचा उपयोग होतो.

४) अस्थि मज्जागत वात:

भेदोडस्थि पर्णणां सन्धिशूल मांसबलक्षय:।
अस्वप्न सतत: रूक्च मज्जास्थिकुपिते डनिले।।
यो.र./वातव्याधी

प्रकुपित वातदोष मज्जा व अस्थि ठिकाणी आश्रित झाल्यास अस्थि संधीत फुटल्याप्रमाणे देवना संधीधूल, मांस, बल व निद्रानाश संप्राप्तिनुसार प्रत्येक अवयवात अवकाश निर्माण झाल्यास त्याचे ठिकाणी वायु महाभुताच्या संचरणास सुरवात होत असते व तेथे आपल्या लक्षणांचे प्रकटिकरण करावयास सुरवात करत असते.

यावेळी त्तथोदशांग गुग्गुळाच्यामुळे वायु महाभुताचे शमन होतेच यासोबतच त्या ठिकाणी निर्मान झालेला अवकाश पृथ्वीतत्वाधिक्याने असणाऱ्या औषध व अनुपानांनी भरून निघतो, यावेळी बाह्योपचार स्वरूपामध्ये स्वेदनाचा वापर करावयास लागतो.

या प्रकारची रोगघ्नता असली तरी आयुर्वेदामध्ये निदानानुसार औषध बदलत असे यामुळे योग्य निदानाचे महत्व आहे उदा. स्त्रियांमध्ये मासिक पाळी संबधी निर्माण होणाऱ्या तक्रारी असतील व त्यानंतर जरा अवस्थेत निर्माण होणाऱ्या वातव्याधीत निदानाचा विचार अगत्याचा ठरतो.

पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | बाभूळ | कषाय | पृथ्वी वायु | शीत, रूक्ष | गुरू | पार्थिव |
| २) | अश्वगंधा | मधूर<br>तिक्त<br>कषाय | पृथ्वी जल<br>वायु आकाश<br>वायु पृथ्वी | लघु, स्निग्ध | स्वापजनक<br>वृष्य, रसायन | - |
| ३) | हपुषा | तिक्त<br>कषाय | वायु आकाश<br>वायु पृथ्वी | मृदु, गुरू | सुगंधी, उष्ण,<br>अनुलोमक | दीपन पाचन |
| ४) | गुळवेल | तिक्त<br>कटु | वायु आकाश<br>वायु अग्नि | रूक्ष | रसायन | दीपन |
| ५) | शतावरी | तिक्त<br>मधूर | वायु आकाश<br>पृथ्वीजल | गुरू, स्निग्ध | मांसकृत | दीपन |
| ६) | गोक्षुर | मधूर | पृथ्वीजल | स्निग्ध | अश्मरीहर<br>बस्तीशोधन | दीपन |
| ७) | रास्ना | तिक्त | वायुआकाश | उष्ण | गुरूवातहर | पाचन<br>क्षारधर्मी |
| ८) | अजमोदा | कटु | वायु अग्नि | उष्ण, तीक्ष्ण | वृष्य, हृदय | दीपन |
| ९) | कपूरकाचरी | कटु<br>तिक्त | वायु अग्नि<br>वायु आकाश | उष्ण, रूच्च | सुगंधी | दीपन |
| १०) | प्रियंगु | तिक्त<br>कषाय | वायु आकाश<br>वायु पृथ्वी | शीत | अनिलपित्तदृत | दुर्गधीहर वर्ग |

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| ११) | मिश्रेया | कटु | वायु अग्नि | उष्ण. लघु | तीक्ष्ण पित्तकृत | दीपन |
| १२) | शुंठी | कटु | वायु अग्नि | रूच्य, उष्ण | स्निग्ध | पाचन |
| १३) | गुग्गुळ | कटु<br>तिक्त<br>कषाय | वायु अग्नि<br>वायु आकाश<br>वायु पृथ्वी | उष्ण<br>सर | रसायन<br>पिच्छिक | संधान वर्ग |
| १४) | घृत | मधुर | पृथ्वी जल | अनुष्ण | योगवाही,<br>रसायन | दीपन |

मात्रा :- 250mg+500mg

अनुपान :- कोष्ण जल, यूष, मध, डिंक, मद्य, धातुक्षयजन्य वातप्रकोप बलाधि
सामता-दशमूलारिष्ट, बृहण-गोदुग्ध

महामंजिष्ठादी काढा गुग्गुळ :

कृती :

१) सर्व घटक द्रव्यांचे समप्रमाणात चूर्ण करून घ्यावे.

२) एका खलामध्ये सु. हिरडा + बेहडा + आवळा हा संयोग करून घ्यावा, यानंतर किराईत + खेतचंदन + सुंठ + अमृता (गुळवेल) यांचा संयोग करावा.

३) वरील दोन संयोग वेगळे ठेवावेत याचप्रमाणे क्रमाने पुढील संयोग करावेत.

४) पटोल + मुस्ता + कुटकी + इंद्रजव

सारीवा + पाठा + निंब + त्रिफळा (वरीलच वापरावा)

या प्रमाणे या संयोगाचा वेगळा झल झाल्यानंतर परत त्यांचा एकत्र खल करून घ्यावा.

५) हा खल पूर्ण झाल्यानंतर विंडग + बावचा + करंज + माका + मूर्वा + देवदा यांचा खल करून वरील मिश्रणात मिसळावा

त्यानंतर मंजिष्ठा + हरिद्रा + दारूहरिद्रा + खैर ६ सोहादा + पिंपळी यांचा खल वरूण + अतिविषा + वाळा + वचा + भारंगी +

चित्रक फ्तिपापडा यांचा खल करून वरील मिश्रणात मिसळावा. कंडुइंद्रावण + निशोत्तर + बहावा या त्रयीची खल करून

संयोग करून शेवटी शिल्लक शतावरी त्रायमाण धमासा अशाण रिंगणी वासा यांचा खल करून मिश्रण तयार करावे.

६) समभाग त्रिफळ्यामध्ये गुग्गुळ शुद्धी विधीवत करावी (पान नं. १६८) शुद्धी करताना पन्हळ पडु लागल्यानंतर गुग्गुळ

खाली उतरवून घ्यावा.

७) त्यामध्ये वरील चूर्णे एकजीव करून घ्यावीत.

८) त्याचे बारीक गोळे तयार करून खालामध्ये घ्यावे बत्यास तूप लावून त्याच्या सहाय्याने घोटत रहावे.

९) घोटल्यावर ताटास तूप लावून वाळवावे गोळ्या करून अथवा तसेच चूर्ण बाटलीत भरून ठेवावे.

## महामंजिष्ठादी काढा गुग्गुळ :

### पाठ संदर्भ :

मंजिष्ठाकुटजामृता घनवचाशुष्ठीहरिद्रादुयं
क्षुद्रारिष्टपटोलतिक्त कटुकाभार्गी विडगंम्लिकम् ।
मूर्वादारूक लिडभृड् मगधात्रायन्ति पाठावरीगायत्री
त्रिफला किरातक महनिम्बासनारग्वधा:।।
श्यामाग्गुजचंदन वरूणक दन्तीकशाखोटक
वासा पर्पटसारीवाप्रतिविष नन्ताविशालाजलम्।।

### पाठ :

| | द्रव्य | प्रमाण | | द्रव्य | प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १) | मंजिष्ठा | १ भाग | २४) | असाणा | १ भाग |
| २) | नागरमोथा | १ भाग | २५) | चित्रक | १ भाग |
| ३) | कुडासाल | १ भाग | २६) | शतावरी | १ भाग |
| ४) | गुळवेल | १ भाग | २७) | त्रायमाण | १ भाग |
| ५) | कुष्ठ | १ भाग | २८) | पिंपळी | १ भाग |
| ५) | सुंठ | १ भाग | २९) | इंद्रजव | १ भाग |
| ७) | भारंगी मूळ | १ भाग | ३०) | वासा | १ भाग |
| ८) | रिंगणी | १ भाग | ३१) | माका | १ भाग |
| ९) | वेखंड | १ भाग | ३२) | देवदार | १ भाग |
| १०) | निंबत्वक् | १ भाग | ३३) | पहाडमूळ | १ भाग |
| ११) | हरिद्रा | १ भाग | ३४) | खैर | १ भाग |
| १२) | दारूहरिद्रा | १ भाग | ३५) | श्वेत चंदन | १ भाग |
| १३) | सु. हिरडा | १ भाग | ३६) | निशोत्तर | १ भाग |
| १४) | बेदडा | १ भाग | ३७) | वरूण | १ भाग |
| १५) | आवळा | १ भाग | ३८) | किराईत | १ भाग |
| १६) | पटोल | १ भाग | ३९) | बावची | १ भाग |
| १७) | कुटकी | १ भाग | ४०) | बहावा | १ भाग |
| १८) | मोखेल | १ भाग | ४१) | सोहाडा | १ भाग |
| १९) | डिंग | १ भाग | ४२) | करंजसाल | १ भाग |
| २०) | कडु इंद्रावण | १ भाग | ४३) | अनिविषा | १ भाग |
| २१) | धमासा | १ भाग | ४४) | वाळा | १ भाग |
| २२) | उपळसरी | १ भाग | ४५) | गुग्गुळ | ५ भाग |
| २३) | पित्तपापडा | १ भाग | ४६) | त्रिफळा | ५ भाग |

कृती :

१) सर्व प्रथम वरील प्रत्येक घटक द्रव्य घेऊन त्यांची समभाग चूर्णे तयार करून घ्यावीत.

२) गुग्गुळाची समभाग त्रिफळ्यामध्ये शुद्धी करून घ्यावी (पान नं. १६६)

३) शुद्धी करताना पन्हळ पडु लागल्यानंतर गुग्गुळ खाली उतरवुन घ्यावा व त्यामध्ये वरील चूर्णे मिसळून एकजीव करावीत.

४) यानंतर बरीक गोळे तयार करून घ्यावेत व खलामध्ये घोटावेत घोटताना बत्यास तूप लावावे.

५) घोटून झाल्यावर गोळ्या तयार करून ताटास तूप लावून त्यामध्ये वाळावयास घालाव्यात.

६) चांगल्या वाळल्यानंतर बाटललीत भरून ठेवाव्यात.

द्रव्यांचे कार्य :

१) मंजिष्ठा :

मधुर, तिक्त, कषाय, उष्ण असुन अम्लधर्मी आहे. रक्तप्रसादन करणे हे मुख्य कार्य या ठिकाणी अपेक्षित असुन वर्ण्य असल्याने रक्तदुष्टी दूर करते.

२) नागरमोथा :

तिक्त कटु रसात्मक, सुगंधी व जलीय असून तेज या महाभूताचे शमन करण्याचे सामर्थ्य असणारा आहे.

दीपन पाचन या मुख्य कर्माने शरीरातील दोषांचे पचन करणारा आहे.

३) कुडासाल :

कुटज कटु, कषाय, रसात्मक, रूक्ष, शीत असुन दीपन धर्माचा आहे. याचे कार्य कुष्ठजित असे सांगितले असुन सालीचा वापर त्वचेवर अधिक होतो.

४) गुळवेल :

तिक्त, कटु रसात्मक, लघु, उष्ण व रसायन असुन धात्वग्नि वर्धन करून शरीरास स्थिरता देण्याचे कार्य करणारी आहे.

५) कुष्ठ :

हा कटु, मधूर रसात्मक, लघू असून वातानुलोमन हा याचा विशेष धर्म आहे. हरितक्यादी वर्गात समाविष्ट असलेली ही वनस्पती रक्त व शुक्र या धातूवर कार्य कारणारी आहे, नावावरूनच व्याधी बोध होतो.

६) सुंठ :

कटु, उष्ण, पाचन या स्वभावाची असून अन्नवह स्त्रोतसावर मुख्य कार्य आहे, वातानुलोमन व ग्राही दोन कार्ये या वनस्पतीची या औषधात उपयुक्त आहेत.

७) भारंगी मूळ :

तिक्त, कषाय, रसात्मक, उष्ण, रूच्य, लघू असून दीपन-पाचन स्वभावधम ही वनस्पती आहे. कृमी नाशक, रक्तगामी असणारी आहे. दोषांचा पाचन करून शरीराबाहेर घालवण्याचे सामर्थ्य या वनस्पती जवळ आहे.

८) रिंगणी :

तिक्त कटु रसात्मक, दीपन, लघु, रूक्ष, उष्ण या गुणांनी युक्त असणाऱ्या या वनस्पती जवळ सर हा विशेष धर्म आहे. यामुळे पुरीषाचे शरीराबाहेर उत्सर्जन होण्यास मदत होते.

९) वचा :

तिक्त, कटु रसात्मक, उष्णवीर्य, अग्निवर्धन करणारी असून 'मलमूत्रविशोधनी' हा या वनस्पतीचा गुणधर्म या ठिकाणी उपयोगी पडतो.

१०) निबंत्वक :

कटु रसात्मक लघु, ग्राही, अह्रदय असणारा असुन वाग्भटोक्त मांसपाचक योगात वर्णन केलेला असुन त्याचे भांसधातूमध्ये असणाऱ्या दोषांचे पाचन करणे हा प्रमुख गुणधर्म या ठिकाणी अपेक्षित आहे.

११) हरिद्रा :

कटु, तिक्त रसात्मक, उष्ण, अम्लधर्मी असणारी हळद कृमीहन व वर्ण्य आहे. रक्तगामी असून त्वचेवर या वनस्पतीचे कार्य सर्वश्रुत आहे.

१२) दारू हरिद्रा :

तिक्त, कषाय रसात्मक, उष्ण, यकृत व रक्तधातु या दोन ठिकाणी असणाऱ्या व्याधीत या वनस्पतीचा वापर करतात. या वनस्पतीकडे छेदन व व्रण दोषकृत असे दोन धर्म या औषधात उपयुक्त ठरतात.

१३) त्रिफळा :

अम्लधर्मी वाग्भटांनी मांपाचक गणामध्ये वर्णन केलेला असुन कुष्ठासारख्या संतर्पणोत्य व्याधीमध्ये मांसधातूची दुष्टी असते त्यामुळे तेथील दोषांचे पाचन करून सर धर्माने शरीराबाहेर दोष काढुन टाकण्याचे कार्य तो करीत असतो.

१४) पटोल :

तिक्त रसात्मक, उष्ण, लघू व रूक्ष असुन, त्रिदोषघ्न, असुन मुळ विरेचक म्हणून तर फल स्त्रंसन कार्य करते. धातुपाचक योगामध्ये रस, रक्त व मांस या ठिकाणी पटोलाचा उल्लेख आहे या ठिकाणी निर्माण होणारी दुष्टी यामुळे नाहीशी होते दोष शोधन येते.

१५) कुटकी :

कुटकी च्या भेदन धर्माबरोबर रसधातु व रक्तधातु यांच्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या दुष्टी दूर करण्याचे काम कुटकी हे द्रव्य करीत असताना दिसते.

१६) मोरेवेल (मूर्वा)

मूर्ता मध्रुर, तिक्त, रसात्मक, गुरू, उष्ण असून सरधर्माची आहे. कृमीघ्न असून, वाग्भटांनी स्तन्यशोधन करणारी सांगितली आहे. याबरोबर रक्त दोषनाशक असून मूत्रगामी असल्यामुळे धातूमध्ये असणाऱ्या दोषांना मूत्रावाटे बाहेर काढुन टाकते.

१७) विडंग :

विडंग हे कटु, तिक्त रसात्मक, उष्ण, तिक्ष्ण असून अग्निवर्धन करणारे आहे. शरीरामध्ये असणारे कृमी बाहेर काढुन टाकण्याचे कार्य या औषधामुळे होते.

१८) कडु इंद्रावण :

तिक्त रसात्मक उष्ण, लघु, रूक्ष, तीक्ष्ण असून सर धर्माचे वामक व विरेचक कार्य करणारे आहे, यकृत व प्लीहा या दोन अवयवांवर मुख्यत: कार्य असूब रक्तशोधक आहे.

१९) धमासा :

कषाय, तिक्त, मधूर, रसात्मक, शीत, लघु व असून शरीरामध्ये आप महाभूताची वृद्धी करणारा आहे. हा क्षारधर्मी व अम्लधर्मी असून पित्तास्त्र कुष्ठकासजित या विशेष गुणधर्माचा आहे.

२०) सारीवा :

सारीवा ही मधुर, तिक्त रसाची शीत, गुरू, स्निग्ध असून आमविषहर व रक्तशोधन हे दोन गुणधर्म या ठिकाणी उपयुक्त पडणारे आहेत.

२१) फ्तिपापडा :

तिक्त रसात्मक, लघु, शीत, दाहनुत व संग्राही असणारा आमविषहर या विशेष गुणाने दोषांचे पाचन करणारा दीपन-पाचन वर्गातील आहे. यासोबत वर्ण्य आहे.

२३) चित्रक :

कटु रसात्मक, रूक्ष, उष्ण असुन दीपन-पाचन या धर्मासोबत ग्राही या विशेष गुणाचा आहे. याबरोबर हा भेदी व पित्तकर आहे.

२४) शातावरी :

तिक्त मधुर रसात्मक गुरू, शीत. मेध्य, स्निग्ध असून मांसधातुवर असणारे विशेष कार्य या ठिकाणी अपेक्षित आहे.

२५) त्तायमाण :

कषाय, तिक्त रसात्मक असणाऱ्या व भ्रमहारी या वर्गातील असणाऱ्या या वनस्पती जवळ पित्तकफनाशक व सर हे दोन विशेष धर्म या ठिकाणी उपयुक्त आहेत.

२६) पिंपळी :

कटु रसाची अनुष्ण असुन स्निग्ध व वृष्य गुणांनी युक्त आहे या वनस्पतीकडे दीपन स्वबाव धर्म असून रक्तधातुवर असणारे कार्य अपेक्षित आहे.

२७) इंद्रजव :

त्रिदोषघ्न, कटु, शीत व संग्राही असणारा कृमी किष्ठ वर्णन केलेला आहे. याचा दीपन हा स्वभाव धर्म आहे.

२८) वासा :

तिक्त, कषाय रसाचा शीत असणारा वासा स्त्रोतोरोध दूर करण्यासाठी उपयुक्त ठरतो.

२९) माका :

तिक्त, कटु रसात्मक, रूक्ष, लघु असणारा माका त्वचागामी असुन क्षारधर्मी आहे. त्वचारोगात याचा वापर सर्वश्रुत आहे.

३०) देवदार:

तिक्त, कटु रसात्मक लघु, स्निग्ध असुन रस रक्त गामी असून कृमी विधातकर व वायु माहभुताचे शमन करणारा आहे.

३१) पाठा:

कटु रसात्मक उष्ण, तीक्ष्ण, असुन रक्तपाचक गणात वर्णन केलेला आहे. यासोबत अग्नि साम्य करणारा व कृमीघ्न आहे.

३२) खदिर:

तिक्त, कषाय रसात्मक, शीत, स्तंभन करणारा असुन दुर्गधीहर आहे. विस्त्र गुणाच्या आधिक्यामध्ये वापरायचा असतो.

३३) श्वेतचंदन:

तिक्त मधूर रसात्मक लघु, रूक्ष, शीत दाहनाशक, ग्राही, वृष्य, रक्तप्रसादक आहे. दुर्गधीनाशन हे कार्य करून इंद्रियांना सुख देतो.

३४) निशोत्तर:

मधुर रसात्मक, उष्ण, दाहनाशक असुन विरेचक आहे. याचा समावेश ब्रमहारी वर्गात असुन मद मूर्च्छहिर हा विशेष धर्म आहे. मलावष्टभ दूर करून आंत्रशुद्धीस मदत करते.

३५) वरूण:

कषाय, तिक्त, कटु, मधुर, रसाचा रक्तदोषहर असुन मूत्रोत्वत्ती करून दोषांना शरीराबाहेर टाकणारा आहे.

३६) किराईत:

किराईत तिक्त, लघु, रूक्ष असुन सर धर्माचा आहे या ठिकाणी त्याची कृमीघ्न व कुष्ठहर कार्ये अपेक्षित आहेत.

३८) बावची :

तिक्त कटु रसात्मक, उष्ण, लघु, रूक्ष असून अनुलोमन करणारी आहे. यामुळे स्त्रसंनासारखे कार्य होऊन कृमी पडुन जातात, रस रक्तगत दुष्टीमुळे निर्माण होणाऱ्या कृमीत याचा विशेष उपयोग होतो.

३९) बहावा :

मधुर रसात्मक, शीत, स्निग्ध असुन अम्लधर्मी आहे याचा स्त्रंसन हा गुण या ठिकाणी उपयोगी पडतो.

४०) सोहादा :

साहादा ही वनस्पती रक्तपित्त हर अर्श व अतिसार यात उपयुक्त आहे, तसेच वटादी वर्गातील असुन मांसादी धातूंना पुष्ट करते.

४१) करंजसाल :

तिक्त कटु रसात्मक, लघु, तीक्ष्ण असुन पित्तकर आहे. चरकाचार्यानी भेदनीय लेखनीय व कण्डुघ्न अशा तीन गुणांची युक्त सांगितली आहे या ठिकाणी त्वचेवर असणारे कार्य अपेक्षित आहे.

४२) अतिविषा :

आमविषहर हा गुणधर्म या ठिकाणी उपयुक्त ठरणारा आहे.

४३) वाळा :

तिक्त, मधुर असुन शीत स्तंभन, जलीय असणारा पाचन कार्य करणारा आहे.

कर्मुकता :

''संतर्पयाति यः स्निग्धैर्मधुरै गुरू पिच्छिलैः ।
नवान्नैर्नवमद्यैश्च मांसेश्चानुपवारिजैः।।
गोरसेर्गोडिकैश्चान्नेः पैष्टिकेश्चातिमात्रशः।
चेष्टाद्वेशी दिवास्वन्न शय्यासन सुखे रतः।।
रोगास्तस्योपजायन्ते संतर्पणनिमित्तजाः।''

च.सू.अ. २३।३।५

श्रेष्ठ चिकित्सक अशा चरकाचार्यांनी संतर्पणीय अपतर्पणीय अध्यायामध्ये संतर्पणोत्य व्याधीचे हेतु वर्णन केले आहेत यामध्ये असणारा हेतुच्या सेवनामुळे शरीरामध्ये पृथ्वी आप या महाभुताच्या गुणांची विकृत वाढ होऊ लागते अग्निमांद्य निर्माण होऊन अवस्थापाक व्यवस्थित होत नाही याचे सेवन सतत चालु राहिल्यास भरण कार्य करणाऱ्या यकृताची दुष्टी होण्यास सुरवात होते.

यकृत दुष्टी :

हेतू सेवनामुळे पार्थिव गुणांची वाढ

↓

यकृता जवळ विजातीत द्रव्याचे वर्धन

↓

पित्तस्त्रावात विकृती निर्माण होते

↓

मलाची साम्यता बिघडते

↓

स्त्रोतोरोध

↓

दोषांची साम्यावस्था बिघडते

↓

यकृत दुष्टी/वृद्धी

यकृत दुष्टी झाल्यानंतर अग्निसंस्था खिळखिळी होऊ लागते, पंचमहाभुताग्निची क्रिया व्यवस्थित न झाल्याने आहार रसात असणारे जाठराग्नि मांद्यामुळे निर्माण झालेले अपाचित अंश धात्वग्निकडे पाठवले जातात. या ठिकाणी सुद्धा धात्वग्नीचे सामथ्य अशा प्रकारचा आहार घटक पचन करण्यास कमी पडु लागतो.

याबरोबर अवस्थापाक व्यवस्थित होत नाही, पित्ताचा सर गुण कमी होऊ लागतो. पक्वशयामध्ये मल साठुन राहु लागतो व त्यामुळे मलावष्टंभ निर्माण होतो, आकाशाचा अवकाश कमी होतो वायु स्वतःची गती सोडून प्रतिलोमित होतो हा बिघड\;;ा अपान यानंतर इतर वायु व पित्त कफांना दुष्ट करू लागतो त्यावेळी यकृताभोवती पार्थिव असे विजातीय घटक मोठ्या प्रमाणात संचित होऊन २ धातुची दुष्टी होण्यास सुरवात होते. यावेळी रसधातुची दुष्टी होऊन अश्रद्धा अरूची या प्रकारची २ लक्षणे जाणवण्यास सुरवात होते पण अज्ञान वश रूग्ण हेतूचे सेवन सतेच चालु ठेवतो यामुळे दोष हे रक्तधातूकडे वळतात, यावेळी यकृत हे आधीच अधु झालेले असल्याने या दोषांचा प्रतिकार करणे अवघड बनलेले असते, रक्तदुष्टी झाल्यानंतर या दुषित रक्ताच्या सहाय्याने सर्व शरीरामध्ये पोषण होण्यास सुरवात होते यावेळी प्लीहेमध्ये संचय करतात.

रक्ताचा जवळचा असणारा मांस धातु सुद्धा यामुळे बिघडण्यास सुरवात होते संतर्पणोत्य हेतूचे सेवन करीत असतानाच अभिव्यदीनि भोज्यनि कारणांनी मांस धातूच्या ठिकाणी विगुणता निर्माण झालेली असते त्यामुळे व्याधी आपले पक्के ठाण मांडुन बसतो यावेळी रसदुष्टीबरोबर पृथ्वी व वायु तत्वांनी निर्माण झालेली त्वचा दुष्ट होऊन या ठिकाणी व्याधीची अभिव्यक्ती होण्यास सुरवात होते व स्वेदवह स्त्रोतस दुष्ट होते व व्याधीची पूर्वरूप दिसण्यास सुरवात होते यानंतर कुष्ठासारक्या व्याधीत मेदोधातुमुळे कृमींना भुमी निर्माण करून दिली जाते रस रक्त मांस व भेद धातूमध्ये असणाऱ्या द्रव आप महाभुताची दुष्टी होते व व्याधीस संपूर्ण व्यक्तता येते.

यकृत व प्लीहा दुष्टीचा परिणाम साहजिकच मूत्रपिंडावर होतो व सर्व अग्निसंस्था बिघडल्यावर रूग्ण वैद्यासमोर येतो.

या सर्व संप्राप्तिचा भंग करणे आवश्यकक असते, महामंजिष्ठादी काढा भैषज्य रत्नावलीत कुष्ठरोगाधिकारात वर्णन केलेला आहे. या काढ्याचा च गुग्गुळ तयार करून वापल्यास वरील संप्राप्तिचा भंग करण्यास मदत होते.

महामंजिष्ठादी काढ्यामध्ये आलेली औषधे ही प्रामुख्याने तिक्त, कटु रसात्मक आकाश, वायु व अग्नि महाभुतांनी अधिक्याने असणारी आहेत. यामध्ये कुटकी, बहावा, मूर्वा, रिंगर्ण, त्रिफळा, बावची यासारखी सर भेदन धार्मची औषधे आहेत.

यकृताच्या ठिकाणी संचित असल्याने द्रव, सर हे गुण पित्तदोषाच्या ठिकाणी कमी झालेले असतात भेदन धर्माने या ठिकाणी पार्थिव अंश विलग होऊन सर धर्माने आंत्तामध्ये आणले जातात, त्यापुढे हे अंश शरीराबाहेर टाकले जाऊ लागतात जसजसे यकृत हे अंश शरीराबाहेर टाकले जाऊ लागतात. जसजसे यकृत मोकळे होऊ लागते तसतसे मलशुद्धीच्या वेळा वाढु लागतात, वायूच्या प्रतिलोम गतीस यामुळे आवर बसु लागतो, यकृतामध्ये असणाऱ्या क्षारधर्मी पित्ताचे संस्कार योग्य होऊ लागतात याबरोबरच प्लीहा व मूत्रपिंडाची वेगळी चिकित्सा सुरू करावे हे बु या पुस्तकाचे वाचकास सांगण्याची जरूरी नाही असे वाटते यामुळे मलशुद्धी साफ होऊन अग्निवर असणारे आवरण हट्ठु लागते. रूग्णास भुकेची जाणीव होऊ लागते, अग्निसंस्था हळूहळू ताळ्यावर येऊन आपले कार्य करावयास सुरवात करते. सुंठ, अतिविषा यांनी आमविषाचा नाश होतो.

अग्नि आपले कार्य व्यवस्थित करीत असतानाच यकृत मोकळे झालेले असतात यामुळे अन्नावर दोम आग्निंचे संस्कार तरी व्यवस्थित होऊ लागतात. यानंतर रसधातूमध्ये पटोल, कुटकी, शतावरी, पाठा, वचा, गुडुची आदि औषधींच्या गुणामुळे रसामध्ये निर्माण झालेल्या दोषांचे पचन होऊ लागते, धात्वाग्नि वर्धन होऊन रसदुष्टी नाहिशी होते.

पटोल सारीवा, नागरमोथा, पाठ, कुटकी या रक्तपाचक काढ्यात वर्णन केलेली सर्व औषधे या कल्पात असून यामुळे रक्तामध्ये असणारी दुष्टी नाहीशी होते. यासोबतच मंजिष्ठा कुष्ठ हरिद्रा, शतावरी यामुळे रक्ताधातूचे प्रसादन होऊ लागते.

मांसधातूवर कार्य करणारी पटोल, निम्ब, त्रिकष्ण, मुस्ता व इंद्रजव चार औषधांच्या सहाय्याने मांस धातुगत गेलेल्या दोषांचे पचन होऊ लागते व त्वचेवर निर्माण झालेली लक्षणे कमी होऊ लागतात.

रूग्णास आपण बरे होणार याची खात्री वाढते, पुढे कृमीचा नाश करणारी व कुष्ठाधिकारात विशेष वर्णन केलेली बावची करंज, विडंग या औषधांमुळे कृमींचा नाश होऊ लागतो पन फक्त कमींचा नाश करून चाकत नाही कृमीभुमी नष्ट होणे आवश्यक असते किराईत चंदन, गुळवेल व सुंठ ही द्रव्ये मेदोपाचक असुन कृमी निर्मितीस आवश्यक असणारी भूमी नष्ट होते व संपूर्णतया संप्राप्तिभंग होतो.

असे या औषधाचे महानकार्य असले तरी डोळे झाकून वापरल्यास यश निश्चित नाही करिता चरक सुश्रुत वाग्भट यांचा जप जोडीला हवाच.

रोगाशिकार:

१) यकृत दुष्टी

यकृत दुष्टी सोबत रूग्णास रक्तधातूची दुष्टी असल्यास या औषधाचा वापर फलत्रिकादी ऐवजी केला तर उपयोगी होतो.

‘त्वग्दोषास्त्वचिरेण यान्ति विलय कुष्ठानि च अष्टादशः।
नाशं गच्छति वातरक्तमखिला नश्यान्ति रक्तामया
वीसर्पत्वाचे शून्यता नयनजा रोग प्रशाम्यति च ।।’
भै. रत्नावली। कुष्ठाधिकार

२) त्वचादोष, अठराकुष्ठ, उक्तदुष्टी विकार:

या अवस्थेत निर्माण होणारी दुष्टी त्याचा संप्राप्तिभंग कर्मुकता या प्रकरणात वर्ण केलेलाच आहे.

३) विसर्पा:

विसर्पामध्ये कुष्ठाप्रमाणेच दुष्ये असली तरी तो अधिक वेगाने पसरणारा व तेज महाभुत अधिक्याने असणारा व्याधी आहे. यावेळी ज्वर, दाह या सारखी लक्षणे प्रकट होत असताना दिसू लागतात अशा वेळी महामंजिष्ठादी या कल्पाचा वापर शीत अनुपानासोबत करून, आमपाचन करणाऱ्या औषधासोबत दिल्यास संप्राप्तिभंग होण्यास मदत होते.

४) वातरक्त :

या व्याधीमध्ये वायूची व रक्तधातूची दुष्टी वेगवेगळी झालेली असते, वायु महाभुताच्या सुक्ष्म, चल गुणांनी हे दूषित रक्त व वायु सर्व स्त्रोतसांमधून फिरू लागतात व वैगुण्याचे ठिकाणी संश्रय करतात यावेळी स्वेदअप्रवृत्ती, अतिप्रवृत्ती तोद, भेद, कंडु, सुप्तता, वेदना या सारख्या लक्षणांची निर्मिती होऊ लागते. यासोबत दोषानुसार वेगवेगळी लक्षणे दिसत असतातच.

चिकित्सा करताना रक्तामध्ये असणारे दोष शरीरामधून पित्तावाटे बाहेर काढून टाकण्यास विरपन सांगितले आहे.

महामंजिष्ठादी काढ्यातील गुडुची वातघ्न, रक्तदुष्टीहर आहे यातील भेदन व सर धर्माच्या वनस्पतींनी रक्तामध्ये असणारी दुष्टी शरीराबाहेर घालवली जाते व वायुचे शमन होते व सप्राप्तिभंग होतो.

नेत्ररोग :

'सिरानुसारिभिर्दोषे विगुणौरुर्ध्वमागते ।
जायन्ते नेत्रभागेषु रोगापरम दारूणा ।।'

सु.उ.अ. १।२०

रक्त धातू पासून सर्व अवयवांचे पोषण होत असते नेत्र सुद्धा याला अपवाद नाहीत. किंबहुना आलेचक पित्त्ाचे पर्येयाने तेज या महाभुताचे स्थान वर्णन केलेले आहे. यकृत दुष्टी नंतर कामलेमध्ये दुषित पित्त उर्ध्वगामी होऊन नेत्राच्या ठिकाणी आपली व्यक्ती दाखवत असते. उष्ण, तीक्ष्ण गुणांनी वाढल्यानंतर रूग्ण नेत्रदाहची तक्रार करीतच असते यामुळे नेत्रारोगामध्ये 'उष्णभितप्तस्थ' या सारख्या हेतूच्या सेवनाने रक्ताची पर्यायाने यकृताची दुष्टी झाल्यास ती दुष्टी दुर करण्यास महामंजिष्ठादि काढा वापरता येतो. विस्त्रता द्रवताराग स्पंदता लघुता। सु.सू १४ ।९ या गुणांनी युक्त असणाऱ्या रक्तधातूची दूष्टी त्याच्या गुणामध्ये विकृती आल्यामुळेच होत असते यावेळी विस्त्रता, द्रवता व राग हे क्रमाने पृथ्वी आप व तेज यामहाभुताचे गुण विकृत होऊन नेत्राच्या ठिकाणी होणाऱ्या व्याधीमध्ये या औषधाचा वापर करता येईल असा विश्वास वाटतो.

यामध्ये असणाऱ्या औषधांनी विस्त्रता, द्रवता हे गुण शरीरामधून यकृताकडुन पित्तावाटे बाहे काढुन टाकले जातात व संप्राप्त भंग होऊन नेत्ररोग कमी होऊ लागतो शेवटी 'संक्षेपत क्रियायोगो निदान परिवर्जनम्। वातादिनां प्रतीघातः प्रोक्तः विस्तरतो पुनः ।।' सु. ३ अ १ ।२५

हे सूत्र चिकित्सेस वापरणे आवश्यक असते.

मात्रा :- **250mg+500mg**

अनुपान :- गरम पाणी

काल :- सकाळी ६ वाजता

सायंकाळी ६ वाजता व्याधीअवस्थेनुसार

## पांभौतिक तक्ता

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | मंजिष्ठा | मधूर<br>तिक्त<br>कषाय | पृथ्वी आप<br>वायु आकाश<br>पृथ्वी वायु | उष्ण, गुरू<br>रूक्ष | रक्तशोधक<br>आर्तवजनन | अम्लधर्मी<br>वर्ण्य |
| २) | मुस्ता | कटु<br>तिक्त<br>कषाय | वायु अग्नि<br>वायु आकाश<br>वायु पृथ्वी | शीत, रूक्ष | ग्राही | दीपन<br>पाचन |
| ३) | कुडासाल | कटु<br>कषाय | वायु अग्नि<br>पृथ्वी वायु | रूक्ष | शीत | दीपन |
| ४) | गुडुची | तिक्त<br>कटु | वायु आकाश<br>वायु अग्नि | रूक्ष | रसायन | दीपन |
| ५) | कुष्ठ | मधुर<br>कटु<br>तिक्त | पृथ्वी आप<br>वायु अग्नि<br>वायु आकाश | लघु, रूक्ष | तीक्ष्ण | अनुलोमन |
| ६) | सुंठ | कटु | वायु अग्नि | लघु, उष्ण<br>रूच्य | स्निग्ध | पाचन<br>क्षारधर्मी |
| ७) | भारंगीमुळ | कटु<br>तिक्त<br>कषाय | वायु अग्नि<br>वायु आकाश<br>वायु पृथ्वी | उष्ण, रूच्य<br>रूक्ष | रक्तशोधन | दीपन<br>पाचन |
| ८) | शिंगणी | तिक्त<br>कटु | वायु आकाश<br>वायु अग्नि | उष्ण, रूक्ष<br>सर लघू | गर्भकरिणी<br>पाचनी | सर |

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| ९) | वचा | तिक्त<br>कटु | वायु आकाश<br>वायु अग्नि | लघु, उष्ण | मेध्य | - |
| १०) | निंबत्वक् | तिक्त<br>कषाय | वायु आकाश<br>वायु पृथ्वी | शीत लघु<br>ग्राही | अग्निवातहर | मांसगामी |
| ११) | हरिद्रा | कटु<br>तिक्त | अग्नि वायु<br>आकाश वायु | उष्ण रूक्ष | रक्तप्रसादक | अम्लधर्मी<br>वर्ण्य |
| १२) | दारूहरिद्रा | तिक्त<br>कषाय | वायु आकाश<br>वायु पृथ्वी | लघु, रूक्ष | छेदन | यकृत, रक्तगामी |
| १३) | त्रिफळा | पंचरसात्मक | - | दीपनी, रुच्या | मेहकुष्ठहर | सर, अम्लधर्मी |
| १४) | पटोल | तिक्त | वायु आकाश | अनुष्णा, स्निग्ध<br>वृष्य | कृमीघ्न | विरेचक |
| १५) | कुटकी | तिक्त<br>कटु | वायु आकाश<br>वायु अग्नि | लघु, रूक्ष | शीत<br>भेदिनी | दीपन |
| १६) | मुर्वा | मधुर<br>तिक्त | पृथ्वी जल<br>वायु आकाश | गुरू, रुच्य | कृमीघ्न | सर |
| १७) | विडंग | तिक्त<br>कटु | वायु आकाश<br>वायु अग्नि | रूक्ष, रूच्य | अग्निकृत | दीपन |
| १८) | इंद्रवारूणी | तिक्त | वायु आकाश | लघु, उष्ण | वामक, विरेचक | सर |
| १९) | धमासा | कषाय<br>तिक्त<br>मधुर | वायु पृथ्वी<br>वायु आकाश<br>पृथ्वी जल | शीत, लघु | पित्तस्त्रकुष्ठजित | भ्रमहारी |

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| २०) | सारीवा | मधुर<br>तिक्त | पृथ्वी जल<br>वायु आकाश | गुरू, स्निग्ध<br>शीत | रक्तदोषहर<br>स्निग्ध | वृष्य, क्षारधर्मी |
| २१) | पित्तपापडा | तिक्त | वायु आकाश | संग्राही, शीत<br>लघु | दाहनुत<br>वातल | भ्रमहारी |
| २२) | असाणा | - | - | - | - | - |
| २३) | चित्रक | कटु | वायु अग्नि | उष्ण लघु | ग्राही | दीपन-पाचन |
| २४) | शतावरी | तिक्त<br>मधुर | वायु आकाश<br>पृथ्वी जल | शीत, गुरू<br>स्निग्ध | रसायन<br>वृष्य, स्तन्यजनन | धी, धृती, स्मृती<br>मेषा वर्ग |
| २५) | त्रायमाण | तिक्त<br>कषाय | वायु आकाश<br>वायु पृथ्वी | शीत | पित्तकफहर<br>सर | भ्रमहारी |
| २६) | पिंपळी | कटु | वायु अग्नि | अनुष्ण | वृष्य, स्निग्ध | दीपन |
| २७) | इंद्रजव | कटु | वायु अग्नि | शीत | संग्राही | दीपन |
| २८) | वासा | तिक्त<br>कषाय | वायु आकाश<br>वायु पृथ्वी | लघु, शीत | स्वंभन<br>स्त्रोतोरोधहर | - |
| २९) | मासा | तिक्त<br>कटु | वायु आकाश<br>वायु अग्नि | रूक्ष, लघु | रसायन | त्वचागामी<br>क्षारधर्मी |
| ३०) | देवदार | तिक्त<br>कटु | वायु आकाश<br>वायु अग्नि | लघु, स्निग्ध | कृमीघ्न<br>वातहर | रसारक्तगामी<br><br>रव रक्त |
| ३१) | पाठ | कटु<br>तिक्त | वायु अग्नि<br>वायु आकाश | उष्ण, तीक्ष्ण | लघु<br>पाचन | |

| अ.नं. | द्रव्य | रस | महाभुत | सामान्य गुण | विशेष गुण | गामित्व/धर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| ३२) | खैर | तिक्त<br>कषाय | वायु आकाश<br>पृथ्वी वायु | शीत | मुखदुर्गधीहर<br>स्तंभन | - |
| ३३) | श्वेतचंदन | तिक्त<br>मधुर | वायु आकाश<br>पृथ्वी जल | लघु, रूक्ष | तृषणाहर | रक्तगामी |
| ३४) | निशोत्तर | मधुर | पृथ्वी जल | उष्ण | दाहहर, रेचन | भ्रमहारी |
| ३५) | वरूण | कषाय<br>तिक्त<br>कटु | पृथ्वी वायु<br>वायु आकाश<br>वायु अग्नि | उष्ण | रक्तदोषहर<br>अश्मरीभेदन | मूत्रगामी |
| ३६) | किराईत | तिक्त | वायु आकाश | लघु, रूक्ष<br>शीत | दाहहर | सर |
| ३७) | बावची | मधुर<br>तिक्त | पृथ्वी जल<br>वायु आकाश | उष्ण, तीक्ष्ण | कृमीघ्न<br>क्लेदहर | सर |
| ३८) | बहावा | मधुर | पृथ्वी जल | शीत | कुष्ठघ्न | स्त्रंसन, अम्लधर्मी |
| ३९) | सोहादा | - | - | - | - | - |
| ४०) | करंजसाल | तिक्त<br>कटु | वायु आकाश<br>वायु अग्नि | उष्ण, तीक्ष्ण | शोथहर<br>कृमीघ्न | भेदन |
| ४१) | अतिविषा | कटु | वायु अग्नि | स्निग्ध | आमविषहर | दीपन-पाचन |
| ४२) | ताळा | तिक्त<br>मधुर | वायु आकाश<br>पृथ्वी जल | शीत | स्तंभन | पाचन |

PARASNATH®
SPECIALITY CLINICS
ILLNESS TO WELLNESS

Advance
**SRDP**
Treatment

# THERAPEUTIC INDEX

## Ayurvedic Proprietory Medicine




- Acidoflex Tablet
- Hematoflex Tablet
- Laxoflex Tablet.
- Edoflex Tablet
- Ostoflextablet
- Painoflex Tablet
- Rhumoflex Tablet
- Stresoflex Tablet
- Teroflex Tablet
- Uriflex Tablet
- Coloflex Tablet
- Dermoflex Tablet
- Shallaki Tablet
- Spino Tablet
- SRDP Tablet
- Gasoflex Tablet
- Piloflex Tablet
- Nuroflex Tablet
- Stenoflex Tablet
- Digiflex Tablet
- Oxy Care Tablet
- Retune Tablet
- Orthofllex Tablet
- Uriflex Granules
- Rhumoflex Granules
- Flexibreath Granules
- SRDP Granules
- Rhumoflex Pottali Churna
- Painoflex Oil
- Laxoflex Pain Oil
- Rhumoflex Oil
- SRDP Pottali Oil
- SRDP Liniment
- Rhumoflex Syrup
- Teroflex Syrup
- Painoflex Syrup
- Oedoflex Syrup
- Retune Syrup
- Rhumoflex Kit
- Spinoflex Kit
- Painoflex Kit
- Teroflex Kit
- Lipoflex Kit

Scan the code and download Therapeutic Index

✓ Attractive margin
✓ Prepared by Panchbhautik Methods
✓ Bhavana Samakar
✓ Quick Acting
✓ Breaks Vyadhi Samprapti




**Our Clinics**

**MUMBAI :** VASHI, THANE, GHATKOPAR, KALYAN, BORIVALI, VIRAR.
**PUNE :** TILAK ROAD, KHARADI , CHINCHWAD


**PARASNATH SPECIALITY CLINIC**
**9082400043**
**For Trade Enquiries**
https://www.parasnathclinics.com/
mbhalchandra27@gmail.com

# PARASNATH® SPECIALITY CLINICS

ILLNESS TO WELLNESS

Joint and Spine | Cancer | Kidney | Heart | Neuro | Liver | Lung | Pancreas | Diabetes | Gynaec

## Excellent Franchisee Opportunity



# Ayush Doctors become an Entrepreneur

## FOFO MODEL

- ✓ Highest Return
- ✓ Quick Break Even
- ✓ Copyright Register SRDP Treatment
- ✓ 15 years of Ayush health care experience
- ✓ 12+ successful clinics in Mumbai and Pune

Scan the code and download Therapeutic Index

What's app your details "i.e. Name, Qualification, Location" on below number:

**+91 93261 17738**
**+91 83290 69156**

(Our executive co-ordinator contact you)